**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ. शी.** : राज्यातील पोलीस भरती प्रक्रियेमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरिता जागा राखून ठेवणे

**मु. शी.** : राज्यातील पोलीस भरती प्रक्रियेमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरिता जागा राखून ठेवणे यासंबंधी ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात होणारी पोलीस भरती ही 'सरळसेवा भरती प्रक्रिया' व 'पोलीस खात्यात काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती' अशा दोन प्रकारे करण्यात येत असतांना सन २००३ नंतर सरळसेवा भरती प्रक्रिया झाली, परंतु आतापर्यंत पोलीस खात्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती प्रक्रिया करण्यात न येणे, यामुळे राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांमध्ये निर्माण झालेले निराशेचे वातावरण, ज्याप्रमाणे सरळसेवा भरती प्रक्रिया करण्यात येते, त्याप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता करण्यात येणारी भरती शासनाने पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1............

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे. मुंबई शहर आणि महाराष्ट्रामध्ये काम करणाऱ्या पोलीस दलातील प्रत्येक कर्मचाऱ्याला असे वाटते की, आपल्या निवृत्तीनंतर आपल्या पाल्याला पोलीस दलामध्ये सेवा करण्याची संधी मिळावी. पोलीस वसाहतीतील निवासस्थानामध्ये राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची निवृत्तीनंतर होणारी परवड आम्ही पाहिली आहे. 2003 पर्यंत पोलीस भरती प्रक्रियेतील शेवटचे दोन दिवस पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी राखीव असायचे. त्यात काही प्रमाणात सवलत देऊन पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना या भरती प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त कसा वाव मिळेल अशी व्यवस्था केली जायची. परंतु 2003 नंतर ही व्यवस्था खंडित करण्यात आली आणि फक्त थेट भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली.

सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, एका पाल्याला पोलीस भरतीमध्ये सवलत दिली जाते. हे उत्तर दिशाभूल करणारे आहे. पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्याला पोलीस भरती प्रक्रियेमध्ये कोणतीही सवलत मिळत नाही. फक्त अनुकंपा तत्वावरील भरतीकरिता 5 टक्के सवलत देण्यात आली आहे. परंतु अनुकंपा तत्वावरील भरतीचे प्रमाण अत्यल्प आहे. माननीय गृहमंत्र्यांनी त्यांच्याच पोलीस दलातील कर्मचाऱ्यांबाबत सहानुभूतीचा दृष्टीने बाळगून निर्णय घ्यायचा आहे आणि ते त्या अनुषंगाने निर्णय घेतील अशी मी आशा बाळगतो.

सभापती महोदय, पोलीस कर्मचाऱ्यांबाबत सहानुभूतीचा दृष्टीकोन राखून त्यांच्या पाल्यांना 2003 पूर्वी ज्याप्रमाणे पोलीस भरती प्रक्रियेत सवलत दिली जात होती, ती सवलत पुन्हा सुरु करण्यात येईल काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, 2003 पूर्वी सुध्दा पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी पोलीस भरतीकरिता आरक्षण नव्हते. त्यावेळी सेवायोजन कार्यालयाकडून नावाची शिफारस करण्यात येत असे. त्यांच्याकडून शिफारस करण्यात आलेल्या यादीमध्ये जरी नाव नसले तरी पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पाल्याला थेट भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची सवलत देण्यात येत असे. जरी सेवायोजन कार्यालयाकडून नावाची शिफारस आली नसली तरी पोलीस भरती प्रक्रियेमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पाल्याला सहभागी करुन घेतले जात होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

मात्र भरती ही मेरिटवर होत असे. पोलीस कर्मचाऱ्यांनी शासनाकडे मागण्यांचे निवेदन दिलेले आहे. वारंवार त्यांची शिष्टमंडळे माझी भेट घेत असतात. आता पोलीस भरतीसाठी जे आरक्षण आहे त्यात सामाजिक आरक्षण 52 टक्के असून समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिकांकरिता 15 टक्के, प्रकल्पग्रस्तांसाठी 5 टक्के, भूकंपग्रस्तांसाठी 2 टक्के, अपंगांसाठी 3 टक्के, महिलांकरिता 30 टक्के, खेळाडूंसाठी 5 टक्के, पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी 10 टक्के अशाप्रकारे 52 टक्के सामाजिक आरक्षणाबरोबरच 70 टक्के समांतर आरक्षण आहे.

सभापती महोदय, काही ठराविक कॅटेगरीमधून पोलीस दलामध्ये पात्र उमेदवार भरतीसाठी उपलब्ध होत नाहीत. समांतर आरक्षणातील काही आरक्षणे राखीव ठेवून सुध्दा ती भरली जात नाहीत. देशाची सेवा करणारे माजी सैनिक यांच्यासाठी पोलीस भरती प्रक्रियेमध्ये 15 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. या कर्मचाऱ्यांची सुध्दा अशाच प्रकारची मागणी आहे. म्हणून पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र उमेदवारासाठी समांतर आरक्षणामधील जी आरक्षणे भरली जात नाहीत त्याची पुनर्रचना करुन 10 टक्के जागा पोलिसांच्या पाल्यांसाठी राखीव ठेवण्याच्या प्रस्तावावर विधी व न्याय आणि सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेऊन लवकरच तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेला जाईल.

सभापती महोदय, समांतर आरक्षणातील 10 टक्के जागा पोलिसांच्या पाल्यांसाठी राखीव असाव्यात अशी गृहमंत्री म्हणून माझी आणि गृह विभागाची सुध्दा धारणा आहे. राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना निश्चितपणे न्याय दिला पाहिजे, म्हणून पॉझिटिव्ह विचार करुन लवकरात लवकर हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर जाईल या दृष्टीने प्रयत्न केला जाईल आणि लवकरच हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर केला जाईल.

नंतर बी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .........

पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी समांतर आरक्षणातील 10 टक्के जागा रिझर्व्ह ठेवण्याबाबत सकारात्मक दृष्टीने विचार करुन हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवला जाईल.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांच्याबाबत माझी तक्रार आहे. राज्यात कोठेही काही घटना घडली की, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे या त्या ठिकाणी पोहचतात. घटना घडण्याच्या अगोदर त्या घटनास्थळी पोहचतात, असे मी काही म्हणणार नाही. परंतु आजच्या सर्व वर्तमानपत्रात बातमी छापून आलेली आहे की, संपूर्ण राज्यामध्ये महाराष्ट्रात महिला कॉन्स्टेबलची संख्या सर्वात जास्त आहे. एवढी मोठी बातमी असतांना ही बातमी सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने महत्वाची नव्हती काय ? त्या केवळ बाजूला बसून शासनावर टीका करण्याचे काम करीत असतात. देशात महिला कॉन्स्टेबलची संख्या पुरेशी नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु मागील 5 वर्षामध्ये देशातील इतर राज्यांपेक्षा आपल्या राज्यात सर्वात जास्त महिला कॉन्टेबलची संख्या आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वारंवार असे म्हणत असतात की, आम्ही शाहू, फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतो. मी आपणास सांगू इच्छितो की, आम्ही केवळ शाहू, फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे केवळ नाव घेतो असे नाही तर आम्ही त्यांचे विचार देखील कृतीतही आणतो. देशात सर्वात जास्त महिला पोलीस आपल्या राज्यात असल्याबद्दल सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी निदान एका शब्दाने तरी राज्य शासनाचे अभिनंदन करण्याची आवश्यकता होती,असे मला वाटते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करते. महिला पोलिसांच्या भरतीच्या संदर्भात आपण पाऊल उचलले आहे. परंतु संपूर्ण देशात या संदर्भात जागृती होण्याच्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय स्थरावर आपण काही विचार केलेला आहे काय,असे मला आपले अभिनंदन करतांना विचारावेसे वाटते.

उप सभापती : ठीक आहे. आता दुसऱ्या क्रमाकांची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील एकूण ७ तालुक्यांना नक्षलप्रभावीत यादीतून वगळण्याचा घेण्यात आलेला निर्णय

मु. शी. : गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील एकूण ७ तालुक्यांना नक्षलप्रभावीत यादीतून वगळण्याचा घेण्यात आलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री राजेंद्र जैन, हेमंत टकले, विक्रम काळे, सतीश चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. राजेंद्र जैन ( भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाच्या गृह मंत्रालयाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी परिपत्रक काढून गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील एकूण ७ तालुक्यांना नक्षलप्रभावीत यादीतून वगळण्याचा घेण्यात आलेला निर्णय, यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, गोरेगांव, तिरोडा, आमगांव असे ४ तालुके आणि भंडारा जिल्ह्यातील साकोली, लाखनी, लाखांदूर अशा ३ तालुक्यांचा समावेश असणे, मध्यप्रदेशातील अति नक्षलप्रभावीत जिल्हे सदर दोन्ही जिल्ह्यांना लागून असणे, ज्यामुळे नक्षलवाद्यांची दोन्ही जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये सतत आवागमन सुरु असणे, त्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील जनता नक्षल कारवायांमुळे त्रस्त असताना सदर तालुके  नक्षलग्रस्त यादीतून वगळण्याचा घेतलेला निर्णय, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष आणि असुरक्षिततेची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन : सभापति महोदय,गोंदिया और भंडारा जिले मध्यप्रदेश तथा छत्तीसगढ़ राज्य की सीमा से लगे हुए हैं. हमारे गोंदिया जिले के चार तालुके एवं भंडारा जिले के 3 तालुके यानी कुल 7 तालुके पहले नक्सलग्रस्त एरिया में समाविष्ट थे. लेकिन अब अचानाक उन 7 तालुकाओं को नक्सलग्रस्त एरिया से अलग कर दिया गया है. यहां पर उत्तर में दिया गया है कि "संबंधित जिल्हयात नक्षल हालचालीबाबत गत वर्षात कमीत कमी 5 गुन्हे दाखल असणे". नक्सलवादी किसी को बताकर तो गुन्हा करते नहीं हैं. मेरा कहना है कि हमारे गोंदिया जिले के जो चार तालुके हैं, वे गडचिरोली जिले से लगे हुए हैं, मध्यप्रदेश राज्य से लगे हुए हैं तथा छत्तीसगढ़ राज्य से लगे हुए हैं. कुछ दिनों पहले गोंदिया शहर से सिर्फ तीन किलोमीटर दूर नक्सलियों का एक सेंटर पकड़ा गया है. इस सेंटर की जानकारी बड़े पैमाने पर पुलिस के पास है. आमगांव और सालेकसा की एक पूरी बार्डर लगी हुई है. सालेकसा में रोज नक्सलवादी गतिविधयां होती हैं और आमगांव में भी कई नक्सली घटनाएं हुई हैं. सरकार कहती है कि कम से कम 5 गुन्हे दाखल होने चाहिए.

यदि गोंदिया और भंडारा जिले का रिकार्ड देखा जाए तो गोंदिया और भंडारा जिला नक्सलग्रस्त और दुर्गम भाग होने की वजह से वहां पर कई शासकीय कार्यालयों में अनेक शासकीय अधिकारियों के पद रिक्त हैं. इसके बावजूद सरकार ने इस प्रकार से निर्णय लेकर इन सात तालुकाओं को नक्सलग्रस्त एरिया से बाहर निकाल दिया है. इस निर्णय की वजह से नक्सलियों का हौसला बढ़ेगा.

**उप सभापति** : आपका सवाल क्या है ?

श्री राजेंद्र जैन : सर, मेरा सवाल यह है कि नक्सलग्रस्त भाग में ये सातों तालुके जुड़े रहने चाहिए. सरकार को इस बात का इंतजार नहीं करना चाहिए कि जब कोई घटना होगी तब इनको फिर से नक्सलग्रस्त भाग में शामिल करेंगे. मेरा स्पष्ट रुप से कहना है कि सरकार के इस निर्णय से हमारे जिले का विकास रुकेगा. वहां पर कई अधिकारियों ने तथा मास्टरों ने वहां से ट्रांस्फर कराने की एप्लीकेशन दी है. इसकी वजह से हमारे जिले का बहुत नुकसान होगा.

सभापति महोदय, यहां पर माननीय गृह मंत्री उपस्थित हैं. मैं आपके माध्यम से गृह मंत्री महोदय से अनुरोध करुंगा कि जिस प्रकार से ये सात तालुके पहले नक्सलग्रस्त एरिया से जुड़े

...4



SGJ/ KTG/ D/ प्रथम श्री. भोगले....... 10:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन...

हुए थे, वहां की सुरक्षा और विकास की दृष्टि से ये सातों तालुके अब भी नक्सलग्रस्त एरिया से जुड़े रहने चाहिए. इसलिए मेरा प्रश्न यह है कि क्या इस तरह का निर्णय सरकार आज ही लेगी ?

( इसके बाद श्री भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, केंद्र व राज्य शासनाने नक्षलग्रस्त जिल्हे, तालुके घोषित करण्यासाठी संबंधित जिल्ह्यात नक्षल हालचालीबाबत गतवर्षात कमीतकमी 5 गुन्हे दाखल असणे, नक्षलग्रस्त भागामध्ये सशस्त्र नक्षल दलमचे अस्तित्व किंवा वावर असणे, नक्षलग्रस्त असलेल्या जिल्ह्याशी लगत असलेली सीमा असे निकष लावलेले आहेत. हे तीन निकष असतील तर संबंधित जिल्हे, तालुके नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात येतात. त्या भागाच्या विकासासाठी विशेष डेव्हलपमेंट फंड दिला जातो. त्याच बरोबर त्या भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष वेतन दिले जात आहे. या भागातील कर्मचाऱ्यांना विशेष वेतन देऊन सुद्धा त्या भागातील पदे रिक्त रहात आहेत. ज्या भागामध्ये नक्षली कारवाया होत नाहीत त्या भागातील शासकीय कर्मचाऱ्यांना अधिकचे फायदे दिले जात आहेत. तथापि, नक्षलग्रस्त भागात त्यांची पोस्टींग केल्यानंतर पोस्टींग नाकारली जात आहे. या पुढच्या काळात कोणीही या भागातील पोस्टींग नाकारले तर नक्षलग्रस्त भागामधील जे विशेष भत्ते दिलेले आहेत ते वसूल करण्याची भूमिका देखील घेण्यात येईल.

येथे जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यातील तालुके नक्षलग्रस्त असलेल्या जिल्ह्याशी लगत आहेत त्यामुळे आम्ही 4 फेब्रुवारी 2013 रोजी जे परिपत्रक काढले आहे त्यास आजच्या आज स्थगित देऊ. तसेच, पुढील दोन महिन्यात एक बैठक घेऊन या भागत कुठल्या सवलती सुरू ठेवल्या पाहिजेत, कुठल्या बंद केल्या पाहिजेत याच निर्णय घेण्यात येईल. दिनांक 4 फेब्रुवारी 2013 रोजी गृह विभागाने जे शासकीय परिपत्रक काढले आहे त्याला आम्ही आता स्थगित देत आहोत.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकेले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी गोंदिया, भंडारा जिल्ह्याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यास माननीय गृह मंत्र्यांनी खूप सकारात्मक उत्तर दिलेले आहे. शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे नक्षलग्रस्तांचा प्रभाव आता कमी होत आहे. जे सुरक्षा कवच होते ते अचानक काढून घेतल्यामुळे लोकांमध्ये वेगळी भावना निर्माण होते. शासन जे परिपत्रक काढते ते सर्वांकडे जाते. त्याप्रमाणे ते नक्षलग्रस्तांकडे देखील जाते. शासनाने कवच काढून घेतल्याची बातमी पसरली तर तेथे पुन्हा काही तरी प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण होते. येथे जो निर्णय आता माननीय मंत्र्यांनी घोषित केला आहे तो अत्यंत चांगलाच आहे. आज या भागात शासकीय पदे रिक्त आहेत. आपण मानव विकास निर्देशांकामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपण एकत्रितपणे प्रयत्न केला तर सर्वच भागासंबंधातील परिपत्रक मागे घेण्याची वेळ येऊ शकते. तेव्हा याबाबत अधिक सकारात्मक कारवाई कशा प्रकारे करता येईल याबद्दल गृह विभाग विचार करणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, शासनाने अनेक बाबींवर विचार केला आहे. मी या सभागृहात अनेक वेळा सांगितले आहे की, नक्षल प्रश्न लॉ अँड ऑर्डरचा नाही, तर तो सोशियो इकॉनॉमीचा देखील आहे. त्या भागातील कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्यासाठी पोलिसांची संख्या वाढविणे, गस्त वाढविणे, नक्षलग्रस्तांना प्रतिकार करणे या बाबी पोलीस दलाने हातामध्ये घेतलेल्या आहेत. मी विनम्रपणे सांगू इच्छितो की, केंद्रीय यंत्रणा आणि राज्य सरकारचे पोलीस नक्षलग्रस्त भागात अहोरात्र चांगल्या पद्धतीने काम करीत आहे. नक्षलग्रस्त चळवळींवर नियंत्रण ठेवण्यावर महाराष्ट्र पोलिसांना बऱ्या पैकी यश आलेले आहे. नक्षल चळवळीमध्ये समाविष्ट होणाऱ्या युवकांची संख्या आपण थांबवत नाही, या चळवळीला बाहेरून मिळणारा सपोर्ट जो पर्यंत बंद करीत नाही, तो पर्यंत तेथे नुसतेच पोलीस ठेवून त्या भागात लोकशाही प्रस्थापित होणार नाही. तेथील जनजीवन सर्वसामान्य होऊन विकास प्रक्रियेला चालना मिळणार नाही. सदर चालना मिळण्यासाठी प्रशासन व शासनाच्या प्रत्येक विभाग लोकांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे तेथील

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

भागासाठी निधी कमी पडू न देणे, निधी दिल्यानंतर तो खर्च होण्यासाठी तेथील अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणे, त्या भागाचा विकास करणे या सगळ्याच गोष्टींना आम्ही प्राधान्य दिलेले आहे. 100 टक्के समाधान व्यक्त करता येत नाही. परंतु,आज किमान 30 ते 40 टक्के विकास प्रक्रिया प्रशासनाने तेथे सुरू केली आहे.

.......

.....4

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : ठाणे जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाच्या कामांची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होऊनही संबंधितांवर कारवाई न होणे

**मु.शी.** : ठाणे जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाच्या कामांची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होऊनही संबंधितांवर कारवाई न होणे या सबंधी श्री.दिवाकर रावते, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे व पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या सूर्या प्रकल्पातील निकृष्ट बांधकामे, प्रत्यक्ष काम न करता बोगस बिले तयार करणे, बेकायदेशीर कामाचा वाढीव खर्च दाखविणे, इत्यादीबाबत चौकशी करण्यासाठी ऑगस्ट, २०१० मध्ये नेमलेल्या जलसंपदा विभागाचे सह सचिव समितीने सखोल चौकशी करणे, या चौकशीमध्ये राज्य शासनाचे सुमोर अडीच कोटी रुपयांचे नुकसान झ ााल्याचे आढळून येणे, या गैरव्यवहारात उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता जबाबदार आढळणे, सन २०१० मध्ये नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार संबधित अधिकाऱ्यांकडून वसूलीची कोणतीही कारवाई अद्यापही न करणे, तसेच काम न करता देयकांची पूर्ण रक्कम घेणाऱ्या कंत्राटदारविरुध्द कोणतीही कारवाई न करणे, त्यातच, प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रातील बेकायदा औद्योगिक कारखाने व दगडखाण उद्योगांमुळे हे सिंचन क्षेत्र बाधित होत असणे, या सर्वच बाबतीत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही."

..5

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री (कृष्णा खोरे व पाटबंधारे महामंडळ वगळून)) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ D/ पूर्वी श्री.भारवि... 10:15

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणी अनियमितता झाल्याचे व त्याबाबत चौकशी सुरु असल्याचे उत्तरात नमूद करण्यात आलेल आहे.एकूण 39 अनियमितता झाल्याचे म्हटले आहे. या प्रकरणास तीन वर्षे झालेली आहेत. पंधरा-वीस लाख रुपयांच्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यास तीन-तीन वर्षे लागत असतील तर 700 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचाराची चौकशी करावयाची असेल तर त्यासाठी सात पिढ्या लागतील. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या प्रकरणी भ्रष्टाचार झाल्याचे प्रथम दर्शन मान्य केलेले आहे. अनियमितता झाल्याचे मान्य केलेले आहे. त्या संदर्भात सहसचिवांची सचिवांची चौकशी नेमण्यात आली होती. माझे प्रश्न आहेत की, निधीचा अपहार केल्या संदर्भात पोलीस तक्रार करण्यात आली होती काय, तसेच या प्रकरणाची लवकरात लवकर चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन 2006-2007 मध्ये तत्कालीन सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात तक्रार केली होती. त्या संदर्भात प्राथमिक चौकश्ी करण्यात आली त्यामध्ये 49 कामांमध्ये अनियमितता झाल्याचे दिसून आल्यानंतर संबंधितांवर चार्जशीट बजावण्यात आली. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात आली. यामध्ये गुंतलेल्या चारही अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. या संदर्भात नेमलेल्या विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झ ााल्यानंतर सहा अधिक्ाऱ्यांपैकी कार्यकारी अभियंता श्री.कांबळे हे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्ी वेतनातून एक वर्षाकरिता सहा टक्के रक्कम कपात करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. उर्वरित अधिकाऱ्यांपैकी एक उप विभागीय अभियंता व एक शाखा अभियंता यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. उर्वरित तीन अधिकारी ज्यामध्ये एक उप विभागीय अधिकारी जे सेवानिवृत्त झालेले आहेत व दोन शाखा अभियंता आहेत त्यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणी रिकव्हरी झाली काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्या प्रमाणे या प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून आल्यानंतर चार्जशीट दाखल झाली आहे तसेच विभागीय चौकशी झाली आहे. त्या चौकशीच्या अहवालानुसार कारवाई झालेली आहे. त्यामध्ये कार्यकारी अभियंता (सेवा निवृत्त) यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून सहा टक्के रक्कम एक वर्षाकरिता कपात करण्याचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. एक उप विभागीय अभियंता व एक शाखा अभियंता यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. उर्वरित तीन अधिकारी ज्यामध्ये एक उप विभागीय अधिकारी जे सेवानिवृत्त झालेले आहेत व दोन शाखा अभियंता आहेत त्यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासकीय निधीचा अपहार झाल्याचे विभागीय चौकशीत निष्पन्न झाले आहे. त्यानुसार संबंधितांवर प्रशासकीय सेवेतील शिक्षा सुनावणीत आली. माझा प्रश्न होता की, ज्यांनी निधीचा अपहार केला त्यांच्या विरुध्द पोलीस तक्रार का करण्यात आली नाही ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन 2008 मध्ये तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री.कृष्णा घोडा यांनी तक्रार केली होती. तेव्हा तत्कालीन जलसंपदा मंत्री यांनी या तक्रारीची दखल घेतली. त्यानुसार 175 कामांची चौकशी करण्याकरिता दहा चौकशी पथके नेमण्यात आली होती. या चौकशी पथकाने दिलेल्या अहवालानुसार संबंधितांवर दोषारोप ठेवण्यात आले. त्यानुसार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असे या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. त्यानंतर प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग यांची दिनांक 5.6.2010 रोजी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ठेवलेल्या दोषारोपाप्रमाणे अहवाल प्राप्त झाला आहे. सन 2010 मध्ये श्री.कांबळे यांनी मॅटमध्ये अर्ज दाखल केला होता.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

त्यानंतर चौकशी अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला. माननीय राज्यमंत्र्यांनी त्या बाबत माहिती दिली असून त्या अहवालाच्या अनुषंगाने कारवाई सुरु आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी संबंधितांवर फौजदारी कारवाई करणार काय, अशी विचारणा केली आहे. मी सांगू इच्छितो की, मूळ प्रकल्पानंतर त्याच्या देखभाल व दुरुस्तीचे कामे करताना त्यामध्ये काही प्रमाणात अनियमितता आणि अपहार झाल्याची वस्तुस्थिती नाकारता येत नाही. चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल आणि सन्माननीय सदस्य करीत असलेली मागणी या बाबी सुध्दा तपासून बघितल्या जातील. या सर्व बाबींची तपासणी करुन संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करणे शक्य असेल तर, 15-20 दिवसांत तो दाखल करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी मॅटच्या कार्यकक्षा समजल्या पाहिजेत. अपहार करणारे अधिकारी/कर्मचारी मॅटमध्ये जातात. वास्तविक पाहता प्रशासकीय सेवेत असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत सरकारने दिलेला निर्णय व्यवस्थित नसेल तर त्यावर दाद मागण्यासाठी मॅटमध्ये जाता येते. परंतु आज मॅटचा दुरुपयोग केला जात आहे. एका बाजूला भ्रष्टाचार करायचा आणि दुसऱ्या बाजूला मॅटमध्ये जायचे असा प्रकार आज सुरु आहे. या सभागृहात मॅटच्या बाबतीत चर्चा करावी अशी मी वारंवार मागणी करीत आहे. प्रत्येक वेळी मॅटमध्ये जाऊन सरकारला आव्हान दिले जाते. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, मॅट ही यंत्रणा भ्रष्टाचाराच्या बाबतीत दाद मागण्यासाठी आहे काय, या संदर्भात शासनाची नक्की भूमिका काय राहणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मॅट हा विषय माझ्या विभागाशी निगडित नाही. सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्य सुध्दा या बाबतीत आग्रही आहेत. या संदर्भात असलेली भूमिका सभागृहात या निमित्ताने निश्चितपणे घेतली जाईल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कर्मचारी सेवानिवृत्ती भत्ता, निर्वाह भत्ता तसेच इतर भत्त्यांच्या बाबतीत संबंधित व्यक्ती मॅटमध्ये गेल्या आहेत. मॅटच्या कार्यकक्षा हा स्वतंत्र विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी जी बाब सांगितली ती तपासून या बाबतीत जो निर्णय घ्यावयाचा आहे तो निश्चितपणे घेतला जाईल.

-----------

..2..

01-04-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-2

SJB/ KTG/ D/ पूर्वी श्री.अजित..... 10:20

**पृ. शी.** : दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना महत्त्वपूर्ण ठरलेली राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना अकोला व वाशिम जिल्ह्यांमध्ये बंद असणे

**मु. शी.** : दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना महत्त्वपूर्ण ठरलेली राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना अकोला व वाशिम जिल्ह्यांमध्ये बंद असणे, या संबंधी डॉ. रणजित पाटील, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, प्रवीण पोटे-पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना महत्वपूर्ण ठरलेली राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना (R.S.B.Y.) अमरावती विभागातील अकोला व वाशिम या जिल्ह्यामध्ये बंद असणे, राज्यातील राजीव गांधी जीवनदायी योजना लागू होण्यास विलंब होत असणे, अशा परिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा विमा योजनेस मुदत वाढ देवून निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, निधी अभावी सदर योजना बंद पडण्याच्या स्थितीत असून या योजनेस निधी उपलब्ध करुन दिल्यास रुग्णांची विशेषत: दारिद्रय रेषेखालील रुग्णांची गैरसोय होणार नाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसम मुश्रीफ ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

डॉ.रणजित पाटील : महोदय, गेल्या अधिवेशनात सुध्दा हा विषय उपस्थित झाला होता. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद केले आहे की, ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागाकडे ट्रान्सफर करणार आहोत. महोदय, विदर्भातील आत्महत्याग्रस्त चार-पाच जिल्ह्यांतील हा प्रश्न आहे. या जिल्ह्यांमध्ये दरडोई उत्पन्न राज्याच्या सरासरी उत्पन्नापक्षा अर्धे आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना 2011 मध्ये सुरु करण्यात आली. ही योजना सर्व ठिकाणी लवकरच सुरु करु असे सांगत दोन वर्षे उलटून गेली आहेत. विदर्भातील दोन-चार जिल्हे वगळता उर्वरित जिल्ह्यात राज्याची कोणतीही योजना सुरु नाही. राष्ट्रीस सुरक्षा विमा योजना एका कुटुंबातील 5 व्यक्तींवर 30 हजार रुपयांपर्यंत उपचार कव्हर करणारी योजना आहे. अकोला आणि वाशिम या दोन जिल्ह्यांत दरडोई उत्पन्न 50-60 हजार रुपये आहे.

मी स्पेसिफिक विचारतो की, या जिल्ह्यांमध्ये ही योजना आपण सुरु ठेवणार आहात काय ? तसेच दुसरी बाब अशी की, राजीव गांधी जीवनदायी योजनेत सर्व आजार कव्हर होत नाहीत. बाकीच्या राज्यांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना आणि राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना या दोन्ही योजना सुरु आहेत. केंद्र सरकारचा 75 टक्के आणि राज्य सरकारचा 25 टक्के हिस्सा या योजनेसाठी येतो. बुलढाणा जिल्ह्यात केवळ 41 हजार कुटुंबे अशी आहेत की, ज्यांना या योजनेचा लाभ घेता येतो. राज्याला विम्याच्या हप्त्यापोटी आपला चौथा हिस्सा द्यावा लागतो. विम्याचा हप्ता 400 रुपये पडतो, त्यातील चौथा हिस्सा म्हणजेच 100 रुपये एका कुटुंबावर खर्च करावे लागतील. 50 लाख रुपये एका जिल्ह्यासाठी आणि अकोला जिल्ह्यासाठी साधारणत: 80-90 लाख रुपये खर्च करावे लागतील. या योजनेमुळे अकोला व वाशिम या दोन जिल्ह्यात दारिद्र्यरेषेखालील लोकांना बराच दिलासा देऊ शकतो. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या दोन जिल्ह्यांसाठी या योजनेला मुदतवाढ देणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना ही गरीब लोकांसाठी अतिशय चांगली योजना होती. दारिद्र्यरेषेखालील एका कुटुंबातील व्यक्तींना 30 हजार रुपयांपर्यंत आरोग्याचा लाभ मिळत होता. आपल्या राज्यात त्या योजनेची योग्यप्रकारे अंमलबजावणी झाली नाही. कारण सार्वजनिक आरोग्य विभागाने या योजनेमध्ये भाग घेतला नाही. ज्या विमा कंपन्यांनी या मध्ये भाग घेतला त्यांनी फार मोठ्या प्रमाणात लूट करण्याचा प्रयत्न केला.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

या राज्यात एकूण लाभार्थी 1 लाख 73 हजार 489 आहेत. आम्ही एकूण 183 कोटी रुपये एवढा इन्शुरन्स भरला आणि फक्त 82 कोटी रुपयांचा क्लेम मिळाला. म्हणजे 40 टक्के सुध्दा क्लेम मिळालेला नाही. म्हणून मी स्वत: या बाबतीत तक्रार केली होती की या ज्या इन्शुरन्स कंपन्या आहेत त्या क्लेम देण्यासाठी नसून त्या फक्त प्रिमियम घेत आहेत आणि गरीब लोकांवर उपचार करण्यामध्ये भाग घेत नाहीत. ते स्मार्ट कार्ड देतात त्यामध्ये बोगस स्मार्ट कार्ड आढळले. ते लांब अंतरावरचे दवाखाने इम्पॅनल करीत असत. ज्या ठिकाणी सुविधा नाहीत असे दवाखाने इम्पॅनल करीत असत जेणेकरुन लोक त्या ठिकाणी जाऊच नयेत, त्यांना उपचार मिळू नयेत आणि त्यांना क्लेम द्यावा लागू नये. अशा प्रकारच्या या योजना होत्या. राज्य शासनाने केंद्रीय कामगार मंत्री मल्लिकार्जून खरगे साहेबांना पत्र लिहिले की, याची खरोखर चौकशी झाली पाहिजे. या योजना इन्शुरन्स कंपन्यांसाठी आहेत की, लोकांसाठी आहेत याची चौकशी झाली पाहिजे असे पत्र आम्ही लिहिले होते. आपल्या राज्यात जी परिस्थिती आहे त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनीही केला.

आपल्या राज्यात 9 जिल्ह्यांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु झालेली आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी साहेबांनी या सभागृहामध्ये अशी घोषणा केली आहे की, मे महिन्यापासून संपूर्ण राज्यभर ही योजना लागू करणार आहोत. त्यामध्ये 970 प्रोसीजर्स आहेत आणि यामध्ये फक्त 600 ते 700 प्रोसीजर्स आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजना जर राज्यभर सुरु झ ाली तर या योजनेचा काहीही उपयोग होणार नाही आणि हेच पैसे आपल्याला तिकडे वापरता येतील. अशा प्रकारची योजना आम्ही सार्वजनिक आरोग्य विभागाकडे दिलेली आहे. आता ही योजना औरंगाबाद, बीड, सातारा, सांगली, भंडारा, गोंदिया, हिंगोली, लातूर, नंदूरबार, नागपूर आणि बुलढाणा जिल्ह्यात चालू आहे आणि त्या ठिकाणच्या योजनेची मुदत संपत जाईल. नाशिक जिल्ह्यात ही योजना चालू आहे. त्याचा 97 टक्के डाटा खराब झालेला आहे. योजनेचे नूतनीकरण न केलेले जिल्हे वर्धा, अकोला, वाशिम, जालना, नांदेड, परभणी, अहमदनगर, चंद्रपूर, ठाणे, उस्मानाबाद, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, कोल्हापूर आणि पुणे हे आहेत. उर्वरित जे 9 जिल्हे आहेत त्या ठिकाणी राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु झालेली आहे. ज्या ठिकाणी योजना चालू

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

आहे आणि त्या योजनेची मुदत संपणार आहे तसेच ज्या ठिकाणी या योजनेची मुदत संपलेली आहे त्या संदर्भात सर्व इन्शुरन्स कंपन्यांना बोलविण्यात येईल आणि ते जर चांगल्या पध्दतीने क्लेम देणार असतील, चांगला लाभ देणार असतील तर निश्चितपणे ही योजना पुन्हा चालू करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत आणि विदर्भाचे पालकत्व त्यांच्याकडे आहे. त्या ठिकाणी सध्या कोणतीही योजना चालू नाही. गेले वर्षभर तेथील बीपीएलच्या लोकांना कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नाही. या बाबतीत ज्या काही तक्रारी असतील त्या या चार पाच जिल्ह्यांमध्ये झालेल्या नाहीत. ज्या ठिकाणी व्यवस्थित काम चालले आहे त्या अकोला आणि वाशिम जिल्ह्यामध्ये तरी ही योजना चालू ठेवणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, ज्या जिल्ह्यामध्ये नूतनीकरण झालेले नाही आणि ज्यांची मुदत संपणार आहे त्या ठिकाणी ताबडतोबीने योजना सुरु करण्याचा विचार करीत आहोत.

---

**लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत**

**उप सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 5 वर सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी दिलेली लक्षवेधी सूचना आहे परंतु सन्माननीय सदस्या आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्या सभागृहात उपस्थित झाल्यानंतर ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ. शी.** : नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाच्या कामात निर्माण झालेला अडथळा

**मु. शी.** : नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाच्या कामात निर्माण झालेला अडथळा यासंबंधी श्री. संजय दत्त, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री चरणसिंग सप्रा, भाई जगताप, सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रलंबित प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊनही प्रत्यक्ष जमीन ताब्यात घेण्यासाठी सिडकोने शेतकऱ्यांशी चर्चा केली असता 30 टक्के विकसित जमीन परत देण्याची शेतकऱ्यांनी केलेली मागणी, मात्र राज्य शासनाने सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार 12.5 टक्के जमीन परत देण्याची घेतलेली भूमिका शेतकऱ्यांना मान्य नसल्याने भूसंपादनाच्या कामास अडथळा निर्माण होणे, जमीन ताब्यात आल्याशिवाय प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला परवानगी मिळणार नाही, अशी केंद्र शासनाने घेतलेली भूमिका, तीन वर्षात या प्रकल्पाची किंमत 9 वरुन 14 हजार कोटीवर गेलेली असणे, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन सदर प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या महत्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचनेच्या रुपाने शासनाचे लक्ष वेधण्याची करण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथम मी आपले आणि माननीय सभापती महोदयांचे आभार मानतो. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा राज्यासाठीच नव्हे तर देशासाठी सुध्दा एक अभिमानास्पद आणि गौरवास्पद प्रोजेक्ट असणार आहे. हा आंतरराष्ट्रीय विमानतळ असल्यामुळे संपूर्ण जगाचे डोळे या प्रकल्पाकडे लागलेले आहेत. एका बाजूला माननीय मुख्यमंत्री, सरकार यासाठी स्वत: प्रयत्नशील आहेत, पाठपुरावा करीत आहेत तसेच शासनाने नुकतीच सिडकोमध्ये एका कार्यक्षम अधिकाऱ्यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केलेली आहे. दुसऱ्या बाजूला 22 नोव्हेंबर 2010 ला प्रोजेक्ट एन्व्हायर्नमेंटल क्लिअरन्स मिळाल्यानंतर सुध्दा या प्रोजेक्टमध्ये बऱ्याचशा प्रॅक्टीकल अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यासंदर्भात माझे तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. या विषयाच्या संदर्भात ते पूर्णपणे पाठपुरावा करीत आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांना विनंती करणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त........
त्यांनी या प्रश्नाकडे थोडेसे लक्ष द्यावे.

माझा पहिला प्रश्न असा आहे की, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या पॅकेजविषयी अडचण निर्माण झालेली आहे किंवा वाद निर्माण झालेला आहे. शासनाची एक भूमिका आहे आणि त्यांची वेगळी मागणी आहे. त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे ? खाजगी मालकीची 291 हेक्टर जमीन संपादित करण्यासंबंधी अडचण निर्माण झालेली आहे. त्याबाबत शासनाचे धोरण काय आहे, या संदर्भात सिडकोने एक प्रस्ताव तयार केलेला आहे त्याबाबत शासनाचे धोरण काय आहे, हा प्रश्न केव्हा सोडविला जाणार आहे ?

फेज-1, 2, 3 व 4 असे चार फेज मान्य झाले होते. ते पूर्ण होण्यासाठी विलंब होणार आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये किती वाढ होणार आहे आणि शासनाच्या नियोजनानुसार फेज-1 केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. राज्य सरकारच्या व केंद्र सरकारच्या मान्यतेने हा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प होणार आहे. राज्य सरकार हा प्रकल्प पूर्णत्वास जावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये त्याबाबत सविस्तर निवेदन करण्यात आलेले आहे. संरक्षण खाते, सीआरझेड, एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया यांच्याकडून या प्रकल्पाला मान्यता मिळालेली आहे. या प्रकल्पासाठी 2072 हेक्टर जमीन लागणार आहे. त्यापैकी 1370 हेक्टर जमीन खाजगी क्षेत्रातून घ्यावी लागणार आहे. 702 हेक्टर शासकीय जमीन आहे. खाजगी जमिनीपैकी 895 हेक्टर जमीन सिडकोने संपादित केलेली आहे. केवळ 475 हेक्टर जमीन संपादित करण्याची प्रक्रिया रायगड जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे शासनाकडून प्रकल्पग्रस्तांना देऊ केलेला दर व प्रकल्पग्रस्तांनी मागणी केलेला दर हा नेहमीच वेगळा असतो. हे नेहमीच घडत असते. त्यामुळे संबंधितांनी केलेली मागणी विचारात घेऊन त्या लोकांच्या हितासाठी अधिकचे देणे शक्य व्हावे यासाठी शासन वेगवेगळ्या स्तरावरुन प्रयत्न करीत असते. प्रकल्पासाठी घेतलेल्या जमिनीच्या प्रमाणामध्ये 12.5 टक्के विकसित केलेली जमीन प्रकल्पग्रस्तांना देण्याची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.भास्कर जाधव....

तरतूद सध्याच्या कायद्यात आहे. परंतु या प्रकल्पग्रस्तांनी 30 टक्के विकसित जमिनीची मागणी केलेली आहे. आजच्या घडीला त्यांच्या मागणीप्रमाणे तेवढी जमीन देणे शक्य होणार नाही. हा प्रकल्प व्हायबल होण्याच्या दृष्टीने किंवा इतर प्रकल्पांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार निर्णय घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे यासंबंधी दोन प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत. पहिला प्रस्ताव म्हणजे तडजोड करुन जमिनीचा भाव ठरविण्यात यावा. त्यांच्या घरासंबंधी, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांच्या शिक्षणासंबंधी किंवा विस्थापित झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या असतील त्याबाबत शासन सहानुभूतिपूर्वक विचार करीत आहे. परंतु त्यांना 30 टक्के जमीन देणे शक्य नाही, जमिनीची नुकसान भरपाई देण्याऐवजी त्यांना 22.5 टक्के विकसित केलेली जमीन देऊन हा प्रश्न सुटू शकतो का यासंबंधी देखील चर्चा सुरु आहे. ही चर्चा लवकरच अंतिम टप्प्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे हे खरे आहे. सर्वच क्षेत्रातील डीएसआरमध्ये वाढ होत आहे. वाढत चाललेल्या डीएसआरमुळे 5 वर्षापूर्वीच्या प्रकल्पाची किंमत दुप्पट होत असते. परंतु ही सातत्याची प्रक्रिया आहे. त्या अनुषंगानेच प्रकल्पांच्या किंमत वाढत असते. सन 2006-07 मध्ये हा प्रकल्प तयार करण्यात आला होता. त्यावेळी प्रत्येक वर्षी या विमानतळावर 40 लाख लोक येतील असे गृहित धरले होते. परंतु आता 60 लाख लोक येतील असे गृहित धरुन तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे फेज 2 किंवा 3 च्या किंमतीमध्ये वाढ झालेली आहे. हे सुध्दा खरे आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

या प्रकल्पाची मूळ किंमत तिपटीने वाढलेली आहे. प्रकल्पाची मूळ किंमत 4766 कोटी रु. होती. आजच्या दराप्रमाणे ही किंमत 14573 कोटी रु. इतकी झालेली आहे. प्रकल्पाची किंमत कितीही वाढली तरी शासन हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे.

श्री. संजय दत्त : या प्रकल्पाच्या कामाला केव्हा सुरुवात होईल ?

श्री. भास्कर जाधव : पीपीएचा अडथळा दूर झाल्यानंतर या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होईल.

श्री. संजय दत्त : राज्यमंत्री महोदयांनी माझ्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिलेली आहेत. तरीही काही प्रश्नांच्या बाबतीत थोडीशी स्पष्टता येणे अपेक्षित आहे. मुंबईतील सध्याच्या सहार आणि सांताक्रुझ या विमानतळावर विमाने उतरण्यासाठी जागा नसल्यामुळे ती आकाशात फिरत असतात. परिणामी तेथे लॅण्डिंगसाठी फार खोळंबा होतो. या नवी मुंबई विमानतळाचा प्रकल्प रखडल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा मुंबईतील सांताक्रुझ आणि सहार विमानतळावर जे कंजेशन झालेले आहे त्याबाबत शासनाचा काही कॉण्टिन्जन्सी प्लॅन आहे काय ? जुहू विमानतळावर सरकारी आणि खाजगी विमाने उतरतात. त्याठिकाणी सीआरझेडचा कायदा शिथिल करुन ज्याप्रमाणे हॉंगकॉंगमध्ये समुद्रात एअरस्ट्रीप करण्यात आली तशी एअरस्ट्रीप करण्यात येईल काय जेणेकरुन नवी मुंबई येथील विमानतळ होईपर्यन्त सांताक्रुझ व सहारा विमानतळावरील ताण कमी होण्यास मदत होऊ शकेल ? मुंबई एअरपोर्टसंबंधी झोपडपट्टीतील 95 हजार लोक बाधित झालेले आहेत. त्यांच्यासाठी पुनर्वसनासाठी साडेतीन हजार घरे बांधलेली आहेत. त्याबाबतीत सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी 6 प्रश्न विचारलेले आहेत. मुंबईतील जुन्या विमानतळासंबंधी त्यांनी प्रश्न विचारलेला आहे. प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे हे खरे आहे. 2006-07मध्ये या प्रकल्पाची किंमत 4766 कोटी रु. होती. आता प्रकल्पाची किंमत 14573 कोटी रु. इतकी अपेक्षित आहे. या प्रकल्पाला आणखी विलंब झाला तर ही किंमत आणखी वाढण्याची शक्यता आहे. यामध्ये तीन-चार महत्वाची कारणे आहेत. आता विमान वाहतूक गतीने वाढत आहे. केन्द्रीय सिव्हिल मंत्रालयाने आता जे नवीन अंदाज केलेले आहेत त्याप्रमाणे प्रतिवर्षी 40 द.ल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

पॅसेंजर ऐवजी 60 द.ल. पॅसेंजर अपेक्षित आहेत. त्यामुळे पॅसेंजर टर्मिनलचा विस्तार अपेक्षित आहे. डीएसआर देखील वाढलेला आहे. समुद्रसपाटी पासूनची उंची 5 मीटर ऐवजी 8 मीटर अशी असावयास पाहिजे. त्यामुळे त्याठिकाणी तेवढी भर टाकावी लागणार आहे. हा खर्च वाढलेला आहे. पर्यावरण खात्याने ब-याच मोठ्या प्रमाणात मॅनग्रोव्ह पार्क करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे मॅनग्रोव्ह पार्कसाठी नवीन जमीन संपादित करावी लागणार आहे. तसेच एक्स्ट्रा हायटेन्शन केबल बदलण्यासाठी खर्च येणार आहे. जमीन अधिग्रहण करण्याचा खर्च देखील वाढलेला आहे. विमानाच्या धावपट्टीची लांबी वाढविण्याचा प्रस्ताव चर्चेतून पुढे आलेला आहे.

मागील दोन आठवड्यापूर्वी नागरी विमान मंत्री मुंबईला आले होते. मुंबईला अधिका-यांसोबत बैठक झाली. त्या बैठकीत नवी मुंबई विमानतळाचा प्रश्न चर्चिला गेला. हे विमानतळ झाले पाहिजे. महाराष्ट्राच्या दृष्टीने हे विमानतळ अत्यंत महत्वाचे आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

देशासाठी आंतरराष्ट्रीय वाहतुकीच्या दृष्टीने हा प्रकल्प अतिशय महत्वाचा आहे. . नवीन मुंबईतील विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे केव्हापर्यंत पूर्ण होईल अशा प्रकारची या ठिकाणी विचारणा केली गेली. या बाबतीत सांगू इच्छितो की, पहिल्या टप्प्याचा खर्च 9 हजार कोटी रुपये एवढा असेल, त्यामागचे कारण जमीन या प्रकल्पासाठी जमीन संपादित करावी लागेल. परंतु यासाठी उर्वरित 279 हेक्टर जमीन संपादित होत नाही, मग तो पर्यंत पुढची प्रक्रिया होऊ शकत नाही. विकासक शोधावयाचा, ज्वाईंट व्हेंचर करावयाचे या गोष्टी जमीन संपादनाशिवाय होणार नाही. जमीन ताब्यात नसली तर त्या गोष्टीमध्ये निश्चितता होते. त्यामुळे बहुतेक कोणी कामे करण्यासाठी पुढे येणार नाहीत ही गोष्ट स्पष्ट आहे. त्या गोष्टी करण्याची प्रक्रिया चालू आहे. गेल्या महिन्यात दिनांक 2 फेब्रुवारी, 2013 मध्ये सर्व प्रकल्पग्रस्तासमवेत बैठक घेतली होती. त्यांनी नवीन जमीन अधिग्रहणाशी जुने सिडकोचे प्रश्न आहेत, त्याच्याशी याचा संबंध जोडलेला आहे. जो पर्यंत आमचे जुने प्रश्न सुटणार नाहीत, तो पर्यंत नवीन जमीन अधिग्रहण करु नये अशा प्रकारची त्या प्रकल्पग्रस्तांची मानसिकता झालेली आहे. परंतु आता युध्द पातळीवर म्हणजे सचिव आणि सिडकोमध्ये नवीन अधिकारी आलेले त्यांच्या पातळीवर या संदर्भात दररोज बैठका घेतल्या जात आहत. मी आणि माननीय उप मुख्यमंत्री आम्ही दोघे या अधिवेशनामध्ये या बाबतीत एक बैठक घेणार आहोत व त्या बैठकीत योग्य तो मार्ग करण्याचा आम्ही प्रयत्न करु.

महोदय, गरजेपोटी घराचा प्रश्न निर्माण झाला आहे, तो प्रश्न देखील या प्रश्नाशी जोडला गेला आहे. तोही प्रश्न महत्वाचा आहे आणि तो प्रश्न सुध्दा आपल्याला सोडवावा लागेल. परंतु सिडको आता नवीन जमीन अधिग्रहण करुन प्रकल्पग्रस्तांची सोय करण्याकरिता प्रोजेक्ट सुरु केलेला आहे. हा प्रकल्प आम्हाला करावयाचा आहे आणि तो करण्याकरिता निश्चितपणे पाऊले टाकतो आहोत. परंतु नवीन मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी लागणारी जेवढी जमीन आहे, तेवढी जमीन अधिग्रहीत केल्याशिवाय आम्हाला पुढे जाता येणार नाही.

सन्माननीय सदस्यांनी मुंबई विमानतळाच्या अनुषंगाने काही प्रश्न विचारले. जुहू विमातळासाठी समुद्रात 1 कि.मी.भर घालून तेथे विमानांसाठी धावपट्टी म्हणून वापर करता येईल काय अशीही माहिती या ठिकाणी विचारली गेली. असाही प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

आपल्याला माहिती आहे की, या देशात अशा प्रकारचा प्रकल्प कोठेही केलेला नाही. अशा प्रकारचे प्रकल्प आंतरराष्ट्रीय स्तरावर बऱ्याच ठिकाणी झालेले आहेत. परंतु याही प्रकल्पाच्या बाबतीत आमच्या दोघांची चर्चा पर्यावरण खात्याशी करावी लागेल तसेच त्यासाठी स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन तद्नंतरच पुढे जावे लागेल.

जुन्या विमानतळाच्या बाबतीत देखील काही प्रश्न विचारले गेले आहेत. तेथेही काही प्रश्न निर्माण झालेले आहेतच. ऑक्टोबर पर्यंत तेथील नवीन विमानतळाच्या कामाचे उद्घाटन होईल, अशी माझी माहिती आहे. तेथील झोपडपट्टीचा प्रश्न आणखी क्लिष्ट झालेला आहे. त्याबद्दलही आमचे प्रयत्न चालू आहेत. मुंबई बद्दल वेगळी नोटीस दिलेली आहे की, या बाबतीत वेगळया पध्दतीने चर्चा करण्यात येणार आहे.

---------------

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरामध्ये वीज दुरुस्ती व देखभाली अभावी वारंवार वीज पुरवठा खंडीत होणे

**मु. शी.** : पुणे शहरामध्ये वीज दुरुस्ती व देखभाली अभावी वारंवार वीज पुरवठा खंडीत होणे यासंबंधी श्री.मोहन जोशी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी रस्त्यावरील डी.पी. व फिडर पीलर माहे मार्च, २०१३ च्या प्रथम सप्ताहापासून उघडे दिसत असणे, वीजवाहिनी जंप तुटल्यामुळे वारंवार वीज खंडीत होणे, त्यातून अपघात होण्याची शक्यता, यामुळे महावितरणाचे मोठ्या प्रमाणात होत असलेले आर्थिक नुकसान, त्याचबरोबर उद्योग, घरगुती ग्राहकांचा वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असणे, जंप तुटणे, डी.पी.जळणे हे प्रकार थांबवून यावर योग्य उपाययोजना करणे आवश्यक असणे, त्याचबरोबर मागील सहा महिन्यांमध्ये पुणे शहर व जिल्ह्यात वीज मंडळ, पुणे जिल्ह्याचा महिन्याला जवळपास ५०० कोटी रुपये महसूल असूनही वीज दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक निधी गेल्या चार महिन्यांत आलेले नसणे, यामध्ये गरीब व गरजू कंत्राटी कामगारांवर अन्याय होत असणे, परिणामी पुणे शहराच्या वीज सुरक्षितेत व मेटेनन्स यावर होत असलेला अनिष्ट परिणाम, यामुळे जनमानसात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातारण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेंद्र मुळक ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातील परिच्छेद क्रमांक 3 मध्ये " न जोडण्याप्रमाणे " असे वाचण्यात यावे अशी दुरुती करीत आहे. लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते सुधारित निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहराच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये जे प्रश्न उपस्थित केलेले होते व त्या प्रश्नांना लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये बगल देण्यात आलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर पुणे शहरातून 600 कोटी रुपये दरमहा या प्रमाणे वर्षाला 7200 कोटी रुपयांचा महसूल दिला जातो. त्या प्रमाणात पुणे शहरातील वीज वितरणाच्या लाईन्सची, डी.पी इत्यादींची देखभाल दुरुस्ती या विभागासाठी जेवढा निधी मिळावयास पाहिजे, तेवढा निधी मिळत नाही एप्रिल, 2011 ते मार्च, 2012 या कालावधीत प्रत्येक आठवडयाच्या गुरुवार हा वीज मंडळाचा दुरुस्तीचा दिवस असतो.

यानंतर श्री. भोगले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक- 7...... श्री.मोहन जोशी.....

परंतु गुरुवारचा दिवस सोडला तर आतापर्यंत एकूण 15230 तास वीज पुरवठा खंडित झाला आहे. जवळपास 30 हजार तास वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे ओव्हर हेड वायरचे जम्पर तुटणे, केबल फॉल्ट असे बिघाड निर्माण झाले. 30 हजार तास वीज पुरवठा खंडित झाला नसता तर शासनाला अधिक महसूल मिळाला असता. म्हणजे वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे शासनाचेच नुकसान झाले आहे.

अनेक भागात डीपी बॉक्स उघडे असतात, त्या माध्यमातून वीज प्रवाह सुरु असतो. लहान मुले खेळताना डीपी बॉक्सच्या जवळपास गेल्यामुळे अनेक ठिकाणी अपघात झालेले आहेत. मंडळाच्या वतीने दुरुस्ती व देखभाल पुरेशा प्रमाणात केली जात नाही. वीज गळती टाळण्यासाठी फिडरचे ऑडिट करुन गळती तपासण्यात यावी तसेच उद्योगांचे देखील ऑडिट करण्यात यावे. डिस्ट्रिब्यूशन लॉसेस कमी करण्यात यावे. पुण्यामध्ये विजेची काटकसर करण्यासाठी लोकांना एलईडी टीव्ही वापरण्यास प्रोत्साहन देण्याची योजना सुरु करण्याबाबत शासनाने निवेदन करावे. डीपी बॉक्स, ओव्हरहेड लाईन्सचे मेन्टेनन्स, जम्परचे मेन्टेनन्स करण्यासाठी प्रभावी जोडणी यंत्रणा सुरु करण्यासाठी पुणे विभागाकरिता किती निधी उपलब्ध करुन दिला जाईल? कॅपॅसिटर बसविणे आवश्यक असून त्याबाबत शासन तातडीने निर्णय घेणार आहे काय?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. साधारणत: पुणे शहरात एकूण 813 फिडर्स आहेत. एकूण उच्च दाब वाहिन्यांची लांबी 2048 आहे. वारंवार वीज पुरवठा खंडित होतो कारण दुरुस्ती व देखभालीचे काम वेळेवर होत नाही असे माननीय सदस्यांनी म्हटले आहे.

सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षात पुणे शहरात विद्युत उपकरणांची निगा व दुरुस्ती याकरिता 10.12 कोटी रुपये प्राप्त झाले होते, ती सर्व रक्कम खर्च करण्यात आली. पोल्सवरील झाकणे चोरीला जात होती, ती बदलण्याचे, जम्पर बदलण्याचे काम करण्यात आले. लूज स्पॅन होते तेही बदलण्याचे काम केले आहे. काही पोल्सवरील झाकणे सातत्याने चोरीला जातात, त्या संदर्भात विभागाने नाशिक भागात तात्पुरती उपाययोजना शोधून काढली आहे. त्यात नवीन पध्दतीने पोल्स इरेक्ट केल्यानंतर अशी माहिती मिळाली की, पोल्स इरेक्ट केल्यामुळे चोरीला आळा बसला आहे. याची संपूर्ण माहिती गोळा करीत आहोत. तशा प्रकारची व्याप्ती ....

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक............

राज्यात इतर भागात करु शकतो का याची व्यवहार्यता तपासून त्यापध्दतीने भविष्यात पोल्स इरेक्ट करण्याचे काम केले जाईल.

सभापती महोदय, साधारणत: रिपेअर ॲण्ड मेन्टेनन्सकरिता पुणे शहरासाठी वर्षात किती निधी मंजूर करण्यात आला व त्यापैकी किती निधी उपलब्ध झाला असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे. पायाभूत आराखडा-1 या अंतर्गत रिपेअर ॲण्ड मेन्टेनन्सकरिता प्रस्तावित रु.258 कोटीपैकी रु.219 कोटीची कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. जून, 2013 पूर्वी ही कामे पूर्ण करण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल. जी काही कामे अपूर्ण आहेत ती जून, 2013 पर्यंत पूर्ण होतील.

नंतर के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, डीपी जळण्याचाही उल्लेख या लक्षवेधी सूचनेमध्ये करण्यात आलेला आहे. या लक्षवेधीच्या संदर्भात उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, पुणे शहरातील विजेच्या देखभालीसाठी 10 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, दि. 26 मार्च, 2013 रोजी गुजरात कॉलनी, कोथरुड मधील त्रिमूर्ती हाईट्स मध्ये डीपीमध्ये स्पार्क झाल्यामुळे त्या ठिकाणी आग लागून 47 दुचाकी वाहने भस्मसात झाली होती. आपण पुणे येथे 10 कोटी रुपये वापरलेले आहेत त्यामुळे पुणे शहरातील डीपीच्या संदर्भात कोणकोणत्या दक्षता घेण्यात आलेल्या आहेत ? या ठिकाणी डीपीमध्ये स्पार्क होऊन आग लागलेली आहे त्यामुळे यासंदर्भात आपण कोणती पाऊले उचलणार आहात ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, डीपीमध्ये काही खराबी झाली तर ताबडतोबीने अशा डीपी बदलण्याची कार्यवाही केली जाते. पुणे शहरात सन 2012 मध्ये डीपींची संख्या 11,800 इतकी होती. पुणे शहरात यावर्षी जळालेल्या डीपींची संख्या 208 आहे. त्यामुळे जळालेल्या डीपींची टक्केवारी 1.8 टक्के इतकी येते. त्रिमूर्ती हाईटस येथे 26 मार्च, 2013 रोजी डीपीमध्ये स्पार्क झ ााल्यामुळे आग लागली नव्हती तर रेफ्रीजरेटरच्या दुकानाला आग लागल्यामुळे ही घटना घडली होती. या ठिकाणी आग लागल्यानंतर त्या ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता.

सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता की, पुणे शहरामध्ये विजेची काटकसर करण्यासाठी एलईडी बल्बचा वापर केला जाईल काय ? यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, एलईडी बल्बचा वापर करणे योग्य आहे परंतु हा निर्णय महानगरपालिकेने घेतल्यास ते जास्त योग्य होऊ शकेल.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहरासाठी 10 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. माहितीच्या अधिकाराखाली मी वीज महामंडळाकडून माहिती मागवली असून त्यामध्ये पुणे शहरात गुरुवार सोडून 30 हजार तास वीज खंडित झालेली आहे असे म्हटले आहे. जर पुणे शहरासाठी विजेच्या संदर्भात 10 कोटी रुपये दिले जात असेल तर 30 हजार तास वीज पुरवठा खंडित होण्याचे कारण काय ? संपूर्ण राज्यात पुणे शहरातून सर्वात जास्त रेव्हेन्यू दिला जात असतांना पुणे शहरासाठी आपण जे 10 कोटी रुपये दिलेले आहेत

..2.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी......

त्या पैशामधून पुणे शहरातील सर्व कामे होणार आहेत काय ? इन्फ्रा वनच्या माध्यमातून पुणे शहरात अतिशय निकृष्ट पध्दतीची कामे झालेली आहेत. त्यामुळे यासंदर्भात चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे काय ? आता आपण इन्फ्रा-2 च्या माध्यमातून कामे केली जातील असे जाहीर केले आहे. परंतु इन्फ्रा वनचे पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण झालेले नाहीत. यासंदर्भात पुरावा म्हणून मी फोटो सुध्दा आणलेले आहेत. त्यामुळे आपण इन्फ्रा वनच्या बाबतीत कोणती कारवाई करणार आहात ?

.श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी साहेबांनी पुण्यामध्ये 30 हजार तास वीज खंडित झाली होती अशी माहिती दिलेली आहे. एका दिवसात 24 तास असतात त्यामुळे 24x365 असा गुणाकार केला तर किती तास होतील ? पुणे शहर हे चारही बाजूने वाढत आहे. मधील काळात इन्फ्रा वनची कामे करीत असतांना ज्या डिकाणी डिमांड मोठया प्रमाणात आली होती त्या ठिकाणी कामे करण्यात आली असून त्या त्या भागामध्ये सबस्टेशन उभे करणे, ट्रान्सफॉमर्स बसविणे, अंडर केबल बसविणे अशी कामे करण्यात आलेली आहेत. पुण्यामध्ये काम करतांना मोठया प्रमाणात अडचणी येत असतात. त्यामुळे तेथील रहदारीला अडचण न होता कामे करण्यात येत आहेत. मी पुणे जिल्हयाचा पालक मंत्री असल्यामुळे मी पुणे शहरामध्ये सतत लक्ष देत असतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

त्याची जरूर चौकशी केली जाईल.

आता ई-टेंडरिंग सुरू केले आहे. याद्वारे ज्याला टेंडर मिळाले असेल व त्याने खराब काम केले असेल तर त्याला बाकीचे पैसे देण्याचे कोणतेही कारण नाही. तरी याची देखील चौकशी केली जाईल. ज्याने कोणी खराब काम केले असेल त्याला काळ्या यादीमध्ये समाविष्ट केले जाईल. त्यासाठी देखील कोणतीही अडचण येणार नाही. हजार तास वीज जाते हे मी मान्य करणार नाही. नवीन मागणी येत असेल तर तेवढ्या वेळा पुरताच आपण ट्रान्सफॉर्मर बंद करतो. अशा काही घटना वेगवेगळ्या बाबींमध्ये घडत आहेत. मागच्या तुलनेमध्ये आता विजेची परिस्थिती निश्चितच चांगली आहे. जेथे विजेची वाणिज्यिक व घरगुती वापराची बिले व्यवस्थितपणे भरली जात आहेत तेथे विजे संबंधात भार नियमनाची अडचण राहिलेली नाही हे ही मी सभागृहाला सांगू इच्छितो. येथे निकृष्ट दर्जाच्या कामासंबंधी जे सांगितले आहे त्याबाबत जरूर चौकशी केली जाईल व जे कोणी दोषी असतील त्यांच्या विरूद्ध कारवाई केली जाईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शेगाव शहराच्या विकास कामासाठी विशेष कृती आराखडा मंजूर हेऊनही विकास कामे रखडलेली असणे

**मु.शी.** : शेगाव शहराच्या विकास कामासाठी विशेष कृती आराखडा मंजूर हेऊनही विकास कामे रखडलेली असणे यासंबंधी सर्वश्री श्री.गोपीकिसन बाजोरिया,डॉ.रणजित पाटील,ॲड.अनिल परब, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकरण संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"श्री संत गजानन महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांसाठी राज्य शासनातर्फे ३६० कोटी रुपये मंजूर करण्यात येणे, शेगांव शहराच्या विकास कामासाठी विशेष कृती आराखडा मंजूर झाल्यानंतरही गेल्या २ वर्षापासून विकास कामे रखडली जाणे, शेगांव संस्थानाने केलेल्या कामांपेक्षा शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात आलेल्या विकास कामांचा दर्जा तुलनेने निकृष्ट असणे, यामुळे भाविक व नागरिकांमध्ये निर्माण झालेली चीड, असंतोषाची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, संत नगरी शेगाव संबंधात सदर लक्षवेधी सूचना आहे. राज्यातील भ्रष्टाचार मुक्त असे हे तीर्थक्षेत्र आहे. मी या संस्थेचे अध्यक्ष श्री.शिवशंकर पाटील यांचे अभिनंदन करतो. ते स्वत: हजारो कोटींचा विकास आराखडा तयार करत आहेत. या देवस्थानाला दररोज लाखो भाविक भेट देत असतात. तेथे येणाऱ्या प्रत्येक व्हीआयपी आणि सर्वसामान्य माणसांना दर्शनाची, राहण्याची, खाण्याची चांगली सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. मी राज्य शासनाचे देखील अभिनंदन करणार आहे. त्यानीं या देवस्थानसाठी 360 कोटी रूपयांचा विकास आराखडा प्रस्तावित केला असून तो कार्यान्वित देखील आहे. यात शासनाचा 250 कोटी रूपयांचा वाटा आहे. यात अत्यंत संथगतीने काम सुरू आहे. सध्याच्या परिस्थितीत या विकास आराखड्यातील 20 टक्के काम भूसंपादन अधिकारी नसल्यामुळे झालेले नाही. अतिक्रमण, पुनर्वसन इत्यादी संबंधातील चर्चा-वाटाघाटी सुरू असताना या विकास आराखड्यासाठी पाहिजे तसा प्रतिसाद प्रशासनाकडून मिळत नाही. नगरपालिकेचा 360 कोटी रूपयांचा विकास आराखडा आणि दुसरा 360 कोटी रूपयांचा शासनाचा विकास आराखडा हे दोन्ही ओव्हरलॅप्स होत आहेत.

सध्या येथे रस्त्यांच्या सुविधा नाहीत. येथे लाखो भाविक येत असल्यामुळे भूसंपादन करणे आवश्यक आहे. पण ते होत नाही. त्यामुळेच माझे दोन प्रश्न आहेत. कोणताही प्रश्न असला की, बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना विचारावे लागेल असे उत्तर यंत्रणेकडून देण्यात येते. पण त्यास जिल्हाधिकारी बुलढाणा देखील योग्य ती उत्तरे देत नाही. सदर बाब विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील कोणतेही काम मार्गी लागत नाही. तेव्हा माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, हा विकास आराखडा कार्यान्वित करण्याकरिता, 100 टक्के चालना देण्याकरिता शासन एक विशेष भूसंपादन अधिकारी नेमणार आहे काय, त्या भागातील एमएलसी आणि एमएलए यांना समितीचे सदस्यत्व देऊन दर दोन महिन्यांनी शासन मिटींग घेणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, 360 कोटी रूपयांचा आराखडा आहे. यामध्ये 250 कोटी रूपये राज्य शासन खर्च करणार आहे. येथील काही काम संस्थेने केले असून उर्वरित काम राज्य शासन विकास आराखड्याच्या माध्यमातून करीत आहे. तेथे भूसंपादन होत नसल्यामुळे अनेक विकासाची कामे होऊ शकली नाहीत. येथे अतिक्रमण झालेले आहे. त्या विरोधात कारवाया केल्या तर अडथळा निर्माण करण्यात येतो. रस्त्यासाठी भूसंपादन करण्याच्या वेळी अडथळा निर्माण करण्यात आलेला आहे. त्यामुळे काही कामे होऊ शकली नाहीत हे सत्य आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

मी स्वत: तेथे जाऊन संस्थांच्या कामाची पाहणी केली होती. तेथील संस्थांच्या अधिकाऱ्यांची चर्चा केली. त्यावेळी जिल्हाधिकारी, आयुक्त व इतर अधिकारी उपस्थित होते. या सर्वांशी चर्चा करताना हा आराखडा कालमर्यादेमध्ये कसा पूर्ण करता येईल या बाबत निर्णय घेण्यात आले. त्या ठिकाणी जमीन भूसंपादनाचा प्रश्न फार मोठा आहे. आपसी समझोत्यातून जमीन भूसंपादन करण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु त्यास म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. तेव्हा आपण दोन भूसंपादन अधिकाऱ्यांची नेमणूक केली. ते अधिकारी कामावर रुजू झालेले आहेत. त्यामुळे भूसंपादनाची कार्यवाहीला वेग आलेला असून रस्त्याच्या आणि इतर नागरी सुविधांच्या कामांना सुध्दा वेग येईल.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात जिल्ह्याचा आराखडा निश्चित करण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्री व मी स्वत: तेथे गेलो होतो. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आपणास हा आराखडा दोन वर्षात पूर्ण करावयाचा आहे. या आराखड्यातील काही कामे पूर्ण झालेली आहेत. त्यामध्ये आराखड्यातील विश्रामगृहे, बस स्थानकावरील सुविधा, रेल्वे स्थानकावरील सुविधा, उप जिल्हा रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था, पोलीस स्टेश्न इमारत, पोलीस वसतिगृहाची इमारत, भाविकांसाठी तात्पुरती निवास व्यवस्था ही कामे पूर्ण झालेली आहेत. भूसंपादन होत नसल्यामुळे रस्त्यांची कामे रखडली होती. परंतु आपण भूसंपादनासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यामुळे या कारवाईस वेग आलेला आहे. हा आराखडा कालमर्यादेमध्ये पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तेथील समितीवर विधानसभा किंवा विधानपरिषदेतील सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल का असा प्रश्न विचारला होता. तेथे शिखर समिती असून त्या समितीचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आहेत. या समितीवर उपमुख्यमंत्री, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री, वित्त मंत्री, ग्राम विकास मंत्री, पाणी पुरवठा मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, नगर विकास मंत्री, सांस्कृतिक कार्य मंत्री आणि राज्याचे मुख्य सचिव हे सदस्य म्हणून आहेत. या समितीच्या बैठका मुंबईमध्ये होतात. या कामासाठी 250 कोटी रुपयांपैकी 230





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

कोटी रुपये दिलेले आहेत. शासनाने निधी दिलेला आहे फक्त नियोजनबध्द पध्दतीने काम करुन घेणे एवढाच प्रश्न आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांची पालकमंत्री म्हणून नियुक्ती केलेली आहे. माझी आपल्यामार्फत त्यांना सूचना आहे की, दर दोन महिन्यांनी होणाऱ्या बैठकीस त्या भागातील प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा किंवा विधानपरिषद सदस्य यांना निमंत्रित म्हणून बोलवावे. लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचना विधायक असतील तर त्या सूचनेचे स्वागत सरकार नेहमीच करते. हे अधिवेशन संपल्यानंतर मी तेथे जाऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी करणार आहे. मला सांगण्यात आले की, संस्थांची कामे दर्जेदार आहेत. जर संस्थांची कामे दर्जेदार होत असतील तर राज्य सरकारने दिलेल्या निधीतून होणाऱ्या कामांमध्ये का अडचणी येतात ज्याचा उल्लेख माननीय राज्यमंत्री महोदयांनी केला. त्या कामांना कशी गती देता येईल आणि ठरलेल्या कालावधीत अपूर्ण कामे कशी पूर्ण करुन घेता येतील हे पाहिले जाईल. या प्रकरणी सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांचे देखील सहकार्य घेण्यात येईल. तसेच त्यांना देखील बैठकीस बोलाविण्यात येईल.

-------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :शासनाने इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विना अनुदानित तत्त्वावर मान्यता देण्यासाठी प्रस्ताव मागवूनही अद्याप त्या शाळांना मान्यता न देणे

**मु. शी.** :शासनाने इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विना अनुदानित तत्त्वावर मान्यता देण्यासाठी प्रस्ताव मागवूनही अद्याप त्या शाळांना मान्यता न देणे या संबंधी सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षण ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माहे मे, 2010 मध्ये शासनाने इंग्रजी माध्यमशाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यासाठी प्रस्ताव मागविणे. त्यानुसार हजारो प्रस्ताव दाखल होणे, माहे जून, 2010 मध्येच मान्यता देण्याची ग्वाही देणे, मान्यता मिळेल या अपेक्षेवर शेकडो संस्थाचालकांनी शाळा सुरु करणे, संस्थाचालकांनी जागा घेऊन इमारती बांधून शिक्षकांच्या नेमणुका करुन शाळा मान्यतेची प्रतिक्षा करणे, शासनाने मात्र अद्याप मंजुरी न देणे, त्यामुळे या शाळांचे भवितव्यच अंधारमय होणे, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, नवीन शाळांना मान्यता देण्यासाठी मागील चार-पाच वर्षापासून शासन प्रस्ताव मागवत आहे. शासनाने प्रस्ताव मागविल्यानंतर हजारो प्रस्ताव दाखल होतात. त्यावर जिल्हा समिती आणि राज्य समितीच्या शिफारशी देखील होतात. परंतु त्यानंतर सरकार त्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी पाठ फिरवते,

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

आणि संस्था चालकांकडून कोट्यवधी रुपये भरुन घेऊन सुध्दा त्या शाळांना मान्यता दिली जात नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, 3115 शाळांना जिल्हा समिती आणि राज्य समितीची शिफारस असेल तर त्या शाळांना मान्यता देण्यात कोणती अडचण आहे ? महोदय, शाळांचे प्रस्ताव सादर करायचे, शाळा सुरु करायच्या आणि त्यानंतर कार्योत्तर मान्यता द्यायची हा आपल्या राज्याचा गेल्या 20-25 वर्षांपासूनचा पायंडा आहे. तो पायंडा मोडण्याचा आपण प्रयत्न करीत आहात. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या शाळा सुरु आहेत, त्या शाळांना मान्यता देण्याचा शासन विचार करणार आहे ? तसेच या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांचे भवितव्य अंधारमय होत असल्यामुळे या शाळांतील मुलांच्या परीक्षा घेण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ?

प्रा.फौजिया खान : महोदय, दि.28 मे, 2010 रोजी सन 2010-11 व 2011-12 या वर्षांसाठी इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्या जहिरातीस अनुसरुन 7475 इतक्या मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी 3115 शाळांच्या प्रस्तावांना जिल्हा समिती आणि राज्य समितीची शिफारस प्राप्त होती. दरम्यान अनेक संस्थांनी तक्रारी केल्या. त्यांचे म्हणणे होते की, आमचे प्रस्ताव संमत व्हावयास हवे होते, समितीने आमच्या प्रस्तावांची शिफारस केली नाही. त्यानंतर या संदर्भातील कॅबिनेटच्या उप समितीमध्ये असा निर्णय झाला की, या प्रस्तावांच्या बाबतीत प्राधान्यक्रम ठरवून ते प्रस्ताव पुन्हा व्हेरिफाय करुन घ्यावेत. त्यानुसार संस्थेची स्वत:ची जमीन आहे काय, स्वत:ची इमारत आहे काय, स्वत:ची जमीन आणि भाड्याची इमारत आहे काय किंवा जमीन आणि इमारत दोन्ही भाड्याने घेतलेल्या आहेत काय तसेच आरटीई च्या तरतुदीनुसार प्राधान्यक्रम ठरवून पुन्हा अर्ज मागण्यात आले. त्यावेळी सुध्दा मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झाले.

सब कमिटीच्या निर्णयानंतर जी.आर.काढण्यात आला. सब कमिटीच्या निर्णयानुसार प्राधान्यक्रम आणि स्थान निश्चिती करण्यात आली. त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत क्वालिटीमध्ये कॉम्प्रोमाईज होता कामा नये असे ठरले. ज्या ठिकाणी शिक्षक उपलब्ध आहेत आणि शाळांची आवश्यकता आहे त्याच ठिकाणी हे काम व्हावे, असे ठरले. त्या नुसार जी.आर. काढण्यात आला. नगर पालिका आणि महानगरपालिकांमध्ये लोकसंख्यानिहाय पुन्हा अर्ज मागविण्यात आले. या कार्यकाळात सेल्फ फायनान्स ॲक्ट हा नवीन कायदा लागू झाला. त्यामध्ये सुध्दा कोणत्याही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फोजिया खान....

परिस्थितीत क्वॉलिटीमध्ये कॉम्प्रोमाईज होणार नाही असे नमूद आहे. अशा प्रकारे कडक निकष करुन, ज्यांना स्वत:च्या पैशाने शाळा उभ्या करावयाच्या आहेत त्यांना त्या सुरु करता येईल असे ठरले. यामध्ये शाळांची संख्या विचारात घेतली आहे. आज जे अर्ज आलेले आहेत ते मोठ्या संख्येने आलेले आहेत. इंग्रजी माध्यमांसाठी 3415 शाळांचे अर्ज आले असून, 899 शाळांचे अपग्रेडेशनच्या बाबतीत अर्ज प्राप्त झाले आहेत. 2010-11 मध्ये ज्या संस्था चालकांनी अर्ज सादर केले होते त्याच लोकांनी पुन्हा अर्ज सादर केले आहेत. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेला कायदा आणि आरटीईच्या निकषानुसार अर्जांना मान्यता द्यावी लागेल आणि ती प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे.

श्री.निरंजन डावखरे : महोदय, ज्या शाळांनी अटी व शर्ती पूर्ण केल्या आहेत त्या शाळा सुरु करण्यास परवानगी देणे का शक्य नाही ? विद्यमान शाळांची दर्जावाढ करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. या बाबतची अधिसूचना दि.4 जानेवारी, 2013 रोजी प्रसिध्द करण्यात आल्याचे निवेदनात नमूद केले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, ज्यांनी इंग्रजी माध्यमांच्या तुकड्यांना मान्यता मागितली आहे त्यांना आरटीई अंतर्गत मान्यता देणार काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, आरटीई आणि सेल्फ फायनान्स ॲक्ट नुसारच शाळांना मान्यता देण्यात येईल. आता ते शासनावर सुध्दा बंधनकारक आहे. ज्या संस्था हे निकष पूर्ण करतील, ज्यांना शासनाने एलओआय दिला आहे आणि ज्या शाळा आरटीईचे निकष पूर्ण करतील त्यांना मान्यता देण्यात येईल.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यात शिक्षण हक्क विधेयक 2009 ला आले. 1 एप्रिल, 2010 ला पुण्यामध्ये माननीय पंतप्रधानांच्या हस्ते त्याचा स्वीकार करण्यात आला. त्यानंतर 28 मे, 2010 ला म्हणजे शिक्षक हक्क विधेयक आल्यानंतर आपण ही जाहिरात दिली. मराठी माध्यमांच्या शाळांना परवानगी देण्याऐवजी आपण इंग्रजी माध्यमांच्या शाळांना परवानगी देण्यासाठी अर्ज मागविले, त्याची काय आवश्यकता होती ? आपल्याकडे 3115 अर्ज शिफारशींसह आले होते. त्या सर्व शाळांना दोन्ही कमिट्यांच्या शिफारशी होत्या. त्यांना आपण परवानगी दिली नाही. ज्यांना परवानगी मिळाली असेल त्यांनी शाळा सुरु केल्या. त्यांना आपण परवानगी देऊ शकत नाही असे कळविले आहे का, असल्यास केव्हा कळविले आणि त्यांचे डिपॉझीट परत केले आहे का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, जेव्हा शासनाने 'कायम' शब्द काढण्याचा निर्णय घेतला त्यावेळी शासनाची बृहत आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु झाली. मराठी माध्यमाच्या शाळांसाठी बृहत आराखडा तयार करण्यात आला. खूप चांगल्या प्रकारच्या टेक्नॉलॉजीचा वापर करुन, आरटीईचे निकष पूर्ण व्हावेत या पध्दतीने मराठी माध्यमाच्या शाळांच्या बाबतीत बृहत आराखडा तयार करण्यात आला. इंग्रजी माध्यमासाठी बृहत आराखड्याची गरज नाही. त्यामुळे हे अर्ज आपण मागविले होते. परंतु आपल्याला शिक्षक उपलब्ध होतात का ? काही ठिकाणी त्यांनी अर्ज मागविले तरी इंग्रजी माध्यमाचे शिक्षक पाहिजेत, जरी बांधकाम झाले असले तरी इंग्रजी शिकविण्यासारखे केपेबल शिक्षक त्या ठिकाणी उपलब्ध होणार का, हे सर्व प्रश्न समोर आले. त्यामुळे मी आधी सांगितल्याप्रमाणे सर्व प्रक्रिया अवलंबिण्यात आलेली आहे. आजच्या घडीला असे स्टेटस आहे. मे महिन्यापर्यंत सेल्फ फायनान्स ॲक्टखाली तसेच मराठी माध्यमाचा जो बृहत आराखडा तयार केला आहे त्या खाली सर्व शाळांना मान्यता देण्याची प्रक्रिया करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ D/ ST

**पृ. शी.** : अमरावती येथील रहाटगाव परिसरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तीनच अभ्यासक्रम सुरु केल्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणापासून वंचित राहावे लागणे

**मु. शी.** : अमरावती येथील रहाटगाव परिसरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तीनच अभ्यासक्रम सुरु केल्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणापासून वंचित राहावे लागणे यासंबंधी श्री. प्रवीण पोटे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रवीण पोटे (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती येथील रहाटगांव परिसरात 5 कोटी रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील मुला-मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत 12 व्यवसायिक अभ्यासक्रमांना मान्यता असतांना केवळ तीनच अभ्यासक्रम सुरू केले असल्यामुळे या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणापासून वंचित रहावे लागणे, सर्व अभ्यासक्रम सुरु करण्यास प्राचार्यांनी कोणतेच प्रयत्न केले नसल्यामुळे दरवर्षी 200 कुशल कारागीर बाहेर पडण्याऐवजी केवळ 30 ते 35 विद्यार्थी प्रशिक्षित होवून बाहेर पडत असणे, सदर "अ" वर्ग आय.टी.आय. मध्ये 32 पदे मंजुर असून प्रत्यक्षात 10 ते 12 कर्मचारी कार्यालयात कार्यरत असल्याने मंजूर असलेली पदे भरणे व अभ्यासक्रम त्वरित सुरू करण्याकरीता नागरिकांची सातत्याने होत असलेली मागणी, त्या अनुषंगाने शासनाने केलेली व करण्यात येत असलेली कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. डी.पी.सावंत ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रवीण पोटे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, डीजीईटी, नवी दिल्ली यांची कायमची संलग्नता प्राप्त करुन घेणे आवश्यक असते. 2006 मध्ये संलग्नतेची कार्यवाही सुरु केली. डीजीईटी, नवी दिल्ली यांनी 2010 च्या आदेशानुसार प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमाला दोन तुकड्या सुरु करणे बंधनकारक आहे असे कळविले आहे. 2006 ते 2010 पर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी याबद्दल काय कार्यवाही केली ? 5 कोटी रुपये खर्च करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ही प्रशिक्षण संस्था सुरु केली त्याचा त्या विद्यार्थ्यांना लाभ मिळणार का ? ज्या अधिकाऱ्यांनी यामध्ये दिरंगाई केली त्यांच्यावर शासन कारवाई करणार का ? अमरावती येथे आयटीआयचे श्री. हस्ते नावाचे डायरेक्टर आहेत त्यांनी अपंगांच्या जागा कन्व्हर्ट करुन दुसऱ्या लोकांना नोकऱ्या दिल्या. त्यांच्यावर शासन कारवाई करणार का ? रिक्त पदे शासन भरणार का ?

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सामाजिक न्याय विभागाने 2006 साली एक निर्णय घेऊन महाराष्ट्रामध्ये 6 ठिकाणी अनुसूचित जाती आणि नवबौध्द मुला-मुलींकरिता प्रशिक्षण संस्था सुरु केल्या. त्यापैकी 4 ठिकाणी संस्था सुरु झाल्या. त्यामध्ये अमरावती विभाग होता. त्यामध्ये अमरावतीला जवळजवळ 4 कोटी 12 लाख रुपये खर्च झाला. त्या ठिकाणी एकूण 12 ट्रेड्ससाठी मान्यता देण्यात आली. परंतु सुरुवातीला पहिली दोन वर्षे ही प्रशिक्षण संस्था शासकीय आयटीआय म्हणून चालविण्यात आली. हे आयटीआय दोन शिफ्टमध्ये चालविण्यात आले. त्यामुळे सर्व ट्रेड एका वेळी चालू करता आले नाहीत. परंतु कालांतराने नवीन इमारत झाल्यानंतर डीजीटीईकडे मान्यतेसाठी गेलो असता त्या ठिकाणी काही कालावधी लागतो आणि तो कालावधी लागत असताना 2010 साली डीजीटीईने अशी अट घातली की,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत....

प्रत्येक ट्रेड सुरु करताना पहिल्या वर्षी कमीत कमी दोन तुकड्या असाव्यात. अशा परिस्थितीत त्या इमारतीमध्ये 12 ट्रेडसाठी 24 तुकड्या सुरु करणे शक्य नव्हते. त्यामुळे वेळ लागलेला आहे.

**उप सभापती** : सभागृहाची वेळ 10 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, त्या इमारतीमध्ये एका ट्रेडसाठी दोन तुकड्या सुरु करणे शक्य नव्हते. सामाजिक न्याय विभागाने 2009 साली तेथे कोणते ट्रेड सुरु करावेत यासाठी एक समिती नेमली होती. त्या समितीने तेथील लोकांना व्यवसाय मिळावेत किंवा नोकऱ्या मिळाव्यात यासाठी नवीन ट्रेड सुचविले होते. या दोन तुकड्यांचे बंधन आल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये 2-2 तुकड्यांचे 6 ट्रेड सुरु करण्याचे विभागाने प्रस्तावित केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी श्री.हस्ते यांच्यासंबंधी प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबतची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही, ती माहिती मी पटलावर ठेवीन. रिक्त जागा भरण्याबाबत शासनाचा नेहमीच प्रयत्न सुरु असतो त्याप्रमाणे जरुर प्रयत्न केला जाईल.

---------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ.शी.** : आर.एन.ए.विकासक यांच्याकडून शिवडी येथील महानगरपालिकेच्या न्यू लेबर कॅम्प मधील मूळ रहिवाशांना सदनिका न देता इतर प्रकल्पग्रस्त व अनधिकृत लोकांना देणे

**मु.शी.**: आर.एन.ए.विकासक यांच्याकडून शिवडी येथील महानगरपालिकेच्या न्यू लेबर कॅम्प मधील मूळ रहिवाशांना सदनिका न देता इतर प्रकल्पग्रस्त व अनधिकृत लोकांना देणे यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"आरएनए विकासक यांच्याकडून सन 2005 मध्ये मुंबईतील शिवडी येथील महानगरपालिकेच्या न्यू लेबर कॅम्प मधील जागेच्या पुनर्विकास योजनेंतर्गत तेथे 100 वर्षापासून राहणाऱ्या 250 रहिवाशांना नियम 33(7) नुसार 415 स्के.फुटाचे घर देण्याचे मान्य करणे, मात्र याबाबतच्या लेखी कराराची प्रत मागणाऱ्या 24 सदस्यांना पुनर्विकसित इमारतीत राहण्यास जागा न देणे, उक्त 24 सदनिका इतर प्रकल्पग्रस्त व अनधिकृत लोकांना देणे, यापैकी 21 जणांना महालक्ष्मी येथे संक्रमण शिबिरात राहण्यास जागा देणे, परंतु उर्वरित 3 रहिवाशांनी या विकासकाने महानगरपालिकेच्या मराठी शाळेची 2353.35 चौरस मीटर जागा हडप केल्याच्या विरोधात आवाज उठविल्यामुळे अद्यापही घरे न देणे, द्वेषापोटी 8 वर्षापासून त्यांना एका संक्रमण शिबिरातून दुसऱ्या संक्रमण शिबिरात स्थलांतरित करीत राहणे, दिनांक 25 फेब्रुवारी, 2013 रोजी ते राहत असलेल्या संक्रमण शिबिरातून त्यांना बेकायदेशीररित्या कोणतीही नोटीस नसतांना घराबाहेर काढणे, यातील एक वृध्द महिला कॅन्सर पीडित असून, दुसऱ्या घरातील मुलाची 12 वीची परीक्षा चालू असणे, त्यांना पाणी, वीज घरापासून बेदखल करणे, याबाबत पालिका आयुक्तांची दिनांक 1 मार्च, 2013 रोजी या अन्यायग्रस्तांसह भेट घेऊन देखील कोणतीच कारवाई न होणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, गेल्या 8 वर्षापासून महानगरपालिकेचे अधिकारी आणि विकासक यांच्या संगनमताने 100 वर्षापासूनच्या भाडेकरुंना आरएनए बिल्डर्स विकासाच्या नावाखाली त्रास देण्याचा प्रकार सुरु आहे. हे प्रकरण म्हणजे एक चांगले उदाहरण आहे. नियम 33/7 अंतर्गत विकासकाला पी.ए.पी.देण्याची तरतूद नसताना सुध्दा या बिल्डरच्या सांगण्यावरुन रहिवाशांना त्रास दिला जात आहे. या प्रकल्पामध्ये जवळजवळ 18 चाळी, 10 वाणिज्यिक व 250 निवासी भाडेकरु होते. 1940 च्या पूर्वीपासून महापालिकेच्या मालकीच्या या चाळी आहेत. या प्रकल्पासाठी 70 टक्के रहिवाशांनी संमती दिलेली आहे. 1991 मधील नियम 33/7 अंतर्गत उपरोक्त मालमत्तेच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव 2006 साली सादर झाला होता. त्यावेळी 250 मूळ भाडेकरु होते. परंतु या निवेदनामध्ये 260 भाडेकरुंपैकी 24 भाडेकरुंनी असहकार्य केल्याचे नमूद केलेले आहे. मला शासनाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, नियम 33/7 अंतर्गत असलेल्या तरतुदींचा विचार करता त्या लोकांनी असहकार्य केले असे म्हणणे चुकीचे आहे. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी पुनर्विकासाचे प्रकल्प सुरु आहेत त्या प्रकल्पातील लोकांचे 10-10, 15-15 वर्षे पुनर्वसन होत नाही. या विकासकांनी त्या लोकांना 415 चौ.फुटाची घरे देतो असे सांगितल्यावर त्यांनी लेखी करारनाम्याची मागणी केली होती. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता कोणीही भाडेकरु लेखी करारनाम्याशिवाय आपल्या जागेवरुन हटत नाहीत. महापालिकेला त्याच जागेवर 15 टक्के भाडेकरुंना घरे देणे बंधनकारक असताना शासकीय अधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी व बिल्डर यांचे संगनमत झाल्यामुळे 15 टक्के लोकांना घरे दिली जात नाहीत. लोकांना केवळ आमिष दाखवून घरे मात्र अधिकाऱ्यांना दिली जातात. असा प्रकार तेथे सुरु आहे. या लोकांनी केवळ लेखी स्वरुपाचा करार करावा एवढीच मागणी केलेली आहे. ही मागणी करणे म्हणजे असहकार्य करणे असे होत नाही. या निवेदनात असेही म्हटलेले आहे की, तेथील 24 भाडेकरु कोर्टात गेलेले आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, 11 वाजून 25 मिनिटांनी सभागृहाची बैठक स्थगित होणार आहे. त्यामुळे आपण आपला प्रश्न थोडक्यात विचारावा. आपण प्रश्नाऐवजी लांबलचक भाषण करीत राहिलात तर मंत्री महोदयांना उत्तर देण्यासाठी वेळ मिळणार नाही.

5.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, विकासकाने 24 लोकांना वेळोवेळी वेगळी वागणूक दिलेली आहे. या 24 लोकांना या योजनेत सहभागी करुन घेण्याचे आदेश असतानाही सहभागी करुन घेतलेले नाही. या विकासकाला तेथे दुसरी योजना करावयाची असल्यामुळे त्यांनी या लोकांना पुनर्वसनाची घरे अद्याप दिलेली नाहीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

त्या लोकांवर अन्याय करणारी ही भूमिका आहे. या लोकांवरील अन्याय दूर करुन त्यांना प्रोजेक्टमध्ये घरे देण्यात येतील काय ?

श्री. भास्कर जाधव : त्यांना त्या प्रोजेक्टमध्ये समाविष्ट करुन घेण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : 226 लोकांना जशी घरे देण्यात आली त्याप्रमाणे या लोकांना 415 चौ.फुटाची घरे देण्यात येतील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ही जागा आणि भाडेकरु हे महानगरपालिकेचे आहेत. हे खाजगी नाहीत. ते खाजगी लोक असल्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. सरकारी किंवा महानगरपालिकेची जागा असल्यामुळे भाडेकरुनी जर सहकार्य केले नाही तर त्यांना 5(बी)खाली निष्कासित करण्याचा अधिकार आहे. ते लोक कोर्टामध्ये गेले. सर्व बाबी त्यांच्या विरोधात गेल्या. खरे तर त्या लोकांनी त्यांचा राहाण्याचा हक्क गमावला होता. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांकडे यासंदर्भात बैठक झाली. त्यांनी सांगितले की, लोकशाहीमध्ये न्याय मागायला जाता येते, कायद्याने या लोकांना न्याय मिळाला नसला तरी या प्रकल्पामध्ये या लोकांना सामावून घेण्याचा निर्णय झालेला आहे. बिल्डरने 226 भाडेकरुंना 415 चौ.फुटाची घरे देण्याचे मान्य केलेले आहे, त्याप्रमाणे या लोकांना घरे देण्यात येतील काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असावा. शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांना 300 चौ.फूट जागा देता येते. बिल्डर प्रलोभने दाखवतात. त्याने 415 चौ.फूट जागा दिलेली आहे. परंतु आता बिल्डर त्या गोष्टी मान्य करीत नाही. परंतु एक गोष्ट मान्य झालेली आहे ती म्हणजे त्यांना याच प्रोजेक्टमध्ये सामावून घेण्याचे मान्य झालेले आहे. पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर, माणुसकीच्या दृष्टीने, कायद्याच्या दृष्टीने नाही, इतरांना जी वागणूक दिली ती यांना देखील दिली जावी या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

ॲड. आशिष शेलार : 105(बी) नियम नसता तर कदाचित हा प्रोजेक्ट आणखी रखडला असता. निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, "सदर योजनेस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त, मालमत्ता यांनी परिशिष्ट-2मध्ये खेळाचे मैदान व महानगरपालिका प्राथमिक शाळा समाविष्ट केलेली आहे." पुढे असे म्हटलेले आहे की, "सदर पुरवणी परिशिष्ट-2च्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार...

अनुषंगाने या योजनेस महापालिकेची सुधार समिती व महापालिकेची मंजुरी अजूनही प्राप्त झालेली नाही." म्हणजे महापालिकेच्या सुधार समितीची आणि महापालिकेची मंजुरी न मिळता हा 33(7) अंतर्गत हा प्रोजेक्ट कसा झाला ?

श्री. भास्कर जाधव : यामध्ये दोन वेगवेगळे भाग आहेत. या लोकांना सामावून घेण्याचा निर्णय आधी झाला. त्यानंतर 24 भाडेकरु कोर्टात गेल्यामुळे त्यांना सामावून घेण्याचा प्रश्न निर्माण झ ाालेला आहे. मी मुद्दाम या ठिकाणी सांगू इच्छितो की क्रीडांगणाचे आरक्षण बदलले जाणार नाही. क्रीडांगणाची जागा कमी केली जाणार नाही. शाळा बांधून या लोकांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : एक महिन्यापूर्वी तिघांना पुन्हा 105(बी)ची नोटीस देऊन बाहेर काढण्यात आलेले आहे. ते लोक 40 महिने रस्त्यावर आहेत. ट्रान्झिट कॅम्पचे नियम न पाळता त्यांना कुठे तरी बाहेर राहाण्यासाठी सांगितले जात आहे. आता जी पुनर्वसनाची घरे तयार झालेली आहेत त्यामध्ये सेक्रटरीच्या जावयाला राहाण्यासाठी खोली दिलेली आहे. या तीन लोकांना त्यांच्या हक्काची घरे ताबडतोब देण्यात येतील काय ?

श्री. भास्कर जाधव : ज्याअर्थी या लोकांच्या बाबतीत 105(बी) लागू झाला त्याअर्थी त्यांनी त्यांचा हक्क गमावलेला आहे. तरी देखील मानवतेच्या दृष्टीने 24 लोकांची त्या ठिकाणी राहाण्याची सोय करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जात आहे. परंतु त्याबाबतीत 226 लोकांचा विरोध होत आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, या लोकांमुळे आम्ही रखडलो आहोत. या लोकांना आमच्यात का समावून घेत आहात ? तरी देखील त्यांना सामावून घेतले जावे असा आमचा प्रयत्न आहे.

**उप सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांच्या हे निदर्शनास आणू इच्छितो की, आर.एन.बिल्डर हा अनियमिता करण्याच्या बाबतीत फार प्रसिध्द आहे. याच्या कामाच्या तसेच अनियमितेच्या संदर्भात संपूर्ण मुंबईमध्ये बोंबाबोंब आहे. माझे असे मत आहे की, या बिल्डरच्या सर्व अनियमितता शोधून त्याच्यावर राज्य शासना तर्फे कठोर कारवाई केली जाईल काय ?

श्री. भास्कर जाधव : स्पेसिफिक माहिती मिळाली तर...

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : ही स्पेसिफिक माहिती आम्ही शोधायची काय ? राज्य शासनाच्या अखत्यारितील डिपार्टमेण्ट काय करतात ? बिल्डरच्या अनियमिततेला संरक्षण देतात की, अनियमितता शोधून काढतात ? अनियमितता आम्ही शोधून काढायच्या काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या बाबतीत थोडासा क्ल्यू मिळाला तर, सूतापासून स्वर्गात जाता येईल म्हणून मी म्हणालो.

**उप सभापती** : तुम्ही खूप सक्षम आहात, त्यामुळे तुम्हाला क्ल्यू देण्याची गरज नाही.आपल्या हातात सत्ता आहे, आपण त्या सत्तेचा पूर्णपणे उपयोग करु शकता. ठीक आहे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 11.30 वाजता पुन: भरले.

( सभागृहाची बैठक दुपारी 11.26 ते 11.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>**

**<u>पृ.शी./मु.शी.</u>**<u>: तोंडी उत्तरे</u>

**सभापती** : आता दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी स्थगित ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक ३६८३९ घेण्यात येईल.

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी आणलेले सोलर वॉटर हिटर विनावापर पडून असल्याबाबत**

**(४) * ३६८३९ डॉ.रणजित पाटील, श्री.नागो गाणार, श्री.प्रवीण पोटे पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०२३ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जुन्या २६४ शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरिता ११ कोटी रुपयांचे १ हजार १४९ सोलर वॉटर हिटर बसविण्याचे कंत्राट बंगलोर येथील रश्मी इंडस्ट्रिज या कंपनीला देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रश्मी इंडस्ट्रिज कंपनीने ७३३ सोलर वॉटर हिटर संचाचा पुरवठा केला मात्र प्रत्यक्षात उर्वरीत संचाचा पुरवठा करण्यात आला नसल्यामुळे समाज कल्याण आयुक्तांनी दिनांक ३० जून, २०१२ रोजी रश्मी इंडस्ट्रिज कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(३) सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासकीय वसतिगृहात सोलर वॉटर हिटर पुरविण्याचे काम विहीत मुदतीत योग्यरित्या न झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (अमरावती) यांनी दिनांक २० मार्च, २०१२ व दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी मा. आयुक्त समाजकल्याण संचालनालय, पुणे यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार संबंधित दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व पुरवठादारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (१) होय.

(२) संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार केंद्र शासनाच्या अखत्यारितील डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाईज ॲण्ड डिस्पोजल्स, नवी दिल्ली यांच्या दर करारावर असणा-या रश्मी इंडस्ट्रीज, बंगलोर या कंपनीकडून एकूण २६४ शासकीय वसतिगृहांमध्ये ५०० लि.क्षमतेचे ११४९ सोलर हिटर संयंत्र बसविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.११.२६ कोटी एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कंपनीने पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार ११४९ पैकी ७३३ संयंत्राचा पुरवठा केला असून कंपनीस ७१० संयंत्रासाठी रु. ५,८८,४९,०२६/- इतकी रक्कम अदा केली आहे. पुरवठा करण्यात आलेल्या ७३३ संचापैकी ७१२ संच बसविण्यात आले असून त्यांचे प्लंबिंग झालेले आहे व २१ संयंत्र बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

..२..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३६८३९......

सदर कंपनीने सोलर वॉटर हिटर सयंत्राचा पुरवठा करण्यात येणाऱ्या अडचणी आयुक्तालयाच्या निदर्शनास आणून वेळोवेळी मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार पुरवठादार कंपनीस मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतवाढ देवूनही पुरवठा न झाल्यामुळे आयुक्तालयामार्फत पुरवठादार कंपनीस कारणे दाखवा नोटीस बजावली आहे व सोलर वॉटर हिटर संयत्रांचा पुरवठा करुन ते कार्यान्वित करणे याबाबतचे वेळापत्रक पुरवठाधारक कंपनीस ठरवून दिलेले आहे.

पुरवठादार कंपनीस भाड्याच्या इमारतीत तसेच जून्या शासकीय इमारतीत कार्यरत असणाऱ्या वसतिगृहांच्या इमारती जून्या असल्याने तसेच काही ठिकाणी पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याचे आढळून आल्याने व अन्य काही कारणामुळे एकूण ४१६ संयंत्रे बसविता येत नाहीत. यासाठी शासनाने ४१६ संयंत्रांचे आदेश रद्द केलेले आहेत.

केंद्र शासनाच्या डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाईज ॲण्ड डिस्पोजल्स, नवी दिल्ली (DGS&D) यांच्या दर करारामध्ये खरेदी करावयाच्या बाबीची किमान संख्या व किमान किंमत याला कोणतीही मर्यादा घालण्यात आलेली नाही किंवा तसे शासनाचे कोणतेही आदेश असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे निविदा न मागविता दर करारावर खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) होय.

(४) वर नमूद केलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर चौकशीची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या विषबाबत डी.जी.ॲण्ड एस.डी.यांच्या सूचीवर महाराष्ट्रातील आठ ते दहा पुरवठादार असून राज्याबाहेरील काही पुरवठादार देखील आहेत. असे असताना याच पुरवठादाराला आदेश का देण्यात आले? आयुक्त, समाजकल्याण यांना वेळोवेळी पत्रे देऊन मागविलेली माहिती अद्यापपर्यंत का सादर केली जात नाही, माहिती सादर न केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात? तीन व चार क्रमांकाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, चौकशीची आणि कारवाईची गरज नाही. असे असेल तर सदर पुरवठादाराला विभागाकडून कारणे दाखवा नोटीस का पाठविण्यात आली?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 182 वसतिगृहे भाड्याची आणि 82 वसतिगृहे शासकीय होती, त्यामुळे कारवाईची गरज नाही असे म्हटले आहे. वजन जास्त असल्यामुळे आणि वसतिगृहावरील छप्पर कौलारु किंवा पत्र्याचे असल्यामुळे सोलर वॉटर हिटर बसविता आले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नाहीत. मुंबईतील दोन वसतिगृहांसाठी 3 लाख रुपयांचे विशेष अनुदान देऊन स्ट्रेंग्थनिंग केले आहे, म्हणून चौकशीची आवश्यकता नाही. मे.ओंकार, एमआयडीसी भोसरी यांनी अर्ज केला होता. परंतु त्यांच्याकडे दरकरार नव्हता. एन नाईन एंटरप्रायझेस, मुंबई या कंपनीने अर्ज केला होता. त्यांच्याकडे दरकरार नव्हता. अन्य कंपन्यांना दरकरार द्या असे कळविले होते. पर्क एंटरप्रायझेस; पुणे आणि गिरीजामाता जनहित सेवाभावी संस्था आणि जय इरिगेशन यांनी महाऊर्जा अभिकरणासोबत दरकरार केला होता. महाऊर्जा, पुणे यांची मुदत 31.3 ला संपल्यामुळे त्यांना काम देता आले नाही.

डॉ.रणजित पाटील : मग पुरवठादाराला कारणे दाखवा नोटीस का देण्यात आली? तीन-चार महिन्यात काम पूर्ण करावयाचे असताना अडीच वर्षे उलटून गेली आहेत. दीड वर्षानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सहा महिने झाले आहेत, आता शासन म्हणते की, 1150 वॉटर हिटर पुरवायचे असताना 650 पुरविण्यात आले. शासनाने पुरवठा आदेश द्यायचे आणि शासनानेच सांगायचे की, वसतिगृहाचे छप्पर कौलारु होते, पुरेसे पाणी नव्हते. मग पुरवठा आदेश देताना या गोष्टींचा विचार का झाला नाही? माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविण्यासाठी मी चार पत्रे दिली आहेत, अद्याप त्यांच्याकडून उत्तर देण्यात आलेले नाही, याबद्दल कोणती कारवाई करणार आहात?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, दिनांक 17.6.2011 आणि 20.9.2011 पर्यंत मुदत वाढवून दिली. 14.3.2012 ला शो कॉज नोटीस दिली. त्यांचे म्हणणे होते की, आम्ही शो कॉज नोटीस का देत नाही? त्यांनी सांगितले की, जी स्ट्रेंग्थनिंग असावयास पाहिजे ती नाही म्हणून आम्ही हिटर बसवू शकत नाही. आम्ही त्याकरिता आवश्यक असलेली मजबूत हॉस्टेल उपलब्ध करुन देऊ शकलो नाही म्हणून ते काम पूर्ण करु शकले नाहीत असा विषय आहे.

नंतर टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :36849** ......

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, आपल्याला किती ठिकाणी सोलर वॉटर हिटरची आवश्यकता आहे, किती ठिकाणी आपण सोलर वॉटर हिटर लाऊ शकतो याची खातरजमा न करता टेंडर काढले गेले आहे. आपल्याला 650 सोलर वॉटरची गरज असतांना 1150 सोलर वॉटर हिटरची ज्या अधिकाऱ्याने सर्वेक्षण न करता ऑर्डर काढली त्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे :सभापती महोदय, आपल्याकडे एकंदर 264 शासकीय बसतीगृहे आहेत. परंतु काही ठिकाणची वसतीगृहे ही पत्र्याची तसेच कौलाची असल्यामुळे ते सोलर वॉटर हिटरचे वजन पेलू शकणार नाही त्यामुळे या ठिकाणी सोलर वॉटर हिटर बसवता येणार नाही याबाबत त्यांना कळविण्यात आले होते. आतापर्यंत जेवढे सोलर वॉटर हिटर पुरवले आहेत त्याच्या 90 टक्केच पेमेंट करण्यात आलेले आहे. सोलर वॉटर हिटरचे 1149 टार्गेट होते त्यापैकी 633 सोलर वॉटर हिटर पुरवण्यात आले असून त्यापैकी केवळ 712 सोलर वॉटर हिटर बसविण्यात आले 710 सोलर वॉटर हिटरचे 90 टक्के पेमेंट करण्यात आलेले आहे.

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, पहिली मुदतवाढ देण्याची वेळ आली होती तेव्हाच सर्व बाब तपासून उर्वरित सोलरचे टेंडर रद्द का केले नाही ? यामध्ये सिंगल टेंडर स्वत:च्या मताने कसे काय दिले गेले ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, केंद्रशासनाचे यासंदर्भात दर करार आहेत. मी सुरुवातीलाच सांगितल्या प्रमाणे ज्या कंपन्यांनी टेंडर भरले होते त्यासंदर्भात महाऊर्जा यांच्याशी दर करार कंपन्याकडून सोलर वॉटर हिटर खरेदी करता येईल काय असे उद्योग व ऊर्जा विभागाला विचारण्यात आल्यामुळे त्यांनी पुढील प्रमाणे अटी दिलेल्या आहेत. महाऊर्जा पुणे यांच्याशी दर करार करणे ही बाब भांडार खरेदी शासन निर्णय 2192 मध्ये समाविष्ट नसल्यामुळे खरेदी करण्याची शिफारस करता येत नाही.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कंचनपूर ग्रामपंचायत (ता.खामगांव,जि.बुलढाणा) येथील दोन ग्रामपंचायत सदस्यांचे सदयत्व रद्द करण्याबाबत**

**(१) * ३६९४७ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंचनपूर (ता.खामगांव,जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीचे २ सदस्य हे ग्रामपंचायतीच्या ६ मासिक सभांना गैरहजर असल्यामुळे त्यांचे सदस्यत्व रद्द करावे अशी मागणी कंचनपूर ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी त्यांच्या दिनांक १ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या पत्राद्वारे खामगाव पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंचनपूर ग्रामपंचायतीच्या सचिवांनीही या सदस्यांचे सदस्यत्व रद्द करावे, असा ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४० (१)(ब) अन्वये प्रस्ताव खामगाव पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांना पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीच्या दिनांक २८ एप्रिल, २०१२, दि.१५ मे, २०१२, दि. ३० जून, २०१२, दि. २३ जुलै, २०१२, दि. २७ ऑगस्ट, २०१२ व दि.२५ सप्टेंबर, २०१२ अशा ६ मासिक सभांना गैरहजर राहणाऱ्या संबंधित २ ग्रामपंचायत सदस्यांविरुध्द मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४० (२) नुसार पुढील कारवाई करावी, अशी विनंती खामगाव पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकडे क्रमांक पंसखा/पंचायत/विअपं/६११२/१२, दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये केली असूनही अद्यापपर्यंत त्यांचेकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायतीच्या ६ मासिक सभांना सतत गैरहजर असणाऱ्या संबंधित दोन सदस्यांविरध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कारवाईस करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील ,श्री. जयंत पाटील यांचे करिता** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर दोन ग्रामपंचायत सदस्यांविरुध्द ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ४० (२) प्रमाणे निर्णय देण्यापुर्वी अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित सदस्यांची बाजू ऐकून घेणेसाठी मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी दिनांक ३०.१.२०१३ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि, सदर सुनावणीस सदस्य गैरहजर असल्यामुळे पुढील सुनावणी घेण्याबाबत निर्णय झाला. त्याप्रमाणे दिनांक १८.०३.२०१३ रोजी मा. अध्यक्ष यांनी सुनावणी ठेवून दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले व दोन्ही सदस्यांना बाजू मांडण्याची संधी देऊन सदर सदस्यांना ग्रामपंचायतीकडून मासिक सभांची सूचना ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींचा उचित अवलंब करुन व योग्य रितीने न दिली गेल्यामुळे सदरहू सदस्यांविरुध्द अपात्रतेची कारवाई करणे अन्यायकारक होईल, असा निर्णय देवून सदर सदस्यांना ग्रामपंचायत सदस्यपदी कायम असल्याचे घोषित करण्यात आले आहे.

(५) विलंब झालेला नाही.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,ग्रामपंचायत कंचनपूर, ता. खामगाव जि.बुलढाणा या ग्रामपंचायतीचे दोन सदस्य सहा मासिक सभांना हजर नव्हते अशी तक्रार सरपंच तसेच सचिवांनी पंचायत समितीला केली. सदर तक्रारीची विस्तार अधिकाऱ्यांनी चौकशी करुन यासंदर्भातील अहवाल बीडीओ यांना दिला. बीडीओ यांनी हा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, बुढाणा यांच्याकडे दिला. अहवाल सविस्तर असतांनाही बुलढाणा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी ग्रामपंचायतीच्या दोन सदस्यांवर निलंबनाची कारवाई केली नाही. उत्तरात सुनावणी घेण्यात आली होती असा उल्लेख करण्यात आलेला आहे. या प्रकरणी बीडीओ तसेच विस्तार अधिकाऱ्यांचा अहवाल असतांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी राजकीय हेतूने प्रेरित होऊन दोन ग्रामपंचायतीच्या सदस्यांना वाचविण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी केलेला आहे हे खरे आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत 40(2) अंतर्गत कारवाई केली जात असते व त्यामध्ये अपिल करण्याची तरतूद आहे. बीडीओ यांनी पहिल्यांदा जी तपासणी केली होती त्यामध्ये त्यांनी संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नव्हती. कायद्या प्रमाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकडे अपिल करण्याची तरतूद असल्यामुळे अध्यक्षांनी दोन्ही बाजूच्या संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन जी काही वस्तुस्थिती समोर आली त्यानुसार स्थगिती दिलेली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, "सदर सदस्यांना ग्रामपंचायतीकडून मासिक सभांची सूचना ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीचा उचित अवलंब करुन व योग्य रीतीने दिला गेला नाही" या वाक्याचा अर्थ काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36947...

श्री.जयंत प्र.पाटील..

सभापती महोदय, सभा आहे हे त्या सदस्याला समजले आहे. असे असताना आपण कुठले तरी कारण देत आहात. हा सदस्य राष्ट्रवादी पक्षाचा आहे काय ? शासनाचे स्वत:च्या पक्षासाठी वेगळे धोरण आहे. तेव्हा यात उचित काय आहे ?

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना विनंती आहे की, त्यांनी प्रश्न विचारताना अकारण एका राजकीय पक्षाचा उल्लेख करण्यामध्ये कोणताही अर्थ नाही. आपण राजकीय पक्षाचा उल्लेख केला आहे तेवढा भाग मी कामकाजातून काढून टाकतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जे आहे ते मी सांगत आहे. माझा प्रश्न योग्य आहे. पक्षातर्फे निवडणुका लढविल्या जातात. अजेंडा द्यायचे म्हणजे काय ? त्यावर त्याची पोच पावती आहे. हे जे काही आहे ते अन्यायकारक आहे. तो सदस्य सहा सभांना गैरहजर होता म्हणून सरपंच,ग्राम विस्तार अधिकारी, ग्रामसेवक यांनी रिपोर्ट केलेला आहे. असे असताना आपण काहीच करत नाही. तेव्हा शासनाने सांगून टाकावे की, सत्ताधारी पक्षाची ग्रामपंचायत असेल तरच काम होईल. तसे धोरण शासनाचे आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, चुकीचा संदर्भ येथे दिला जात आहे. योग्य तऱ्हेने नोटीस बजाविण्याच्या सूचना संबंधितांना असतातच. या नोटीसमधील स्वाक्षऱ्या वेगवेगळ्या आहेत. सदर नोटीस त्यांना पोचलेली नाही हे अध्यक्षांना पटल्यामुळेच त्यांनी यामध्ये स्थगिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मांडलेल्या मुद्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, नियमांमध्ये थोडी संदिग्धता निश्चितपणे आहे. ग्रामसभेची सभा बोलाविताना कुठल्या पद्धतीने नोटीस सदस्यांना गेली पाहिजे त्यासंबंधी संदिग्धता निश्चितपणे आहे. सदर संदिग्धता येणाऱ्या काळामध्ये दूर करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. एका बाजूला हा विषय असताना दुसऱ्या बाजूला गैरफायदा घेण्याची शक्यता देखील नाकारता येणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36947...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार मी येथे अधिकचा खुलासा करू इच्छितो. प्रत्येक ग्रामपंचायत सदस्याच्या घरी जाऊन सभेची नोटीस देण्यात आलेली आहे. त्यावर त्यांच्या सह्या देखील आहेत. गट विकास अधिकाऱ्याने आपल्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की, "वरीलप्रमाणे ग्रामपचांयत कंचनपूर, ता.खामगाव, जि.बुलढाणा येथील श्री.संजय आसाराम भट्टड, सदस्य श्री.गुंफाबळी शामराव सोळंके, हे दोन्ही सदस्य ग्रामपंचायतींच्या सहा सभांना सतत सहा महिने गैरहजर असल्यामुळे त्यांच्या विरूद्ध ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या कलम 40 (2) अन्वये पुढील कारवाईस्तव सविनय सादर." एवढा स्पष्ट अहवाल आहे. गटविकास अधिकाऱ्याने त्यांच्या सह्या आहेत किंवा नाही हे व्हेरिफाय केलेले आहे. आपल्याच पक्षाचे ते दोन्ही सदस्य असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांविरूद्ध शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, भारतीय घटने प्रमाणे जिल्हा परिषदेला अधिकार दिलेले आहेत. त्यासाठी तरतूद देखील करण्यात आली आहे. बीडीओ स्तरावरील आदेशाच्या विरोधात जिल्हा परिषद अध्यक्षांकडे अपील करावयाचे असते. अध्यक्षांनी दिलेल्या निर्णया संबंधात आयुक्तांकडे अपील करावयाचे असते व आयुक्तांच्या निर्णयासंबंधात शासनाकडे अपील करावयाचे असते. त्यामुळे अध्यक्षांनी कोणाला पाठीशी घातले आहे किंवा नाही हे पुढच्या अपीलामध्ये सिद्ध होऊ शकेल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सरकारच्या अशा वृत्तीमुळे बेबंदशाहीचा पाया घातला जात आहे. तेव्हा कोणालाही वाचविण्यापूर्वी याचे भान शासनाने ठेवावे. शिपाई स्वत: सांगतो की, मी गेलो होतो व त्यांच्या सह्या घेतल्या होत्या. येथे कोण कुठल्या पक्षाचा आहे हा विषय नाही. येथे एका पोलिसासंबंधी साधे रामायण घडल्यानंतर सरकारने तो प्रश्न प्रतिष्ठेचा केला. त्यातून केवढे मोठे रामायण घडले. अशा उत्तराने आपणच या सभागृहाची सातत्याने अप्रतिष्ठा करत .....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36947...

श्री.दिवाकर रावते....

आहात. सदस्य व सरकार कोणाचेही असो. ग्रामपंचायतीच्या एका सदस्याला वाचविण्याकरिता संपूर्ण सरकार उतरते आहे ते चुकीचे आहे. सरकारचा हा जो पुचाटपणा आहे तो मोठ्या बेबंदशाहीकडे नेण्यावाचून राहणार नाही. तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, याच प्रश्नासंबंधी आपल्या दालनामध्ये बैठक लावून चर्चा करावी. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा पेक्षा आपले स्थान नक्कीच मोठे आहे. तेव्हा त्याबैठकीमध्ये सर्वांच्या समक्ष चर्चा करून निर्णय घ्यावा.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.भारवि... 11:45

ता.प्र.क्र. 36947...

श्री.दिवाकर रावते...

जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांपेक्षा आपले स्थान मोठे आहे. तेव्हा या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनात बैठक लावावी. जर या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची चूक असेल तर त्याबाबत मार्गदर्शन करावे. कारण प्रत्येक प्रश्नाच्या संदर्भात याला वाचव, त्याला वाचव असे प्रकार सुरु आहेत. हे सरकार राज्य कसे चालविणार आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी कायद्यानुसार अपीलाची तरतूद आहे... मला उत्तर पूर्ण करण्याची संधी मिळाली पाहिजे..

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

माझे उत्तर ऐकून घ्यायचे नाही असे ठरविले असेल तर ते योग्य नाही....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. माननीय राज्य मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात कायद्यामध्ये काही तरतुदी आहेत. त्यानुसार एखादा निर्णय दिला असेल तर त्यावर जिल्हा परिषद अध्यक्षांकडे अपील करता येते. त्या प्रमाणे सदस्य अपिलात गेले. त्यानंतर हिअरींग झाले. हिअरींगनुसार सदस्यांच्या बाजूने निर्णय झाला असा एकूण प्रकार आहे. हा प्रश्न मी राखून ठेवत नाही. या प्रश्नाच्या संदर्भात मी माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे की, जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांकडे अपील झाले. त्या संदर्भात दोन वेळा हिअरींग झाले. एकदा एक सदस्य गैरहजर राहिले. त्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली. त्यानंतर अध्यक्षांनी त्यांच्या क्वासी ज्युडिशिअल अधिकारामध्ये निर्णय दिला. त्यांनी निर्णय दिल्यानंतर त्यावर भाष्य करणे योग्य नाही. त्या निर्णयाविरुध्द आयुक्तांकडे अपील करण्याची तरतूद आहे. अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करणे हा विषय नाही. आपणास आयुक्तांकडे अपील करता येते. अशा प्रकारणामध्ये मंत्री म्हणून आमचे जे अधिकार आहेत ते अधिकार आम्ही आयुक्तांकडे सोपविलेले आहेत. तेव्हा या प्रकरणी संबंधितांनी आयुक्तांकडे अपील केल्यास त्यांना न्याय मिळू शकेल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36947...

**सभापती** :माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उत्तर देताना सांगितले की, खालच्या निर्णयावर जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांकडे अपील करता येते. त्या प्रमाणे अपील झाले. या प्रकरणी दोन वेळा हिअरींग झाले. एकदा एक सदस्य गैरहजर होते म्हणून त्यांना दुसऱ्यांदा बोलाविण्यात आले. त्या ठिकाणी जो निर्णय झाला त्याच्या विरोधात आयुक्तांकडे अपील करता येते. तेव्हा त्यामध्ये हस्तक्षेप करणे कायद्याच्या दृष्टीने बरोबर नाही. या प्रश्नाच्या अनुषंगाने माझ्या दालनात जी बैठक बोलाविण्यात येणार होती ती रद्द करण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपले स्थान आयुक्तांपेक्षा मोठे आहे. आपण या संदर्भात निर्णय दिलेला आहे. आम्ही बहिर्गमन करतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात )

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36947....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या बाबतीत माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर आपण निदेश दिले आणि सर्व सभागृहाचे समाधान झाले. असे असताना आपण दिलेल्या निर्णयाच्या विरोधात विरोधी पक्षाचे ज्येष्ठ सदस्य आणि जबाबदार असलेली नेते मंडळी सभागृहातून निघून जाणे बरोबर नाही. त्यांनी आपल्या निर्णयाच्या विरोधात अशा प्रकारचे वर्तन करणे बरोबर नाही, म्हणून आपण त्यांना समज दिली पाहिजे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विरोधी पक्षाचा तो अधिकार आहे. माझ्या निर्णयाच्या विरोधात ते सभागृहातून निघून गेले असे मी मानत नाही.

आता आपण पुढील प्रश्नाकडे वळू या.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ ST/ D/ 11:50

**रायगड जिल्ह्यातील सावित्री, कुंडलिका, धरमतर, भोनंग, आंबे, म्हाप्रळ, दादर या खाड्यांमध्ये बेकायदा रेती उत्खनन केल्याबाबत**

**(२) * ३७४८० श्रीमती अलका देसाई, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील सावित्री, कुंडलिका, धरमतर, भोनंग, आंबे, म्हाप्रळ, दादर या खाड्यांमध्ये बेकायदा रेती उत्खनन केले जात असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदेशीररित्या रेतीचे उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता :** (१) व (२) रायगड जिल्ह्यात ऑक्टोबर २०११ ते एप्रिल २०१२ दरम्यान मौजे आंबेत, विचारेवाडी, वीर, कोपराखाडी, सानेगाव, भोनंग, दिवीपारंगी खाडी, रावे, कोलेटीवाडी व दादर अशा वेगवेगळ्या ठिकाणी वाळू/रेतीच्या अवैध उत्खननाप्रकरणी कारवाई करुन मुद्येमाल जप्त केला आहे. तसेच पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात मौजे आंबेत, विचारेवाडी, वीर, कोपराखाडी इ. वेगवेगळया ठिकाणी ऑक्टोबर-2011 ते एप्रिल-2012 या कालावधीत रेतीच्या अवैध उत्खननाप्रकरणी कारवाई केल्याचे नमूद केले आहे. माझ्या माहितीनुसार आजही त्या भागात वाळू माफियांकडून अवैध रेती उत्खननाचे काम सुरुच आहे. या बाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील खुलासेवार बोलतील. मी या निमित्ताने एवढेच विचारु इच्छिते की, अवैध उत्खनन करणाऱ्या वाळू माफियांवर काय कारवाई केली, नसल्यास ती कधी करणार आहात ?

( सभात्याग केलेले काही सन्माननीय सदस्य सभागृहात प्रवेश करतात.)

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, अवैध गौण खनिज उत्खननाच्या बाबतीत कारवाई करण्यात येत असल्याचे या प्रश्नाच्या लेखी उत्तरावरुन दिसून येते. दि.1 एप्रिल, 2012 ते दि.28 फेब्रुवारी, 2013 पर्यंत रायगड जिल्ह्यात अवैध उत्खनन व वाहतुकीचे एकूण 545 प्रकरणे निदर्शनास आली. त्या अनुषंगाने काही अज्ञात व्यक्तींविरुध्द 10 आणि ज्ञात व्यक्तींविरुध्द 10 अशा प्रकारे एकूण 20 गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये जवळजवळ 1.75 कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. अशा प्रकारची कारवाई सातत्याने सुरु असते. ..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37480....

श्री.भाई जगताप : महोदय, अवैध वाळू उत्खननाच्या बाबतीत असलेला हा गंभीर प्रश्न आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत पूर्वी वाळू उत्खननासाठी वाळूचे पट्टे भाडे तत्त्वावर दिले जात होते. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, वाळू पट्टे भाडे तत्त्वावर देण्याबाबत सरकारचे धोरण काय आहे ? कारण आज प्रत्येक वेळी वाळू उत्खननावर बंदी असल्याचे सांगितले जाते. महोदय, या मुळे साधे घर बांधायचे असले तरी लोकांना वाळू मिळत नाही. छोट्या छोट्या कामांसाठी काळ्या बाजारातून वाळू खरेदी करावी लागते. पूर्वी 800-1000 रुपये ब्रासने वाळू मिळत होती, आता ती 6 हजार रुपये ब्रासने मिळत आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, सरकार कायद्याच्या चौकटीत राहून पूर्वी ज्याप्रमाणे वाळूचे पट्टे भाडे तत्त्वावर दिले जात होते तशाच प्रकारे कोकणातील चारही जिल्ह्यांमध्ये भाडे तत्त्वावर वाळूचे पट्टे देणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. या वर्षी वाळू पट्टयांचा लिलाव करण्यात बऱ्याच अडचणी आल्या. दि.27 फेब्रुवारी, 2012 रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे बहुतांश अडचणी आल्या. सर्वोच्च न्यायालयाने वाळू उत्खनन करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही आणि सुनियोजितरित्या शास्त्रीय पध्दतीने गौण खनिजाचे उत्खनन होईल असे आदेश दिले. या आदेशाची पूर्तता करताना आता 5 हेक्टरच्या आतील पट्टयांना सुध्दा राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाचे क्लिअरन्स बंधनकारक झाले आहे. त्यामुळे निश्चितपणे सुरुवातीच्या काळात काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. परंतु आता या अडचणी बऱ्याच अंशी दूर करण्यात आल्या आहेत. या बाबतीत राज्य सरकारला जे नियम करावयाचे होते ते नियम तयार करुन सर्वोच्च न्यायालयाच्या मान्यतेसाठी सादर केलेले आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37480 .....

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्र्यांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, गुन्हे दाखल केलेले आहेत. हे गुन्हे दाखल केल्यानंतर सुध्दा महादेवबाग, ता. रोहा या ठिकाणी बेकायदेशीर वाळू उत्खनन होते म्हणून 46 लोक उपोषणाला बसले होते. त्यावर तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांनी कोणतीही कारवाई आतापर्यंत केलेली नाही. मी तेथील आमदार म्हणून दोन वेळा तहसीलदारांना पत्र लिहिले. हा भाग वाळू माफियांचा आहे. रोहा तालुक्याच्या राष्ट्रवादीच्या एका अध्यक्षाने तहसीलदारावर गोळीबार केला होता. त्यामुळे त्या ठिकाणी वेगळे वातावरण आहे. त्या ठिकाणी मोठी माफियांची टोळी निर्माण झालेली आहे. त्या दृष्टीकोनातून या ठिकाणी आलेली माहिती अपुरी आहे. त्यानंतर सुध्दा त्या ठिकाणी अनेक गुन्हे नोंदलेले आहेत त्या बाबतीत शासन कोणती कारवाई करणार ? ही बाब एवढी गंभीर आहे की, वाळू माफिया आणि वाळूचे उत्खनन आज सुध्दा या राज्यात बेकायदेशीरपणे चालू आहे. वाळू काढण्यावरच कायमची बंदी घालून वाळूला पर्याय निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून शासन वेगळे धोरण करणार का ? दगडापासून वाळू कशी निर्माण करता येईल याबाबत तंत्रज्ञान आलेले आहे. त्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार का ? बंदी असतानाही आज राज्यामध्ये सर्व ठिकाणी बांधकामे सुरु आहेत. तलाठ्यापासून प्रांत अधिकारी यांच्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालू आहे. प्रत्येक चेकनाक्यावर पोलिसांचे हप्ते सुरु आहेत. वाळू माफियांची ही संपूर्ण कार्यवाही शासन थांबविणार का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रोहा तालुक्यासंबंधी पहिला प्रश्न विचारला. या ठिकाणी कोणालाही पाठीशी घालण्याची शासनाची भूमिका नाही. त्यांनी जो प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात निश्चितपणे चौकशी करण्यात येईल आणि योग्य ती कारवाई करण्यात येईल. वाळूला काही पर्याय आहे का असा दुसरा प्रश्न त्यांनी उपस्थित केलेला आहे. दगडापासून वाळू तयार करणे यामध्ये सुध्दा शेवटी उत्खनन आलेच. बांधकामांसाठी आणि प्रकल्पांसाठी वाळूची गरज आहे या वस्तुस्थितीकडे आपल्याला डोळेझाक करुन चालणार नाही. दगडापासून वाळू बनविण्यासाठी कशा पध्दतीने प्रोत्साहन द्यावे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. लवकरात लवकर त्या बाबतीत निर्णय घेतला जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37480 .....

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, वाळूचा हा विषय अत्यंत संवेदनशील झालेला आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये शासनाने वाळूचे ई-टेंडर काढले होते पण वाळू माफियांच्या दबावामुळे ते टेंडर भरण्यासाठी देखील लोक आले नाहीत आणि सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा प्रकारचा दबाव झुगारुन शासन या बाबतीत कशा पध्दतीने अंमलबजावणी करणार आहे ? मंत्री महोदयांनी दगडापासून वाळू तयार करता येईल असे सांगितले. मुळात दगडखाणी आणि क्रशर केले अनेक दिवस बंद आहेत ते चालू करण्याच्या बाबतीत शासन काय योजना आखणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा प्रश्न रायगड जिल्ह्याच्या संदर्भात होता तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या बाबत सांगू इच्छितो की, नाशिक जिल्ह्यामध्ये ई-टेंडरींगची प्रक्रिया अवलंबित होतो त्यामुळे कोणत्याही कार्यालयामध्ये जाण्याचा प्रश्न येत नाही. ई-टेंडर ऑनलाईन भरता येते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला दिसतो. आता हे काम ई-टेंडरींगच्या माध्यमातून होत असल्यामुळे कोणत्याही कार्यालयामध्ये जाऊन टेंडर भरणे अपेक्षित नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37480......

**सभापती** : या प्रश्नावर कितीही उपप्रश्न विचारण्यासाठी मी परवानगी दिली तरी त्यातून सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे मी या विषयाबाबत एक तासाची अल्पकालीन चर्चा करण्याला अनुमती देत आहे. आता मी पुढील प्रश्नाकडे वळतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण चांगला निर्णय घेतला आहे. परंतु वाळूच्या विषयाबरोबर गौण खनिज विषयाचाही त्यात समावेश करण्यात यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : ठीक आहे.

--------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ D/ KTG/

**बीड जिल्ह्यातील मातोरी (ता.शिरुर) ते चकलाबा (ता.गेवराई) या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामास मंजूरी देण्याच्या मागणीबाबत**

**(3) * 38279 श्री.एम.एम.शेख, श्री.सतीश चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) बीड जिल्ह्यातील मातोरी (ता.शिरुर) ते चकलाबा (ता.गेवराइ) या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामास मंजुरी द्यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक 12 डिसेंबर, 2012 रोजी वा त्या सुमारास शासनाकडे सातत्याने केलेली आहे, हे खरे आहे काय
(2) असल्यास, मातोरी ते चकलाबा या रस्त्यामुळे बीड ते चकलाबा गेवराई मार्गे असलेले अंतर 9 कि.मी.ने कमी होवून दोन राष्ट्रीय महामार्गाना जोडणारा रस्ता सुरु होईल, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री. जयंत पाटील यांच्याकरिता** : (1) होय.
(2) नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

( काही सन्माननीय सदस्य बसून बोलत असतात. )

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्यांना आपापसात बोलावयाचे असेल त्यांनी सभागृहात थांबण्याचे कारण नाही. मी देखील माझ्या चेंबरमध्ये जातो. माझ्यासमोर बसलेल्या उजव्या बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे.

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, 4 वर्षापूर्वी मातोरी ते चकलाबा या रस्त्यासाठी मी शासनाकडे निवेदन दिलेले आहे. (अडथळा)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला ताकीद देणे मला योग्य वाटत नाही. याचा अर्थ तुम्ही खाली बसून कॉमेंट करावी असा होत नाही. सभापतींनी केलेली सूचना मानावयाची नाही असे जर आपल्या मनात असेल तर मला अन्य मार्गाने आपल्याला दुरुस्त करावे लागेल.

( सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे खाली बसून बोलत असतात. )

सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना मी पुन्हा सांगू इच्छितो की, आपण अत्यंत हुशार आहात. आपण सभागृहातील कामकाजात चांगल्या प्रकारे भाग घेत असता. परंतु सभापतींनी केलेल्या सूचनेबाबत खाली बसून कॉमेंट करणे तुम्हाला शोभत नाही.

3.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ D/ KTG/

ता.प्र.क्र.38279........

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, मातोरी हे गाव माझे जन्मस्थान आहे. मातोरी ते चकलाबा हे अंतर केवळ 6 कि.मी.आहे. हा रस्ता जिल्हा परिषदेचा आहे. परंतु त्या रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता आहे ते समजत नाही. त्यामुळे 14 कि.मी.लांबच्या अंतरावरुन चकलाबा येथे जावे लागते. मातोरी या गावाच्या ठिकाणी पोलीस स्टेशन आहे, प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. गेल्या 4 वर्षापासून या रस्त्याचे मजबुतीकरण व खडीकरण करण्यात यावे अशी मागणी करीत आहे. हा रस्ता किती दिवसामध्ये दुरुस्त केला जाईल ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्या गावात कायमचे वास्तव्य केले तर त्यांच्या मागणीचा विचार करता येईल. हा ग्रामीण मार्ग आहे. नियम 30/54 अंतर्गत अनेक रस्त्यांसाठी निधी दिला जातो. सन्माननीय सदस्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले होते. ग्रामीण मार्गासाठी टप्प्याटप्प्याने निधी दिला जातो. त्याप्रमाणे या रस्त्यासाठीही निधी देण्याची शासनाची भूमिका राहील.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मातोरी-चकलाबा या रस्त्याचे संपूर्ण मातेरे झालेले आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून या रस्त्याची दुरुस्ती केली जाणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितल्या प्रमाणे या रस्त्याच्या कामासाठी टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

---------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ D/ KTG/

**राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित वसतिगृहांचे थकीत अनुदान व मानधन त्वरित अदा करण्याबाबत**

**(4) * 37044 डॉ. अपूर्व हिरे** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात सामाजिक न्याय विभागातंर्गत चालविण्यात येणाऱ्या शासन मान्यता प्राप्त अनुदानित वसतिगृहांचे गत दोन वर्षातील अग्रीम 60 टक्के व सन 2010-2011 चे अंतिम 40 टक्के थकीत भोजन अनुदान व मागील एक वर्षापासूनचे थकलेले अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांचे मानधन त्वरीत अदा करणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक 28 डिसेंबर, 2012 रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मा. समाजकल्याण राज्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(3) नसल्यास, सदरहू निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. शिवाजीराव मोघे** : (1) होय.

(2) सामाजिक न्याय विभागातंर्गत कार्यरत असणाऱ्या अनुदानित वसतिगृहासाठी चालू वर्षाकरीता रु 95.48 कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आलेले आहेत. मागील वर्षातील अनुदानित वसतिगृहांचे इमारत भाडे, परिपोषण अनुदान व कर्मचारी मानधन याबाबींची थकबाकी देण्यासाठी व चालू वर्षासाठी लागणारी अतिरिक्त रक्कम अशी एकूण रु. 51.09 कोटी इतक्या रकमेची पुरवणी मागणी मान्य करण्यात आलेली असून लवकरच थकीत अनुदान देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अपूर्व हिरे : सभापती महोदय, अनुदान वितरणांमध्ये मोठ्या प्रमाणात दिरंगाई होत आहे. भोजन अनुदानाबरोबरच वेतन अनुदान सुध्दा वेळेवर मिळत नाही. त्यामुळे 6-6 महिने कर्मचाऱ्यांचे पगार होत नाहीत. विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. मागील वर्षी बजेटमध्ये तरतूद करण्यात आली, तरी देखील पुरवणी मागणी करुन हा प्रश्न मार्गी लावावा लागला. म्हणून भविष्यामध्ये असा प्रकार होऊ नये म्हणून कायम स्वरुपी उपाययोजना केली जाईल काय आणि सर्व प्रकारचे अनुदान वेळेवर देण्यासाठी कोणती उपाययोजना केली जाणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : दिनांक 1.1.2012 रोजी परिपोषण आहारामध्ये 630 ग्रॅमवरुन 900 ग्रॅमपर्यंत वाढ करण्यात आली. त्यामुळे तरतुदीमध्ये फरक पडला होता. या परिपोषण आहारासाठी 51 कोटी रुपयांची पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद केली आहे. या निधीचे 15 दिवसामध्ये पूर्णपणे वाटप करण्यात येईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:05

ता.प्र.क्र.37044...

श्री. विक्रम काळे : राज्यात सामाजिक न्याय विभागाअंतर्गत जी वसतिगृहे सुरु होतात त्या वसतिगृहातील कर्मचा-यांच्या व्यथा आम्ही सातत्याने या सभागृहामध्य मांडत आलो आहोत. या कर्मचा-यांचे वेतन व थकीत अनुदान किमान हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी शासन अदा करील काय ? या कर्मचा-यांना वेतनश्रेणी मिळत नाही, त्यांना मानधन दिले जाते. त्यांना वेतनश्रेणी मिळावी यासाठी गेल्या 25 वर्षापासून लोकप्रतिनिधी पाठपुरावा करीत आहेत. तेव्हा या वसतिगृहातील कर्मचा-यांना वेतनश्रेणी देण्यात येईल काय ?

श्री. शिवाजीराव मोघे :15-20 दिवसात ट्रेझरीमधून पैसे मिळणार आहेत. कर्मचा-यांना वेतनश्रेणी देण्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक झाली असून लवकरच हा विषय मंत्रिमंडळापुढे येईल.

डॉ.नीलम गो-हे : सामाजिक न्याय विभागांतर्गत जी वसतिगृहे चालविली जातात त्यांना अनुदान दिले जाते. कर्मचा-यांना पगाराची रक्कम उशिरा मिळते. यामुळे सामाजिक न्याय विभाग तसेच संस्था चालकांविरुध्द कर्मचा-यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झालेला आहे. सगळे संस्थाचालक निर्दोष आहेत की नाहीत या चर्चेमध्ये मी जाणार नाही. कर्मचा-यांचे वेतन व अनुदान देण्यासाठी इतका विलंब होण्याचे कारण काय ? सातारा येथील भटक्या विमुक्तांसाठी काम करणा-या संस्थेच्या बाबतीत माझा प्रश्न आहे की, अनुदान थकीत असल्यामुळे जे तंटे निर्माण झालेले आहेत त्याबाबतीत चौकशी समिती नेमण्यात येईल काय ? समाजकल्याण विभागांतर्गत ज्या ज्या अनुदान मिळणा-या संस्था आहेत त्यांची विभागीय स्तरावर बैठक घेऊन त्यांच्या अडचणी दूर करण्याच्यासाठी मंत्री महोदय स्वत: लक्ष देतील काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : जे आऊटस्टँडिग आहे ते 15-20 दिवसात देण्यात येईल. विलंबाचे कारण मी सांगितलेले आहे. एका विद्यार्थ्यामागे 630 रुपये अनुदान होते ते 900 रुपये झाल्यामुळे पुरवणी मागणी करण्यात आली. दुसरे असे की, काही वेळा एखाद्या डिव्हिजनमधून कमी मागणी होते. त्यामुळे असे प्रश्न निर्माण होतात. असे प्रश्न यापुढे निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल.

..2..

श्री. वसंतराव खोटरे : सामाजिक न्याय विभागांतर्गत जी वसतिगृहे चालवितली जातात त्या वसतिगृहातील कर्मचा-यांचे वेतन वर्षातून दोन-तीन वेळा होते. चार-चार महिने त्या कर्मचा-यांचे पगार होत नाहीत त्यामुळे त्यांना फार त्रास सहान करावा लागतो. या प्रश्नासंबंधी कर्मचा-यांच्या संघटनेच्या पदाधिका-यांसमवेत माननीय मंत्री महोदयांच्या दालनामध्ये एक बैठक झाली होती. त्या बैठकीत कर्मचा-यांचे पगार प्रत्येक महिन्याच्या 1 तारखेला होण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते. तेव्हा थकीत वेतन आणि कर्मचा-यांचे पगार या महिन्यापासून वेळेवर देण्यात येतील काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : 15-20 दिवसात संपूर्ण पैसे देण्यात येतील.

श्री. रामनाथ मोते : अनुदानित वसतिगृहे ही सामाजिक संस्थाकडून चालविली जातात. त्यांना शासनाचे अनुदान येईपर्यन्त स्वत: खर्च करावा लागतो. त्यामुळे या संस्थांना 60 टक्के अग्रिम रक्कम आणि रिपोर्ट सादर झाल्यानंतर 40 टक्के रक्कम देण्याची योजना आहे. मागील दोन वर्षापासून अशा त-हेने रक्कम दिली गेली नव्हती. तेव्हा ही अग्रिम देण्याची प्रथा पूर्वी प्रमाणे सुरु ठेवण्यात येईल काय ?

श्री. शिवाजीराव माघे : त्यांना स्केल देण्याचा प्रश्न विचाराधीन आहे. तो प्रश्न मिटल्यानंतर हा देखील प्रश्न सोडविला जाईल.

श्री. हेमंत टकले : या सामाजिक न्याय विभागामार्फत चालविल्या जाणा-या संस्थांमधून मुलांना योग्य शिक्षण मिळावे, योग्य प्रकारचा आहार मिळावा, राहाण्यासाठी योग्य प्रकारची जागा मिळावी असे शासनाचे धोरण आहे. हे धोरण ठरविल्यानंतर त्याबाबतीत उशीर होत गेला तर त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होतो. त्यामुळे विशेषकरुन या वर्गातील विद्यार्थ्यांची मागे पडण्याची संख्या जास्त आहे. तेव्हा ज्या प्रमाणे इतर बाबतीत ऑन लाईन गोष्टी केलेल्या आहेत त्याप्रमाणे थकीत अनुदान ऑन लाईन पध्दतीने दिले तर त्या संस्थांना अडचण येणार नाही व मुलांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष देता येईल. म्हणून यादृष्टीने काही प्रयत्न होतील काय ?

...नंतर श्री. गिते...

अशुद्धापित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37044...

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, समाजसेवा प्रणाली लागू करण्याची कार्यवाही सुरु झालेली असून ती कार्यवाही लवकरच पूर्ण होणार आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य सरकारने रेडीरेकनरमध्ये केलेली मोठी दरवाढ**

**सर्वसामान्यांवर अन्यायकारक असल्याबाबत**

**(५) * ३७९९८ ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.संजय दत्त, श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.एम.एम.शेख, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारमार्फत ठाणे जिल्ह्यातील रेडीरेकनरच्या दरात २० ते २५ टक्के तर कोकणातील रत्नागिरी ग्रामीण परिसरात सर्वाधिक ४० टक्के वाढ करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेडीरेकनरच्या दरात झालेल्या वाढीमुळे घरखरेदी आणखी महागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम क्षेत्रात मंदी असल्यामुळे दरात कमी वाढीची अपेक्षा असतानाही किमान २० ते २५ टक्के वाढ झाल्याने इमारतींचा पुनर्विकास करताना जुन्या घरांना फटका बसणार आहे, तसेच ही वाढ करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने रेडीरेकनरच्या दराबाबत पुर्नविचार करुन सर्व सामान्याना परवडेल असा दर लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणताच पुर्नविचार केला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही. वार्षिक मूल्यदर तक्ते हे दस्तात नमूद बाजार मूल्याची पडताळणी व त्या अनुषंगाने मुद्रांक शुल्क वसूलीसाठी तयार केलेले असतात. घरांच्या किंमती या वार्षिक मूल्यदर तक्त्यांवर अवलंबून नसून त्या बाजारचलित घटकांवर (Market forces) अवलंबून असतात. सन २०१३ चे वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दर हे बाजारातील दरांचा अभ्यास करुन प्रस्तावित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७९९८

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.आशिष शेलार :सभापती महोदय, सदर प्रश्नाच्या 1 ला "होय" असे उत्तर दिलेले आहे. ठाणे जिल्हयातील रेडीरेकनरच्या दरात 20 ते 25 टक्के तर कोकणातील रत्नागिरी ग्रामीण परिसरात सर्वाधिक 40 टक्के वाढ करण्यात आली आहे. गेल्या वर्षी साधारणत: 18 टक्क्यांपर्यंत रेडीरेकनर वाढत गेले होते. रत्नागिरी ग्रामीण परिसरात रेडीरेकनरचे दर 40 टक्के वाढल्यामुळे त्या भागात जमीन खरेदी, जमिनींची डेव्हलपमेंट, ठाणे येथील डिडेव्हलपमेंट यावर रेडीरेकनरचा विपरित परिणाम होतो आहे. कॉस्ट ऑफ कन्स्टक्शनमध्ये 10 टक्के आर.आर. मध्ये वाढ झाली हे खरे आहे काय, ज्या ठिकाणी अशा ॲबनॉर्मल वाढी 20 टक्क्यांच्या वर झाल्या आहेत. होणाऱ्या महागाईचा विचार करुन शासन पुनर्विचार करणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, वार्षिक मूल्यदर तक्ते दरवर्षी तयार केले जातात. जी स्टॅम्प डयूटी ही बाजार मूल्यावर आकारली जाते. यासंदर्भात एक ठराविक पध्दत आहे. साधारणत: खरेदी विक्रीचे व्यवहार होतात, मूल्य विभागाचे गुणदोष, बाजारातील कल, मालमत्ता प्रदर्शनातील दर, स्थानिक चौकशी इत्यादी बाबी विचारात घेऊन मूल्यदर तक्ते तयार केले जातात. साधारणत: रत्नागिरी जिल्हयामधील गुहागर येथे जिरायती शेतीचा एकरी दर 26 हजार 800 रुपये आहे आणि जास्तीत जास्त दर 4 लाख रुपये एकर एवढा आहे. आज ग्रामीण भागात 26 हजार रुपये एकर दराने जमीन मिळत असेल असे मला वाटत नाही. प्रचलित दर आणि रेडीरेकनरचे दर यात तफावत आहे. विशेषत: ग्रामीण भागात ही तफावत जास्त प्रमाणात आहे. ही तफावत दूर करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न चालला आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, रेडीरेकनरचे दर प्रत्येक वर्षी 10 ते 15 टक्क्यांनी वाढवावे असे शासनाचे धोरण आहे. परंतु प्रत्येक जिल्हयात रेडीरेकनरचे दर 30 ते 40 टक्क्यांनी वाढविण्यात आलेले आहेत. महसूल विभागाचे अधिकारी 40 त 50 टक्क्यांपर्यंत रेडीरेकनरचे दर वाढवितात. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करतात आणि नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात या संदर्भात काही हरकती व सूचना असतील तर त्या सादर कराव्यात अशी अधिसूचना प्रसिध्द करतात. नोव्हेंबर, डिसेंबरच्या कालावधीत बैठक घेताता आणि ए.जी.आर.कडे जाण्याचे अधिकार सुरक्षित आहेत असे सांगितले जाते. त्या बैठकीला काहीच अर्थ

4...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नसतो. रेडीरेकनरचे दर 40 टक्के वाढवून फक्त सेक्शन 32 नुसार त्या अधिकाऱ्याकडे अपील करावयाचे एवढेच अधिकार आहेत. रेडीकरेनरचे दर वाढवून अधिकारी आपली दुकानदारी सुरुच ठेवतात. राज्यात रेडीरेकनरचा दर 10 ते 15 टक्के वाढविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे, तोच दर वाढविला पाहिजे अशी आमची मागणी आहे. परंतु प्रत्येक वर्षी रेडीरेकनरमध्ये 30 ते 40 टक्के दरवाढ होते, ती दरवाढ राज्य शासन कमी करील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, रेडीरकनरचा दर 10 ते 15 टक्क्के एवढाच वाढला पाहिजे असा काही शासनाने निर्णय घेतलेला नाही. साधारणत: बाजार भाव आणि रेडीरेकनरचे दर तफावत नसावी असे शासनाचे धोरण आहे. परंतु काही भागामध्ये जास्त दर वाढतात. मागच्या वर्षात खरेदी विक्री व्यवहार झालेले असतात, त्याच्यावर हे दर प्रामुख्याने आधारित असतात. 15 ते 20 टक्के रेडीरेकनरचे दर वाढविण्यासंबंधी शासनाचे धोरण आहे असे काही म्हणता येणार नाही. मार्केटचा दर व इतर गोष्टी विचारात घेऊन हे दर ठरविले जातात.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37998...........

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जी प्रोसेस सांगितली त्याची सर्व माननीय सदस्यांना माहिती आहे. रेडी रेकनरचे रेट 14 ते 15 टक्के वाढविण्याचे शासनाचे धोरण आहे आणि तेवढ्या प्रमाणात रेट वाढतात असा आमचाही अनुभव आहे. परंतु यावर्षी 40 टक्क्यापर्यंत रेट वाढले आहेत म्हणजे दुप्पटीहून अधिक वाढ झालेली आहे. याबद्दल सरकार फेरविचार करणार आहे काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शासनाची रेडी रेकनरचे दर निश्चित करण्याची एक प्रोसीजर आहे. नोंदणी आणि मुद्रांक विभागामध्ये पूर्ण वर्षभर याची प्रक्रिया सुरु असते. त्यानुसार 1 जानेवारी रोजी रेट जाहीर केले जातात. बाजारात जे व्यवहार होतात त्याच्या जवळपास जाण्याचा शासनाचा प्रयत्न असतो.

सभापती महोदय, या ठिकाणी रत्नागिरी शहराचा उल्लेख केला आहे. त्या भागात रेडी रेकनरच्या दरामध्ये 40 टक्के वाढ झाली आहे. त्या ठिकाणी जे मूल्य ठरविले आहे त्यातून तेथे होणाऱ्या व्यवहाराच्या अगदी जवळ जाण्याचा आमचा प्रयत्न आहे, फार जवळ पोहोचलो असा दावा करु शकत नाही. स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होत असते. त्या बैठकीसाठी लोकप्रतिनिधींना बोलावले जाते. त्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होत असते. सन 1995 मध्ये रेडी रेकनरची प्रोसीजर निश्चित केली होती, त्या संदर्भातील नियम तयार केलेले आहेत.

सभापती महोदय, काळाच्या ओघात बरेच बदल झाले आहेत, 17 वर्षानंतर या संदर्भात लोकांचा अधिक सहभाग घेणे, या विषयाची चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते. रेडी रेकनरचे दर हे केवळ स्टॅम्प ड्युटीपुरते मर्यादित नाही. महानगरपालिका, नगरपालिका यांनी सुध्दा याचा उपयोग करुन मालमत्ता कर, एफएसआय प्रिमियम, बांधकाम विकास शुल्क याची आकारणी केली पाहिजे. रेडी रेकनरचे दर केवळ कागदपत्रांचे रजिस्ट्रेशन करण्यापुरते मर्यादित न राहता दैनंदिन व्यवहारात, विशेषत: महानगरपालिका क्षेत्रामध्ये रेडी रेकनर रेटवर आधारित कर लावले जावेत. हे धोरण लागू होऊन 17 वर्षे झाली आहेत. या धोरणाबाबत पुन्हा एकदा कशा पध्दतीने लोकांचा सहभाग वाढविता येईल, कसा निर्णय करता येईल याचा आम्ही निश्चित प्रयत्न करु.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी रेडी रेकनरच्या वाढीव दरामुळे महाराष्ट्रातील नागरी जीवनावर विपरित परिणाम होत असल्याचे मान्य केले आहे. आता केवळ स्टॅम्प ड्युटी भरण्यापुरते हे दर मर्यादित राहिलेले नाहीत. केंद्र शासनाच्या धोरणानुसार ज्या ज्या महानगरपालिका, नगरपालिका जेएनएनयुआरएम अंतर्गत निधी घेतात, त्यांनी मालमत्ता कराची आकारणी रेडी रेकनरच्या दरानुसार करावयास सुरुवात केलेली आहे. याचा परिणाम मुंबई शहरातील जुन्या चाळींवर होत आहे. यापूर्वी रेडी रेकनरच्या रेटमध्ये 40 टक्क्यापर्यंत कधीही वाढ झालेली नव्हती. मुंबईसारख्या शहरामध्ये जुन्या चाळींवर आकारण्यात येणारा मालमत्ता कर भविष्यात रेडी रेकनर रेटवर आधारित असणार आहे. म्हणून मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, सकारात्मक भूमिका घेऊन याच अधिवेशन काळात रेडी रेकनरच्या रेटबद्दल फेरविचार करणार आहात काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा याच अधिवेशन काळाचा विषय नसून रेडी रेकनर रेट निश्चित करणे ही संपूर्ण वर्षभर चालणारी प्रक्रिया आहे. यामध्ये जास्तीत जास्त लोक सहभाग कसा वाढविता येईल, हे रेट वस्तुस्थितीशी निगडित कसे राहतील यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. या संदर्भात अनेक माननीय सदस्यांना विचार मांडावयाचे असतील, काही सूचना करावयाच्या असतील, जनतेच्या काही सूचना असतील तर त्याचाही विचार करुन रेडी रेकनरचे रेट कशा पध्दतीने जाहीर करायचे याचे धोरण ठरवू.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, या संदर्भातील धोरण अधिक पारदर्शक, अधिक पार्टिसिपेटरी आणि अधिक डेमोक्रॅटिक पध्दतीने करणार असल्याचे जाहीर केल्याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. हे धोरण केव्हापर्यंत जाहीर करणार आहात?

श्री.बाळासाहेब थोरात : रेडी रेकनरचे रेट 1 जानेवारी रोजी जाहीर केले जातात. 2013 या नवीन वर्षाचे रेट जाहीर झालेले आहेत. पुढील तीन महिन्यात या बाबतीत आम्ही अवश्य विचार करु आणि पुढील वर्षी ते लागू होईल याची काळजी घेऊ.

---------

नंतर 2सी.1...

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासी विकासासाठी केलेल्या आर्थिक तरतूदीपैकी**
**दोन हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(७) * ३८२००** **श्री. विजय गिरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकासासाठी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात येत असलेल्या सुमारे चार हजार कोटी रुपयांच्या आर्थिक तरतूदीपैकी दोन हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१२ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहार सन २००५ पासून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) व (२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाचा फंड वेगवेगळया विभागासाठी वापरला जातो. समाज कल्याण किंवा आदिवासी विभागाचा फंड दुसरीकडेच वापरला जात असतो. जनहित याचिकेच्या माध्यमातून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. या प्रकरणात 2000 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला हे खरे आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हे खरे नाही.

श्री. दीपक सावंत : सभापती महोदय, माहे ऑक्टोबर, 2012 च्या शेवटास हे प्रकरण उघडकीस आले आहे काय असा प्रश्न विचारला असता त्यावर माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या लेखी उत्तरात "नाही" असे म्हटले आहे. त्यामुळे हा भ्रष्टाचार नेमका कधी झालेला आहे ? या भ्रष्टाचारासंदर्भात माननीय कोर्टाने ताशेरे मारले असून आपल्या नस्ती जप्त करुन ठेवल्या होत्या हे खरे आहे काय ? हा भ्रष्टाचार नेमका कोणत्या बाबतीत झाला व त्याचे स्वरुप काय होते ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात जो प्रश्न विचारण्यात आला होता त्याला "नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. आपले या वर्षीचे 4005 कोटी रुपये बजेट होते परंतु त्यापैकी प्रत्यक्षात 3500 कोटी रुपये उपलब्ध झाले. या वर्षीची खरेदी 118 कोटी रुपयांची असून यामध्ये कोणताही गैरव्यवहार झाला नाही सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात एक रिट याचिका उच्च



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : ३८२००** ......

श्री.बबनराव पाचपुते....

न्यायालयात दाखल झाली असून त्या रिट याचिकेचा क्रमांक 1532012 असा आहे. यासंदर्भात आपण सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सन 2006ते 2009 या काळातील 4 खरेदीच्या संदर्भात भ्रष्टाचार झाला असून त्यामध्ये एकूण खरेदी 2000 कोटी रुपयांची झाली नसून 76 कोटी रुपयांची खरेदी झालेली आहे. ही बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे यावर अधिक भाष्य करणे योग्य होणार नाही.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये भ्रष्टाचार झाला नाही असे सुरुवातीला सांगितले व नंतर यामध्ये 76 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे असे सांगितले आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, रिट याचिका दाखल झालेली आहे असे मी सांगितले असून सन 2006 ते 2009 या काळात 2000 कोटी रुपयांची खरेदी झाली आहे असे सांगण्यात आले परंतु त्यामध्ये केवळ 76 कोटी रुपयांची खरेदी झाली आहे असे सांगितले आहे. यासंदर्भातील केस कोर्टात सुरु असल्यामुळे यावर अधिक भाष्य करु नये एवढेच मी म्हटले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यायालयीन व प्रशासकीय चौकशी केली जात असते. न्यायालयात प्रकरण असतांना न्यायालय त्यासंदर्भात आपला निर्णय घेत असते व त्या वेळेला विभागीय चौकशी सुध्दा सुरु असते. न्यायालय जो काही निर्णय घेईल तो घेईल, न्यायालयाने यासंदर्भात आपल्याला स्थगिती दिलेली नाही, आमच्याशिवाय तुम्ही कोणतेही काम करु नका असे काही सांगितले नाही. या प्रकरणात भ्रष्टाचार झाला असेल तर यासंदर्भात आपण प्रशासकीय चौकशी करणार आहात काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रकरणाची प्रशासकीय चौकशी झालेली आहे. यामध्ये जी काही खरेदी झालेली आहे ती नियमा प्रमाणे झालेली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात रिट याचिका दाखल झाली असल्यामुळे हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे असेही मी सांगितले आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वनहक्क कायद्याअंतर्गत वनजमीन शेतीसाठी मिळण्याकरिता केलेल्या दाव्यापैकी ५८ टक्के दावे जगंलाखालील जमीनीवर करण्यात आल्याबाबत**

**(८) * ३७४४८ श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.एम.एम.शेख, श्रीमती अलका देसाई, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, डॉ.निलम गोऱ्हे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनहक्क कायद्यांतर्गत वनजमीन शेती कसण्यासाठी मिळावी यासाठी राज्य सरकारकडे प्रलंबित असलेल्या २ लाख एकरच्या दाव्यापैकी तब्बल ५८ टक्के दावे हे जंगलाखालील जमिनीवर करण्यात आल्याची माहिती माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) जंगलाच्या जमिनीवर ज्या आदिवासी, बिगर आदिवासींनी २००५ पूर्वी अतिक्रमण केलेले होते आणि ते तेथे शेती करीत होते, त्यांना त्या जमिनी कायमस्वरूपी देण्यात याव्यात अशी तरतूद वनहक्क कायदा २००५ मध्ये आहे. त्याची मर्यादा ५ हेक्टरची आहे. त्यामुळे राज्याच्या विविध जंगलांच्या क्षेत्रात २ लाख एकर जमीन मिळावी यासाठीचे १ लाख ११ हजार दावे आदिवासी विकास विभागाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही मुदत बंद करावी अशी मागणी वनविभागाकडून गेल्या दोन वर्षापासून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्नांबाबतची रितसर चौकशी करुन सदर जमिनीची मोजणी करणारे कर्मचारी, अधिकारी यांच्याविरूध्द शासनाने कोणती फौजदारी कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.बबनराव पाचपुते** : (१) व (२) वनहक्क कायदा, २००६ व सुधारीत अधिनियम २०१२ अंतर्गत माहे जानेवारी, २०१३ पर्यंत वनहक्क कायद्याच्या कलम ३(१) नुसार ग्रामसभेकडे प्राप्त झालेल्या एकुण ३,३९,१०० वनहक्क वैयक्तिक दाव्यांपैकी २,८८,६०४ दावे मान्य करण्यात आले आहेत. उपविभागीय स्तरीय समितीने त्यापैकी १,११,९९६ दावे मान्य केलेले आहेत. उपविभागीय स्तरीय समितीने मंजूर केलेल्या १,११,९९६ दाव्यांपैकी १,०४,७५५ दावे जिल्हा स्तरीय समितीने मान्य केलेले आहेत. एकूण मान्य वनक्षेत्र २४३५१२.३५ एकर इतके आहे.

माहे जानेवारी, २०१३ पर्यंत ग्रामसभेकडे प्राप्त झालेल्या वैयक्तिक वनहक्काचे ३,३९,१०० दाव्यापैकी फक्त २,७३७ दावे व सामुहिक वनहक्काचे ४,९८८ दाव्यांपैकी फक्त २८१ दावे प्रलंबित आहेत.

अधिनियमातील कलम ४(६) नुसार प्रत्यक्ष भोगवट्याखाली असलेल्या क्षेत्रापुरती मर्यादीत आणि कोणत्याही परिस्थितीत ४ हेक्टर पेक्षा अधिक असणार नाही, इतकेच वनक्षेत्र मंजूर करण्याची तरतूद अधिनियमात आहे.

(३) वनहक्क कायद्यांतर्गत वैयक्तिक आणि सामुहिक वनहक्क दावे स्विकारण्याबाबतची कालमर्यादा अधिनियमात दर्शविलेली नाही. तसेच मुदत बंद करण्याबाबतची कोणतीही मागणी वन विभागाकडून करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, राज्याच्या वन खात्याने हैद्राबाद येथील नॅशनल रिमोट सेन्सींग स्पेस ॲप्लीकेशन सेंटरकडून या जमिनीचे सर्वेक्षण करुन घेतले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37448...

श्री.संजय दत्त....

तेव्हा धक्कादायक माहिती समोर आली आहे की, सन 2005 पूर्वी ज्या जमिनी शेत जमिनी होत्या, त्यातील 58 टक्के जमिनीवर सन 2006-2007 पर्यंत व काही ठिकाणी त्यानंतरही जंगलच होते असे सन 2012 च्या सर्वेक्षणामध्ये आढळले आहे हे खरे आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील यंत्रणा 2005 नंतर वन हक्क दाव्या संबंधातील वन जमिनीची मोजणी करीत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीने राज्य शासनाकडे केली होती. त्यावेळी अशी मोजणी करणाऱ्या अधिकारी,कर्मचाऱ्यांविरूद्ध कारवाई केली जाईल असा आदेश वन विभागाने काढला आहे हे खरे आहे काय व त्याबाबत काय कारवाई झाली याची माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा केंद्र सरकारचा कायदा आहे. या कायद्यानुसार 31 मे पर्यंतचे बंधन घालण्यात आले होते. त्यावेळेस माझ्याकडे फॉरेस्ट डिपार्टमेंट होते. त्यावेळी आम्ही सॅटेलाईटद्वारा माहिती काढलेली होती व त्याचा सर्व्हे केला होता. त्यानंतर काही अतिक्रमणे झालेली आहेत. त्यानंतर काही संघटनांनी पुढाकार घेतला. आता जमीन मिळते म्हणून सरकार वाटायला निघाले आहे म्हणून लाटायला निघा ही प्रवृत्ती वाढली होती. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी 2005 नंतर अतिक्रमणे झाली आहेत. परंतु, वन विभागाने सॅटेलाईटद्वारा संपूर्ण महाराष्ट्रातील वनासंबंधातील माहिती काढून घेतली होती. आपण जो पहिला प्रश्न विचारला आहे तो बरोबर आहे. नंतर काही अतिक्रमणे झालेली आहेत ही वस्तुस्थिती आहे. आपण दुसरा प्रश्न विचारला आहे त्यासंबंधातील सगळी माहिती शासनाकडे आहे. त्यामुळे जमिनींवर बंधने आणली आहेत, जाणूनबुजून त्रास देत आहोत असे कुठेही होत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय म्हणाले की, जमीन वाटायला आली म्हणून लाटायला सुरूवात झाली आहे. मला वाटते हे अन्यायकारक आहे. आदिवासींना जमिनी मिळाव्यात म्हणून अनेक संघटना, राजकीय पक्ष काम करीत आहेत. आदिवासींच्या जमिनी त्यांच्या नावावर झाल्याच पाहिजे म्हणून आपण अनेक वर्ष लढलो आहोत.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37448...

श्री.जयंत प्र.पाटील...

त्यामुळेच राज्य व केंद्र शासनाने आदिवासींच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्याचे मान्य केले आहे. आदिवासींना त्यांच्या जमिनी लवकरात लवकर मिळण्यासाठी धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे त्या निर्णयाची अंमलबजावणी शासन करणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : होय.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदर निर्णयाची अंमलबजावण शासन किती दिवसात करणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लवकरात लवकर.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आणि मंत्री महोदयांनी एकत्रितपणे काम केलेले आहे. ते येथे ज्या पद्धतीने उत्तर देत आहेत ते चुकीचे आहे हे मी नम्रपणे सांगू इच्छितो. आपण आमच्या बरोबर अनेक वेळा लढे दिलेले आहेत.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, आपणाला शासनाचे उत्तर आवडले नाही तर उप प्रश्नाच्या माध्यमातून पुन्हा उत्तर मिळविण्याचा प्रयत्न करावा. माझी अनुमती न घेता उठून बोलण्यास सुरूवात करणे ही नवीन प्रथा पडण्याची शक्यता आहे ती आपण टाळली पाहिजे. माननीय सदस्यांच्या प्रश्नाला माननीय मंत्र्यांनी उत्तर देण्याचे कारण नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपला निर्णय अंतिम आहे. तथापि, सभागृहामध्ये चुकीची प्रथा पडत आहे. मी आपली परवानगी मागितली होती. आपण निदेश दिल्यानंतर आम्ही बोलत नाही. आम्ही हतबल आहोत. ज्यासाठी आम्ही भांडलो त्या प्रश्नालाच न्याय मिळत नाही. त्याचे आम्हाला भयंकर वाईट वाटते.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37448...

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यास मी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. लवकरात लवकर सगळ्यांना जमीन देण्यात येणार आहे काय, असा प्रश्न विचारला असता मी त्यास "होय" असे उत्तर दिलेले आहे. किती दिवसात जमिनी देण्यात येतील, असा प्रश्न विचारला असता मी त्यास "लवकरात लवकर" असे उत्तर दिले. माझ्याकडे सगळी माहिती आहे. सुरूवातीला ग्रामपंचायतीकडे अर्ज करावयाचा आहे. ग्रामपंचायतीकडे 3 लाख 39 हजार 100 अर्ज आले आहेत. त्यापैकी ग्रामपंचायतीने 50398 अर्ज अमान्य केलेले आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37448.....

श्री.बबनराव पाचपुते....

2 लाख 88 हजार 604 दावे मान्य केलेले आहेत. सामूहिक वन हक्काच्या संदर्भात 4 हजार 988 दावे प्राप्त झाले. त्यापैकी 68 दावे अमान्य झाले तर 4 हजार 920 दावे मान्य झालेले आहेत. हे दावे पुन्हा उप विभागीय समितीसमोर म्हणजे दुसऱ्या समिती समोर जातात. उप विभागीय समितीकडे 2 लाख 88 हजार 604 दावे आहेत. त्यापैकी 1 लाख 74 हजार 675 दावे अमान्य झाले तर 1 लाख 11 हजार 996 दावे मान्य केलेले आहेत. सामूहिक वन हक्काच्या संदर्भात 4 हजार 920 दावे प्राप्त झाले. त्यापैकी 1 हजार 625 दावे अमान्य झाले तर 3 हजार 408 दावे मान्य झालेले आहेत. शासनाने आदिवासींचा हक्क डावलेला नाही तर त्यांना हक्क दिलेला आहे. त्यांना जमीन दिलेली आहे.

सभापती महोदय, जिल्हा स्तरीय समितीकडे 1 लाख 11 हजार 996 दावे प्राप्त झाले त्यापैकी 6 हजार 453 दावे अमान्य करण्यात आले तर 1 लाख 4 हजार 755 दावे मान्य करण्यात आले. सामूहिक हक्कामध्ये 3 हजार 048 दावे अमान्य केलेले आहेत तर 237 दावे मान्य केलेले आहेत. आपण ही सर्व आकडेवारी पाहिल्यास इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र आघाडीवर आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याने आदिवासींना जमीन देण्याबाबत चांगले निर्णय घेतलेले आहेत.

सभापती महोदय, उप विभागीय स्तरावर 43 हजार 480 दावे प्राप्त झाले होते. आपण जिल्हा स्तरावर मोठ्या प्रमाणात जमिनींचे वाटप केलेले आहे. आदिवासींना जमीन कसण्यासाठी जी ताकद पाहिजे त्यासाठी शासनाने 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे शिवाय केंद्र सरकारकडे 500 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. जमीन सपाटीकरण करणे, विहीर घेणे, पाईप लाईन टाकणे, बी-बियाणे व औषधांसाठी यासाठी निधी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आम्ही आदिवासींवर अन्याय करणार नाही. या रकमेचे वाटप करण्यात येणार काय या प्रश्नाचे उत्तर होय असे दिलेले आहे. त्यांना लवकरात लवकर मदत करण्यात येईल काय या प्रश्नाचे उत्तर त्यांना तातडीने मदत करण्यात येईल असे दिलेले आहे. या संदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात आलेली आहे. मी हे सर्व आपणास माहितीसाठी सांगत आहे.

.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37448.....

डॉ.नीलम गोऱ्हें : सभापती महोदय, या प्रश्नावर सभागृहाचा वेळ घालविण्याची आमची इच्छा नाही. प्रत्येक जिल्ह्यात दावे का फेटाळण्यात आले, त्यामध्ये काय अडचणी आहेत हे जाणून घेण्यासाठी आपण या विषयावर एक तासाची चर्चा घडवून आणावी अशी विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, आपण मला माझ्या दालनात येऊन भेटावे. मी त्याबाबत जरुर विचार करीन.

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या तीन सूचना आलेल्या आहेत.

सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, जयंत प्र.पाटील, सुमंत गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्री भाई गिरकर, डॉ.नीलम गोऱ्हे व श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहर व उपनगरातील जागांच्या भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर रेडी रेकनर प्रमाणे दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून आकारण्याचा निर्णय घेतला असल्याने तसेच करप्रणाली मालमत्तेच्या संपूर्ण बांधलेल्या क्षेत्रफळावर आधारित असल्याने मुंबईतील सुमारे 1 लाख 80 हजार मालमत्ता मालकांना गत तीन वर्षापासूनची जादा कराच्या रकमेची बिले प्राप्त होणे, त्यासाठी कोणीही सवलत देण्यात न येणे, सदर रक्कम न भरल्यास त्यावर दोन टक्के जादा कर आकारण्याची तरतूद केलेली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्या बाबत सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, पूर्वी मुंबई शहरामध्ये रेटेबल व्हॅल्यूवर आधारित कर आकारला जात होता. परंतु जेएनएनयुआरएमच्या अटीनुसार आता कॅपिटल व्हॅल्यू बेसवर कर आकारण्यात येत आहे. हा निर्णय तीन वर्षापूर्वी घेण्यात आला होता. त्यानुसार मुंबई महानगरपालिका ॲक्टमध्ये बदल करण्यात आला. या संदर्भातील फॅक्टस आणि फॉर्म्युला ठरविण्यासाठी दोन समित्या नेमण्यात आल्या. या समित्यांनी प्रॉपर्टी टॅक्स ठरविण्यासाठी कोणता फॉर्म्युला असला पाहिजे, त्यामध्ये कोणकोणते फॅक्टर असले पाहिजेत, प्रत्येक प्रॉपर्टीची डेफिनेशन कशी वेगळी असली पाहिजे,

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:35

ॲड.आशिष शेलार.....

या महापालिकेच्या स्वरुपावर ठरविल्या. त्यानंतर नवीन देयके काढली गेली आहेत. फॅक्टर्स, डेफिनेशन आणि फॉर्म्युला यांचा विचार करुन तीन वर्षांची देयके दुपटीच्या वर आलेली आहेत. मुंबईतील 21 क्लासिफिकेशनपैकी 17 क्लासिफाईड लोकांना प्रॉपर्टी टॅक्सेशनचा मार बसत आहे. शिवाय गेल्या तीन वर्षांचा बॅकलॉग एकदम भरावा लागणार आहे. महागाईच्या परिस्थितीत या लोकांना जास्त मालमत्ता कर भरावा लागत असल्यामुळे या विषयी चर्चा व्हावी अशी आमची विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी एका प्रश्नावर चर्चा करताना सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी सुध्दा या बाबतचा उल्लेख् केला होता. हा गंभीर प्रश्न आहे. या बाबत शासनाचे नेमके म्हणणे काय आहे हे सभागृहाला समजले पाहिजे.

**सभापती** : मी माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, रेडी रेकनरच्या दृष्टीने 2010 मध्ये जी वाढ केली आहे त्या अनुषंगाने सातत्याने करात वाढ होणार आहे. परिणामी वाढीव कर लोकांना असह्य होणार आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आज पासून विभागवार चर्चेला सुरुवात होणार आहे. नगर विकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेच्या वेळी या बाबत चर्चा होईल. परंतु एक गोष्ट खरी आहे की, कराच्या संदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे. माननीय सभापती महोदय, आपण सुध्दा एके काळी मंत्री होता. एकदा कर लावल्यानंतर तो विथ्ड्रॉ केला तर वेगवेगळे अर्थ निघतात. विकास करण्यासाठी निधी लागतो. रेडी रेकनरच्या माध्यमातून प्राप्त होणारा कर विकास कामांवर खर्च करावा लागतो.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, 2010 पासून हा कर लागू करण्यात आला आहे. आज 2013 वर्ष सुरु आहे. शिवाय लोकांना 2010 पासूनचा कर भरावा लागणार आहे. जर बॅकलॉगचा कर भरला नाही तर 20 टक्के पेनल्टी लागणार आहे. काही ठिकाणी हा कर दुप्पट-तिप्पट झाला आहे.

महोदय, मी कांदिवली येथे आमदार विकास निधीतून 20 लाख रुपयांचे 3400 स्क्वे.फू. क्षेत्रफळाचे समाज मंदिर बांधले होते. ते समाजमंदिर पत्रा शेडचे आहे. आज रेडी रेकनरनुसार त्या समाज मंदिराचे व्हॅल्यूएशन 3 कोटी 40 लाख रुपये केले आहे. तसेच महिला बचत गटाची

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर....

संस्था त्या काळात 5 लाख रुपयांत बांधलेली असताना त्याचे व्हॅल्यूएशन 45 लाख रुपये दाखविले आहे. शिवाय दर 5 वर्षांनी रेडी रेकनर बदलणार आहे. सामाजिक संस्था, ट्रस्ट, समाजमंदिर इत्यादि बांधकाम कमर्शियलमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी कोणी राहत नाही ते कमर्शियल म्हणून गणले गेले आहे. बालवाडी, समाजमंदिर, ट्रस्ट, सामाजिक संस्था यांना कमर्शियल धरुन टॅक्स लावला आहे. महोदय, हा कर रद्द करावा अशी आमची मागणी नाही, परंतु या बाबतीत सभागृहामध्ये चर्चा घडवावी अशी आमची मागणी आहे. तसेच या प्रकरणी संबंधितांवर जो अन्याय झाला आहे तो दूर करावा.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी सन्माननीय सदस्यांचे नेमके काय प्रश्न आहेत या बाबत त्यांनी मला निवेदन द्यावे. या संदर्भात संबंधित सन्माननीय सदस्य आणि संबंधित अधिकाऱ्यांना एकत्र बसवून चर्चा घडवून आणण्यात येईल. यातून व्यवहार्य मार्ग काढण्याची राज्य सरकारची तयारी राहील. परंतु एक गोष्ट खरी आहे की, सरकारने विचार करुन कर लावलेला आहे. तरी सुध्दा या विषयी सन्माननीय सदस्य व अधिकाऱ्यांशी एकत्रित चर्चा करुन योग्य तो मार्ग काढण्यात येईल.

**सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांना एकत्र घेऊन त्यांनी चर्चा केली तर या प्रकरणी सहज मार्ग निघू शकतो. त्यामुळे या विषयी मी वेगळी चर्चा उपस्थित करण्यास परवानगी देऊ इच्छित नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब, ॲड. आशिष शेलार, श्री. विनायक राऊत यांनी दोन-तीन ठिकाणी झालेल्या मारहाणीच्या प्रकाराच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. खरे म्हणजे नियम 289 अन्वये दिलेली ही प्रस्तावाची सूचना न स्वीकारता जर सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत लक्षवेधी सूचना दिल्या तर त्या लक्षवेधी सूचनांना प्राधान्य देण्याचा मी जरुर प्रयत्न करीन. पण नियम 289 अन्वये दिलेल्या या प्रस्तावाच्या सूचनेला मी प्राधान्य देणार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आरोपी फरारी आहेत. चार दिवस झालेले आहेत.

**सभापती** : नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये जर राज्याच्या संदर्भातील, विभागाच्या संदर्भातील विषय असेल तर त्याला आपण प्राधान्य देतो. मी सांगितल्याप्रमाणे जर सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिली तर मी त्याचा जरुर विचार करीन.

डॉ. नीलम गोऱ्हे : धुळे येथे आणि इतर ठिकाणी ज्या घटना घडलेल्या आहेत...

**सभापती** : या सूचनेमध्ये तीन ठिकाणी घडलेल्या वेगवेगळ्या गुन्ह्यांचा उल्लेख केलेला आहे. मी असे सांगितले की, जर आपण लक्षवेधी सूचना दिल्या तर मी त्याचा विचार करीन.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, जयंत प्र. पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्री. विजय गिरकर, डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड. अनील परब यांनी आयपीएल स्पर्धेच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होतो याबाबत सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, 9 एप्रिल ते 15 मे, 2013 या कालावधीत तीन ठिकाणी जे आयपीएलचे सामने होणार आहेत त्या तीनही ठिकाणच्या खेळपट्टया तयार करण्यासाठी रोज 60 हजार लिटर पाणी लागणार आहे. राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती असताना आसारामबापू यांनी रंगपंचमीच्या निमित्ताने जे पाणी वाया घालविले त्याबाबत आपण सर्वांनी मिळून निषेध व्यक्त केलेला आहे. अशा प्रकारचा पाणी वापर ज्या ज्या ठिकाणी होणार आहे त्याबाबत शासनाचे नेमके



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ...

काय धोरण आहे ? 9 एप्रिल ते 15 मे या कालावधीत इतक्यास मोठ्या प्रमाणावर पाणी वापरले जाणार आहे. त्यामुळे या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. राज्यात आणखी तीन महिने दुष्काळाचा विषय सुरु राहणार आहे. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर पाणी वापरले जाणार आहे असे पाणी वापरावयाचे की नाही या बाबतीत शासनाचे काय धोरण आहे ? एक मुद्दा अस पुढे येईल की, हे आयपीएल सामने म्हणजे महाराष्ट्राच्या भूषणाचा विषय आहे. मग त्याची खूप मोठ्या प्रमाणावर किंमत ठरवून ते पैसे दुष्काळी भागात वापरण्याचा विचार झाला पाहिजे. प्रामुख्याने हा धोरणाचा विषय असल्यामुळे आपण या विषयावर सभागृहात चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये दुष्काळ आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु दुष्काळ असताना देखील महाराष्ट्रातील काही भाग असा आहे की, त्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे. मुंबईपुरते बोलावयाचे झाले तर मुंबई महानगरपालिका तेथील कामाला पाणी देते. कमर्शियल पाण्याचा दर वेगळा असतो आणि घरगुती वापराकरिता पाण्याचा दर वेगळा असतो. परंतु एकंदरीत राज्यामध्ये काही भागात अक्षरश: पिण्याच्या पाण्याचे अतिशय दुर्भिक्ष्य आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेता हा मुद्दा काही लोकांनी सध्या चर्चेत आणलेला आहे. इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच प्रिंट मीडियामध्ये देखील या संदर्भातील बातम्या बघण्यात आणि ऐकण्यात आलेल्या आहेत. त्या संदर्भात मी एवढेच सांगेन की, ज्या ठिकाणी हे सामने आहेत त्या ठिकाणी जर पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल तर त्या संदर्भात राज्य सरकार निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेईल.

**सभापती** : या बाबतीत चर्चा करावयाची असेल तर काय करावयाचे याचा निर्णय मी स्वत: घेईन.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याच्या मुद्याबाबत

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिनांक 25 मार्च, 2013 रोजी एक औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी माझ्याकडे परवानगी मागितली होती. त्या दिवशी सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये काही प्रश्न झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज तहकूब झाले होते. त्यानंतर त्यांनी दिनांक 26 मार्च, 2013 रोजी माझ्याकडे त्यांच्या औचित्याच्या मुद्यासंबंधी विचारणा केल्यावर मी त्यांना होकारार्थी उत्तर दिले होते. त्यानुसार त्यांनी दिनांक 26 मार्च, 2013 रोजी आपला औचित्याचा मुद्दा मांडला होता. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडल्यानंतर माननीय उप सभापतींनी याबाबतचा निर्णय सभापती देतील असे जाहीर केले होते. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी दिनांक 26 मार्च, 2013 रोजी माझ्याकडे एक पत्र दिले होते. मी या संदर्भात सर्व बाजूंनी पूर्ण विचार केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी दि.26 मार्च रोजी माझ्याकडे जे पत्र दिले होते त्याच्या संदर्भात मी निर्णय देण्याचे ठरविलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी दि.25 मार्च रोजी परवानगी दिली होती. त्यांनी तो औचित्याचा मुद्दा दिनांक 26 मार्च, 2013 रोजी मांडला होता. त्यांच्या मुद्यावर माननीय उप सभापतींनी जो निर्णय दिला होता त्यासंबंधी त्यांना काही तरी भाष्य करावयाचे होते. या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनावर सभापती, उप सभापती किंवा तालिका सभापती असले तरी त्यांचा निर्णय किंवा निष्कर्ष असतो तो सर्वांना बंधनकारक असतो अशा निर्णयाप्रत मी आलो आहे. यासंबंधी माननीय उप सभापतींनी निर्णय दिलेला असल्यामुळे मी त्यावर भाष्य न करता माझा निर्णय आता वाचत आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी आज बोलण्यासाठी परवानगी देणार नाही. कारण मी आपल्याला यापूर्वी दोन वेळा परवानगी दिलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिनांक 26 मार्च, 2013 रोजी मला एक पत्र दिलेले आहे. ए.बी.पी.माझा आणि आय.बी.एन.लोकमत या वृत्तवाहिन्यांचे संपादक श्री.राजीव खांडेकर व श्री.निखील वागळे यांच्या विरोधात विधानपरिषदेच्या सभागृहाने दिनांक 21 मार्च, 2013 रोजी मंजूर केलेला हक्कभंग प्रस्ताव मागे घेण्याच्या संदर्भात त्यांनी दिनांक 26 मार्च, 2013 रोजी सभागृहात औचित्याचा मुद्दा मांडला असता माननीय उप सभापतींनी त्यांचे वक्तव्य

2.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**सभापती**.........

कामकाजातून काढून टाकल्यामुळे सदस्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा संकोच होत असल्याची बाब सदर पत्रात उपस्थित करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना सोमवार, दि.1 एप्रिल, 2013 रोजी शून्य प्रहरात सांविधानिक न्याय मागण्याची परवानगी देण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

मी या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी तपासून पाहिली असता दि.18 मार्च, 2013 रोजी पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असताना विधानसभेच्या सदस्यांना सी-लिंकवर अवमान झाल्याचे प्रकरण सभागृहासमोर आले होते. त्याच प्रकरणाच्या अनुषंगाने विधान भवन परिसरामध्ये काही घटना घडल्या होत्या. दि.20 मार्च, 2013 रोजी संपूर्ण सभागृहाने एकमताने विधान भवन परिसरामध्ये घडलेल्या घटनेबाबत खेद व्यक्त केला होता.

सदरहू प्रकरणी ए.बी.पी.माझा आणि आय.बी.एन.लोकमत या वृत्तवाहिन्यांवरील बातम्यांमधून चर्चासत्रातून सन्माननीय सदस्य व सार्वभौम सभागृहाचा अवमान करणाऱ्या बातम्या प्रसिध्द होत होत्या. ही बाब विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, शिवसेना गट नेते श्री.दिवाकर रावते, काँग्रेस पक्षाचे गट नेते श्री.सुभाष चव्हाण, राष्ट्रवादी पक्षाचे गट नेते श्री.हेमंत टकले व सभागृहातील अनेक वरिष्ठ सदस्यांसमवेत या प्रकरणाची चर्चा माझ्या दालनात करण्यात आली व सदर प्रकरण सभागृहाच्या विशेषाधिकारांचे भंग करणारे व त्या संदर्भातील सर्व निकष पूर्ण करणारे असल्यामुळे सर्वानुमते असे ठरले की, संपूर्ण सभागृहाच्या एकमताने हक्कभंगाचा प्रस्ताव संमत करावा आणि तो विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे पाठवावा.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**...

या निर्णयाप्रमाणे दिनंक 21 मार्च 2013 रोजी सन्माननीय सदस्य श्री. अशोक उर्फ भाई जगताप यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 240 अन्वये विशेषाधिकार भंगाचा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रस्ताव मांडला. सदर प्रस्तावावर सभागृहातील सर्व पक्षाच्या सदस्यांची सही असून त्यावर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांची सुध्दा सही आहे. सदरहू प्रस्ताव एकमताने मंजूर करुन विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे पाठविण्यात आला.

सदर हक्कभंग प्रस्तावाच्या झालेल्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, दिवाकर रावते, अमरसिंह पंडित, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, भगवान साळुंखे, यानी आपले मत व्यक्त केले. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे भाषण मी तपासून पाहिले असता त्यांनी फ्रिडम ऑफ प्रेस संविधानातील अनुच्छेद 194 (1), (2),(3) आणि (4) तसेच संविधानाच्या अनुच्छेद 19(2) मधील तरतुदी, कार्पोरेट जगतातील मीडियाची वागण्याची चुकीची पध्दत आणि सभागृहाचे अधिकार किती श्रेष्ठ आहेत व हा विशेषाधिकार भंग कसा होतो हे सांगून सदर प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठवावे असे आग्रही प्रतिपादन केले.

त्यानंतर दिनांक 21 मार्च 2013 रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री मोहन जोशी, हेमंत टकले यांनी औचित्याच्या मुद्याची सूचना दिली होती. त्याच दिवशी सभागृहाचे कामकाम सुरु असताना सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी माझ्याकडे एक औचित्याचा मुद्दा मांडण्याच्या संदर्भात पत्र दिले. सदरहू पत्र लांबलचक असल्यामुळे सभागृहाचे कामकाज चालविताना मला ते संपूर्णपणे वाचणे शक्य नव्हते. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे काही वेगळा विषय मांडत आहेत असे मला वाटले. तथापि, त्या दिवशी सभागृहाच्या कामकाजामध्ये ते मांडले गेले नाही. दिनांक 26 मार्च 2013 रोजी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सदरचा औचित्याचा मुद्दा मांडण्याची अनुमती सभापतीस्थानी असलेल्या उप सभापती महोदयांकडे मागितली

..2..

**सभापती**...

आणि असे करताना त्यांनी मला माननीय सभापती महोदयांनी अनुमती दिलेली आहे असाही उल्लेख केला होता.

माननीय उप सभापतींनी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली आणि त्यांनी जो मुद्दा मांडला तो दिनांक 21 मार्च 2013 रोजी संपूर्ण सभागृहाने एकमताने मान्य केलेल्या विशेषाधिकारभंगाच्या विरोधात होता. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते यांनी आक्षेप घेऊन हा मुद्दा सभागृहाच्या निर्णयाशी विसंगत असल्यामुळे मांडण्यात येऊ नये, जो भाग यापूर्वीच मांडण्यात आलेला आहे तो कामकाजाच्या कार्यवाहीतून वगळण्यात यावा व त्यास प्रसिध्दी देण्यात येऊ नये असे प्रतिपादन केले. सदर प्रतिपादनास सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले व किरण पावसकर यांनी दुजोरा दिला व सदरहू मजकूर वगळण्यात आल्याचे माननीय उप सभापती यांनी घोषित केले.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सभागृहाच्या कार्यवृत्तातून मजकूर वगळण्यास माननीय उप सभापती किंवा तालिका सभापती यांना अधिकार आहेत का ? त्याच प्रमाणे कोणत्या नियमाने सदर मजकूर काढता येतो ? अशी संसदीय कार्यपध्दती आहे काय ? याबाबत प्रतिविचारणा केली असून त्यांचे म्हणणे मांडण्यास परवानगी मागितली आहे.

मी नियमातील तरतुदी तपासून पाहिल्या असता विधानपरिषद नियम 9 मध्ये 'सभापतीस्थानी असलेल्या व्यक्तीचे अधिकार' या शीर्षाखाली असे नमूद केलेले आहे की,

"उप सभापतींना आणि विधानपरिषदेच्या कोणत्याही तात्पुरत्या सभापतींना विधानपरिषदेच्या सभास्थानी असताना सभापतींना अशा रीतीने सभास्थानी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील आणि सभापतीसंबंधीचे नियमातील सर्व उल्लेख, अशा परिस्थितीत, अशा रीतीने सभापतीस्थानी असणा-या अशा कोणत्याही व्यक्तीसंबंधी आहेत, असे समजण्यात येईल."

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ D/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:55

सभापती....

त्याचप्रमाणे "कार्यवाहीतून शब्द काढून टाकणे" या शिर्षाखाली म.वि.प.नियम 281 यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की :-

" कार्यवाहीत असंसदीय,मानहानिकारक किंवा असभ्य किंवा शिष्टसंमत नसलेला किंवा सभागृहाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारा असा एक किंवा अनेक शब्द वापरण्यात आलेले आहेत असे सभापतींचे मत असेल, तर त्यांना, स्वेच्छा-निर्णयानुसार, विधानपरिषदेच्या कार्यवाही वृत्तातून असा शब्द किंवा असे शब्द काढून टाकण्यात यावा किंवा यावेत असा आदेश देता येईल."

तसेच या बाबतची संसदीय प्रथा, परंपरा काय आहे हे मी तपासून पाहिले असता, कौल आणि शकधर यांच्या पार्लमेंटरी प्रॅक्टीस ॲण्ड प्रोसिजर या पुस्तकातील सहाव्या आवृत्तीतील पृष्ठ क्रमांक 1049 व 1050 या संबंधीचे विवेचन केले असून त्यानुसार मानहानिकारक किंवा असभ्य, आरोपात्मक आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारे असे शब्द कार्यवाहीतून काढण्याचे माननीय सभापतीस्थानी असणाऱ्या व्यक्तिला अधिकार आहेत. त्याचप्रमाणे, कोणत्या परिस्थितीमध्ये कोणते शब्द काढावेत त्या संदर्भातील अधिकार सभापतीस्थानी असलेल्या व्यक्तीला आहेत. सभागृहामध्ये जर एखाद्या सदस्याने विसंगत असे विधान केले व त्याकडे जर एखादा सदस्य किंवा माननीय मंत्री यांनी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले आणि माननीय सभापतींच्या मते ते सभागृहाच्या आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेला अशोभनीय ठरले तर, असा शब्द किंवा ती वाक्ये ही त्या कार्यवाहीचा भाग होऊ शकत नाहीत व तो भाग वगळण्याचा माननीय सभापतींना अधिकार आहे. सभागृहातील कामकाजामधून अनेकदा असे शब्द किंवा अशी वाक्ये वगळण्यात आली आहेत.

वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता सभापतीस्थानी असलेल्या व्यक्तीचे अधिकार, नियमातील तरतुदी, संसदीय प्रथा, परंपरा, पूर्वोदाहरणे हे सर्व तपासून पाहिले असता सदर मजकूर वगळण्याचा या पीठासनास संपूर्ण अधिकार असून माननीय उप सभापती यांनी वगळलेल्या मजकुराशी मी पूर्णपणे सहमत आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिनांक 21 मार्च,2013 रोजी विशेषाधिकारभंगाच्या प्रस्तावावर बोलताना व्यक्त केलेले त्यांचे मत आणि औचित्याच्या मुद्याव्दारे सभागृहात मांडण्याचा प्रयत्न करीत असलेली बाब, या दोन्ही बाबी परस्पर विसंगत आहेत. त्याचप्रमाणे, गट नेत्याच्या बैठकीमध्ये घेतलेला निर्णय आणि त्यानुसार

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

सभागृहामध्ये एकमताने घेतलेला निर्णय या बाबीशी सुध्दा विसंगत असल्यामुळे मी त्यांना या विषयावरचा कोणताही औचित्याचा मुद्दा मांडण्याची अनुमती देत नाही.

हे प्रकरण आता येथेच संपलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी अतिशय थोडक्यात माझा मुद्दा मांडणार आहे.

**सभापती** : मी दिलेल्या निर्णयावर आपल्याला भाष्य करता येणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : आपण निर्णय देत असताना असा उल्लेख केला की, " गट नेत्यांची बैठक" माझ्या दालनात झाली. मी या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या मुद्याचे समर्थन करीत नाही. आपली प्रथा आणि संकेत असे आहेत की, गटनेत्याबरोबर माननीय सभापतींच्या दालनात झालेली चर्चा आपण कधीही रेकॉर्डवर आणत नाही. तेवढे वाक्य काढून टाकावे अशी माझी आपणास विनंती आहे.आपणाकडून कदाचित अनवधानाने तो उल्लेख झाला असावा.

**सभापती** : अनेक वेळा सभागृहाचे नेते, विरोधी पक्ष नेते, गट नेते यांना मी माझ्या दालनात सल्ला घेण्यासाठी बोलावित असतो, विचारविनिमय करीत असतो, काही वेळा तो निर्णय सभागृहात जाहीरही करीत असतो. त्या निर्णयाप्रमाणे पुढील कामकाज करीत असतो.

-------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ KTG/ ST/ 13:00

**पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.राजेंद्र मुळक (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा सातवावार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

**औचित्याच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे तीन औचित्याच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. संबंधित माननीय सदस्यांना उद्या औचित्याची सूचना मांडण्याची संधी देण्यात येईल.

------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना**

**सभापती** : आता सहसचिव नियम 93 अन्वयेच्या सूचनेतील विषय व त्यावरील माझा निर्णय वाचून दाखवतील.

**सह सचिव** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी " मुंबई शहरातील बांद्रा येथील लिलावती हॉस्पिटल बंद करुन त्या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल उभारण्याचा रचलेला डाव" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "ठाणे विक्रीकर कार्यालयातील 23 शिपाई पदांच्या भरतीत झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणातील गुन्हे दाखल केलेल्या अधिकाऱ्यांसाठी विधी व न्याय विभागाने सरकारी वकिलांची नियुक्ती करण्यास दिलेली मान्यता रद्द करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खंडाळे, वेश्वी, वाडगाव, मुळे इत्यादी परिसरात आलेल्या कांद्याच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात भेसळ झाल्याने उत्पन्नात घट निर्माण झाल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 25 मार्च, 2013 रोजी जालना शहरातील ॲड.रशिदा हुसैनी बानिवाल या महिलेवर प्राणघातक हल्ला केलेल्या आरोपींना अटक करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "औरंगाबाद जिल्हयात कन्नड येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे आयोजित केलेल्या लोकअदालतीची आकडेवारी फसवी असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..



SGB/ D/ D/ KTG/ ST/ 13:00

**सह सचिव**...........

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी "मौजे ढोकाळी बाळकुंभ (जि.ठाणे) येथील जमिनीत विकासकाने अनधिकृत मातीचा भराव टाकून 100 कोटीहून अधिक शासनाला द्यावयाच्या रॉयल्टीमध्ये केलेला भ्रष्टाचार तसेच यामुळे गावातून येणाऱ्या सांडपाण्याचा व पावसाळी पाण्याचा निचरा न होणे, परिणामी बाजूच्या शेतात भाजीपाला सडून होत असलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "रायगड जिल्हयातील जे.एन.पी.टी.येथे माल वाहतूकदार कंपन्या क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करीत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "माजी आमदार लक्ष्मण माने यांच्याविरुध्द दिनांक 26 मार्च, 2013 रोजी वा त्यासुमारास जकातवाडी येथील शारदाबाई पवार आश्रमशाळेतील तीन महिला कर्मचाऱ्यांनी लैंगिक छळ करीत असल्याचा केलेला आरोप" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी "दिनांक 28 मार्च, 2013 रोजी खेड (जि.रत्नागिरी) येथील एका अल्पवयीन बालिकेवर गुंडांनी बलात्कार केल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "मुंबईतील मनोरा आमदार निवास, सह्याद्री अतिथीगृहात स्थापत्य, विद्युत, लिफ्ट अशा विविध विभागातील 508 कर्मचा-यांना नियमित करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..



**सह सचिव**.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "पुणे येथील मधुकर राऊत यांच्या नगर योजनेतील जमिनीसंदर्भातील निर्णय प्रलंबित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 93 अन्वये ज्या सूचना माडण्यात येतात, त्या संदर्भात आपण निर्देश दिल्यानंतर शासनाकडून जी निवेदने पाठविली जातात त्याच्या प्रती माननीय सदस्यांना सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी मिळाव्यात अशी विनंती आहे. आम्ही सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी सभागृहात उपस्थित होत असतो. निवेदनाच्या प्रती आयत्यावेळी दिल्या जात असल्यामुळे निवेदनावरील चर्चा सुरु झाल्यानंतर ऐनवेळी प्रश्न विचारता येत नाही. म्हणून सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी नियम 93 वरील सूचनांची निवेदने माननीय सदस्यांना वितरित केली जावीत, अशी विनंती आहे.

**सभापती** : तशी व्यवस्था केली जाईल.

-------

नंतर 2एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**सभापती** : आज माझ्या कार्यालयात सभागृहाच्या कामकाजासंबंधी चर्चा आयोजित करण्यात आली होती. परंतु माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार हे त्यावेळी उपस्थित नव्हते. त्यामुळे या संदर्भात सभागृहात मत व्यक्त करावे असा निर्णय घेतला गेला. प्रश्नोत्तरे ज्या प्रायोरिटीने येतात त्यामध्ये अनेक पध्दतीचा वापर करुन सुध्दा सन्माननीय सदस्यांचे फारसे समाधान होतांना दिसत नाही. सभागृहात बहुधा आठव्या किंवा नवव्या प्रश्नापर्यंत चर्चा होत असते. परंतु नंतरच्या प्रश्नावर चर्चा होत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त प्रश्न चर्चेला येतील यासंदर्भात सर्वांनी मिळून विचार करण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या संदर्भात आणखी काही मार्ग काढता येईल, चर्चा करता येईल. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी माझ्या दालनात एक कल्पना मांडली होती ती कल्पना त्यांनी पुन्हा या ठिकाणी मांडावी अशी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या निवेदनाव्यतिरिक्त सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात या सार्वभौम सभागृहाच्या संदर्भात विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या सदनातील सर्व सदस्य जे काही प्रश्न उपस्थित करतात ते त्या भागातील प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी करीत असतात. परंतु शासनाकडून उत्तर दिले जात असतांना जी काही परिस्थिती असते ती परिस्थिती मांडली गेली तर प्रशासनामध्ये आपला दरारा निर्माण होईल. या सदनामध्ये एकदा विषय आल्यानंतर सरकार चुकीचे काम करणाऱ्याला संरक्षण देऊ शकत नाही असा संदेश सर्वांना जाईल. या विषयाच्या संदर्भात मी आपल्या बरोबरही चर्चा केलेली आहे. आम्हाला शासनाकडून उत्तर मिळत नसल्यामुळे सभागृहात तोच तोच विषय वारंवार उपस्थित करावा लागतो. सरकारकडून जर योग्य उत्तर आले तर शासनाचा प्रशासनावर दरारा राहील. आमदारांमुळेच सरकार बनलेले आहे. शासनाचे प्रतिनिधी म्हणून योग्य प्रशासन चालावे यासाठी आपण काम करीत असतो. काम करीत असतांना आम्हाला ज्या काही त्रुटी जाणवतात त्या योग्य असतील किंवा नसतील त्या आम्ही मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. शासनाकडून आम्हाला योग्य उत्तर कधीही मिळत नाही.

एक साधे उदाहरण देतो की, एपीआय निलंबित झाला असता तर विषय वाढला नसता, तुमच्या चौकशीत तुम्हाला योग्य वाटले असते तर त्याला पुन्हा कामावर घेता आले असते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

हे सभागृह सार्वभौम आहे. सरपंचाच्या विषयात विभागीय आयुक्त आपल्यापेक्षा मोठा नाही. या विषयाच्या संदर्भात आपण सांगितले होते की, मी माझ्या दालनात याविषयावर चर्चा करतो. खरे म्हणजे आपल्या दालनात या विषयावर निर्णय झाला नसता. विभागीय आयुक्तांनी सुमोटो अपिल घ्यावे व यासंदर्भात 15 दिवसात निर्णय द्यावा असे निदेश दिले असते तर ते चांगले झाले असते. या सदनात एखादा प्रश्न लागल्यानंतर चुकीचे काम केलेल्यांची शासनापुढे धडगत राहणार नाही असा संदेश संपूर्ण राज्यात जाण्याची आवश्यकता आहे. आपण योग्य काम केले नाही तर सदनात उपस्थित झालेल्या प्रश्नातून आपली सुटका होऊ शकणार नाही असा संदेश संपूर्ण राज्यात जाण्याची आवश्यकता आहे. असे जर झाले तर प्रशासनामध्ये आपला एक दबाव निर्माण होतो. अशा पध्दतीने काम झाले तर प्रशासनाला गती येईल. परंतु कोणाला तरी वाचविण्यासाठी काही घडते तेव्हा राज्यात संदेश चांगला जाणार नाही, हे सभागृह सार्वभौम आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या संदर्भात माझ्या दालनात जी चर्चा झाली होती त्यासंदर्भात आपण आपले विचार मांडण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळेला गट नेत्यांची बैठक बोलावली जाईल त्यावेळी या विषयावर जरुर चर्चा केली जाईल.

आता नियम 93 अन्वयेच्या सूचनावरील निवेदने घेण्यात येतील.

---------------------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी. /मु. शी.** : मौजे कवडगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा येथील पोलीस पाटील भरतीकरिता उपविभागीय दंडाधिकारी खामगाव यांनी जाहीरनामा प्रसिध्द करणे याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मौजे कवडगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा येथील पोलीस पाटील भरतीकरिता दि. 23.6.2012 रोजी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. जाहीरनाम्याप्रमाणे लेखी परीक्षा व तोंडी मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये श्री गणेश भगवान पवार यांना सर्वात जास्त गुण प्राप्त झाले होते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्यांची नियुक्ती झाली. पण त्यांना 3 अपत्ये आहेत अशा प्रकारची तक्रार झाल्यानंतर त्याचे पोलीस पाटील पद रद्द झाले. दिनांक 23.8.2012 रोजी अनुक्रमांक 2 वर जो उमेदवार होता त्याने माझी या पदावर नियुक्ती झाली पाहिजे अशा प्रकारचा अर्ज केला. त्याने अर्ज केल्यानंतर उप विभागीय दंडाधिकारी, खामगाव यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे मत मागितले. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी मत दिले की, आपल्या पातळीवर आपण निर्णय घ्यावा. असे असताना हा प्रस्ताव उप विभागीय दंडाधिकारी यांच्याकडे चार महिने पडून राहिला. या उमदेवाराला मग दिनांक 30.1.2013 रोजी ऑर्डर देण्यात आली. सदर ऑर्डर त्याला दिनांक 15 मार्च 2013 रोजी मिळाली आहे.या उमेदवाराची ऑर्डर दिनांक 30.1.2013 रोजी काढली होती. संबंधित पोलीस पाटलाला ती दिनांक 15 मार्च 2013 रोजी मिळाली. सदर ऑर्डर एवढे दिवस कार्यालयात पडून ठेवण्याचे कारण काय आहे ? दोन महिने ऑर्डरवर सही केली नसेल तर त्याला जबाबदार कोण आहे व यासंबंधी शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच, दिनांक 30 जानेवारी ते 15 मार्च 2013 पर्यंतचा पगार त्या पोलीस पाटलाला देण्यात येणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, भरती प्रक्रिया झाल्यानंतर तक्रार आली. तद्नंतर दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्यावेळी हे सिद्ध झाले की, उमेदवाराला तीन अपत्ये आहेत. तेव्हाच जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक 29.9.2012 रोजी कळविले की, यासंबंधी योग्य तो निर्णय घ्यावा. श्री.सुभाष नरसिंग चव्हाण यांनी दिनांक 30 जानेवारी 2013 रोजी नियुक्तीचे आदेश दिले होते. ती ऑर्डर 15 तारखे पर्यंत का पोहोचली नाही याबाबत खुलासा मागविण्यात येईल. तसेच, याबाबत दिरंगाई का झाली याची देखील माहिती घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक 29.9.2012 रोजी एसडीओ यांना आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा असे कळविले आहे. एसडीओंनी आपल्या कार्यालयात आधीच दोन महिने प्रकरण प्रलंबित ठेवले होते. येथे प्रश्न उपस्थित झाल्यानंतर त्यांनी बॅक डेटने ऑर्डर काढली आणि दिनांक 15 मार्च 2013 रोजी म्हणजे जवळ जवळ दोन महिने उशिराने ऑर्डर दिलेली आहे. हा जो विलंब झालेला आहे त्याला कोण जबाबदार आहे ?

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

जिल्हाधिकाऱ्याने ऑर्डर देऊन सुद्धा दोन महिने प्रकरण प्रलंबित ठेवण्यात आले आहे. येथे प्रश्न उपस्थित झाल्यानंतर 30 जानेवारी 2013 तारीख टाकून दिनांक 15 मार्च 2013 रोजी ऑर्डर देण्यात आली. हा जो विलंब झालेला आहे त्याला कोण जबाबदार आहे, त्याची चौकशी शासन करणार आहे काय व विलंब करणाऱ्या अधिकाऱ्या विरूद्ध शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, पोलीस पाटलाचे पद भरले जावे म्हणून शासन सकारात्मक असते. या प्रकरणी दिरंगाई का झाली याची माहिती मागवून संबंधितांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : ता.खेड,जि.रत्नागिरी येथील नातूनगर कालव्याची दुरूस्ती करणे याबाबत श्री रामदास कदम वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री (कृष्णा खोरे व पाटबंधारे महामंडळ वगळून) ): सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 8 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : नातूनगर कालव्याचा प्रश्न मी सतत 7 वर्षे विचारत आहे. त्यावेळी सन्माननीय मंत्री महोदयांनी मला सांगितले होते की, या कामासाठी ताबडतोब निधी उपलब्ध करून देण्यात येईल. खरे म्हणजे हा विशेषाधिकार भंगाचा विषय होतो. परंतु, मी विशेषाधिकार भंगाची सूचना दिली नाही. शासन या कामासाठी किती दिवसामध्ये निधी देणार आहे व सदर काम तात्काळ सुरू करण्यात येणार आहे, असा माझा पहिला प्रश्न आहे. हा 25 कि.मी.चा कालवा आहे. पाणी सोडल्यानंतर शेवटच्या गावापर्यंत पाणी येण्यासाठी 23 दिवस लागतात. त्यातील 95 टक्के पाणी वाया जाते. म्हणजे 5 टक्के पाणी शेवटपर्यंत येते. त्यामुळे शासन किती दिवसामध्ये टेंडर प्रोसेस पूर्ण करणार आहे ? यामध्ये आपल्याला तीन भाग करावे लागणार आहेत. एक म्हणजे काँक्रीटीकरण, दोन म्हणजे दरवाजे बसविणे आणि तीन म्हणजे दरवाजे दुरूस्त करणे. या सर्व कामांचे एस्टीमेट तयार आहे. तेव्हा सदर काम किती दिवसात पूर्ण होणार आहे आणि येथील भागाला शासन न्याय कधी मिळवून देणार आहे.

सभापती महोदय, येथे उत्तर देऊन शासनाने कोकणातील शेतकऱ्यांची थट्टा करण्याचे काम केले आहे. कोकणातील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. आपण लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "कोकणात मुळातच शेतकऱ्यांचा रब्बीमध्ये शेती करण्याकडे कल कमी दिसून येतो. शेती कमी असल्यामुळे शेतीसाठी आवश्यक पशुधन, आधुनिक अवजारे व मनुष्यबळ या गोष्टी शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडत नाहीत." म्हणजे कोकणातील शेतकरी हा आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही. हा प्रश्न मी आपल्याला विचारलाच नव्हता. मुळात आपणच तो प्रश्न निर्माण करीत आहात. त्यातून उप प्रश्न निर्माण होईल की, कोकणातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

या प्रश्नाचे आपणास वेगळे उत्तर द्यावे लागेल. तेव्हा माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, स्पेसिफिक प्रश्नाचे स्पेसिफीक उत्तर दिल्यास त्यातून उप प्रश्न निर्माण होणार नाहीत. तेव्हा नातू नगर कालव्यासाठी शासन निधी देणार आहे असे मी समजतो. माझा प्रश्न आहे की नातू नगर कालव्याचे काम दिवसांत पूर्ण होणार आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नातू नगर कालव्यासाठी निधी देण्या संदर्भात मागे एकदा निवेदनाच्या माध्यमातून विनंती केली होती. त्यावेळी मी काही बाबींच्या अधीन राहून उत्तर दिले होते. सदर काम हे अे.आय.बी.पी.च्या माध्यमातून पूर्ण करणे क्रमप्राप्त होते. अे.आय.बी.पी. अंतर्गत निधी मंजूर होण्यासाठी अनेक प्रशासकीय बाबींचा खुलासा करणे आवश्यक असते. अे.आय.बी.पी.च्या अटी आणि शर्तीचे पालन केल्यानंतरच निधी मंजूर होतो. या कामासाठी निधी प्राप्त होण्यासाठी सदरहू प्रस्ताव तातडीने केंद्र सरकारकडे पाठवावा अशा प्रकारचे निदेश क्षेत्रीय स्तरावर देण्यात आलेले आहेत. केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झाल्यावर सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे कामे हाती घेता येतील. सन्माननीय सदस्यांनी या कामाची निविदा केव्हा काढण्यात येतील आणि हे काम केव्हा पूर्ण होईल असे प्रश्न विचारले. त्याबाबत सांगू इच्छितो की, अे.आय.बी.पी.कडून जसा निधी प्राप्त होईल त्याप्रमाणे कामे हाती घेण्यात येतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय असत्य उत्तर देत आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांच्याशी माझे बोलणे झाले होते. त्यांनी सभागृहात देखील उत्तर दिले होते. मागील दहा वर्षापासून केंद्र शासनाकडे हा प्रस्ताव प्रलंबित आहे. माननीय मंत्री महोदय येथे दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या कामासाठी राज्य शासनाकडून निधी देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. आता ते आपला शब्द पाळत नाहीत. केंद्र शासनाच्या ज्या अटी आणि शर्ती आहेत त्या कोकणात पूर्ण होऊ शकणार नाहीत. तेव्हा आपणास केंद्र शासनाकडून निधी मिळणार नाही हे मला माहीत आहे. शासन एका बाजूला पाण्याचा अपव्यय करतात म्हणून श्री.आसाराम बापू यांचा निषेध करीत आहे तर दुसऱ्या बाजूला शासन कोकणामध्ये 95 टक्के पाणी वाया घालवत आहे. तेव्हा शासनावर गुन्हा दाखल केला पाहिजे. आपण हा प्रश्न राखून ठेवावा अशी विनंती आहे. या संदर्भात माननीय मंत्री श्री.सुनील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

तटकरे यांनी येथे आश्वासन दिलेले आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या कामासाठी शासन निधी उपलब्ध करुन पावसाळ्यापूर्वी टेंडर प्रोसेस पूर्ण करणार काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने काही बाबींच्या अधीन राहून सभागृहात उत्तर देण्यात आले होते. आपण ही कामे ट्रीपल आरमध्ये घेतो, अे.आय.बी.पी.मध्ये घेतो. या संदर्भातील प्रक्रिया जितक्या लवकर होणे शक्य असेल तितक्या लवकर करण्यासाठी जातीने लक्ष देण्यात येईल. आपण ट्रीपल आर आणि अे.आय.बी.पी. योजनेमध्ये अशाप्रकारच्या रिपेअर्स व मेन्टनन्सची कामे करीत असतो आणि ते प्रस्ताव अंतिम टप्प्यामध्ये आहेत. तेव्हा या संदर्भातील प्रस्ताव तातडीने केंद्र सरकारकडे पाठविण्याच्या दृष्टीने मी स्वत: जातीने लक्ष घालीन.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, एका बाजूला 95 टक्के पाणी वाया जात आहे तर दुसरीकडे केंद्र सरकारकडे मागील दहा वर्षापासून हा प्रस्ताव प्रलंबित आहे. माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले होते की, शासनाकडून या कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु आता मंत्री महोदय उत्तर देताना सांगत आहे की, काही बाबींच्या अधीन राहून उत्तर दिले होते. केंद्र सरकारच्या अटी आणि शर्ती पूर्ण होऊ शकत नाहीत. कारण त्यासाठी सोसायट्या होणे आवश्यक आहे आणि कोकणामध्ये सोसायट्या होत नाहीत. माननीय मंत्री महोदय येथे असत्य माहिती देत आहेत. मागील 24 वर्षापासून मी येथे काम करीत आहे. तेव्हा या कामासाठी निधी देणार किंवा नाही हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगावे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ ST/ D/ पूर्वी श्री.अजित.... 13:20

श्री.रामदास कदम.....

काम करायचे आहे की नाही ? केंद्र सरकारकडे जाऊ आणि पैसा आणू हे आपण डोक्यातून काढून टाकावे.

कोकणातील 35 पाटबंधारे युतीच्या काळात केले होते. परंतु ते आज निधी अभावी बंद आहेत. 27 हजार कोटी रुपयांच्या बाबतीत सांगितले जात आहे. परंतु आज सरकारकडे कोकणाच्या विकासासाठी पैसा नाही. महोदय, आम्ही कालव्याच्या दुरुस्तीसाठी पैसे मागत आहोत. परंतु माननीय राज्यमंत्री केंद्र सरकारकडे बोट दाखवित आहेत. माझी विनंती आहे की, कॅबिनेट मंत्री येईपर्यंत हे निवेदन थांबवावे. आज त्या भागात पिण्याचे पाणी नाही. शेतीतील पिके सुकली आहेत. ग्रीन हाऊस पाण्या अभावी संपले आहे. माननीय राज्यमंत्री सांगत आहेत की, त्या शेतकऱ्यांकडे अवजारे नाहीत, जनावरे नाहीत, ते आर्थिक सक्षम नाहीत. अशा प्रकारे ते असत्य उत्तर देत आहेत. गरीब शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? अशा प्रकारचे उत्तर देणे लाजिरवाणी बाब आहे. मी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी कॅबिनेट मंत्र्यांबरोबर चर्चा करावी व नंतर सभागृहात या निवेदनावर उत्तर द्यावे.

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, माझी या विषयी मंत्री महोदयांबरोबर चर्चा झालेली आहे. आम्ही दोघांनीही हा विषय अत्यंत गंभीररित्या घेतला आहे. सदर कामाला निधी मिळणे क्रमप्राप्त आहे. केंद्र सरकारने एआयबीपीचा प्रस्ताव मंजूर केल्याबरोबर राज्याचा हिस्सा म्हणून राज्याच्या योजनेतून तातडीने खर्च करण्यात येईल. सदर कामाची निविदा ताबडतोब काढून सदर काम हाती घेऊ शकतो. केंद्र सरकारची मान्यता मिळूनही निधी प्राप्त झाला नाही तर राज्याचा हिस्सा तातडीने देऊन सदर कामे सुरु करु.

श्री.सचिन अहिर : महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. प्रथेनुसार नियम-93 च्या निवेदनावर एकच प्रश्न विचारण्याची संधी दिली जाते. परंतु सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले. या प्रश्नाची ग्रॅव्हीटी होती यात दुमत नाही. परंतु नियम-93 च्या निवेदनांना लक्षवेधी सूचनेचे स्वरुप प्राप्त होता कामा नये, असे मला वाटते.

**तालिका सभापती** : हा प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली.

-------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : मुंबई शहरातील मरीन लाईन्स येथील रेल्वेच्या गेस्ट हाऊसमध्ये सेक्स रॅकेट चालविण्यात येत असणे, याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एलिना, मॅगनेट, ब्लेझर, एटलीस अशा 6 पबमध्ये बाबुलाल वर्मा या आरोपीचा वावर होता. चर्चगेट, मरीन लाईन, मुंबई सेंट्रल, दादर, भाईंदर, डहाणू, वलसाड या रेल्वेच्या गेस्ट हाऊसमध्ये हा आरोपी सेक्स स्कॅंडल चालवित होता. 1999 मध्ये गुजरातच्या तिकीट घोटाळ्यात हाच आरोपी सापडला होता. याची मोडस ऑपरेंडी अशी होती की, चांगली वेशभूषा केलेली सुंदर मुलगी जात असेल तर तिच्याकडे तिकीट विचारायचे. जर ती विना तिकीट सापडली तर तिला ब्लॅकमेल केले जात होते. निवेदनात चार मुली बळी ठरल्याचे नमूद केले असले तरी त्या आरोपीकडे तीन ते साडेतीन हजार नंबर्स सापडले आहेत. सभापती महोदय, हा संघटीत गुन्हा आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारते की, या प्रकरणी एमपीडीएचे कलम लावणार काय ? ज्या ठिकाणी हा धंदा सुरु होता ती सर्व रेल्वेचे गेस्ट हाऊस होती. म्हणजेच या आरोपीकडून सरकारी निवासस्थान आणि सरकारी विश्रामगृहांचा दुरुपयोग होत होता. असे असताना ही बाब रेल्वे पोलिसांच्या लक्षात कशी आली नाही ? त्यामुळे संबंधित रेल्वे पालिसांची चौकशी करण्यात येईल काय ? शिवाय महिला पथकांच्या निदर्शनास देखील ही बाब आली नाही. संबंधित आरोपी स्वत:चे निवासस्थान सुध्दा या धंद्यांसाठी वापरत होता. त्यामुळे बाबुलाल वर्मा याला सर्वप्रथम निवासस्थानातून निष्कासीत केले पाहिजे. मी स्पेसिफिक विचारु इच्छिते की, सरकारने बाबुलाल वर्मा याचे शासकीय निवासस्थान रिकामे करुन घेतले आहे काय, नसल्यास ते करणार काय ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, यामध्ये स्वत: पोलिसांच्या समाजसेवा शाखेने ही कारवाई केलेली आहे. आम्हाला मिळालेल्या माहितीवरुन ही कारवाई केलेली आहे. श्री. वर्मा हा रेल्वेचा अधिकारी आहे. रेल्वे खात्याने त्यांना निलंबित केलेले आहे आणि त्यांची कारवाई चालू आहे. परंतु आपल्या माध्यमातून आपला तपास चालू आहे. यामध्ये संघटितपणे अनेक ठिकाणी तो जात होता वगैरे ज्या सर्व गोष्टी निष्पन्न होतील त्या पध्दतीने त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. आजपर्यंत हे गेस्ट हाऊसमध्ये घडत होते आणि ते कोणी मुद्दाम नजरअंदाज करण्याचा प्रयत्न केला आहे का किंवा त्या गेस्ट हाऊसकडे पोलिसांचे दुर्लक्ष झाले आहे का हाही निश्चितपणे तपासाच्या चौकशीचा भाग राहील.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

**पू. शी./ मु.शी.** : तारापूर येथील मुद्रा लाईफस्टाईल युनिट शहानिशा न करता प्रदूषण नियंत्रण मंडळाने बद करणे याबाबत श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सचिन अहिर ( पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री. विक्रम काळे )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदाकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. कोणी तरी फोनवर तक्रार केली आणि हजार बाराशे कामगार असलेला कारखाना काहीही कारण नसताना बंद केला गेला. नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर लगेच सुनावणी घेतली गेली आणि कारखाना ताबडतोब सुरु केला गेला. ही अतिशय गंभीर बाब आहे. शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, कारखान्याच्या आवारातून सांडपाणी जात नसल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे प्रत्यक्ष सुनावणी देऊन कारखाना चालू करण्यास सशर्त परवानगी दिली असून कारखाना चालू करण्यात आलेला आहे. मी तारापूर भागातील आहे. या भागामध्ये कारखान्यांना ब्लॅकमेल करण्याचा नवा उद्योग सुरु झालेला आहे. फोनवर तक्रार केली जाते. या ठिकाणी तर पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या अहवालावर तक्रारदाराची सही आहे इतका भयंकर प्रकार घडलेला आहे. या सर्व गोष्टी या निवेदनातून समोर आलेल्या आहेत. त्यामुळे या सर्व संबंधित कारखान्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी हजारो कामगार काम करतात. 15-15 दिवस कारखाना बंद राहतो, कामगार रोजगाराला मुकतात, उद्योग बुडतो, कारखानदाराचे नुकसान होते, आमच्या त्या औद्योगिक पट्टयाचे नुकसान होते. या संदर्भात स्वतंत्र बैठक बोलविणार का आणि या अधिकाऱ्यांबाबत कारवाई करणार का ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 4 पुढे ढकलण्याबाबत**

**तालिका सभापती** : माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 4 पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फंडकर : सभापती महोदय, सदरहू निवेदन उद्या चर्चेला घेण्यात येईल का ?

**तालिका सभापती** : होय. सदरहू निवेदन उद्या चर्चेला घेण्यात येईल.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

**पृ.शी./मु.शी.**: राज्यात एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत करण्यात आलेली बिस्किटांची खरेदी याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. वर्षा गायकवाड ( महिला व बाल विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हे निवेदन एवढे सुस्पष्ट आहे की, पौष्टिक आहार देण्याच्या नावाखाली 240 रुपये किलो दराने आयुर्वेदिक बिस्किटे आणि 160 रुपये किलो दराने नाचणीची बिस्किटे खरेदी करुन विद्यार्थ्यांना दिली गेली. जवळजवळ 14 कोटी रुपयांची ही बिस्किटे दिली गेली. टीएचआर ही केंद्र शासनाची योजना आहे आणि त्यामार्फत ही बिस्किटे दिली गेली असे निवेदनामध्ये म्हटले आहे. पार्ले कंपनी, ब्रिटानिया कंपनी अशा वेगवेगळ्या कंपन्या जी बिस्किटे बनवितात ती सर्व बिस्किटे सोडून आयुर्वेदिक बिस्किटे किंवा नाचणीची बिस्किटे देण्यामागचे नेमके काय प्रयोजन आहे ? निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, आवश्यक जीवनसत्वयुक्त औषध, आयर्न, कॅल्शियम, मल्टिविटॅमिन व अतिरिक्त आहाराशी संबंधित वस्तू त्यामध्ये आहेत. म्हणूनच तो पुरवठा केला आहे असे मी मानतो. आयुर्वेदिक बिस्किटांमध्ये आयर्न, कॅल्शियम, मल्टिविटॅमिन आहेत का आणि हे आपण तपासून पाहिले आहे का ? हे सर्व प्रकरण आपण प्रथम एफडीएकडे देऊन त्या बिस्किटाची योग्यता म्हणजे त्यामध्ये जे काही घटक आहेत ते प्रत्यक्षात आहेत का हे तपासून बघून याबाबतचा सर्वच तपास सीआयडीकडे देणार का ?

प्रा. वर्षा गायकवाड: सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे तीन प्रश्न विचारले त्यातील दुसरा प्रश्न त्यांनी त्यामध्ये आयर्न आणि कॅल्शियम आहे का या संदर्भात विचारला. त्या संदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : ही बिस्किटे एफडीएकडे पाठवून तपासून घेऊन मग अहवाल पटलावर ठेवणार का ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छिते की, याबाबत दर निश्चिती करीत असताना पहिल्यांदा वर्तमानपत्रात जाहिराती दिल्या. नंतर त्याची राजपत्रात प्रसिध्दी केली. त्या संदर्भात आम्ही 3.6.2011 ला ई-टेंडरींग केले. त्याचा पुरवठा 28 जुलै, 2011 ला केला. ही बिस्किटे देण्याचे का ठरविले असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

संचालनालय, आरोग्य सेवा यांच्याकडून सन 2007 साली प्रथम शिफारस आली होती. त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या आयुर्वेद विभागानेही याबाबत शिफारस केली होती. आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 5 मे, 2007 रोजी आयुर्वेदिक बिस्किटासंबंधी शिफारस केली होती. त्यानंतर जव्हार येथे प्रायोगिक तत्वावर या बिस्किटाचे काम देण्यात आले होते. 2009 मध्ये टीएसपी अंतर्गत निधी देण्यात आला होता. त्यानंतर जव्हार येथे हा प्रयोग करण्यात आला होता. त्यावेळी संनियंत्रण समिती नेमण्यात आली होती. त्या समितीच्या सदस्यांची नावे मी देऊ शकते. त्या समितीने या बिस्किटाची शिफारस केली होती. त्यानंतर ई-निविदा काढण्यात आली होती. वर्तमानपत्रात त्याची जाहिरात दिली होती. तसेच राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले होते. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे पार्ले-जी किंवा ब्रिटानिया कंपन्यांनी या बिस्किटाबाबत रस दाखविला तर शासनाला काही अडचण नाही, शासनाकडून त्या कंपन्यांचेही स्वागत केले जाईल.

डॉ.दीपक सावंत : या बिस्किटामध्ये आर्यन, कॅल्शिअम असल्यामुळे ही बिस्किटे विद्यार्थ्यांना दिल्यानंतर त्यांची शारीरिक वाढ योग्य पध्दतीने व्हावी म्हणून त्यांना परवानगी देण्यात आली आहे. ही आयुर्वेदिक बिस्किटे एफडीए कडून पाठवून त्याची गुणवत्ता तपासण्यात येणार आहे काय, नसल्यास, त्या कंपन्यांविरुध्द कारवाई केली जाईल काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : मी मघाशीच सांगितले आहे की, या घटकांसंबंधीची माहिती मी पटलावर ठेवीन. या आयुर्वेदिक बिस्किटामध्ये असलेले घटक तपासण्यास सांगण्यात येईल. त्यांच्याकडून शासनाला जो रिपोर्ट येईल तो सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

-------

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ.शी. / मु.शी.** :अमरावती जिल्ह्यातील ओबीसी व एसबीसीच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची तरतूद न करणे याबाबत डॉ.रणजित पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री.विक्रम काळे )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, 10 वी नंतर शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती व परीक्षा फी बाबतचा हा प्रश्न आहे. या राज्यात मागासवर्गीयांसाठी, सामाजिकदृष्ट्या मागासलेले असोत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असोत, या सर्वांसाठी अनेक योजना राबविल्या जातात, परंतु या योजनांची सुमार अंमलबजावणी सुरु आहे. हा चिंतेचा विषय आहे, असे सामाजिक संस्थेच्या अहवाल नमूद केलेले आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या अहवालामध्ये सहस्त्रकी उद्दिष्टे ठरविण्यात आल्याचे म्हटलेले आहे. त्यामध्ये अत्यंत महत्वाचे मानक हे मागासवर्गीयांच्या शिक्षणाचे व शिष्यवृत्तीसंबंधीचे आहे. या विद्यार्थ्यांची गळती थांबली पाहिजे, शिक्षणाची दालने उघडी करुन दिली पाहिजे. त्यांना रोजीरोटी मिळाली पाहिजे. अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसंबंधी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फ्री शिप दोन वर्षापासून थांबविलेली आहे.

सन 2011-12 या शैक्षणिक वर्षात नोंदणी केलेल्या इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांची संख्या 43 हजार होती आणि सन 2012-13 मध्ये 45 हजार इतकी होती. या दोन्ही वर्षामध्ये अनुक्रमे 31 कोटी रुपये व 44 कोटी रुपये एवढी तरतूद केली होती. परंतु प्रत्यक्षात 10 हजार विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात आली होती. म्हणजे 45 हजार विद्यार्थी पात्र असताना प्रत्येक वर्षी केवळ 10 हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात असल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे बाकी आहे. सन 2012-13 मधील 99 टक्के विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दिलेली नाही. विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बाबतीतही तशीच परिस्थिती आहे. 99 टक्के विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती देता येत नसेल तर हे राज्य कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहे हा प्रश्न मला पडला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी किती वर्षे लागतील, यासाठी दरवर्षी मागणी करावी लागेल काय ?

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी प्रश्नच विचारलेला नाही असे मला वाटते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्या पायाजवळून उंदीर येऊन गेला आहे. या सभागृहात आता उंदीरही येऊ लागले आहेत ? ही गंभीर बाब आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासून पाहण्यात येईल.

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

डॉ.रणजित पाटील : या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे केव्हा मिळणार आहे आणि यापुढे असा प्रकार न होण्यासाठी शासन दक्षता घेईल का ?

श्री.सचिन अहिर : यावर्षी शिष्यवृत्तीसाठी 1100 कोटी रुपयांची बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. हा निधी बीडीएसकडे आल्यानंतर दोन महिन्याच्या आत सर्व विद्यार्थ्यांना पैसे दिले जातील.

--------

5.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ.शी./ मु.शी.**:महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या अधिपत्याखाली असलेली श्री शाहू छत्रपती मिल 2003 पासून बंद असणे याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नसीम खान ( वस्त्रोद्योग मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : श्री शाहू छत्रपती मिल ही कोल्हापूरच्या परिसरातील लोकांना रोजगार मिळण्यासाठी सुरु करण्यात आली होती. ही मिल 2003 साली बंद झाली. या मिलची 27 एकर जागा आहे. या ठिकाणी छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक करण्यात येणार आहे. कामगारांनी स्वेच्छा निवृत्ती घेतलेली असल्यामुळे त्यांना त्या ठिकाणी घरे देता येणार नाही असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. स्वेच्छा निवृत्ती ही मुंबईतील गिरणी कामगारांनी देखील घेतली होती आणि त्यांना घरे देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तेव्हा श्री शाहू छत्रपती मिल मधील गिरणी कामगारांनी स्वेच्छा निवृत्ती घेतल्यामुळे त्यांचा घरे मिळण्याचा हक्क कसा काय नाकारला जाऊ जाऊ शकतो ? मागील 12-14 वर्षापासून हे कामगार घरांसाठी मागणी करीत आहेत. या मिलची जागा मोठी आहे. त्या ठिकाणी त्या मिलमधील कामगारांना घरे बांधता येतील तसेच छत्रपती शाहू महाराजांच्या स्मारकाचाही तो एक भाग होईल. तेव्हा मिलमध्ये काम केलेल्या कामगारांना घरे देण्यात येतील काय ?

श्री. नसीम खान : कोल्हापूर मधील श्री शाहू छत्रपती मिल ही 2003मध्ये बंद करण्यात आली. मिलमध्ये काम करणा-या कामगारांना घरे द्यावीत असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. आता जे कामगार तेथे रहात नसतील त्यांना घरे देण्याचा कोणताही नियम नाही. मुंबईच्या संदर्भात वेगळी विकास नियमावली तयार केलेली आहे. श्री. शाहू छत्रपती मिलच्या ठिकाणी छत्रपती शाहू महाराजांचे चांगले स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने नागपूरच्या अधिवेशनामध्ये घेतलेला आहे. यासाठी माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. न राहाणा-या लोकांना घरे देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी** : आदिवासी विभागाकडून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी जादा दराने केलेली तांदळाची खरेदी याबाबत ॲड. अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 9 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री.खंदारे 13:35

ॲड. अनिल परब : हा विषय फार गंभीर आहे. या विषयी शासनाने अद्याप सकारात्मक भूमिका घेतलेली नाही. तेव्हा याबाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन धोरण जाहीर करील काय ?

श्री. बबनराव पाचपुते : शासनाचे जे पूर्वीचे धोरण आहे त्याबाबतीत दोन-तीन जी.आर काढलेले आहेत. त्यामुळे वेगळा विचार करण्याची आवश्यकता नाही.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी** : दूधगंगा प्रकल्पाकडे जाणा-या रस्त्याची झालेली दुरवस्था याबाबत श्री. जयंत प्र. पाटील,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरेपाटबंधारे महामंडळ वगळून) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 10 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : या दूधगंगा प्रकल्पाच्या ठिकणी पर्यटनाच्या दृष्टीने शासनाने अभयारण्य देखील जाहीर केलेले आहे. त्या ठिकाणी असलेल्या रस्त्यावरुन बैलगाडी देखील जाऊ शकत नाही इतकी त्या रस्त्याची दूरवस्था झालेली आहे. हा रस्ता लवकरात लवकर कधी पूर्ण करण्यात येईल ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : निवेदनामध्ये नमूद केलेले आहे की, जरी हा प्रकल्प आंतरराज्यीय असला तरी रस्ता पूर्ण करण्यासाठी निधीची कमतरता आहे. हा रस्ता करण्यासाठी जलसंपदा खात्याने प्रयत्न केलेले असून हा रस्ता बांधकाम खात्याकडे वर्ग करण्याचा प्रयत्न केलेला आहे. बांधकाम खात्याच्या नवीन नियमाप्रमाणे हा इ.जि.मा. क्र. 77 व 79 रस्ता ओडीआर असल्यामुळे आणि तो आरडीडीकडे गेल्यामुळे आरडीडीच्या योजनेतून हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण केला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : दूधगंगा हा अतिशय महत्वाचा प्रकल्प आहे. या रस्त्याचे काम आपण टाळण्याचा प्रयत्न करीत आहात. अतिरेक्यांचा विचार करता तो भाग अतिशय धोकादायक असल्यामुळे तेथे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत जोपर्यंत तो रस्ता आपल्या ताब्यात आहे तोपर्यंत तो सुस्थितीत ठेवण्याची काळजी घेण्यात येईल काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : निश्चितपणे काळजी घेण्यात येईल.

----

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी./मु. शी.** : माणगाव,जि.रायगड उप विभगातील पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, माणगाव उपविभागीय अधिकारी (जि.रायगड) यांच्या माणगाव उप विभागात रोहे, सुधागड (पाली), तळे, माणगाव हे चार तालुके असणे, या चार तालुक्यांसाठी एकूण 497 पदे पोलीस पाटलांची असणे, त्यापैकी माणगांव तालुक्यात 60 रिक्त पदे, तळे तालुक्यात 19 रिक्त पदे, रोहे तालुक्यात 54 रिक्त पदे व सुधारगड तालुक्यात 19 रिक्त पदे अशी एकूण 152 पोलीस पाटलांची रिक्त पदे असणे, गावपातळीवर शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे काम पोलीस पाटील पहात असणे, रायगड जिल्हयात अनेक वाडयांचे गावात रुपांतर करण्यात आले असून स्वतंत्र गावांसाठी पोलीस पाटील नेमणूक करावी लागणे, त्यासाठी आणखी नवीन पोलीस पाटील नेमावे लागणे.

माणगाव उपविभागात रिक्त असलेल्या पोलीस पाटील यांच्या जागा त्वरित भरण्याबाबत खेडया-पाड्यातील ग्रामीण जनतेची होत असलेली मागणी, सबब शासनाचे या गंभीर प्रकरणी लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे. धन्यवाद.

-----------

2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सेवाखंडीत हजेरी सहायकांना शासन सेवेत समावून घेणेबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" सभापती महोदय, सेवा खंडीत हजेरी सहायक सघटना यांना सन 1978 ते 79 पासून 1993 पर्यंत करणे, परंतु शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे सेवा खंडीत हजेरी सहायकांवर उपासमारीची वेळ येऊन घोर अन्याय होणे, रोजगार हमी योजनेच्या कामावर हजेरी सहायकाचे काम करणारे हजारो सेवाखंडीत सहायक नोकरीच्या अपेक्षित असणे, मागील 20 ते 25 वर्षापासून रोजगार हमी योजनेचे काम करणारे सेवाखंडीत हजेरी सहायकांना अपेक्षित असणे, मागील 20 ते 25 वर्षापासून रोजगार हमी योजनेचे काम करणारे सेवाखंडीत हजेरी सहायकांना केवळ आश्वासन देऊन त्यांची दिशाभूल केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, या मागणीपोटी अनेक निवेदने, मोर्चा, आंदोलने करण्यात येणे, परंतु राज्य शासनाने त्याची दखलही न घेणे, त्यामुळे सन 1978 ते 1993 पर्यंत रोजगार हमी योजनेच्या कामी असलेल्या बहुतांश हजेरी सहायकांचा मृत्यू होणे, तर अनेक हजेरी सहायकांनी वयोमर्यादा ओलांडणे, सेवाखंडीत हजेरी सहायकांना शासन सेवेत सामावून घेण्याचा निर्णय मागील अधिवेशनास घेण्यात येणे, परंतु अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, माननीय मंत्री महोदयांनी दोन महिन्यात शासकीय सेवेत सामावून घेऊ असे आश्वासन देऊनही एक वर्षाचा कालावधी होऊन होऊनही अद्याप निर्णय न होणे, यामुळे महाराष्ट्र राज्य हजेरी सहायक संघटना यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, शासनाने सेवाखंडीत हजेरी सहायक यांना तत्काळ शासकीय नोकरीत समाविष्ट करुन त्यांच्यावर आलेल्या उपासमारीचे संकट दूर करण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रया"

-------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : दामोदर हिरली व बाई देवकाहू चॅरेटी ट्रस्टकडून कै.गोपाळ कांबळे यांच्या कुटंबीयांवर खोली खाली करण्यासाठी दबावतंत्राचा वापर करणे याबाबत श्री. प्रकाश बिनसाळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, मुंबई शहरातील वाळकेश्वर येथे दामोदर हिरली व बाई देवकाहू चॅरेटी ट्रस्टच्या इमारतीमध्ये कै.गोपाळ कांबळे यांच्या कुटुंबाचे 70 वर्षापासून तळमजल्यावरील खोलीत वास्तव्य असणे, या पोटी त्यांच्या हयातीमध्ये भाडे ट्रस्टने भाडे स्वीकारणे, त्यानंतर ट्रस्टने भाडे न स्वीकारणे, सदर कुटुंबास खोली खाली करण्यासाठी दबाव तंत्रांचा वापर करणे, ट्रस्टने न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचा निर्णय न्यायालयाने या कुटुंबाच्या बाजूने देणे, मात्र त्यानंतर सदर ट्रस्टने महापालिका प्रशासनाकडून इमारतीच्या दुरुस्ती व डाडगुजीसाठी देण्यात येणारी 354 ची नोटीस घेऊन संपूर्ण इमारत पाडून सदर कुटुंबास बेघर करण्याचा प्रयत्न करणे, अशाप्रकारे मुंबई शहरांमध्ये गरीब कुटुंबांना बेघर करण्याचे षडयंत्र मोठ्या प्रमाणात सुरु असणे, अशा प्रकारचे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी तसेच या कुटुंबास न्याय मिळावा व भविष्यात असे प्रकार घडू नये म्हणून सदर ट्रस्टवर फौजदार गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे.

सभापती महोदय, "त्यांना पर्यायी निवास व्यवस्था करुन दिल्यानंतर पुढील कार्यवाही करावी" अशा प्रकारचा महानगरपालिकेने आदेश दिलेला असतानाही आज सकाळी ठेकेदाराने ती इमारत तोडून कै.गोपाळ कांबळे यांच्या कुटुंबीयांना बेघर करण्याचे षडयंत्र रचले आहे. मी आपणास या इमारतीसंबंधीचे सर्व फोटो सादर करतो. आपण या बाबतीत सबंधिताविरुध्द कारवाईचे आदेश दिले तर या कुटुंबाला न्याय मिळेल.

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे)** : ठीक आहे.

-------

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुबई-गोवा बोटसेवा सुरु करणे  याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" सभापती महोदय, कोकणाला सुमारे 720 कि.मी.सुंदर किनारा लाभलेला आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते माननीय यशवंतराव चव्हाण यांनी जलवाजतूक सेवा सुरु केली होती. ही सुरु असलेली जलवाहतूक सेवा सध्या शासनाकडून अनुदान मिळत नसल्यामुळे बंद पडली आहे. जलवाहतूक सुरु करण्याबाबत नागरिकांकडून वारंवार आंदोलनही करण्यात आली होती. बोटसेवा बंद झाल्यामुळे निर्मनुष्य कोकण किनार पट्टीवर गुन्हेगारांना व देशद्रोहयांना फायद्याचीच ठरणार आहे, तसेच सध्या बोटसेवा बंद असल्यामुळे महामार्गावर वाहतुकीचा ताण पडत असून त्यात वारंवार अपघात होत असून त्यात अनेक निष्पाप प्रवाशांचा मृत्यू होत आहे. अलिकडेच खेड येथे जगबुडी नदीत खाजगी बस कोसळून झालेल्या अपघातात 37प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना  घडली होती. तसेच कोकणात विविध ठिकाणी लहान मोठे उद्योग मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे लोकसंख्येचे प्रमाणही वाढत आहे. त्यात जागातिक प्रतिचेही उद्योग येत आहेत. यामुळे कोकणात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे. मृत्यूचा सापळा बनलेल्या मुंबई-गोवा महामार्गावर वारंवार कोकणसीयांचे नाहक जात असलेल्या बळींना आळा घालण्याच्या दृष्टीने मुंबई-गोवा-कोकण बोटसेवा सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही करण्याची आवश्यकता, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे, कृपया स्वीकृत करण्यात यावी, ही विनंती.

-----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील हुतात्मा स्मारकांच्या देखभालीचे काम स्वयंसेवी संस्थांकडे सोपविणे याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या जन्मगावी किंवा मृत्यूच्या ठिकाणी शासनाने शासकीय खर्चाने हुतात्मा स्मारके उभारली आहेत. या स्मारकांची देखभाल स्वयंसेवी संस्थांच्या ताब्यात द्यावी असा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने तेथील हुतात्मा स्मारकांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी एस्टीमेट तयार करावे आणि लागणाऱ्या खर्चाची तजवीज करण्यासाठी आमदार, खासदार यांच्या विकास निधीची मदत घ्यावी असाही शासनाने निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, मी पुणे जिल्हयाबरोबरच सिंधुदुर्ग जिल्हयाचे उदाहरण देऊ इच्छिते. दोन-दोन वर्षे होऊनही या दोन्ही जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाने हुतात्मा स्मारकांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी एस्टीमेट तयार करुन संबंधित आमदार किंवा खासदार यांना कळविलेले नाही किंवा ते स्मारक स्वयंसेवी संस्थांकडे कशा पध्दतीने सोपविले जाणार आहे यासाठी पाऊल उचललेले नाही. हुतात्मा स्मारकांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्यात यावे, त्याचबरोबर त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी एस्टीमेट तयार करुन ते पुढील महिन्यात डीपीडीसीच्या बैठकीमध्ये सादर करावे. आमदार किंवा खासदार निधी उपलब्ध होण्यास काही अडचण येत असेल तर शासनाने त्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी. एक चांगला उपक्रम या निमित्ताने सुरु होणार आहे. या बाबीकडे विभागाकडून होणारे दुर्लक्ष अगदी संतापजनक आहे, याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मंत्रालयीन विभागातील कर्मचाऱ्यांच्या तीन वर्षानंतर बदल्या करताना त्या त्या विभागातील आस्थापनेचा अनुभव असणाऱ्या किमान 50 टक्के कर्मचाऱ्यांना त्याच विभागात कायम ठेवणे याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, सन 2005 मध्ये शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांविषयक कायदा केला. त्यानुसार केलेल्या बदल्यांमुळे अनेक समस्या निर्माण होताना दिसून येत आहेत. उदाहरण म्हणून सांगायचे झाले तर मंत्रालयातील एका विभागातील सर्वांच्या बदल्या दुसऱ्या विभागात केल्या जातात. त्यावेळी नवीन विभागाची कार्यप्रणाली समजावून घेण्यामध्ये एक वर्ष निघून जाते. दुसरे वर्षात कामाचा अंदाज आणि आवाका येतो. तिसऱ्या वर्षात कामाची गती वाढते, तोपर्यंत पुन्हा दुसऱ्या विभागात बदली होते. पुन्हा मूळ स्थिती प्राप्त होते. सारांश रुपाने बदल्या करताना त्या त्या आस्थापनेचा अनुभव असलेल्या निम्म्या कर्मचारी वर्गाला त्याच विभागात ठेवले जाईल याकडे शासनाने कटाक्षाने लक्ष द्यावे, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मालेगाव (जि.नाशिक) येथील भुईकोट किल्ल्याची दुरुस्ती करणे याबाबत डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील मोक्षगंगा उर्फ मोसम नदीच्या पूर्व तीरावर असलेला ऐतिहासिक भुईकोट किल्ला सन 1740 पासून ताठ मानेने उभा असून सध्या मात्र या किल्ल्याची मोठया प्रमाणात पडझड सुरु असून या किल्ल्यावर असलेले अतिशय देखणे व किल्ल्याची शान असलेले दोन घुमट यांची मोठया प्रमाणात झीज होऊन ते केव्हाही कोसळण्याचा धोका निर्माण होऊनही पुरातत्व विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे अलीकडे आढळून येणे, या किल्ल्याची व घुमटाची पडझड झाल्यास हा ऐतिहासिक किल्ला व घुमट संपुष्टात येण्याचा निर्माण झालेला धोका, यासाठी या किल्ल्याची व घुमटाची पुरातत्व विभागाने त्वरित दखल घेऊन दुरुस्ती करण्याची नितांत आवश्यकता, अशा अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-----

नंतर 2यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :पुणे महाविद्यालयात नशीले पदार्थ विकले जाणे याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरातील नामांकित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून नशीले पदार्थ विकणे जाण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होणे, शहरातील प्रख्यात महाविद्यालयांसह एमआईटी व अरिहंत इन्स्टिट्यूट या संस्थांमध्ये मोठया प्रमाणावर विदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणे, या विदेशी विद्यार्थ्यांमध्ये नायजेरियन विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असणे, विदेशी विद्यार्थी नोंदणी कार्यालय एमआरओ मध्ये विद्यार्थ्यांची संपूर्ण व्यक्तिगत माहितीची व चारित्र्याची नोंदणी आवश्यक असतांनाही अशा नोंदणी करण्यात न येणे, त्यामुळे नशीले पदार्थ व्यवसायात कार्यरत असलेल्या नायजेरियन विद्यार्थ्यांनी केलेल्या कोणत्याही गुन्हेगारी कृत्याची या कार्यालयाकडे नोंदच नसणे, महाविद्यालयांतही विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती नसणे, शहरात नशीले पदार्थांची विक्री करतांना अटक केलेले जास्तीत जास्त विद्यार्थी नायजेरियन असूनही अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देण्यापासून रोखण्याबाबत कोणतीही यंत्रणा नसणे, त्यामुळे शहरात नशीले पदार्थ विक्रीत दिवसेंदिवस वाढ होत असणे, या प्रकरणी सखोल चौकशी करुन अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्यात यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :मुंबईमध्ये क्षयरोगाच्या रुग्णांनी वापरलेले कपडे,भांडी, आणि अंथरुण यांच्या स्वच्छतेकडे रुग्णालयाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत श्री. जयप्रकाश छाजेड, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"मुंबईमध्ये क्षयरोगाचे प्रमाण वाढत असतांना शिवडी येथील क्षयरोग हॉस्पिटलमध्ये रुग्णाने वापरलेली कपडे, भांडी आणि अंथरुण यांच्या स्वच्छतेकडे रुग्णालयाकडे होत असलेले दुर्लक्ष, क्षयरुग्णालयात रुग्णांचे कपडे धुण्यासाठी प्रशिक्षित व्यक्ती नसणे, रुग्णांचे कपडे निर्जंतुकीकरणाचे ऑटोक्लेव्ह मशीन मागील अनेक वर्षापासून रुग्णलयात धूळ खात पडून असणे, रुग्णांचे कपडे निर्जंतुकीकरण करण्यासाठी इतर रुग्णालयात पाठविण्यात येणे, एमडीआर आणि एक्सडीआर क्षयरोग सर्वात धोकादायक असल्याचे पालिकेने सिध्द करुनही, क्षयरुग्णालयात स्वच्छतेची विशेष दक्षता न घेता विविध गोष्टीकडे पालिका अधिकाऱ्यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी रुग्णांच्या मृत्यूच्या प्रमाणात सातत्याने होत असलेली वाढ, या गंभीर बाबीकडे आरोग्य विभागाने लक्ष घालून तत्काळ कार्यवाही व उपाययोजना करण्याची आवश्यकता, सदर विषय सार्वजनिक महत्वाचा असल्याने विशेष उल्लेखाद्वारे मी त्याकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो."

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :बीड जिल्हयातील शासकीय रुग्णालयात कान,नाक, घसा तज्ञांचा तसेच औषधांचा तुटवडा असणे याबाबत प्रा.सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा. सुरेश नवले ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, बीड जिल्हयातील शासकीय रुग्णालयात गेले अनेक महिन्यांपासून कान, नाक, घसा तज्ञ इत्यादी डॉक्टरांचा अभाव, औषधांचा तुटवडा, रुग्णांना बेडची व्यवस्था नसणे, विविध मशिनरी बंद असणे, यामुळे बीड शहरातील तसेच जिल्हयातील नागरिकांचे विशेषत: ग्रामीण भागातील रुग्णांचे मोठया प्रमाणावर होणारे हाल, अपघात ग्रस्त, रुग्णांना उपचारासाठी बीड शासकीय रुग्णालयात दाख करण्यात येत असणे, परंतु उपचार मिळत नसल्याने औरंगाबाद किंवा आंबेजोगाई रुग्णालायात घेऊन जाण्यास सांगण्यात येणे, परंतु वेळीच उपचार मिळत नसल्याने रुग्ण प्रवासातच दगावण्याच्या घडलेल्या अनेक घटना, या सर्व बाबीकडे आरोग्य विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष. यासाठी बीड शासकीय रुग्णलयात सोयी सुविधा अद्ययावत करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु. शी.** :चंदपूर जिल्हयात वन विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानामध्ये विद्युत पुरवठा न केल्यामुळे निवासस्थाने पडीक असणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

सभापती महोदय,चंद्रपूर जिल्हयात लाखो रुपये खर्च करुन वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानाची सोय करणे, परंतु निवासस्थाने बांधूनही केवळ दोन वर्षापासून विद्युत पुरवठा न झाल्याने, निवासस्थाने पडीक असणे. त्यामुळे नागभीड येथील वनपरिक्षेत्राधिकारी व वनपाल यांच्यासाठी बांधलेली निवासस्थानाची दुर्दशा झाली असून पडझड झालेली आहे. त्यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून वन अधिकारी व वन कर्मचारी यांना निवासस्थाची सोय नसणे, पैसा खर्च करुनही विद्युत पुरवठा करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष, ताबडतोब विद्युत पुरवठा करुन व निवासाची दुरुस्ती करुन वन अधिकारी व वन कर्मचाऱ्यांना राहण्यायोग्य निवासस्थानाची व्यवस्था करणे, शासनाने यावर करावयाची कारवाई.

-------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : ठाणे कोपरी येथे दिनांक 27 मार्च 2013 रोजी रंगपंचमीच्या दिवशी भरदुपारी साडेतीन वर्षाच्या मुलीवर झालेला पाशवी बलात्कार याबाबत श्री.निरंजन डावखरे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

ठाणे जिल्ह्यातील कोपरी येथे दिनांक 27 मार्च 2013 रोजी रंगपंचमीच्या दिवशी भरदुपारी एका साडेतीन वर्षाच्या कोवळ्या वयाच्या मुलीवर 23 वर्षाच्या एका युवकाने पाशवी बलात्कार केला. या घटनेने मुलगी अत्यंत भांबावलेल्या अवस्थेत असून गंभीर स्थितीत आहे. तसेच, सध्या ठाणे येथील जनरल हॉस्पिटलमध्ये ॲडमीट असून डॉक्टर्स तिच्यावर उपचार करत आहेत. मुलगी सुदैवाने जीवंत आहे. तथापि, या घटनेचा आघात सहन न झाल्याने ती मुलगी व तिचे आई-वडील हे मानसिकरित्या खचले आहेत. बलात्कार करणाऱ्यास पोलिसांनी अटक केली असून सदर आरोपी पोलीस कस्टडीत आहे. या प्रकरणी हॉस्पिटलमध्ये जाऊन बलात्कारित मुलगी व तिच्या कुटुंबीयांची भेट घेतली असता हा बलात्कार अत्यंत हृदद्रावक व मन हेलावून सोडणार होता. या संदर्भात सदर हॉस्पिटलचे शल्यचिकित्सक यांच्याशी चर्चा केली असता त्यांच्या म्हणण्यानुसार या हॉस्पिटलमध्ये दिवसाला कमीतकमी बलात्कारीत घटनेची दोन प्रकरणे तरी येतात, असे त्यांनी सांगितले. इतकेच नव्हे तर डॉक्टरांशी चर्चा करत असताना त्याच दिवशी पहाटे 5 वाजता आदिवासी भागातील 13 वर्षाच्या अन्य एक बलात्कारित मुलीला दाखल करण्यासाठी आणण्यात आले होते. या एकंदरित घटना लक्षात घेता समाजात विशेषत: तरूणांमध्ये बलात्कार करण्याची वाढलेली प्रवृत्ती दुर्दैवी असून कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2

श्री.निरंजन डावखरे...

मी एक महत्त्वाची बाब म्हणून सांगू इच्छितो की, ज्यावेळी त्या मुलीच्या आईवडिलांना भेटलो तेव्हा त्या मुलीची आई बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हती. लोकांकडे बघून रडत होती. वडिलाशी बोलत असताना ते म्हणाले की, ही मुलगी माझी लाडकी व अत्यंत आवडती आहे. ती मुलगी जीवंत आहे. या घटनेनंतर वडिलाचे हे वाक्य फार महत्वाचा संदेश देणारे आहे. आज त्या घरातल्यांची काय परिस्थिती असेल ? त्या मुलीचे पुढील जीवन कसे असेल ? साडेतीन वर्षाची ती मुलगी आहे. अतिप्रसंग झालेल्या मुलींसंबंधी आपण सभागृहात चर्चा केली आहे. अशा मुलींसाठी, महिलांसाठी शासनाने धोरण आखणे आवश्यक आहे. या घटना करणारे पाशवीवृत्तीचे जे लोक आहेत त्यांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. त्यासाठी मी विशेष उल्लेख येथे मांडला आहे.

अशा प्रकरणांना आळा बसण्याच्यादृष्टीने राज्यातील घडणाऱ्या घटनांप्रकरणी तसेच कोपरी (ठाणे) येथील सदर प्रकरणी शासनाने संबंधित आरोपी विरूद्ध कडक कारवाई करून बलात्कारित मुलीस व तिच्या कुटुंबीयांना न्याय द्यावा अशी मी विनंती करीत आहे.

**तालिका सभापती** : शासनाने याची नोंद घ्यावी.

श्री.बबनराव पाचपुते : होय.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2013-14 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरू....

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, यावेळचा अर्थसंकल्प पाहिल्यानंतर एका लेखकाकडे आपले लक्ष वेधावेसे वाटते. एका लेखकाने आपल्या देशाचे असे वर्णन केले आहे की, श्रीमंत लोकांचा गरीब देश. आपण 11 कोटी जनतेचे बजेट मांडले आहे. त्यात 1 लाख 55 हजार 986 कोटी रूपयांचा महसूल जमा झाला असल्याचे व 1 लाख 55 हजार 802 कोटी रूपये वेगवेगळ्या कारणांमुळे खर्च होणार असल्याचे दाखविले आहे. अशा प्रकारे 184 कोटी रूपये शिलकीचा अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्र्यांनी मांडला आहे.

आपल्या महाराष्ट्राचे 1 लाख 55 हजार कोटी रूपयाचे बजेट आहे. श्री.मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स उद्योग समुहाचा यंदाचा व्यवसाय 1 लाख 30 हजार कोटी रूपयांचा आहे. एका बिझिनेस एम्पायरचा वार्षिक व्यवसाय आहे त्याच्या जवळपास असलेले आपल्या 11 कोटी जनतेचे हे बजेट आहे. आपण जे बजेट मांडतो त्याचे एकूण डिस्ट्रीब्युशन कसे काय केले आहे ? 1 लाख 55 हजार कोटी रूपयांपैकी वेतनावर 61525 कोटी, निवृत्तीवेतनावर 15293 कोटी, व्याजावर 21098 असे मिळून 97916 कोटी रूपये खर्चात जाणार आहेत. त्यातून नवीन काहीही निर्माण होणार नाही. त्यामुळे फक्त 46938 कोटी रूपयांचे बजेट हे विकासासाठी उपलब्ध होणार आहे. त्याद्वारे पाणी, शेती,खते इत्यादी प्रकारच्या वेगवेगळ्या व्यवस्था उभ्या करीत असतो. आपल्याकडे एका बाजूला अशी स्थिती असेल तर महाराष्ट्रातील अपूर्ण प्रकल्प पूर्ण कसे काय होतील ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पासाठी 77 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. असे असताना बजेटमध्ये फक्त 7 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. आपण दहा टक्के इन्फ्लेक्शन मानले तरी त्यासाठी 7 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे म्हणजे प्रकल्प जसेच्या तसे राहणार आहेत. तेव्हा सिंचन प्रकल्पासाठी 77 हजार कोटी रुपयांची आवश्यकता, बजेटमध्ये करण्यात आलेली 7 हजार कोटी रुपयांची तरतूद आणि 7 हजार कोटी रुपये वाढलेल्या महागाईवर खर्च होणार असतील तर सिंचनाचे प्रकल्प कधीही पूर्ण होऊ शकणार नाहीत. तेव्हा या सर्व गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एकूण उत्पन्नाच्या फक्त 25 टक्के कर्ज काढता येते आपण फक्त 17 टक्के कर्ज काढलेले असे सांगण्यात आले. व्याजापोटी 21 हजार कोटी रुपये खर्च होणार आहे. आपले एकूण उत्पन्न 1 लाख 55 हजार 986 कोटी रुपये आहे. एखादा सामान्य माणूस बँकेमध्ये कर्ज काढायला जातो त्यावेळी त्याची कर्ज फेडण्याची ऐपत पाहून त्याला कर्ज दिले जाते. आपल्या राज्याचे उत्पन्न 1 लाख 55 हजार 986 कोटी रुपये आहे आणि राज्याची कर्ज फेडण्याची क्षमता खूप कमी आहे. असे असताना बँका राज्याला कसे काय कर्ज देतात हा माझ्या समोर प्रश्न आहे. या वर्षी सरकार 22 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढण्याचा विचार करीत आहे. आपण हा विरोधाभास लक्षात घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शासन राजीव गांधी स्वास्थ्य योजनेवर 22 कोटी रुपये खर्च करणार आहे. हा खर्च अपुरा आहे. राज्य विमा कामगार योजनेची अनेक रुग्णालये अर्धवट स्थितीत आहेत ती पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वेगवेगळ्या धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब घटकातील लोकांसाठी 10 टक्के जागा ठेवल्या पाहिजेत असा नियम असताना त्याचे पालन होत नाही. या बाबत देखील विचार झाला पाहिजे. आपण फक्त राजीव गांधी स्वास्थ्य योजनेद्वारे राज्यातील सर्व जनतेला आरोग्य सुविधा पुरवू शकणार नाही. तेव्हा वरील गोष्टींचा विचार झाला पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, शासन विना अनुदानित शाळांना 266 कोटी रुपयांचे वेतनेतर अनुदान देणार आहे. परंतु सन 2008 ते 2013 या पाच वर्षाचे अनुदान देण्याचा विचार झालेला नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

माझी अशी मागणी आहे की, आपण ही थकबाकी द्यावी. ही थकबाकी देताना अट टाकावी की, शाळामध्ये ज्या सुविधा उभ्या करणे आवश्यक आहे त्यासाठीच या निधीचा वापर करावा. आपण असे केल्यास शाळांतील इन्फ्रास्ट्रकचरसाठी वेगळा निधी द्यावा लागणार नाही.

सभापती महोदय, सरकार क्रीडा क्षेत्रावर 150 कोटी रुपये खर्च करणार आहे. परंतु शासनाने क्रीडा खेळाडूंवर अनेक बंधने घातलेली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर जो खेळाडू कोणतेही पदक मिळविल त्याला सरकारी सेवेत सामावून घेण्यात येईल असे सरकारने सांगितले. महाराष्ट्रातील एकमेव खेळाडू राही सरनोबत हिची ऑलिम्पिक खेळासाठी निवड झाली. वीरधवल खाडेला सुध्दा ऑलिम्पिकमध्ये जाता आले नाही. आपण तिला अद्याप नोकरीमध्ये सामावून घेतलेले नाही. शासनाने आता एक नवीनच धोरण जाहीर केले आहे की,खेळाडूंना फक्त क्रीडा क्षेत्रात नोकरी देण्यात येईल. पंजाब सरकारने क्रिकेटपटू श्री.हरभजन सिंगची थेट डी.एस.पी.च्या पदावर नियुक्ती केली. परंतु महाराष्ट्र सरकार खेळाडूंच्या पायामध्ये बेड्या घालून त्यांना फक्त क्रीडा क्षेत्रातच नोकरी मिळेल असे सांगत आहे. तेव्हा या गोष्टीचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी 240 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कोल्हापूर विमानतळाच्या विस्तारीकरणाचा निर्णय अद्याप मार्गी न लागल्यामुळे तेथील औद्योगिक विकासाला खीळ बसली आहे त्याचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषित केले होते की, ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण जाहीर करण्यात येईल. या घोषणेस एक वर्ष झालेले आहे. परंतु अद्याप धोरण घोषित झालेले नाही. या बजेटमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. मी या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेचे अभिनंदन करतो. मुंबई महानगरपालिकेने ज्येष्ठ नागरिकांना शस्त्रक्रियेसाठी 50 टक्के रक्कम भरण्याची सुविधा दिली होती आणि 50 टक्के रक्कम महानगरपालिका स्वत: भरत होती. परंतु आता महानगरपालिकेने घोषित केले की, सर्व ज्येष्ठ नागरिकांची शस्त्रक्रिया महानगरपालिका स्वत:च्या खर्चाने करणार आहे. तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी एक वर्षापूर्वी घोषित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाविषयी या बजेटमध्ये कोणत्याही प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

महोदय, या वर्षी मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला आहे. दुष्काळामुळे आमदार विकास निधी वाढविता येणार नाही असे म्हणता कामा नये. उलट दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आमदार विकास निधीमध्ये वाढ करणे गरजेचे आहे. आमदार विकास निधी वाढवित असताना आमदारांनी वाढीव निधी दुष्काळी कामांवरच खर्च केला पाहिजे असे बंधन घातले पाहिजे. शिवाय महाराष्ट्रातील दुष्काळ संपविण्यासाठी त्या त्या मतदारसंघात कायमस्वरुपी प्रकल्प उभे केले पाहिजे. ज्या प्रमाणे 10 टक्के रक्कम मागासवर्गीयांवर खर्च केली पाहिजे, 5 टक्के रक्कम विशेष प्रकल्पावर खर्च केली पाहिजे त्याच प्रमाणे आमदार विकास निधीची वाढीव रक्कम दुष्काळी कामांवर खर्च करावयास पाहिजे, असे बंधन घातले पाहिजे

महोदय, आमदारांना वाहतूक भत्ता 46 हजार रुपये दिला जातो. दोन वर्षांपूर्वी डिझेलचा दर प्रति लीटर 30 रुपये होता. आता तो दर 58 रुपयांवर गेला आहे. आमदारांचे मानधन वाढवू नये परंतु त्यांना मतदारसंघात फिरण्यासाठी सध्या जो इंधन भत्ता वा वाहतूक भत्ता दिला जातो त्यात दुपटीने वाढ केली पाहिजे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आमदारांच्या स्वीय सहायकांच्या वेतन वाढीचा मुद्दा वारंवार मांडलेला आहे. परंतु त्यावर केवळ चर्चा होते, पण निर्णय मात्र होत नाही. स्वीय सहायक हे सरकारी कर्मचारी मानले जातात. माझा मतदारसंघ पाच जिल्ह्यांचा आहे. माझ्याकडे 14 स्वीय सहायक असून, 13 स्वीय सहायकांच्या वेतनाचा खर्च मी स्वत: करतो. या निमित्ताने माझी मागणी आहे की, आमदारांच्या स्वीय सहायकांना सरकारी नोकराप्रमाणे सोयी-सवलती दिल्या पाहिजेत.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती** (श्री.विक्रम काळे) : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 35 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.06 ते 2.35 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.)

---------

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी सन 2013-2014 या वर्षाचा जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्या बाबतीत माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपणा सर्वांना ज्ञातच आहे की, सर्व सोंगे करता येतात पण पैशाचे सोंग करता येत नाही. परंतु या अर्थसंकल्पामध्ये सर्वसामान्य जनतेवर कोणत्याही प्रकारच्या कराचा बोजा न लादता समतोल अर्थसंकल्प सादर करण्याचे काम माननीय अर्थमंत्र्यांनी केलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. दोन वर्षाच्या दुष्काळाच्या गडद छायेच्या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प सादर झालेला आहे आणि म्हणून या अर्थसंकल्पाच्या बाबतीत अनेकांना वेगळ्या प्रकारच्या अपेक्षा होत्या. आम्हालाही वेगळ्या प्रकारच्या अपेक्षा होत्या. मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, या अर्थसंकल्पाचा आपण जर एकंदरीत बाज पाहिला तर या दुष्काळी परिस्थितीवर नुसता तोडगाच नव्हे तर त्यावर मात करण्याच्या दृष्टीने या अर्थसंकल्पामध्ये अनेक गोष्टींची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या बाबतीत नेहमीच चर्चा होते. नेहमी अशी चर्चा केली जाते की, आम्ही फक्त तत्कालीक योजना करतो, दूरगामी उपाययोजना करीत नाही. परंतु या अर्थसंकल्पातील या दोन्ही प्रकारच्या उपाययोजनांचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात येईल की, आपले जे तत्कालीक प्रश्न आहेत, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे, गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न आहे, इंडस्ट्री सुध्दा जगली पाहिजे म्हणून त्या इंडस्ट्रीजच्या पाण्याचा प्रश्न आहे आणि या सर्व गोष्टींना या अर्थसंकल्पामध्ये विशेष प्राधान्य दिलेले आहे. एवढेच नव्हे तर त्यासाठी विशिष्ट तरतूद या अर्थसंकल्पामध्ये केल्याचे दिसून येते.

सभापती महोदय, एक सामाजिक जबाबदारी पार पाडत असताना 7.1 टक्के इतका जीडीपी आपण गाठला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

गेल्या दोन वर्षापासून राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे सर्वांना ते अपेक्षितच आहे. दुष्काळाने होरपळणाऱ्या बळीराजाला, तहानलेल्या 11 जिल्ह्यातील नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पाद्वारे करण्यात आलेला आहे असे म्हटले तर ते चुकीचे होऊ नये. या राज्यात दुष्काळ अक्राळविक्राळपणे उभा असताना शासनाने सर्व शिक्षा अभियान किंवा अन्य योजनांकडे दुर्लक्ष केलेले नाही. राज्याचा सर्वांगीण विकास हा हेतू नजरेसमोर ठेवून या अर्थसंकल्पात अनेक प्रकारच्या तरतुदी केलेल्या आहेत. शिक्षण विभागावर कोट्यवधी रुपये खर्च केला जात आहे. विशेषत: या सभागृहात अनेकदा मागासवर्गी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत अनेक सन्माननीय सदस्य भावना व्यक्त करीत असतात. या वर्षीच्या अर्थसंकल्पात या सर्व गोष्टींचा विचार करुन यासाठी तरतुदही करण्यात आल्याचे दिसून येते.

या अर्थसंकल्पात सामाजिक न्याय विभागासाठी 10 टक्के तरतूद केलेली आहे. आदिवासी विकास विभागासाठी 8.9 टक्के तरतूद केलेली आहे. आदिवासी विकास विभागासाठी जी तरतूद केली जाते त्याची मला कोडे सुटलेले नाही. हा विषय कोणी टिकाटिप्पणीसाठी घेऊ नये. या राज्यामध्ये माझ्या माहितीप्रमाणे 90 लाखाच्या आसपास आदिवासींची लोकसंख्या आहे. आदिवासी विकास विभागासाठी या वर्षाच्या बजेटमध्ये 4 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. म्हणजे बजेटच्या 9 टक्के ही तरतूद आहे. या विभागासाठी इतकी मोठी तरतूद केली जात असताना आदिवासींचे राहणीमान किती उंचावू शकलो असा प्रश्न मला नेहमी पडतो. आदिवासींसाठी अनेक योजना राबविल्या जातात त्याचा शासनाने कधी तरी आढावा घेतला आहे काय, त्यांचे राहणीमान किती उंचावले आहे हे पाहिले आहे काय ? आदिवासींचे शिक्षण, आरोग्य यामध्ये झालेल्या बदलाचा चार्ट तयार करुन त्यातून उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे काय ?

मी एकदा गंमतीने म्हटले होते की, राज्याच्या बजेटमधून 4.5 हजार कोटी रुपये खर्च केला जातो. त्याप्रमाणे 5 वर्षांमध्ये 20 हजार कोटी रुपये खर्च केले तरी ते त्याच स्थितीत दिसतील. मुंबईतील आदिवासी पाड्यांमधील आदिवासींची स्थितीही अनेक वर्षांपासून तशीच आहे, त्यात सुधारणा झालेली नाही. त्यामुळे प्रत्येक आदिवासींच्या नावे 10-10 लाख रुपये फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवले तर त्याचा त्यांना चांगला उपयोग होईल. असे केले तर त्यांच्यासाठी आणखी काही करण्याची आवश्यकता नाही. खऱ्या अर्थाने त्यांना न्याय दिल्यासारखे होईल असे मी अनेकदा सभागृहात बोललो आहे. यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

कित्येक वेळा आपल्याला अशा प्रकारे बोलायला आवडत नाही. लोकशाहीच्या चौकटीमध्ये वावरताना, काम करताना काही विशिष्ट जबाबदा-या पार पाडाव्या लागतात.

मी एक उदाहरण देतो. मुंबईच्या बाजूला आरे कॉलनीमध्ये 27 आदिवासी पाडे आहेत. मुंबईमध्ये एका बाजूला 7 स्टार हॉटेल आहे आणि दुसरीकडे आदिवासी पाड्यांमध्ये कालपर्यन्त वीज नव्हती. आम्ही प्रयत्न करुन तेथे वीज नेली. तेथे वीज नेली ही काही त्यांच्यावर आम्ही मेहरबानी केली नाही. या आदिवासी पाड्यातील आदिवासींची परिस्थिती देखील तीच आहे. त्यांच्यासाठी राबविण्यात येत असलेल्या आरोग्याच्या योजना फलद्रूप झालेल्या आहेत काय, जेवढे पैसे त्यांच्या योजनांसाठी राखून ठेवले जातात तेवढे ते खर्च होतात की नाही, यासंबंधी दरवर्षी ऑडिट केले गेले पाहिजे. आदिवासींसाठी खर्च केलेले साडेचार हजार कोटी रुपये कोठे गेले, ते कशा पध्दतीने खर्च करण्यात आले, किती मुलांचे कुपोषण थांबले, किती स्त्रियांच्या रक्तातील हिमोग्लोबीनमध्ये वाढ झ ाली, या गोष्टींचे ऑडिट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आरोग्याच्या संदर्भात मला एका गोष्टी बाबत शासनाचे अभिनंदन करावेसे वाटते. राजीव गांधी जीवनदायी योजना ही राज्याच्या 9 जिल्ह्यामध्ये मागील 2 वर्षापासून यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. ही योजना कामगार, कर्मचारी, सर्वसमान्य जनता यांच्यासाठी लागू केलेली आहे. बायपास सारख्या, ब्रेनटयुमर सारख्या मोठ्या शस्त्रक्रिया या योजनेतून होतात. आता ही योजना संपूर्ण राज्यामध्ये लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला असून या निर्णयाचे मी स्वागत करतो. पण त्याच बरोबर हेही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, काही हॉस्पिटलमधून या योजनेअंतर्गत उपचार घेताना लाभार्थीकडून पैसे मागितले जातात. मी स्वत: माझ्या काही कार्यकर्त्यांसमवेत 7 हिल्स हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. त्यावेळी तेथील व्यक्तीने ते नाकबूल केले. परंतु ज्या माणसाने पैसे दिले होते त्याने 2 लाख रुपये आपल्या सोसायटीमधून काढून दिले होते. अशा प्रकारच्या त्रुटी या योजनेमध्ये आहेत. अशा गोष्टी होता कामा नयेत. ज्या पवित्र भावनेतून आपण ही योजना राज्यभर लागू करीत आहात त्याच भावनेतून लाभार्थीपर्यंत ती योजना पोहोचली पाहिजे. म्हणून अशा प्रकारे या योजनेला कोठे कीड लागत असेल तर तर ती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

वेळीच नष्ट करणे आवश्यक आहे. मग ती कोणतीही हॉस्पिटल्स असू द्या. योजनेतील लाभार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्याचे आमच्या जीवावर आलेले आहे अशा पध्दतीने काही 5 स्टार हॉस्पिटल्स वर्तन करीत असतात. ही सर्वंकष अशी योजना ख-या अर्थाने गरिबांपर्यन्त पोहोचली पाहिजे.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

सदर योजनेचा लाभ घेताना गरिबांची पिळवणूक होता कामा नये, या दृष्टीने सगळयांनी लक्ष द्यावयास पाहिजे. या संदर्भात शासनाने कडक अशी कारवाई आणि कडक असे धोरण हाती घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी माननीय वित्तमंत्र्यांचे एका गोष्टीच्या बाबतीत अभिनंदन करतो, तसेच शासनाचे देखील अभिनंदन करतो. कबड्डी सारख्या खेळाला वेगळया प्रकारचा दर्जा देण्याचा सातत्याने प्रयत्न गेल्या अनेक वर्षापासून आपण करीत आहोत. भारतातील महिला कबड्डी खेळाच्या खेळाडूंनी विश्वचषक आणला, त्या महिला खेळाडूमध्ये तीन मुली महाराष्ट्रातील आहेत. मला एका गोष्टीचा उल्लेख करताना खरोखरच आनंद वाटतो की, मला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्री यांचे अभिनंदन करावेसे वाटते की, कबड्डी खेळाचा विश्वचषक आणलेल्या तीन महिला खेळाडूंना बक्षीसे देण्यात नक्कीच उशीर झाला. परंतु त्यास काही कारण असतील. या तीन महिला कबड्डी खेळाडूंना प्रत्येकी 1 कोटी रुपयांचे बक्षीस देण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे या तीन महिला कबड्डी खेळाडूंना नुसते धनादेशाचे वाटप माननीय मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांनी उपस्थितीत दिले गेले. त्या खेळाडूंना नुसते धनादेश न देता शासकीय सेवेत नोकऱ्या देण्याचे देखील शासनाच्या वतीने वचन देण्यात आले होते, ते वचन या शासनाने पाळलेले आहे. या बाबतीत शासनाने वचनपूर्ती केली, त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या वर्षी युवा धोरण जाहीर झाले. मला माननीय वित्तमंत्र्यांना एकच विनंती करावयाची आहे की, क्रीडा क्षेत्रात सर्वांना सोबत घेऊन आपण काम करीत आहात. परंतु राज्य क्रीडामंडळ युवा धोरणासाठी 150 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मला असे वाटते की, महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये खेळांसाठी एक वेगळे स्थान आहे. युवा धोरण जाहीर होत असताना माझी अपेक्षा अशी होती की, या विभागाला 250 ते 300 कोटी रुपयांची तरतूद करावयास पाहिजे होती. कबड्डी, खो-खो, हॉलिबॉल किंवा इतर मैदानी इंडोअर खेळ असतील, या खेळांकडे हे महाराष्ट्र वेगळया दृष्टीने पहात असते. कबड्डी या खेळास आपण सर्वांनी विशिष्ट स्थानापर्यंत नेलेले आहे. महाराष्ट्रातील कबड्डी हा खेळ भविष्यात आणखी पुढे जाईल या बाबतीत माझ्या मनात शंका नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

सभापती महोदय, मी पुन्हा एका गोष्टींचा उल्लेख करु इच्छितो की, सभागृहात कोकणाचा विषय चर्चेला आला तर आम्ही सर्व आमदार बोलत असतो. ज्यावेळेला निधी देण्याची वेळ येते त्यावेळेला मात्र आमच्या हातात निराशा येते. मी टीका करीत नाही, पण आमचे दुर्देव आहे की, श्री.सुनील तटकरे अर्थमंत्री होते, त्यांनी दोन वेळा या सभागृहात अर्थसंकल्प मांडला होता. त्यावेळी त्यांच्याकडून अपेक्षा होती की, कोकणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल. परंतु त्या दोन्ही वेळा अर्थसंकल्पात अतिशय कमी प्रमाणात निधी दिला गेला.

महोदय, ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून कोकणाला 50 कोटी रुपये देऊ केलेले आहेत त्याबद्दल माननीय वित्तमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे मी व्यक्तीश: आणि कोकणातील जनतेच्या वतीने आभार मानतो. कोकणात सी-वर्ड प्रकल्प व्हावा म्हणून मी, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण तसेच कोकणातील इतरही सन्माननीय सदस्यांनी आग्रह धरला होता. सी-वर्ड प्रकल्पासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे म्हणून या बाबतीत सुध्दा मी माननीय वित्तमंत्र्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, शासनाकडून विविध प्रकल्प तसेच योजनांसाठी तरतूद उपलब्ध करुन दिली जाते, परंतु ती तरतूद खर्च करीत असताना नियोजन मात्र व्यवस्थितपणे केले जात नाही. तरतूद खर्च करीत असताना अनेक अडचणी येतात याची आपणा सर्वांना माहिती आहे....

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...........

या ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून, ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून हे सगळे काम होणार आहे किंवा हा निधी वापरला जाणार आहे.

सभापती महोदय, मी पहिल्यांदा निवडणूक कोकणातील दापोली मतदारसंघातून लढविली होती. दापोली आणि मंडणगड हे दोन तालुके महाराष्ट्रातील अतिशय मागासलेले तालुके आहेत, हे मला मुद्दाम सांगावेसे वाटते. पूर्वी प्रशासनामध्ये असे म्हटले जात असे की, एखाद्याला शिक्षा द्यायची असेल तर गडचिरोली किंवा मंडणगड येथे बदली करा. ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तुम्हा आम्हाला घटना दिली, ज्या घटनेच्या आधारे आपण सर्वजण या सभागृहात बसलो आहोत, राज्यकारभार करीत आहोत त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ गाव आंबळवेद हे आमच्या मंडणगड तालुक्यात आहे. ज्यांना पेशवाईचा नाद म्हटले जायचे ते नानासाहेब फडणवीस मंडणगडचे, स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणारच असे म्हणणारे बाळ गंगाधर टिळक चिखलगावचे म्हणजे आमच्या दापोलीचे होते. अशी 100 गावांची उदाहरणे देता येतील. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, आगरकर अशी कितीतरी नावे घेता येतील. दुर्दैवाने या महनीय व्यक्तींची जन्मगावे मात्र नेहमीच वंचित राहिली. आंबळवेद गावापर्यंत जायला रस्ता नाही, एसटी बस महत्प्रयासाने जाते. आम्ही शासनाकडे रस्त्याचा प्रस्ताव दिला होता.

सभापती महोदय, साने गुरुजी यांचे पालगड गाव असेल, चिखलगाव असेल, वेळास असेल या सगळ्या गावांना महत्व देण्याचा निर्णय माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार यांनी घेतला, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीमुळे राज्य एका वेगळ्या संकटातून जात असताना मोठ्या मनाने या गोष्टीबाबत आम्हाला दिलासा देण्याचे काम केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, राज्यातील सर्वसामान्य जनतेला त्यांच्या जीवनावश्यक वस्तू आहेत, त्यात गहू असेल, डाळी असतील, पीठ असेल............

नंतर 3डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप .......

यामध्ये एक पैशाचीही करवाढ करण्यात आली नसून सन 2014 पर्यंत करमुक्त करण्यात आलेले आहे त्यामुळे मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मला अनेक विषयावर बोलता येईल परंतु माझे सहकारी त्यावर आपले विचार मांडून न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्यामुळे मी सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, राज्याचे औद्योगिक धोरण जाहीर झाले असून त्या माध्यमातून 5 लाख नोकऱ्या मिळू शकणार आहेत. चांगल्या प्रकारचे औद्योगिक धोरण राज्य शासनाने आणल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मुंबई, ठाणे, पुणे या भागांचाच विचार न करता गडचिरोली सारख्या ठिकाणी विशाल प्रकल्प यावेत व तेथील स्थानिकांना, बेरोजगारांच्या हाताला काम मिळावे यासाठी शासनाने धोरण आखले आहे. गडचिरोली सारख्या ठिकाणी मोठ मोठे प्रकल्प जाणे, कार्यान्वित होण्यासाठी शासनाने सकारात्मक पाऊले उचलणे आवश्यक आहे. धोरणांची अंमलबजावणी करीत असतांना शासनाला अनेक गोष्टीला सामोरे जावे लागणार असून मला त्याची कल्पना आहे. आजपर्यंत जेवढी औद्योगिक धोरणे आली ती केवळ मुंबई, ठाणे, पुण्याच्या अवती भवतीच फिरत राहिली होती परंतु या वेळचे औद्योगिक धोरण राज्याच्या सर्व भागामध्ये, सर्व मागास भागांमध्ये जाणार असून त्यासाठी अर्थसंकल्पात निधी राखून ठेवलेला आहे. आद्योगीकरणामध्ये शासनाने उद्योजकांनाही सुविधा दिलेल्या असल्यामुळे मी माननीय अर्थमंत्र्यांचे आभार व्यक्त करतो, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपलेही आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

----------

...2....

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, अर्थसंकल्प सादर करीत असतांना स्व.यशवंतराव चव्हाण यांचा महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून गौरव करण्यात आलेला आहे. काल विधानसभा विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव खडसे यांनी 60 वर्षानंतरही हे विधान भवन कोणाचे आहे ते आपल्याला सांगता आलेले नाही. मी आपल्या परवानगीने विचार मांडण्यासाठी या ठिकाणी उभा आहे. माननीय खडसे साहेबांनी जी सूचना केली आहे ती पुढील आठवडयात अंमलात आणली तर स्व.यशवंतराव चव्हाणांचा सन्मान होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असलेले विधान भवन,सन्मानित होईल अशी विनंती करतो.

सभापती महोदय, दुसरा सन्मान महाराष्ट्राचे हरित क्रांतीचे प्रणेते, कापूस एकाधिकार खरेदी योजनेचे शिल्पकार स्व.वसंतराव नाईक यांचीही अर्थसंकल्पात आठवण काढण्यात आलेली आहे. मला या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते की, ज्यांनी या महाराष्ट्राला हरित क्रांतीचा मूलमंत्र दिला त्या हरित क्रांतिला पूर्ण विराम दिलेल्या 70 हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळयाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात होण्याची आवश्यकता आहे. या शासनाला सिंचनाच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची वेळ आली व ती आकडेवारी लपविण्यासाठी आर्थिक अहवालामध्ये सिंचनाची आकडेवारीच लुप्त करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ ST/ D/ 15:05

श्री.दिवाकर रावते...

हे सर्व पाहिल्यानंतर आपण त्यांचा कशा पद्धतीने आदर करीत आहोत हा प्रश्न निर्माण होतो. कापूस एकाधिकार योजनेचे शिल्पकार म्हणून आपण त्यांचे वर्णन करतो. गौरव करतो. असे असताना आज शेतकऱ्यांना व्यापाऱ्याच्या तोंडावर टाकून कापूस एकाधिकार योजनाच संपुष्टात आणलेली आहे. गेल्या आठवड्यामध्ये मी या संदर्भात म्हटले होते की, तेथे आता कोणीही राहिलेले नाही. 200 ते 250 ग्रेडर आहेत. त्यांच्यासाठी दर महिन्याला 2 कोटी 15 लाखाचा खर्च सुरू आहे. तेथे आपण भारतीय प्रशासन सेवेतील एक अधिकारी नियुक्त केला आहे. त्यांना देखील मोकळे करावे म्हणजे त्यांचा उपयोग मंत्रालयामध्ये करता येईल. आज ती कापूस एकाधिकार योजना लयाला गेली आहे.

आपण नवी मुंबईचे शिल्पकार म्हणून श्री.वसंतराव नाईक साहेबांचा उल्लेख आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात केलेला आहे. त्याच वेळी या महाराष्ट्रामध्ये आदर्श इमारत उभी करून संपूर्ण देशामध्ये या महाराष्ट्राचा लौकिक पसरवला. तेव्हा आपण कोणत्या नैतिकतेच्या आधारावर हरितक्रांतीचे, रोजगार हमी योजनेचे व कापूस एकाधिकार योजनेचे शिल्पकार असलेले आदरणीय नेते श्री.वसंतराव नाईक यांचा सन्मान करीत आहात ? याबद्दल माझ्या मनात प्रश्न निर्माण होतो.

रोजगार हमी योजनेसाठी आपण लोकांच्या खिशातून तीन हजार कोटी रूपये जमा करीत आहात. तो निधी आता आपण मूळ अर्थसंकल्पामध्ये सामावून घेत आहात. त्या पैशाचा उपयोग रोजगार हमी योजनेसाठी न करता दुसऱ्याच कामासाठी करण्यात येत आहे. त्यामुळे श्री.वसंतराव नाईक यांनी निर्माण केलेल्या योजनेचा अवमान कसा करीत आहात हे मी अत्यंत व्यथित अंत:करणाने मांडत आहे.

श्री.वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीसाठी प्रयत्न केला. दुसरे श्री.सुधाकरराव नाईक आले. ते पण त्याच घरातील. त्याच कुटुंबातील. पोलिसी बडग्याची ताकद काय असते हे त्यांनी त्यावेळी दाखवून दिले. भल्याभल्यांना घाम फुटेल अशा प्रकारचे जबरदस्त प्रशासन निर्माण करण्याचे सामर्थ्य श्री.सुधाकरराव नाईक यांनी दाखविले. आता कदाचित माझा संदर्भ चुकेल असे वाटते. वसई-विरारच्या टापूमधील जबरदस्त असलेल्यांना तुरूंगात टाकण्याचे सामर्थ्य श्री.सुधाकरराव

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

नाईक यांनी दाखविले. त्याच कुटुंबातील एक सदस्य विधान मंडळाचा सदस्य आहे. त्याने जो काही प्रकार केला आहे ते चौकशीत येईलच. पण विधी मंडळात घडलेल्या घटनेमुळे आम्हावर आज मान खाली घालण्याची पाळी आली आहे. त्यांचे वारसदार म्हणून तिसरे नाईक यांना आणले आहे. त्यांना शोधावे लागते. ते कुठे आहेत हेच कळत नाही.

सभापती महोदय, त्या दिवशी श्री.ना.धों.महानोर माझ्या स्वप्नात आले होते. ते मला म्हणाले की, निसर्गाच्या सौंदर्याने नटलेल्या माझ्या कवितेला आपण काय केले ? आपण खालच्या सभागृहात कदाचित कविता चांगली म्हटली असेल. पण या सभागृहात काही तरी गडबड झाली. ते मला म्हणाले की, माझी कविता विद्रूप करण्याचा अधिकार आपणाला कोणी दिला आहे ? मी म्हणालो, कविवर्य आपण चिंता करू नका. मी कविता सादर करतो.

या नभाने या भूमीला उधळून टाकले
आणि या मातीतून चैतन्य गेले
कोणती पापे अशी येती फळाला
जोंधळयाला चांदणेही लगडेना
या नभाने या भूमीला उधळून टाकले
आणि भुकेल्या मांडवात पाणीही आटले
पहाता ऋतुगंध ओस पडलेला
पाखरेही गेली सोडून गावे
गुंतलेले प्राण आता रानोमाळ झाले.
या नभाने या भूमीला उधळून टाकले....

आमच्या श्री.ना.धों.महानोर यांना किती यातना झाल्या असतील ? शासनाने कर देखील लावले आहेत. मी सुरूवातीला एका कराच्या मुक्तीबद्दल अभिनंदन करतो. अनेक विद्यार्थी जुनी पोस्टाची तिकिटे गोळा करतात. तो भार आपण करमुक्त केला आहे. त्यामुळे जुना ठेवा जतन करणाऱ्यांना आपण चांगले बळ दिलेले आहे त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करतो.

यानंतर श्री.अजित...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.भारवि.. 15:10

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय,शंभर रुपये गृहीत धरुन जुने मुद्रांक शुल्क घेणार नाही. परंतु जून 2012 पासून घेतलेले दोनशे ते अडीचशे कोटी रुपये शुल्क परत देणार काय असा प्रश्न आहे. शेतकऱ्याला सावकाऱ्याचा जाच होता. परंतु आता वित्तीय संस्थांवर येथोचित मुद्रांक शुल्क हा कर लावला आहे. शेतकऱ्यांना गहाण खत बनविताना किंवा बँकेपुरता ते मर्यादित होते. पंरतु आता कर्जावर सुध्दा कर लावत आहात आणि हा बोजा शेतकऱ्यांवर पडणार आहे. हा कर वित्तीय संस्था स्वतःच्या खिशातून देतील असे मला वाटत नाही. तेव्हा शेतकऱ्यांवर आणखी नवीन कर येत आहे असा माझा समज आहे. तसे नसेल तर त्याबाबत माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी खुलासा केल्यास मला आनंद होईल.

सभापती महोदय, या बजेटमध्ये एक नवीन मुद्दा मांडण्यात आलेला आहे. तो कोणाच्या सुपीक डोक्यातून आला ते मला माहीत नाही. पेव्हर ब्लॉकवर साडेबारा टक्के कर लावण्यात आला आहे. मुंबई शहरामध्ये महानगरपालिका दरवर्षी 10 लाख चौ.मी.पेव्हर ब्लॉक वापरते.पेव्हर ब्लॉकचा वापर फक्त मुंबई शहरामध्ये होतो असे नाही तर महाराष्ट्रातील नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद क्षेत्रांमध्ये सुध्दा पेव्हर ब्लॉकचा वापर होतो. महानगरपालिका करातून सोयी देते त्यावर हा कर लावण्यात आलेला आहे. या करामुळे महानगरपालिकेमध्ये जे काही टेंडर झाले असतील त्याचे एस्क्लेशन येईल. या करामुळे महानगरपालिकांची आर्थिक स्थिती नक्कीच कोलमडेल अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, दुष्काळाची थट्टा किती करावी. श्रीमंतांना सोडणार नाही आणि गरिबांना सांभाळून घेऊ असा सरकारचा आविर्भाव आहे. जो कर लावण्यात आलेला आहे, मला म्हणायचे आहे की, बनवाबनवी कशी करायची ? दादा, आपल्यासारख्यांच्या मनात अशी बनवाबनवी येणार नाही. परंतु आपण तसे केले आहे. ते अधिकाऱ्यांनी केले किंवा अन्य कोणी केले मला माहीत नाही. बजेटच्या भाग दोन मधील 12 नंबरवर उल्लेख आहे तो मी वाचून दाखवितो. "या वर्षी राज्याच्या काही भागात तीव्र दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. दुष्काळी परिस्थितीच्या निवारणासाठी मोठा खर्च भागविण्यासाठी तात्पुरती उपाय योजना म्हणून सोने, चांदी, हिरे, मौल्यवान धातू व त्या पासून बनविण्यात येणाऱ्या दागिन्यांवर एक टक्क्याऐवजी 1.10 टक्के

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

कराची आकारणी प्रस्तावित आहे."   मी या संदर्भात माहिती घेण्याचा प्रश्न केला. मी सुरुवातीला सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांच्या वडिलांना फोन करुन विचारले की, अशाप्रकारच्या कर लावल्यामुळे किती निधी जमा होईल ? त्यांनी मला सांगितले की, 50 कोटी रुपये. मी त्यांना सांगितले की, मी आपल्यावर लागणाऱ्या कराबाबत विचारले नाही तर महाराष्ट्रातून किती कर जमा होईल असे विचारले आहे. त्यानंतर मी अनेकांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मला असे समजले या माध्यमातून जवळपास 500 ते 700 कोटी रुपये मिळतात. त्यावर पॉईन्ट वन पर्सेन्ट म्हणजे दुष्काळी आपत्ती निवारणसाठी फक्त 170 कोटी रुपये वाढविले,

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 15:15

श्री.दिवाकर रावते....

सोने, चांदी, हिरे, मौल्यवान धातू व त्यापासून बनविण्यात येणाऱ्या दागिन्यांवर 0.10 टक्के कर लावल्यामुळे 170 कोटी रुपये मिळणार आहेत. केवळ 170 कोटी रुपये करांतून आपण कोणते दुष्काळ निवारण करणार आहात ? केवळ मोठ्या लोकांवर कर लादला असे अर्थसंकल्पात नमूद केले आहे. राज्य सरकारच्या या प्रवृत्तीमुळे प्रश्न निर्माण होतो. हा कर लावून एकप्रकारे दुष्काळाची थट्टा केली आहे. महोदय, फुलाला सुगंध असतो आणि कुस्करलेल्या फुलाला देखील सुगंध असतो. कवी ना.धो.महानोर म्हणाले होते की, मी तुमच्या हातात फूल दिले होते पण तुम्ही ते कुस्करले. पण सुगंध तोच मातीचा आहे.

महोदय, सन 2013-14 या वर्षाचे महसुली उत्पन्न रुपये 1 लाख 55 हजार 986 कोटी 95 लाख रुपये अपेक्षित आहे. महसुली खर्च रुपये 1 लाख 55 हजार 802 कोटी 57 लाख रुपये एवढा आहे व महसूली अधिक्य 184 कोटी 38 लाख रुपये असल्याचे अर्थसंकल्पात नमूद केले आहे. हे अधिक्य राहणार नाही हे माननीय उप मुख्यमंत्र्यांना सुध्दा माहीत आहे. या पूर्वी अनेक सन्माननीय सदस्यांनी आकडेवारी नमूद केल्यामुळे मी आकडेवारीत जाणार नाही. महोदय, गेल्या वर्षी राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 45 हजार कोटी रुपये होते. या वर्षी ते 46 हजार कोटी रुपयांवर गेले आहे. महोदय, एका बाजूला आपण 10 टक्क्यांनी कर लावतो. त्याच धर्तीवर राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान गेल्या वर्षीच्या तुलनेत 10 टक्क्यांनी वाढविले असते तर ते पुढे गेले असते. महोदय, गेल्या वर्षी दुष्काळामुळे विकास योजनांना कट लावल्यामुळे ही तूट भरुन निघणार आहे आणि राज्याच्या अर्थसंकल्पात अधिक्य राहणार आहे हे स्पष्ट होते.

महोदय, आमदार विकास निधीचा वापर जलसंधारणाच्या कामी तसेच ग्रामीण भागात पाणी निर्माण करण्यासाठी करता येणार आहे. ही कल्पना ज्याची असेल त्यांचे मी खरोखरच अभिनंदन करतो. महोदय, आमदार निधीतील 25 लाख रुपये ग्रामीण भागात पाण्याच्या कामांवर वापरता येणार आहेत. एका बंधाऱ्यावर 2-3 लाख रुपये खर्च गृहीत धरल्यास, 25 लाख रुपयांतून खूप बंधारे करता येतील. माननीय श्री.अजित दादा पवार आमदार विकास निधी 2 कोटी रुपये करतील तेव्हा 25 लाख रुपयांची मर्यादा वाढवून देतील.

महोदय, महसूल विभागाशी निगडित असलेला 7/12 च्या उताऱ्याचा विषय आहे. युती सरकारने "7/12 तुमच्या दारी" ही योजना राबविली होती. ती योजना काही दिवस चालली. पण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्या योजनेचे पुढे काय झाले माहीत नाही. 7/12 चे उतारे शेतकऱ्यांच्या दारी जाण्याचे थांबले. ते उतारे आता संगणकाच्या माध्यमातून देण्यात येत आहेत. संगणकीकरणाच्या कामाचा ठेका दिला गेला. 7/12 चे संपूर्ण रेकॉर्ड त्यांच्याकडे दिले. पूर्वी शेतकऱ्यांना 7/12 चा उतारा 5 रुपयांत मिळत होता. 5 रुपये ही आपल्या दृष्टीने कमी रक्कम असली तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने ती मोठी आहे. शिवाय 7/12 चा उतारा ताबडतोब मिळण्यासाठी 10 रुपये रक्कम आकारली. त्यानंतर 20 रुपये केले. 7/12 चा उतारा घेण्यासाठी शासनाने 2.5 रुपये कर लावला. ती रक्कम 22.5 रुपये झाली. कोर्ट फी स्टॅम्पचे 5 रुपये आणि अर्ज करण्यासाठी 2 रुपये आकारले जाऊ लागले. अशा प्रकारे निरनिराळ्या रकमा आकारुन 5 रुपयांमध्ये मिळणारा उतारा घेण्यासाठी 30 रुपयांत मोजावे लागत आहेत. वास्तविक पाहता नंतरच्या शासनाने "7/12 तुमच्या दारी" ही योजना मजबूत केली असती तर शेतकऱ्यांना कमी रकमेत व वेळेवर उतारा मिळाला असता. शेतकऱ्यांना वर्षातून कमीत कमी 5 आणि जास्तीत जास्त 10 वेळा 7/12 उतारा घ्यावा लागतो. 7/12 वर उत्पन्न यावे म्हणून 3 महिन्यासाठी 7/12 चा उतारा काढला जातो. परंतु तो परत घेतला जातो. याला अनेक कारणे आहेत. 7/12 चा उतारा पूर्वी 5 रुपयांत मिळायचा, तो आता 30 रुपयांत मिळतो. शिवाय वर्षातून 5-10 वेळा उतारा घ्यावा लागतो. त्यामुळे हे वाढलेले बजेट शेतकऱ्यांसाठी खूप मोठे आहे.

महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जाच्या व्याज माफीचा विषय सुध्दा महत्त्वाचा आहे. माझ्याकडे सातारा येथील एका व्यक्तीचे अधिकृत पत्र आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्या व्यक्तीने मला असे कळविले आहे की, आमच्या बँकेमध्ये आतापर्यंत शासनाने माझ्या खात्यावर माझे कर्ज फेडल्यानंतर मला उपलब्ध होणारी जी व्याजमाफी आहे ती दिलेली नाही. ही बँक ऑफ महाराष्ट्रची भूईज शाखा आहे. या व्यक्तीचे नाव गणेश हनुमंत वाघ आहे. त्यांचा खाते क्रमांक 20205954478 आहे. त्यांच्या खात्यावर व्याजापोटी 5193 रुपये वसूल करुन घेतले. 29.3.2011 आणि 30.9.2011 इत्यादी तारखांना हे पैसे घेतले आहेत. हे एक उदाहरण आहे. अशा प्रकारे हजारो शेतकऱ्यांच्या खात्यावर शासनाने केवळ बँकेमध्ये पैसे न भरल्यामुळे शेतकऱ्यांना हा भूर्दंड पडत आहे. आपली व्याजमाफीची जी योजना आहे ती त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. अशा या अर्थसंकल्पावर विचार करीत असताना सर्वसामान्य लोकांपर्यंत तो जर पोहोचत नसेल तर त्या संदर्भात आपली काय भूमिका राहू शकते हा विषय माझ्यापुढे येतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या बऱ्याच योजना आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून आपण लाभ देतो. हे आपण यावेळी करण्याचे ठरविले मग मागे का केले नाही याची झाडाझडती घेणे अत्यंत आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या सवलतीच्या दरातील कर्ज पुरवठ्याबाबत बोलत असतानाच राज्य व केंद्र योजनेअंतर्गत कौशल्य विकास योजना वगैरे सर्व या ठिकाणी दिलेले आहे. ती योजना कितपत होणार हे पुढच्या वर्षी कळेल पण आतापर्यंत कोठेही काही निर्माण झालेले दिसत नाही. राष्ट्रीय फलोद्यान अभियानाच्या माध्यमातून फलोत्पादन हा विषय यामध्ये घेतलेला आहे. मी कालच मराठवाड्यामध्ये होतो. या संदर्भात ॲग्रो वन मध्ये एक बातमी आलेली आहे ती मी वाचली. त्यामध्ये राज्याच्या हिश्याचे काय झाले हा प्रश्न त्यामध्ये निर्माण झालेला आहे. 400 कोटी रुपये केंद्र शासनाने दिल्यानंतर जाहीर पॅकेज मधील केंद्राचा हिस्सा वगळून 50 टक्क्यामध्ये 25 टक्के मदत राज्य सरकारकडून अपेक्षित आहे. मात्र राज्य हिश्याबाबत सध्या कोणीही बोलत नसल्यामुळे, ती व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांना केंद्राचे आलेले पैसे त्यांचे फलोद्यान जगविण्याकरिता उपयोगी येत नाही, ही परिस्थिती आहे. अर्थसंकल्पात तरतूद करीत असताना असेल त्या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना जगविण्याकरिता जर तरतूद करीत नसू तर अशा प्रकारची बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात निर्माण करणार आहात का असा प्रश्न निर्माण होतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, आपण आदिवासींचा प्रश्न व्यवस्थित मांडला. मला एक गोष्ट जाणवली. आरोग्य खाते पूर्वी राष्ट्रवादीकडे होते. ते खाते काँग्रेसकडे आल्यानंतर श्री. सुरेश शेट्टी यांनी ते खाते अत्यंत चांगल्या पध्दतीने चालविले आहे. ते उत्कृष्ट पध्दतीने काम करीत आहेत. कोणी 100 टक्के करु शकत नाही. कारण त्यामध्ये अनेक गोष्टी असतात. पण आधी ज्यांच्याकडे ते खाते होते त्यावेळी हे खाते का पेंगाळलेले होते असा प्रश्न निर्माण करणारी क्षमता श्री. सुरेश शेट्टी साहेबांनी दाखविलेली आहे. त्यामुळे आपण आदिवासी खात्याबद्दल एवढ्या तळमळीने बोलत असताना भविष्यात देवाणघेवाण झाली तर कदाचित आदिवासी विकास खाते तुमच्याकडे येईल. आता आदिवासी विकास खाते बिगर आदिवासीकडे देण्याची पध्दत सुरु झालेली आहे. अनुसूचित जमाती संबंधीचा मुद्दा आला होता. त्यासाठी फक्त 68 कोटी रुपयांची तरतूद असल्याचे आपण सांगितले. आपण तळमळीने सांगत होता की, एकाएका शेतकऱ्याला 10-10 लाख रुपये दिले तर त्यांचा प्रश्न सुटेल. माझ्याही कल्पनेत ते होते. पण या ठिकाणी अनुसूचित जाती, जमाती, कुक्कुटपालन, शेळी, मेंढी यासाठी फक्त 68 कोटीचीच तरतूद आहे.

सभापती महोदय, पाटबंधारे विभागाच्या संदर्भामध्ये उद्या सभागृहामध्ये चर्चा आहे. मराठवाड्यातील जलसिंचनाच्या संदर्भातील विषयाच्या संदर्भात विरोधी पक्षाचा प्रस्ताव आहे. त्यामुळे त्या विषयावर जास्त वेळ घालवावा का असा प्रश्न पडतो. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो. या सभागृहामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा झाली. या सभागृहामध्ये दुष्काळावर चर्चा झाली. या सभागृहामध्ये आपण भरपूर कामकाज केले आणि त्यावर उत्तरही आले. दुष्काळाच्या चर्चेमध्ये मी ऊसाच्या संदर्भातच माझे भाषण केले होते. मला एका गोष्टीचे समाधान आहे की, आपण या ठिकाणी ठामपणे जाहीर केले की, भविष्यामध्ये तीन वर्षाच्या आत प्रत्येक कारखान्याच्या क्षेत्रामध्ये ठिबक सिंचनाव्दारे ऊस पिकवावा लागेल. यासाठी तीन वर्षाची अट घातलेली आहे. तीन वर्षात हळूहळू ठिबक सिंचन केलेच पाहिजे असा निर्धार आपण व्यक्त केला आहे. परंतु अर्थसंकल्प वाचत असताना हा निर्धार दिसून येत नाही. दुष्काळावरील चर्चेला उत्तर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. दिवाकर रावते ....

देत असताना भाषणामध्ये आपण हा निर्धार व्यक्त केला. त्यानंतर पाच सहा दिवसात हा अर्थसंकल्प सादर झालेला आहे. त्यामध्ये आम्हाला या संदर्भात कोणतेही नियोजन दिसून आले नाही. आपल्याला तीन वर्षाची अट घातल्यानंतर प्रतिवर्षी या पध्दतीने आपल्याला ठिबक सिंचनाकरिता वेळ पडल्यास शासनाकडून कारखान्याला अनुदान नव्हे पण कर्ज रुपाने पैसे मिळू शकतील आणि कारखाने शेतकऱ्यांना पैसे देतील अशा प्रकारचे कोणतेही नियोजन मला या अर्थसंकल्पामध्ये दिसले नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आपल्या निर्धाराबद्दल मी शंका घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण आपण जे बोलता ते करता असे आपले अनेक सन्माननीय सदस्य बोलत असतात. आपली कार्यशैली तशी आहे, याबद्दल दुमत नाही. परंतु पाटबंधारे विभागामध्ये जो घोळ सुरु आहे त्यावर मी आज बोलणार नाही, कारण तो स्वतंत्र विषय आहे. मी मराठवाड्यातील सिंचनाच्या अनुशेषाबाबत बोलणार आहे, विदर्भातील सिंचनाच्या अनुशेषावर बोलणार नाही. कारण मराठवाड्यातील दुष्काळ हा जीवनमरणाचा विषय झ ालेला आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी पाटबंधारे विभागाच्या चर्चेच्या वेळी ऊर्जा मंत्री म्हणून सभागृहात उपस्थित राहून उत्तर दिले तर आम्हाला आनंद होईल. मराठवाड्यातील वीजनिर्मितीचा प्रश्न गुंतलेलेला आहे. जायकवाडी, गोदावरी प्रकल्पासंबंधी झालेल्या अन्यायाबाबत मी माझे मत उद्या मांडणार आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा सर्व सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. त्यामुळे त्या योजनेबाबत मी अधिक बोलणार नाही. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत अर्भक मृत्यू दराबाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे हे नेहमी उल्लेख करीत असतात. परंतु या योजनेसाठी केवळ 500 रुपयांची तरतूद केलेली असल्यामुळे ती अत्यंत अपुरी आहे असे माझे मत आहे. पण ही सुरुवात आहे.

या अर्थसंकल्पात यंत्रमागासाठी 939 कोटी रुपये व शेतकऱ्यांच्या वीज बिलासाठी 3 हजार कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे घोषित केलेले आहे. नगर विकास विभागाच्या अंतर्गत जेएनएनयुआरएम अंतर्गत शहरातील गरीब वस्त्यांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी आतापर्यंत किती खर्च केलेला आहे त्याचा अर्थसंकल्पात उल्लेख केलेला आहे. परंतु त्यामध्ये नवीन काहीच नमूद केलेले नाही. राज्यपालांच्या गेल्या वर्षाच्या अभिभाषणामध्ये तेच सांगितले होते, अर्थसंकल्पात तेच सांगितले होते, या वर्षीच्या अभिभाषणात व अर्थसंकल्पात तेच नमूद केले आहे. पण मुंबई शहरासाठी या अर्थसंकल्पात एकही नवीन योजना मांडलेली नाही. शासन केवळ एमएमआरडीएवर विसंबून राहिलेले आहे. ते जे करतील त्यातून आमचे भले होईल. गेल्या वर्षी जेएनएनयुआरएम

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अंतर्गत केंद्र सरकारकडून अपेक्षित निधी कमी मिळाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये कमी घरकुले बांधण्यात आली आहेत. सुधारित अंदाजपत्रकामध्ये 245 कोटी रुपये कमी आल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या वर्षी 1 लाख 9 हजार 612 घरकुले मंजूर केली आहेत. त्यासाठी केंद्र सरकारकडून 730 कोटी रुपये अपेक्षित केले आहेत. परंतु गेल्या वर्षीचे 400 कोटी रुपये कमी मिळाले असल्यामुळे या वर्षी या योजनेवरील खर्चाची तोडमिळवणी कशी करणार असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या वर्षी घरकुले निर्माण होतील की नाही अशी मला शंका येते.

या सभागृहात नेहमीच कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा करीत असताना सर्व सन्माननीय सदस्य त्यात भाग घेत असतात. त्यावेळी शासनाच्या उणिवांबद्दल न बोलता पोलिसांच्या कार्यशैलीबाबत बोलत असतो. त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये काय कमी आहे, पोलीस दलामध्ये किती पदे रिक्त आहेत त्याचा उल्लेख करीत असतो. या निमित्ताने मी दोन गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख करणार आहे. कालच 26/11 च्या घटनेतील गुन्हेगारांचा शोध लावल्याबद्दल श्री.राकेश मारिया व इतर पोलीस अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्रे दिलेली आहेत. एक गोष्ट मला नेहमी अभिमानाची वाटते. एक खाकी वर्दीतील पोलीस अधिकारी संपूर्ण ताज हॉटेलमध्ये फिरुन दहशतवाद्यांवर गोळ्या घालत फिरत होता हे संपूर्ण जगाने पाहिलेले आहे. त्या पोलीस अधिकाऱ्यांचे नाव श्री.विश्वास नांगरे-पाटील असे आहे. त्यांना शासनाने कोणते बक्षीस दिले आहे ते आम्हाला माहीत नाही. हा वेगळा विषय आहे. त्यांच्याशी आमचा काही संबंध येत नाही. परंतु त्यांच्या शौयाबद्दल आम्हाला किती अभिमान असावा हा खरा विषय आहे. मुंबई पोलीस दलातील एक अधिकारी दहशतवाद्यांच्या विरोधात लढत असताना आपले कर्तव्य धैर्याने पार पाडत आहे. त्या पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने बढती दिली आहे काय ? पोलिसांचे धैर्य वाढविण्याचे काम शासनाने केले पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:30

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी दुष्काळासंबंधी बोलत असताना माननीय उप मुख्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, काल ते उस्मानाबादला गेले नाहीत. त्यांना निमंत्रण होते की नाही मला माहीत नाही. आदरणीय मुख्यमंत्री महोदय तेथे गेले होते. उस्मानाबाद जिल्हयामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. जत, सांगोला या प्रमाणे धाराशिव, जालना हे भाग देखील तीव्र दुष्काळी आहेत. उस्मानाबाद येथे मोठा समारंभ झाला. हजारो लोक त्या समारंभात जेवले, माननीय मुख्यमंत्री देखील त्या समारंभाला गेले होते. आदरणीय श्री. शरद पवार साहेब यासंबंधी काय बोलतील हे मला माहीत नाही. पण दुष्काळग्रस्त अशा उस्मानाबादमध्ये मोठा समारंभ झाला अशा बातम्या वृत्तपत्रातून आणि दूरचित्रवाहिन्यांवरुन झळकल्या. धाराशिवमध्ये मी गेलो होतो.

सभापती महोदय, इतर ठिकाणी निधी कमी पडला तरी चालेल. पण पोलीस दलासाठी अधिक दिला गेला पाहिजे. पोलीस प्रशिक्षण केन्द्रासंबंधी मी माहिती देतो. मी खंडाळयाच्या पोलीस प्रशिक्षण केन्द्रामध्ये चार दिवस राहिलो होतो. आता ते केन्द्र महिला पोलिसांसाठी केले आहे. आपल्या राज्यामध्ये एकूण 10 प्रशिक्षण केन्द्रे आहेत. नागपूर येथे-1200, मरोळ येथे-1200, खंडाळा येथे 700, जालना येथे 1200, दौंड येथे 2200, सोलापूर येथे 800, लातूर येथे 600, सांगली येथे 800 अशा प्रकारे एकूण 8700 प्रशिक्षणार्थी पोलीस 6 महिने प्रशिक्षण केन्द्रावर शिकत असतात. त्याना जेवण वगैरे या गोष्टी त्यामध्ये येतात. हा पोलीस तेथून प्रशिक्षण घेऊन तेथील संस्कार घेऊन काम करीत असतो. नियमाप्रमाणे 100 लोकांमागे एक आचारी पाहिजे. या प्रशिक्षणार्थींच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी 500 ते 550 आचारी आवश्यक असताना आज फक्त तेथे 200 आचारी आहेत. हे पोलीस प्रशिक्षण घेत असताना त्यांच्या जेवणाचे हाल होत असतील तर मग ते बाहेर भुकेलेले आल्यानंतर काय करतील, असा प्रश्न निर्माण होतो.

आम्ही ग्रामीण भागातील जिल्हा परिषदाच्या शाळा पहातो. त्या शाळांमध्ये शिक्षक शाळेत आले नाही तर दोन-तीन वर्गाचे विद्यार्थी एकत्र बसवून त्यांना शिकविले जाते. दुसरी, तिसरी, चौथीचे वर्ग एकाच ठिकाणी भरवून विद्यार्थ्यांना शिकविले जाते. हे दृश्य नेहमीचेच आहे. हीच परिस्थिती पोलीस प्रशिक्षण केन्द्रामध्ये देखील आहे. 100 प्रशिक्षणार्थींना शिकविण्यासाठी एक शिक्षक आवश्यक आहे. परंतु त्यांची संख्या पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे प्रशिक्षणार्थींच्या दोन-तीन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:30

श्री. दिवाकर रावते....

तुकडया एकत्र करुन त्यांना शिकविले जाते. मग सक्षम पोलीस कसा काय तयार होणार ? भविष्यामध्ये हा महाराष्ट्र सुरक्षित ठेवण्यासंबंधीचे प्रशिक्षण जेथे दिले जाते तेथे प्रशिक्षण देणारे शिक्षक नसतील तर पोलिसांना चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण कसे मिळेल ? मुळातच भेसळीने सुरवात झ ाली तर तो बाहेर आल्यानंतर काय करणार असा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, पोलिसांमध्ये फ्रस्टेशन येण्याचा विषय आहे. दोन-तीन दिवसापूर्वी एका पोलीस उपायुक्ताने डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना घडली. या पोलिसांना चांगले प्रशिक्षण नसेल तर त्यांच्यामध्ये वैफल्य का येणार नाही ? पोलीस हवालदाराच्या लेखनिक पदाची, निरीक्षकाची पदे भरण्यासंबंधीची परीक्षा 2002 सालापासून घेण्यात आलेली नाही. आता 10 वर्षे झाली तरी त्यांचे साधे प्रमोशन होत नाही. परीक्षा होत नसल्यामुळे कर्मचारी नाराज झालेले आहेत. ते वैफल्यग्रस्त झालेले आहेत. मग ते लोकांवर, आमदारांवर राग काढतात. त्यांचा लोकांवर किंवा आमदारांव राग नसतो. खात्यामधील चीड त्याच्या डोक्यात भिनते आणि मग कुणाला सोडायचे नाही अशी भावना त्याच्यात निर्माण होते.

सभापती महोदय, आमच्या कार्यकर्त्यांना अटक केली जात होती म्हणून मी वरळी पोलीस स्टेशनला गेलो होतो. माझ्या सवयीप्रमाणे मी सर्व माहिती घेतली. पोलिसांसाठी तेथे 82 चाळी आहेत आणि फक्त 18 सफाई कामगार आहेत.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

पोलिसांच्या आई-बहिणींना वाटते की, त्या ठिकाणी आपल्यालाच रहावयाचे आहे म्हणून आपणच जाऊन तेथील शौचालये साफ करुन घेऊ. त्या पोलीस वसाहतीमध्ये साफसफाई करण्यासाठी कर्मचारी नेमले जात नाहीत ही अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे. ही अतिशय लहान गोष्ट आहे, परंतु ती अतिशय गरजेची आहे. मुंबई शहरातील पोलीस वसाहतींची अशा प्रकारची दुरावस्था झालेली आहे. या गोष्टी आपण सर्वजण पाहतो, परंतु आपण काही करु शकत नाही. प्रथम समाज संरक्षक हा मजबूत असला पाहिजे. दोन गोष्टी इकडे कमी झाल्या, तिकडे कमी झाल्या तर करता येतात. आपल्या सेवेसाठी, आपल्या रक्षणासाठी आजन्म त्यांना उभे करावयाचे आहे, त्यांच्यामध्ये तुम्ही अशा प्रकारचे वैफल्य निर्माण केले तर ती गोष्ट फार गंभीर आहे. या गोष्टीकडे शासनाने आवर्जून लक्ष घालणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील पोलीस अधिकाऱ्यांची पदे भरण्यासंबंधीचा एक ज्वलंत प्रश्न आहे. मुंबईत पोलीस विभागाची पाच मुख्यालये आहेत. त्यात 5 उपायुक्तांची पदे आहेत आणि 18 सहायक पोलीस आयुक्तांची पदे आहेत. महाराष्ट्रातील आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्यामुळे 5 उपायुक्तांच्या पदापैकी 1 पद भरलेले आहे. 4 उपायुक्तांची पदे भरलेली नाहीत. तसेच सहायक पोलीस आयुक्ताची 10 पदे भरलेली नाहीत. मुंबई शहरास आंतरराष्ट्रीय धोका निर्माण झालेला आहे, आतंकवाद्यांकडून धोका निर्माण झालेला आहे. मुंबई शहरासाठी अत्यावश्यक असलेली उच्चपदस्थ पदे भरली जात नसतील व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जात नसेल तर पोलिसांनी हे शहर कोणत्या पध्दतीने सांभाळावे असा प्रश्न आमच्या सारख्यांसमोर निर्माण होतो.

सभापती महोदय, विश्वचषक जिंकलेल्या महिला कबड्डी खेळाडूंना प्रत्येकी 1 कोटी रुपये बक्षीस मिळावे म्हणून या सभागृहात आपण भांडलो. त्या महिला कबड्डी खेळाडूंना प्रत्येकी 1 कोटी रुपयांचे धनादेश देताना माननीय बाबासाहेबांनी आणि माननीय दादासाहेबांनी फोटो काढले. ही बातमी सर्व वृत्तपत्रात छापून आली. पोलिसांना इनकॅशमेंट रजेचे पैसे गेल्या दोन वर्षापासून मिळालेले नाहीत. पोलिसांना गेल्या दोन, तीन वर्षापासून प्रवास भत्ता दिला गेलेला नाही. त्यांना साप्ताहिक सुटीच्या दिवशी डयुटी केली तर त्या बदल्यात त्यांना कॅश दिली जाते, ती देखील गेल्या दोन,तीन वर्षापासून दिली गेली नाही. पोलिसांना बक्षिसे जाहीर केली जातात, परंतु

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

बक्षिसापाटी त्यांना एकही पैसा दिला गेलेला नाही. पोलिसांनी कशाच्या जोरावर काम करावे असा प्रश्न निर्माण होतो. सध्या पोलीस खाकी गणवेशात असतात, वॉचमनही खाकी गणवेशात असतो, बीईएसटीचे वाहन आणि चालक हे देखील खाकी गणवेशात असतात. त्यामुळे खाकी गणवेशाच्या बाबतीत मी काही बोलणार नाही.

महोदय,आज सकाळी मी पोलिसांचे बक्कल सहजपणे बघितले. पोलीस विभागाकडून पोलिसांना अतिशय पातळ असे बक्कल दिलेले आहेत. शासनाची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे पातळ बक्कल पोलिसांना देण्यात आलेले आहेत. पूर्वीचे पोलीस बक्कल आणि बुटांची पॉलिश करण्यासाठी संपूर्ण दिवस घालवत होते. पूर्वीच्या पोलिसांचे बक्कल अतिशय दणगट असावयाचे. पोलिसांनी पट्टा काढला की, समोरच्या गुन्हेगाराला भीती वाटावयाची. त्यांच्या पट्टयाचे बक्कल लागले तर आपले काही खरे नाही असे गुन्हेगारांना वाटत होते. आता पत्राची बक्कले पोलिसांना देण्यात आलेली आहेत, अशी वाईट अवस्था राज्य शासनाची झालेली आहे.

सभापती महोदय, परवा श्री.बॅनर्जी नावाच्या एका पोलीस उपायुक्ताने स्वत:च्या सर्व्हीस रिव्हाल्वरमधून गोळी मारुन घेतली. तो कोणत्या फस्ट्रेशनमध्ये होता हे त्या बिचाऱ्यालाच माहित असावे. परंतु त्याच्या आत्महत्येमुळे शासनाचा लौकिक निश्चितपणे ढासळला. आठ महिने पोलीस अधिकाऱ्यास पगार मिळत नसेल तर अशा गोष्टीमुळे तुमचा लौकिक चांगला आहे काय ? दुसरे पोलीस अधिकारी श्री.दाभाडे यांना दहशतवादी पथकामध्ये टाकले. तुमच्या प्रशासकीय यंत्रणेत काय चालले आहे हे मला समजत नाही. मंत्रालयात भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी सचिव म्हणून नेमलेले आहेत, त्यांनी या गोष्टींकडे पाहिले पाहिजे. परंतु त्यांच्याही पदाला मान्यता नाही, तरी देखील ते त्या पदावर काम करीत आहेत. त्यांनाही पगार नाही. पगार न मिळालेले अधिकारी तुमच्याकडे कार्यरत आहेत हे मला कळत नाही. पोलीस यंत्रणा खंबीरपणे उभी राहील या बाबतीत शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले जात नाही. पोलीस यंत्रणा खंबीरपणे कशी उभी राहील यासाटी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, पोलिसांच्या घराचा विषय मी मांडू इच्छित नाही. तो विषय सभागृहासमोर मांडण्या पलिकडे गेलेला आहे. पोलीस विभाग पोलिसांना घरे देऊ शकत नाही. अतिरिक्त पोलीस वापराचा एक मुद्दा आहे. मी उद्या चारचाकी वाहनांच्या काचांना काळया फिल्म

3...



ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 15:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

लावल्याबद्दलचा मुद्दा उपस्थित करणार आहे. तो विषय काढून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर 6, माननीय उप मुख्यमंत्र्याच्या बंगल्यावर 6, माननीय गृहमंत्र्यांच्या बंगल्यावर 6 व इतर मंत्र्यांच्या बंगल्यांवर 3-3 अशा प्रकारे पोलिसांच्या नेमणुका केलेल्या आहेत. जवळपास 150 ते 200 पोलीस हे माननीय मंत्र्यांच्या सेवेसाठी नेमले आहेत. त्या पोलिसांना त्यांच्या विभागात परत बोलवा आणि तेथे दुसऱ्या विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करा. त्या ठिकाणी पोलिसांना घेऊ नका, पोलिसांची गरज राज्यातील जनतेसाठी आहे. शासन अशा प्रकारे पोलिस दलाला वापरतात, हे बरोबर नाही.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अडचणीचा होतो आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनेक गोष्टी माझ्याकडे आहेत. त्या लहान लहान गोष्टींचा उल्लेख करुन मी वेळ घेऊ इच्छित नाही कारण " शितावरुन भाताची परीक्षा". पोलीस दलाला सक्षम करण्यासाठी कोणत्याही गोष्टी कमी पडू दिल्या जाणार नाहीत. अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळयासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे शासनाकडून वारंवार सांगितले जाते..

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ पूर्वी श्री.गिते 15:40

श्री.दिवाकर रावते.......

काही झाले की एकच सांगण्यात येते, निधी कमी पडू देणार नाही. छत्रपती शिवरायांचा आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मंत्री महोदयांच्या आस्थापनेवर पोलीस यंत्रणेतील किती अधिकारी कार्यरत आहेत याबद्दल उल्लेख केला आहे. मी त्यांना असे विचारु इच्छितो की, माननीय श्री.उध्दव ठाकरे, श्री.आदित्य ठाकरे आणि त्यांच्या धाकट्या मुलाच्या संरक्षणासाठी किती पोलीस कर्मचारी नेमलेले आहेत याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली तर आमचे प्रबोधन होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राम पंडागळे चांगले बोलले आहेत. मंत्री महोदयांना जी सुरक्षा पुरविण्यात आली आहे त्याबद्दल मी म्हटले आहे. पोलीस यंत्रणेतील तीन अधिकारी घ्यावेत आणि उर्वरित अधिकारी इतर विभागातील नेमावेत. उगाच दात कोरुन पोट भरायचे नसते.

श्री.राम पंडागळे : शिवसेना कार्याध्यक्षांच्या सुरक्षेसाठी 200-200 पोलीस नेमलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : तुम्ही स्वत: जाऊन बघा. तेथे कोणी नाही. आपल्याला माहिती नसेल तर काहीतरी निमित्त काढून खाजवू नका. नाही तर तुम्हाला तुमचीच नखे लागतील.

सभापती महोदय, दुष्काळग्रस्त भागाकरिता या अर्थसंकल्पात कमिटमेंट दिसत नाही. यातून ताकद जाणवेल अशी राजकीय इच्छाशक्ती असावी लागते. दुष्काळी भागात आम्ही जातो, तुम्हीही जाता. जनावरांचा चारा, पाणी याबद्दल आम्ही चर्चा खूप करतो. दुर्दैवाने या सगळ्या गोष्टीबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होते हा प्रश्न आहे. रेल्वे वॅगनमधून पाणी देणार असे सांगितले गेले. पाणी कुठून आणणार आहात? बीड जिल्हयात रेल्वे सेवाच नाही. तेथे कसे पाणी नेणार? निव्वळ फसवेगिरी करीत आहात. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून भविष्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होणार नाही असे अपेक्षित होते. अर्थसंकल्पातील 7663 कोटी रुपये पाण्याच्या प्रश्नाकरिता राखून ठेवले आहेत. या निधीतून किती धरणांची कामे पूर्ण होणार आहेत? आजच

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ पूर्वी श्री.गिते 15:40

श्री.दिवाकर रावते......

माननीय मुख्यमंत्र्यांनी 5 प्रकल्पांसाठी 2200 कोटी रुपये जाहीर केले आहेत. हा काय प्रकार आहे? आम्हाला काही कळेनासे झाले आहे. ग्रामीण भागातील दुष्काळी परिस्थिती हा भाग महत्वाचा नसून भविष्यात दुष्काळावर मात करण्याकरिता कोणत्या उपाययोजना करणार आहात या संदर्भातील मार्गदर्शन या अर्थसंकल्पात आम्हाला सापडत नाही, त्यामुळे आम्ही त्याबद्दल कोणताही अभ्यास करु शकत नाही.

सभापती महोदय, 26.11 च्या घटनेमध्ये राज्यातील दोन आयपीएस दर्जाचे पोलीस अधिकारी शहीद झाले. मला आज श्री.नवल बजाज या आयपीएस अधिकाऱ्यांचे कौतुक करावयाचे आहे. आजच्या दैनिक मिरर या इंग्रजी वृत्तपत्रात एक बातमी छापून आली आहे. पोलिसांची शक्ती कुठे वापरावी याचा विचार करावा लागणार आहे. तुमचे आमचे सर्वांचे जीवन गांभीर्याने विचार करायला लावणारे झालेले आहे. कुठे आणि कोणत्या क्षणी काय होईल हे सांगता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तुमच्या माझ्यासह पोलिसांना सामना करावा लागेल. पोलिसांनी कृती करावी आणि आम्ही बघत रहावे असा भाग नाही. विधिमंडळाचा सदस्य म्हणून सरकारला काही सूचना करणे हा देखील एक महत्वाचा भाग असतो. टीकात्मक दृष्टीने मी अर्थसंकल्पाकडे पाहिलेले नाही. मागील वेळी कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेताना मी धुळ्याच्या दंगलीचा मुद्दा मांडला होता.

आज दै.मिररमध्ये अशी बातमी प्रसिध्दी झाली आहे की, 'गर्ल्स इस्लामिक संघटना' ही संघटना जमात-ए-इस्लामीची उपसंघटना असून केरळ राज्यात स्थापन झालेली आहे. महिलांनी जास्त जास्त इस्लाम धर्मातील कुराण व हदीसप्रमाणे आचरण करावे हा उद्देश आहे. शाळा कॉलेजमध्ये जास्तीत जास्त तरुणींना कट्टर इस्लाम विचाराने प्रेरित करुन जिहादसाठी तयार करणे, धर्माचा प्रसार व प्रचाराद्वारे जगाचे इस्लामीकरण करणे हा आहे. श्रीमती सालेहा बाजी या महाराष्ट्रातील प्रमुख आहेत. त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. श्री.नवल बजाज, अतिरिक्त पोलीस आयुक्त यांनी या माहितीच्या संदर्भात शासकीय परिपत्रक काढले.

नंतर 3एम.1...

अशुध्दप्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...........

यासंदर्भात शासकीय परिपत्रक काढले गेले व ते शासकीय परिपत्रक त्यांच्या हातामध्ये कसे गेले हे मात्र आम्हाला काही कळले नाही. अत्यंत गुप्त असलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचल्या आहेत. त्यामुळे आजच्या मिरर मध्ये श्री. राहूल बजाज यांनी "पोलीस यंत्रणेवर येणारे संकट, सावट आणि पोलीस यंत्रणेची क्षमता" याबाबत आपले विचार व्यक्त केलेले आहेत. पोलीस यंत्रणेच्या बाबतीत सक्षमता निर्माण व्हावी यासाठी अर्थसंकल्पात बाकीच्या गोष्टी बाजूला पडल्या तरी चालतील परंतु पोलीस यंत्रणा सक्षम झाली पाहिजे. माननीय गृहमंत्री सभागृहात येतात, घोषणा करतात परंतु प्रत्यक्षात काहीच अंमलबजावणी होत नाही अशी चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात झालेली आहे. पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी इतर दोन गोष्टी कमी केल्या तरी चालतील परंतु पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी निधी कसा उपलब्ध होणार आहे असा प्रश्न उपस्थित करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----------------

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी** ) : अर्थसंकल्पावर अजून 20 सन्माननीय सदस्यांना विचार मांडावयाचे आहेत. सायंकाळी 6.00 वाजता माननीय उप मुख्यमंत्री उत्तराला सुरुवात करणार आहेत त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात व्यक्त करावेत अशी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, अतिशय थोडक्या शब्दात मी अर्थसंकल्पावर माझे विचार मांडणार आहे. परक्यालाही आपलेसे करता येतील असे गोड शब्द असतात, शब्दांनाही कोडं पडावे अशी काही गोड माणसे असतात, किती मोठे भाग्य असते जेव्हा ती आपली असतात, असे आमचे अर्थ मंत्री व राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेबांनी महाराष्ट्रातील शेवटच्या माणसाला समोर ठेवून अर्थसंकल्प सादर केल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या राज्याचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब, तसेच हरित क्रांतींचे प्रणेते स्व. वसंतरावजी नाईक साहेब या दोघांची जयंती वर्ष शताब्दी महाराष्ट्र शासनाने साजरी करण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केली असून ती आमच्या सारख्या तरुण कार्यकर्त्यांसाठी आनंदाची बाब आहे.

सभापती महोदय, डॉ बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज यांचे स्मारके उभारण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही याची ग्वाही माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सभागृहात दिलेली आहे.

सभापती महोदय,रयतेचे राजे,छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक अरबी समुद्रात झाले पाहिजे ही राज्यातील जनतेची अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री शिवाजी महाराजांच्या स्मारकाची जागा अरबी समुद्रात पाहण्यासाठी गेले असतांनाचा त्यांचे फोटो काल सर्व वर्तमानपत्रातून झळकले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची जागा अरबी समुद्रात नक्की झाली अशी बातमी आम्ही जेव्हा वाचली तेव्हा माझ्या सारख्या तरुण कार्यकर्त्यांना अत्यांनद झाला, ऊर भरुन आला. गेल्या आठ दिवसापूर्वी या सभागृहात माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, येणाऱ्या काही दिवसांमध्ये स्मारकाची जागा निश्चित केली जाईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अतिशय भव्य-दिव्य होण्याची आवश्यकता आहे. ( सभागृहात उंदीर असल्याचे काही सन्माननीय सदस्य निदर्शनास आणतात.) मराठा समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे या दृष्टिकोनातून सुध्दा ......आम्ही सर्व शेतकऱ्यांची लेकरे आहोत. उंदीर आमच्याही घरात असतात त्यामुळे उंदराला घाबरण्याची काही आवश्यकता नाही.त्या उंदराची व्यवस्था विधान मंडळ उद्या करेल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ 15:50

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, मराठा आरक्षणासंबंधी या सभागृहामध्ये सातत्याने चर्चा झाली आहे. वडिलोपार्जित चालत आलेली शेती मग ती दहा एकराची असेल व दोन भाऊ असतील तर ती पाच-पाच एकरावर येते. पाच एकरची शेती अडीच एकरवर येते. अडीच एकरची शेती सव्वा एकरवर येते. अशा प्रकारे मराठा शेतकऱ्यांमध्ये परंपरागत शेतीची वाटणी करण्याचा प्रकार सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची दूरवस्था झाली आहे. ग्रामीण भागातील कष्टकरी माणूस आहे त्याच्या लेकराला शिक्षण मिळावे शिक्षणासाठी सवलती मिळाव्यात नोकेरीसाठी सवलती मिळाव्यात यासाठी आम्ही मराठा आरक्षण मागत आहोत. त्यासंबंधीचा निर्णय लवकर झाला पाहिजे. गेल्या अधिवेशनात माननीय सभापतींनी बैठक देखील घेतली होती. आताच आम्हाला कळले की, माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून त्यासंबंधीचा जी.आर.देखील निघाला आहे. त्यामुळे आमच्या आशा आता पल्लवीत झालेल्या आहेत की, किमान त्या कामाला गती तरी मिळू शकेल. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न देखील तडीस जाईल अशा प्रकारचा आशावाद मला वाटतो.

सभापती महोदय, एखाद्याशी हसता हसता तितक्याच हक्काने रूसता देखील आले पाहिजे. समोरच्याच्या डोळ्यातील पाणी अलगद पुसता आले पाहिजे. मान अपमान काहीच नसतात. आपले हृदय समोरच्याच्या हृदयात साठवता आले पाहिजे. ही भावना आमच्या आघाडी सरकारची आहे. म्हणूनच आमच्या शासनाने सांगितले आहे की, संकटे येत असतात. त्याला सामोरे गेले पाहिजे. जो संकटाला सामोरे जातो तोच माणूस पुढे जातो. म्हणूनच आमचे आघाडी सरकार सुद्धा पुढे पुढे जात आहे.

सभापती महोदय, आघाडी सरकारने काही निर्णय घेतले आहेत. दुष्काळी परिस्थितीशी सामना करण्यासाठी 850 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. एवढेच नव्हे तर 1050 कोटी रूपये पुन्हा दुष्काळग्रस्त भागासाठी देण्यात येतील असे अभिवचन देखील या अर्थसंकल्पात दिलेले आहे.

आपण कितीही पैसे दिले तरी पाऊस काही लगेच पडणार नाही. आज दुष्काळग्रस्त जनतेसाठी पाणी व जनावरांसाठी चारा मिळाला पाहिजे. या भावनेतून सातत्याने मदत करण्याचे काम आघाडी सरकार करीत आहे त्याचा मला अभिमान वाटतो. या दुष्काळावर राजकारण न करता सर्वांनी मिळून दुष्काळग्रस्त भागातील दिलासा देण्याचे काम केले पाहिजे. अशा प्रकारची मागणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ 15:50

श्री.विक्रम काळे...

मी या निमत्ताने करीत आहे. मी या निमित्ताने राज्यातील सर्व जनतेसह पक्षातील नेतमेडळींला आणि आमदारांना आवाहन करतो की, एखादा माणूस संकटात सापडला की, त्याला मदत करण्यास आपण नेहमी धावतो. याला कारण आपली मराठी संस्कृती आहे. आपण पिण्यासाठी टँकरने पाणी पुरवठा करीत आहोत. आपण चाऱ्या छावण्या उघडल्या आहेत. तेथे देखील पाणी पुरवठा केला पाहिजे. यासाठी आपण टँकरच्या फेऱ्या देखील वाढविल्या पाहिजेत. तेव्हा यासंबंधी तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे. गावात टंचाई असल्यामुळे आपण पाणी पुरवठा करीत आहोत. त्या गावात छावणी असेल तर जनावरांसाठी पाणी कुठून आणायचे ? असा महत्त्वाचा प्रश्न आता निर्माण झ ाालेला आहे. त्यासाठी टँकरच्या जादा फेऱ्या द्याव्या लागतील. त्यासाठी देखील तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

सभापती महोदय, महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट आलेले आहे. परंतु महाराष्ट्रात दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडत आहे. तेव्हा या दुष्काळावर कायम स्वरुपी मात करण्यासाठी कोणत्या स्वरुपाच्या उपाय योजना केल्या पाहिजेत या दृष्टीने उपाय योजना झाल्या पाहिजेत. आता शिरपूर पॅटर्न पुढे आला आहे. नवीन घर बांधणाऱ्याला रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम बंधनकारक केली पाहिजे अन्यथा बांधकामास परवानगी मिळणार नाही अशा प्रकारची अट घातली पाहिजे. अशाप्रकारच्या उपाययोजना आपणास भविष्यकाळासाठी कराव्या लागतील.

सभापती महोदय, शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी सांगितले की, ऊस काढून टाका. परंतु ऊस हे शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. तेव्हा ऊस काढून टाकून उपयोग नाही तर यापुढील काळात ऊसाची लागवड ठिबक सिंचनावर करावी अशी सक्ती करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने ठिबक सिंचनासाठी 90 टक्के सबसिडी दिली पाहिजे.

सभापती महोदय, मराठवाड्याला त्याच्या हक्काचे 25 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे. माझे वडील स्व.वसंतराव काळे हे तीन टर्म या सदनाचे सदस्य होते. त्यांनी सातत्याने हा विषय लावून धरला होता. त्यांनी मराठवाड्यात अनेकवेळा पाणी परिषदा घेतल्या. आपला पक्ष सत्तेवर असला तरी पाणी प्रश्ना संदर्भात सरकारच्या विरोधी भूमिका घेतली आहे. मराठवाडयाच्या हक्काचे 25 टीएमसी पाणी मिळावे यासाठी ते सातत्याने लढत राहिले. माजी मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांच्या काळात पाणी देण्याचा जरुर निर्णय झाला. परंतु निर्णय होऊनही तेवढे पाणी मिळेल की नाही किंवा आमच्या मुलांना तरी मिळेल की नाही अशी शंका आमच्या मनात आहे. उद्या आपण या संदर्भात जरुर सविस्तर चर्चा करु. तेव्हा या प्रश्नाच्या संदर्भात ठोस आश्वासन देण्याचे काम माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी करावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, वेतनेतर अनुदानासाठी 266 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे ही अतिशय चांगली बाब आहे. आज आपण वर्तमानपत्र पाहिले की, पहिल्याच पानावर शिक्षकांच्या संपाची बातमी असते. मध्यंतरी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक्ांचा संप झाला. आता वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा संप सुरु आहे. हे संप का होतात ? त्यांचे प्रश्न कोणी सोडवावयाचे याचा निर्णय तातडीने झाला पाहिजे. तेव्हा दादांना माझी विनंती आहे की,त्यांनी या प्रश्नामध्ये

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

जातीने लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा. शिक्षकांनी संप करणे हे राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. तेव्हा शिक्षकांच्या मागण्या तातडीने मान्य झाल्या पाहिजेत कारण शिक्षक हा समाजाचा शिल्पकार आहे. तेव्हा आपणास त्यांचे प्रश्न प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही.

सभापती महोदय, आज शिष्यवृत्तीचा प्रश्न गंभीर झालेला आहे. या प्रश्नावर दोन-तीन वेळा लक्षवेधी सूचना मांडण्यात आली. तेव्हा शिष्यवृत्तीचा प्रश्न सोडविला पाहिजे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, आज रस्त्यांवर वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे त्या प्रमाणात चांगले रस्ते नाहीत. आपण सुध्दा वाहनाने पुण्यावरुन मुंबईला येता. आपणास झोप आली तरी झोपत नाही कारण गाडी कुठे तरी धडकते की काय अशी शंका आपल्या मनात असते. इतकी प्रचंड वाहने आज रस्त्यावर आहेत. तेव्हा रस्त्यांचे चौपदरीकरण झाले पाहिजे, शासनानकडे निधी नसेल तर बी.ओ.टी.तत्त्वावर करावेत. या ठिक्राणी माननीय मंत्री उपस्थित आहेत त्यांनी धडक कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यासाठी माननीय वित्त मंत्रीमहोदयांनी निधी दिला पाहिजे. माननीय वित्त मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे की," अण्णा, तुम्ही पुढे चला आम्ही तुमच्या पाठीमागे आहोत, आपण पाहिजे तेवढे रस्ता करा." औरंगाबाद-लातूर रस्ता चौपदरीकरणातून जोडला गेला पाहिजे. असे अनेक रस्ते जिल्ह्या जिल्ह्याला जोडणारे आहेत ते चौपदरी केले पाहिजेत अशी मी मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या चर्चेमध्ये बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले असले तरी जास्त वेळ न घेता खरोखरच ज्या विषयांना स्पर्श करणे आवश्यक आहे त्याच विषयांना स्पर्श करुन माझे भाषण संपवावे अशी माझी स्वत:ची अपेक्षा आहे.

महोदय, काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित करुन, त्यांची उत्तरे माननीय अर्थ मंत्र्यांनी द्यावीत अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. महोदय, 140 सिंचन प्रकल्पांसाठी 7,249 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 7,249 कोटी रुपयांतून 140 प्रकल्प पूर्ण होणार आहेत काय, ते कधी पूर्ण होणार आहेत, 7,249 कोटी रुपयांतून नेमके किती प्रकल्प पूर्ण होणार आहेत, या बाबतची सविस्तर माहिती माननीय मंत्र्यांनी द्यावी.

महोदय, यापूर्वी मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पाची चर्चा, विचार आणि अभ्यास केल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, 1999 ते 2008 पर्यंत ज्या ज्या वेळी माननीय श्री.जयंत पाटील यांनी अर्थसंकल्प मांडले त्या त्या वेळी त्यांनी फिस्कल कन्सॉडीलेशन, महाराष्ट्र ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स, सोशल जस्टीसचा अर्थसंकल्पात समावेश केला. परंतु दुर्दैवाने माननीय श्री.सुनील तटकरे ते माननीय श्री.अजित पवार यांनी अर्थसंकल्पामध्ये अजूनही महाराष्ट्र ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्सबाबत कोणतीही भूमिका मांडलेली नाही. या वर्षीच्या बजेटचा अभ्यास कोणत्या डेव्हलपमेंट इंडेक्सवर आहे हे समजत नाही. त्यामुळे या संदर्भात माननीय मंत्र्यांनी सभागृहात खुलासा केला पाहिजे.

महोदय, सरकारकडून सांगितले जाते की, या वर्षीचा अर्थसंकल्प शिलकी आहे. गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प सुध्दा शिलकी होता. अर्थसंकल्पाच्या ग्रीन पुस्तकातील पृष्ठ क्र.56 व 57 वरील रेव्हेन्यू आणि बजेटरीची आकडेवारी पाहिली तर गेल्या वर्षीचे बजेट सरप्लस नव्हे तर 6,485 कोटी रुपये इतक्या तुटीचे होते. याउलट या वर्षीचे बजेट सरप्लस असल्याचे सांगितले जात आहे. सरकार हे कसे साध्य करणार आहे याची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे.

महोदय, पृष्ठ क्र.43 ते 47 वरील एस्टीमेट फॉर रेव्हेन्यू एक्स्पेंडीचर ऑन हाऊसिंग, स्पेशल प्रोग्राम फॉर रुरल डेव्हलमेंट, रुरल एम्प्लायमेंट, फ्लड कंट्रोल अँड ड्रेनेज या महत्त्वाकांक्षी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.....

योजना असून त्यावर गेल्या वर्षी पेक्षा या वर्षी भांडवली खर्च कमी केला आहे. हा खर्च कमी करण्याची नेमकी कारणे काय आहेत, याचा खुलासा झाला पाहिजे. तसेच पृष्ठ क्र.39 व 40 वर उत्पन्नाचा मार्ग वाहनावरील कर असल्याचे नमूद केले आहे. यातून 4,750 कोटी रुपये कर मिळेल अशी सरकारची अपेक्षा आहे. वास्तविक पाहता 4,750 कोटी रुपये कर मिळविण्यासाठी 1,353 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. जवळजवळ 28 टक्के पैसा नवीन कर मिळविण्यासाठी खर्च करावा लागणार आहे. माननीय मंत्री हा रेश्यो कसा जस्टीफाय करु शकतील हा खरा प्रश्न आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पोलिसांबद्दल पूर्ण विवेचन केले आहे. या बजेटच्या एस्टीमेट कॅपिटल आऊटलेमध्ये गेल्या वर्षी 294 कोटी रुपये गृह विभागासाठी तरतूद होती. ती आता 571 कोटी आहे. पोलिसांच्या बाबतीत सरकारची नवीन योजना काय आहे, महाराष्ट्राला नवीन योजना खरोखरच मिळणार आहे काय, या बाबतचे स्पष्टीकरण होण्याची आवश्यकता आहे.

महोदय, वॉटर सप्लाय आणि सॅनीटेशन या दोन्ही कार्यक्रमांमध्ये गेल्या वर्षीच्या बजेट पेक्षा या वर्षी 48 टक्क्यांची तूट आहे. याची कारणे काय आहेत ? मुळात हे दुष्काळी वर्ष असल्यामुळे दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आपण सर्व जण प्रयत्न करीत आहोत. उपरोक्त कार्यक्रमासाठी गेल्या वर्षी 160 कोटी रुपये तरतूद होती, ती आता 82 कोटी रुपयांवर आली आहे. या कामी 42 टक्के घट का केली याची माहिती देणे आवश्यक आहे.

महोदय, रस्त्याचे चौपदरीकरण, पूल, रस्ते इत्यादीबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पात आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी रस्ते आणि पुलांच्या कामांसाठी मार्जिनली कमी पैसा मिळाला आहे. यातून महाराष्ट्राचे काय भले होणार आहे हे माननीय मंत्र्यांनी सांगणे आवश्यक आहे.

महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जाबद्दल खूप चर्चा झाली आहे. मी आकडेवारीत जाणार नाही. विधानसभा सभागृहात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे. त्यांनी सांगितले की, जीडीपीच्या रेश्योमध्ये आम्ही कर्ज बघतो. त्यामुळे राज्य सरकारला अजूनही कर्ज काढण्याची सुविधा आहे. त्यांनी हे सांगावे की, आपला ॲन्युअल प्लॅन सुध्दा जीडीपीच्या रेश्योमध्ये का वाढला नाही ?

नंतर श्री.बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ....

जर कर्जाची सुविधा जीडीपीच्या रेश्योमध्ये असेल तर ॲन्युअल प्लॅनचा रेश्यो सुध्दा जीडीपीच्या तुलनेत का वाढविला नाही, हे सांगण्याची आवश्यकता आहे. फायनान्शिअल स्टेटमेंटमध्ये लँड रेव्हेन्यूच्या बाबतीत असे म्हटले आहे की, 1070 कोटी वरुन आपल्याला 1637 कोटी रुपये इन्कम अपेक्षित आहे. 600 कोटी रुपयांचे जास्त इन्कम अपेक्षित आहे. ते इन्कम आपल्याला कसे मिळणार आहे ? लँड रेव्हेन्यूचे इन्कम वाढविताना आपण एनए टॅक्स वाढविणार आहोत का, लँड रेव्हेन्यू टॅक्स वाढणार आहे का ? हे 600 कोटी रुपये सरकार नेमके कोठून आणणार आहे हे सदनासमोर येण्याची आवश्यकता आहे. आरोग्य विषयाच्या संदर्भामध्ये चर्चा होते. अजूनही आपण जुन्या जनगणनेच्या आधारे आरोग्याचे बजेट मांडतो. या सभागृहाला हे सांगण्याची आवश्यकता आहे की, 2011 चे सेन्सस पकडून कधीपासून आरोग्याची रचना आणणार आहोत ? गेल्या 12 वर्षापासून असलेला 637 कोटी रुपयाचा आरोग्याचा अनुशेष कधीपर्यंत भरणार आहोत ?

सभापती महोदय, जे बजेट असते ते कोणत्याही सरकारचे असले तरी ते बजेट मॅन्युअलवर आधारित असते. कोणत्याही बजेटला बजेट मॅन्युअलचा आधार असतो. त्या बजेट मॅन्युअलची कॉपी माझ्या हातामध्ये आहे. दुर्दैवाने मला असे सांगावेसे वाटते की, या सरकारने मांडलेला हा अर्थसंकल्प बजेट मॅन्युअलला छेद देणारा आहे, बजेट मॅन्युअलचा भंग करणारा आहे. या बजेट मॅन्युअलच्या बाब क्रमांक 21(1) मध्ये असे म्हटले आहे की, प्रशासनावर करावयाचा अत्यावश्यक असा किमान खर्च वगळता सर्व प्रकारच्या विकास विषयक खर्चाला विकासेतर खर्चावर प्राधान्य असले पाहिजे. हे दुष्काळी वर्ष आहे. विकास दर कमी आहे, निधीची चणचण आहे, हे स्वाभाविक आहे. तरीही आपल्या लक्षात असेल की, विकासेतर खर्च 2010-2011 मध्ये 33 टक्के होता तो 2013-2014 मध्ये 35 टक्क्यावर गेलेला आहे. बजेट मॅन्युअलने जे अपेक्षित केले तेही आपण करु शकलो नाही.

सभापती महोदय, बजेट मॅन्युअलच्या बाब क्रमांक 39 मध्ये असे म्हटले आहे की, ज्या जमा रकमांचे अर्थसंकल्पीय अंदाज हे कर, शुल्क, फी इत्यांदीच्या विद्यमान दरावर आधारलेले असले पाहिजे. आजचा जो नियम आहे, आजची जी पॉलिसी आहे त्याच्या आधारावर अपेक्षित उत्पन्न

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार .....

असले पाहिजे. सन 2012-2013 मध्ये अर्थसंकल्पामध्ये नगरविकास खात्यातून एफएसआय वाढीतून 1481 कोटी रुपये मिळतील असे अपेक्षित धरले होते. प्रत्यक्षात 862 कोटी रुपये मिळाले. असा कोणताही निर्णय नसताना अशा पध्दतीच्या घोषणा या बाबीवर आधारित आपण केलेल्या नाहीत.

सभापती महोदय, बजेट मॅन्युअलमध्ये ठोक तरतुदी असू नयेत असे बाब क्रमांक 53 मध्ये म्हटले आहे. 2009-2010 मध्ये 11 हजार कोटी रुपयांची ठोक तरतूद होती. यावेळी 4994 कोटी रुपयांची ठोक तरतूद केलेली आहे. ठोक तरतुदींचा कोणत्याही पध्दतीचा बजेट मॅन्युअलमध्ये उल्लेख नाही. बजेट मॅन्युअलच्या दृष्टीने याचा सुध्दा उल्लेख करावा लागेल.

सभापती महोदय, आज केंद्र पुरस्कृत योजना सुध्दा आपले राज्य चालवू शकते अशी स्थिती आहे. मी प्रत्येक योजना वाचणार नाही. नॅशनल हॉर्टिकल्चर मिशन या केंद्र सरकारच्या योजनेमध्ये आपण फक्त 42 टक्के पैसे घेतले. इंटिग्रेटेड हाऊसिंग अँड स्लम डेव्हपलमेंट प्रोग्रामसाठी केंद्र सरकार पैसे देते. त्यामध्ये आपण केवळ 35 टक्के पैसे उचलले. सर्व केंद्र पुरस्कृत योजनांचा खर्च पाहिला तर केंद्राकडून आलेल्या पैशाच्या तुलनेत आपण केवळ 42 टक्के पैसे उचलले. केंद्राने जे देऊ केले तेही आपण राज्याला देऊ करु शकत नाही अशा पध्दतीचा प्रावधान नसलेला हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, मी एक अतिशय महत्वाची विनंती माननीय अर्थमंत्र्यांना स्वत: भेटून केली. या महाराष्ट्रात 18 लाख ख्रिश्चन समाज राहतो. कोणतेही राज्य धर्माच्या आधारावर असता कामा नये परंतु एका मायनॉरिटी समाजाला केंद्र आणि राज्य शासन जर हजला जाण्यासाठी पैसे देत असतील तर ख्रिश्चन समाजाला त्यांच्या धार्मिक स्थळांना भेट देण्याकरिता 1 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मागणी आम्ही केली. मला खेदाने सांगावेसे वाटते की, या अर्थसंकल्पामध्ये त्या 1 कोटी रुपयांची तरतूद सुध्दा माननीय अर्थमंत्र्यांनी केलेली नाही. या महाराष्ट्रातील 18 लाख नागरिकांना जर जेरुसलेमला जावयाचे असेल किंवा इजिप्तला जावयाचे असेल तर 1 कोटी रुपयांची तरतूद सुध्दा केलेली नाही.

सभापती महोदय, मी शेवटच्या तीन सूचना करणार आहे. कारण केवळ निगेटीव्ह बोललो

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ॲड. आशिष शेलार ....

तर आपण अर्थसंकल्पावर निगेटीव्ह बोलतो असा अर्थ होईल. म्हणून आपल्या रेव्हेन्यू वाढविणाऱ्या काय काय गोष्टी असू शकतात त्याचा सुध्दा मी उल्लेख करणार आहे. राज्य सरकारच्या मालकीच्या, राज्य सरकारच्या हातात असलेल्या इमारतींच्या लँड पोटेन्शिअलचा कोणताही सर्व्हे राज्य सरकारने केलेला नाही. कोर्ट असतील, क्वार्टर्स असतील, आपल्या ज्या वेगवेगळ्या इमारती आहेत त्यांच्या लँड पोटेन्शियलच्या आधारावर आपल्याला इन्कम वाढविता येऊ शकते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार........

एक सत्यशोधन समिती स्थापन केली तर पुढची 20 वर्षे पुरेल एवढा पैसा राज्य सरकारच्या मालकीच्या इमारतींचे प्रोटेन्शिअल वापरले तर त्यातून मिळू शकेल. या सभागृहात टोल विषयी बरीच चर्चा झालेली आहे. आता पीपीपी प्रोजेक्टस् हे राज्याचे भवितव्य आहे असे चित्र दिसत आहे. त्यामुळे व्हायबिलिटी गॅप फंडिंगसाठी केंद्र सरकारकडून पैसा येतो. राज्य सरकारकडून पैसा खर्च केला जातो. परंतु या प्रकल्पातून राज्य सरकारला पैसा मिळू शकेल या दृष्टीने नियमन प्राधिकरण निर्माण केले तर त्याचा फायदा सरकारला होईल.

या राज्यामध्ये 1 लाख 12 हजार कोटी रुपयांची विकास कामे केली जाणार आहेत असे या अर्थसंकल्पात नमूद केलेले आहे. ही विकास कामे वेगवेगळ्या टेंडर्सच्या माध्यमातून केली जातील. माझी सरकारला साधी विनंती आहे की, बिडर क्वालिफिकेशनमध्ये एस्टीमेट कॉस्टच्या 5 टक्के रक्कम प्रत्येक कंत्राटदाराने सरकारकडे डिपॉझिट केली तरच तुम्ही पात्र व्हाल असे जाहीर करावे. या 5 टक्क्याच्या आधारावर 6 हजार कोटी रुपये सरकारकडे जमा होतील आणि तो पैसा पुढील 3 वर्षे वापरता येईल. राज्य सरकार त्यातून आपला महसूल वाढवू शकते.

शेवटचा महत्वाचा मुद्दा म्हणजे कोणतेही राज्य सरकार किंवा कोणतीही कंपनी कॅश मॅनेजमेण्ट परफेक्ट करीत असते. रिलायन्स कंपनीच्या एका अधिकाऱ्याने केवळ कॅश मॅनेजमेण्ट परफेक्ट करुन सरकार दरबारी 5 टक्के महसूल वाढविला आहे. आजही विक्रीकर, व्यवसाय कर या करांच्या माध्यमातून रोजचे कॅश कलेक्शन सुरु आहे. या कॅश कलेक्शनसाठी ट्रेझरी मॅनेजमेंट डिपार्टमेण्ट निर्माण केले तरी त्यातून 5 टक्के महसूल वाढवू शकतो. ज्या महाराष्ट्राने देशासाठी गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली प्लॅनिंग कमिशन दिले होते. त्या महाराष्ट्रात गेल्या 4-5 वर्षापासून प्लॅनिंग कमिशनला चेअरमन नाही. मानव विकास निर्देशांक विचारात न घेता राज्याचा अर्थसंकल्प मांडलेला असेल, ज्या राज्यात प्लॅनिंग कमिशन ॲक्टिवेट नसेल, ज्या राज्यात त्याच्या आधारावरील बजेट नसेल अशा बजेटबाबत चर्चा करीत असताना फक्त खेदच व्यक्त करावा लागेल. म्हणून या अर्थसंकल्पाबाबत फक्त खेद व्यक्त करण्यासाठी मी हे मुद्दे मांडून येथे थांबतो. धन्यवाद.

--------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-14 या वर्षाच्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी व त्याला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या वर्षी जागतिक मंदी असताना व राज्यात दुष्काळा सारखी परिस्थिती असताना विधानसभेमध्ये माननीय अर्थ मंत्री श्री.अजित दादा पवार यांनी व विधान परिषदेमध्ये राज्याचे माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी अर्थसंकल्प मांडला आहे. हा अर्थसंकल्प संतुलित, सर्वसामान्यांना दिलासा देणारा व राज्याला विकासाकडे घेऊन जाणारा आहे. या अर्थसंकल्पात सर्वसामान्यांवर कोणत्याही प्रकारचा कर लादलेला नाही. परंतु सोने, चांदी, सिगरेट, सौंदर्य प्रसाधने यावर कर लावण्यात आला आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू यावर कर लावलेला नाही. उलट त्याचे दर कमी होतील अशी परिस्थिती आहे.

कोणत्याही राज्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करीत असताना मानव विकास निर्देशांक पाहिला जातो. हा निर्देशांक वाढत आहे की, कमी होत आहे या वरुन राज्याची स्थिती कळू शकते. मागील वर्षी मानव विकास निर्देशांक 83395 होता, या वर्षी तो 95339 पर्यंत वाढलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 16:15

श्री. माणिकराव ठाकरे...

एकूणच राज्याचा जो मानव विकास निर्देशांक आहे तो दरडोई उत्पन्न किंवा त्या राज्याची शिक्षणाची किंवा आरोग्याची जी स्थिती असते त्यावरुन ठरत असतो. या सर्व क्षेत्रातील राज्याची स्थिती पाहिली तर दरडोई उत्पन्न वाढत असल्याचे आपल्याला दिसून येते. संपूर्ण देशाचा मानव विकास निर्देशांक 0.467 इतका आहे आणि महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक 0.572 इतका आहे. अशा प्रकारे महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक वाढलेला आहे. याबाबतीत काही राज्ये महाराष्ट्राच्याही पुढे आहेत. केरळ, दिल्ली, गोवा यासारखी लहान राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत. परंतु महाराष्ट्राने देखील या क्षेत्रामध्ये प्रगती केल्याचे आपल्याला दिसून येते. काही जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक अत्यंत खालावलेला असून त्याकडेही राज्य शासनाला लक्ष द्यावे लागणार आहे. त्यामध्ये गडचिरोली, यवतमाळ, नंदूरबार, वाशिम, जालना, धुळे हे जिल्हे खालच्या क्रमांकावर आहेत. देशामध्ये जे जिल्हे खालच्या क्रमांकावर आहेत त्यांच्या तुलनेत या जिल्ह्याचा विकास दर कमी आहे. म्हणून याबाबतीत विशेष लक्ष द्यावे लागणार आहे.

राज्याचे दरडोई उत्पन्न वाढत असताना आपल्या राज्यातील शिक्षणाचा दर्जाकडे काय आहे याकडे लक्ष दिले तर आपले राज्य निश्चितपणे पुढे जाऊ शकेल. राज्यातील शिक्षण घेणा-या मुलांची आकडेवारी आपण पाहिली तर लक्षात येईल की, इयत्ता 10वी पर्यन्त शिक्षण घेणा-या मुलांमध्ये गळतीचे प्रमाण 36 टक्के आहे आणि 10वी पर्यंत शिक्षण घेणा-या मुलींमध्ये गळतीचे प्रमाण 40 टक्के आहे. ही मुले शाळा का सोडतात. त्यांच्या समोर अनेक अडचणी असतील. या अडचणी समजून घेऊन ही मुले शाळा सोडणार नाहीत या दृष्टीने आपण नियोजन केले किंवा एखादा मास्टर प्लॅन तयार केला तर यामध्ये आपण निश्चितच प्रगती करु शकू. आपण संपूर्ण देशामध्ये शिक्षणाचा हक्क दिलेला आहे. आपण सातत्याने शिक्षणाच्या हक्काचा उल्लेख करीत असतो. परंतु राज्याने या संदर्भात देखील पावले उचलण्याची गरज आहे. आपण या शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये कुठे तरी मागे पडत चाललो आहोत की काय असे वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण होणे हे महाराष्ट्राला भूषणावह नाही. म्हणून याबाबतीत ठोस अशी पावले उचलण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने आरोग्याकडेही तितकेच लक्ष देण्याची गरज आहे. आज राज्यामध्ये ज्या काही दोन-तीन समस्या आहेत त्यामध्ये आरोग्य ही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....

देखील एक महत्वाची समस्या आहे. आपण राज्यात कुठेही एखादे रोग निदान शिबिर घेतले तरी हजारोच्या संख्येने लोक अशा शिबिरांना उपस्थित राहातात. याचे कारण त्यांना पाहिजे तशी हॉस्पिटलची सुविधा मिळत नाही. पाहिजे त्या प्रमाणे ते इलाज करुन घेऊ शकत नाही. ही अत्यंत बिकट अशी परिस्थिती आहे. म्हणून राज्याने राजीव गांधी जीवनदायी योजना राज्यात सुरु केलेली आहे. या योजनेंतर्गत 972 रोगांवर उपचार करुन घेऊ शकतो. ही योजना आता संपूर्ण राज्यामध्ये यशस्वीतेने राबविणार आहोत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 16:20

श्री.माणिकराव ठाकरे....

आणि ती योजना यशस्वीपणे राबवू त्यावेळी निश्चितच आरोग्य विषयक अतिशच चांगले पाऊल उचलू शकू असे मला वाटते.

महोदय, देशात महाराष्ट्र राज्य हे आरोग्य विषयक निश्चितपणे पुढे आहे. महाराष्ट्रातील पुरुषांचे आयुष्यमान 70.7 वर्षे एवढे आहे आणि महिलांचे आयुष्यमान 72.5 एवढे आहे. महाराष्ट्रात पुरुषांचे आयुष्यमान कमी आहे. महिलांचे आयुष्यमान थोडे जास्त आहे. भारतामध्ये पुरुषांचे आयुष्यमान हे 68 टक्के आहे आणि महिलाचे आयुष्यमान 69.5 एवढे आहे. पुरुषापेक्षा महिला ही जास्त दिवस जगते हे या प्रमाणावरुन दिसून येते. राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या माध्यमातून 325 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. ही अतिशय महत्वपूर्ण योजना आहे. राज्य शासनाच्या ज्या योजना चालू आहेत, त्यातील एक क्रमांकाची योजना राजीव गांधी जीवनदायी योजना आहे. या योजनेला भरघोस तरतूद करण्यात आल्यामुळे सरकारचे मी अभिनंदन करतो. ही योजना सरकारने वेगाने चालवावी अशी मी या निमित्ताने शासनाकडे अपेक्षा व्यक्त करतो. ही योजना राबविताना काही अडचणी येत असतील. विमा कंपन्यांकडून अडचणी येत असतील. खाजगी रुग्णालयांकडून काही अडचणी येत असतील. परंतु सर्व अडचणींवर मात करुन ही महत्वाकांक्षी योजना राबविण्याचा सरकारने निर्धार केलेला आहे.

सभापती महोदय, या वर्षाचा आपला एकूण प्लॅन बजेट 46938 कोटी रुपयांचा आहे. बजेटची विभागणी करीत असताना विदर्भासाठी 8911 कोटी रुपये, मराठवाडयासाठी 5334 कोटी रुपये आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता 16969 कोटी रुपये अशा प्रकारची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. परंतु जे सुधारित अंदाज आहेत, ते आपले वाढीव अंदाज आहेत. त्यामध्ये निश्चितपणे आपल्याला ऐच्छिक पैसा मिळेल अशी अपेक्षा आहे. त्या आधारावर 15729 कोटी रुपये सुधारित बजेटच्या माध्यमातून आपल्याला मिळती्ल. इतर ज्या महत्वाकांक्षी योजना आहेत. त्याकरिता निश्चितपणे या तरतुदींचा उपयोग आपल्याला करुन घेता येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या राज्यावर मोठ्या प्रमाणात कर्ज आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे साहेबांनी सुरुवातीलाच सांगितले की, प्रत्येक माणसावर 25 हजार रुपये कर्ज आहे अशा प्रकारची परिस्थिती आहे. राज्यावर एकूण कर्ज किती आहे, किती उचल केली आहे यासंबंधी देखील त्यांनी माहिती दिली.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

ज्यावेळी या राज्यात युतीचे सरकार होते, त्यावेळी किती उचल केली होती, त्यावेळी आपल्या शासनाने 17 टक्के उचल केली होती. पूर्वी राज्य शासनावर कर्ज नव्हते. परंतु या राज्यात युती सरकार आले आणि या राज्यावर 45 हजार कोटी रुपयांचे कर्ज झाले. अशी कर्जे गरजेपोटी घेतलेली असतात अशातला भाग नसतो. आपल्याला स्मॉल सेव्हींग, इंदिरा विकास पत्रे या अनुषंगाने कर्ज घ्यावे लागते. जेवढा कर्ज म्हणून पैसा येतो तो पैसा केंद्र सरकारला जातो. केंद्र सरकारकडून काही रक्कम परतीच्या बेसवर कर्ज म्हणून घ्यावीच लागते. ते 9 ते 9.50 टक्के दराने कर्ज घ्यावे लागते.

सभापती महोदय, युतीच्या काळात श्री.मनोहर जोशी हे मुख्यमंत्री होते. आपण स्मॉल सेव्हींगचे कर्ज घेऊ. लोकांना जास्तीत जास्त स्मॉल सेव्हींग स्कीमध्ये गुंतवणूक करण्यास सांगू. राज्यात मोठया प्रमाणात इंदिरा विकास पत्रे देऊ.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 16:25

श्री.माणिकराव ठाकरे.....

तो पैसा आपण वापरु अशा प्रकारची त्यांची कल्पना होती. परंतु जेवढा निधी प्राप्त झाला तो संपूर्ण निधी केंद्र सरकारला द्यावा लागला. मग गरज नसताना तो निधी केंद्र सरकारने राज्याला कर्ज म्हणून दिला, अशा प्रकारे कर्जाची स्थिती वाढली. महाराष्ट्राला कर्जाची गरज नसताना अल्पबचत, इंदिरा विकास पत्र यातील काही भाग सक्तीने कर्ज म्हणून घ्यावे लागले.

सभापती महोदय, कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीतील वर्गणी शासनाकडे जमा होते, त्या निधीवर शासनाला व्याज प्रदान करावे लागते. ही व्याजाची रक्कम ठराविक मर्यादेपर्यंत दिली पाहिजे. राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या 30 टक्क्यापेक्षा जास्त रक्कम व्याजापोटी देणे कोणत्याही सरकारला आर्थिकदृष्टया परवडणारे नसते. व्याजाची रक्कम 21 हजार कोटी रुपयांपर्यंत द्यावी लागत असताना विरोधी पक्षाच्या काही नेत्यांकडून अशी विधाने केली जातात की, राज्य दिवाळखोरीत चालले आहे. राज्याने गरजेपेक्षा जास्त कर्ज घेतलेले नाही. उलट केंद्र सरकारने कर्जाबाबत रेषा आखून दिलेली आहे. त्यापेक्षा कमी कर्ज घेतले आहे, हे सर्व कर्ज गरजेपोटी घेतले आहे असा भाग नाही. काही प्रमाणातील कर्ज आपोआप राज्याकडे आलेले आहे आणि त्या कर्जावरील व्याज राज्याला प्रदान करावे लागत आहे. राज्याचे जेवढे उत्पन्न असेल त्याच्या 30 टक्क्यापेक्षा जास्त रक्कम कर्जाची परतफेड म्हणून द्यावी लागत असेल तर राज्याला ओव्हरड्राफ्ट घ्यावा लागतो. असा ओव्हरड्राफ्ट तीन महिन्यात परत करावा लागतो. अन्यथा राज्य दिवाळखोरीकडे चालले आहे त्या दृष्टीने केंद्र सरकारकडून सूचना दिल्या जातात.

सभापती महोदय, राज्यामध्ये अशी स्थिती निर्माण झालेली नाही. युती सरकारच्या काळात एकदा ओव्हरड्राफ्ट घेण्यात आला होता. 2006 नंतर महाराष्ट्र राज्याने एकही ओव्हरड्राफ्ट घेतलेला नाही. 2004 मध्ये राज्यामध्ये राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आघाडीचे सरकार सत्तारुढ झाले. एकूण आर्थिक स्थिती पाहिली तर लक्षात येईल की, राज्य जोमाने पुढे वाटचाल करीत आहे. गरजेपेक्षा जास्त कर्ज घेतले जात नाही. कर्जाच्या मर्यादेची रेषा ओलांडली जात नाही. काही कर्जे नाईलाजाने घ्यावी लागलेली आहेत. केंद्र सरकारकडून, भविष्य निर्वाह निधीच्या माध्यमातून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून कर्जे घ्यावी लागलेली आहेत. या सर्व बाबींचा विचार केला तर विरोधी पक्षाकडून केले गेलेले आरोप अगदी तकलादू असल्याचे दिसून येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

सभापती महोदय, राज्य शासनाने अत्यंत चांगल्या प्रकारच्या योजना हाती घेतलेल्या आहेत, ज्यांचा उल्लेख माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी केलेला आहे. महाराष्ट्र राज्याने सामाजिक दृष्टीकोनातून जबाबदारी घेतलेली आहे. आदिवासी, मागासवर्गीय समाजाच्या विकासाकरिता स्वतंत्र बजेट देण्याची व्यवस्था या राज्यामध्ये करण्यात आलेली आहे. त्याचे प्रामाणिकपणे पालन केले जाते की नाही हे पाहणे महत्वाचे आहे. राज्याला केंद्र सरकारच्या नियोजन आयोगाने मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. राज्यात आदिवासी आणि मागासवर्गीय समाजाची जेवढी लोकसंख्या आहे त्याप्रमाणात अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद केली पाहिजे. या सूचनेप्रमाणे अर्थसंकल्पात तंतोतंत तरतूद केलेली आहे. राज्यात 10.2 टक्के आदिवासी समाजाची लोकसंख्या आहे.

नंतर 3व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ......

त्या प्रमाणे 4787 कोटी रुपयांची तरतूद अनुसूचित जातीकरिता करण्यात आलेली आहे. आदिवासींची संख्या 8.9 टक्के असून त्यासाठी 4177 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय,अनुसूचित जाती जमातींना जास्तीत जास्त वित्तीय सहाय्यता मिळण्यासाठी मौलाना अब्दुल कलाम महामंडळाची तरतूद 250 कोटी वरुन 500 कोटी रुपये करण्यात आलेली आहे. वसंतराव नाईक महामंडळाची तरतूद 100 कोटी होती ती 200 कोटी रुपये करण्यात आली आहे. महात्मा फुले महामंडळाची तरतूद 200 कोटी होती ती 500 कोटी रुपये करण्यात आली आहे. ओबीसी महामंडळाची तरतूद 50 कोटी होती ती आता 250 कोटी रुपये करण्यात आली आहे. अण्णासाहेब पाटील महामंडळाची तरतूद 50 कोटी होती ती आता 150 कोटी रुपये करण्यात आली आहे. मला शासनाला विनंती करावयाची आहे की, यातून काही वर्ग निश्चितपणे सुटलेले आहेत. बारा बलुतेदारांची अनेक वर्षापासूनची मागणी आहे. बारा बलुतेदार खेडयांमध्ये लहान लहान व्यवसाय करीत होते त्यांच्यासाठी आपण 10-15 हजार रुपये देत होतो परंतु हे पैसे सर्वच बारा बलुतेदारांना मिळत नाही. त्यामुळे बारा बलुतेदारांसाठी व्यवस्था करण्याच्या दृष्टिकोनातून, त्यांना अधिकाधिक कर्ज मिळण्याच्या दृष्टिकोनातून बारा बलुतेदारांसाठी एखादे महामंडळ असले पाहिजे व त्यांना उद्योगासाठी वेगळया प्रकारची मदत झाली पाहिजे अशी सूचना मी अंदाजपत्रकाच्या चर्चेच्या निमित्ताने करु इच्छितो.

सभापती महोदय, कोकणामध्ये कुणबी समाज मोठया प्रमाणात असून तो हलाखीच्या अवस्थेत आपले जीवन जगत आहे. या लोकांकडे अतिशय थोडया जमिनी आहेत परंतु या जमिनी त्यांच्या मालकीच्या नाहीत. बेदखल कुळ, खोतांच्या जमिनी ते कसत आहेत. या लोकांना कर्ज पाहिजे असेल तर त्यांना कर्जही मिळत नाही. या लोकांकडे शेती असतांना त्यांना कर्ज मिळत नाही. म्हणून कोकणातील अशा कुणबी लोकांना आर्थिक दृष्टया मजबूत करण्याची आवश्यकता आहे.त्यामुळे शामरावजी पेजे महामंडळ निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे याबाबतीत शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

..2..

श्री. माणिकराव ठाकरे ......

सभापती महोदय, अन्न सुरक्षेच्या संदर्भात आपल्याकडे नव्याने कायदा येत आहे. अन्न सुरक्षा योजना अत्यंत महत्वकांक्षी योजना आहे. आपल्याकडे काही वर्गाला भरपूर अन्न मिळते परंतु राज्यात असे काही वर्ग आहेत की, त्यांना एकवेळचे अन्नही मिळत नाही. मग हा वर्ग झ ोपडपट्टीत राहणारा असेल किंवा खेडयामध्ये राहणारा गरीब माणूस असेल. अशांना आता अन्न सुरक्षा योजनेतून अन्न मिळू शकणार आहे. अन्न सुरक्षा योजनेसाठी राज्य शासनाने गोडाऊन बांधण्याची आवश्यकता आहे. गोडाऊनसाठी 13 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केली आहे. गोडाऊन बांधले गेले तर त्या गोडाऊनमध्ये अन्न साठवून ते धान्य या लोकांना तात्काळ देऊ शकू. त्यामुळे यासंदर्भात राज्य शासनाने विचार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्य लोडशेडींग मुक्त झाले पाहिजे अशी राज्य शासनाची इच्छा आहे व तशा प्रकारची पाऊले राज्य शासन उचलत आहे. संपूर्ण राज्यात जी काही वीज निर्माण होते त्यातील 2-3 हजार मे.वॅट वीज आपल्याला कमी पडत आहे. भविष्यात वीज कमी पडता कामा नये यासाठी राज्य शासनाने 3000 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यामध्ये 13 हजार मे.वॅट विजेचे उद्दिष्ट शासकीय प्रकल्पातून केलेले आहे. खाजगी विजेच्या प्रकल्पांची आपल्याला खरोखर गरज आहे काय ? विदर्भामध्ये आपण खाजगी विजेचे प्रोजेक्ट उभे करीत आहोत परंतु हे खाजगी वीज प्रकल्प घेणे गरजेचे आहे काय, किंवा त्यांच्याशिवाय आपले भागणारच नाही याबाबतची माहिती लोकांना मिळण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

पॉवर प्रोजेक्ट आपण खाजगी उद्योगांकरिता घेतो आणि त्यांना पाणी देतो. शासकीय स्तरावरच आज पाण्याची उणीव भासू लागली आहे. तेव्हा यासंबंधी काही तरी धोरण आखले पाहिजे अशा प्रकारची माझी विनंती आहे.

वर्धा येथे चांगल्या प्रकारचा सर्वोदय प्रकल्प होत आहे. येथे प्रकल्प व्हावा अशी आमचे माननीय पालक मंत्री श्री.राजेंद्र मुळक यांची अनेक वर्षापासूनची इच्छा होती. त्याप्रमाणे त्यांनी बजेटमध्ये देखील तरतूद केलेली आहे. तीर्थक्षेत्र विकासासाठी एक रूपयाची तरतूद दोन कोटी रूपयांपर्यंत करण्यात आली आहे. राज्य शासनाने हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

नाशिक येथे कुंभमेळा होणार आहे. त्यासाठी आपण अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली नाही. यासाठी राज्य सरकारने तरतूद केली पाहिजे. जेणेकरून कुंभमेळा मोठ्या प्रमाणावर आपण यशस्वी करू शकू.

मनरेगा अंतर्गत विविध स्वरूपाची कामे घेण्यात येतात. त्यात क्रीडांगणाचा समावेश नव्हता. पण या योजनेमध्ये आता क्रीडांगणाचा देखील समावेश करून अत्यंत महत्त्वाचे पाऊल केंद्र शासनाने टाकलेले आहे. क्रीडांगण विकसित करण्यासंबंधी क्रीडा विभागाने धोरण आणले आहे. त्यासंबंधी देखील निश्चित पावले उचलली पाहिजेत.

राज्यात दुष्काळ असल्यामुळे व भविष्यात दुष्काळ पडू नये यासाठी आपण निधीमध्ये 25 टक्के कपात करीत आहात. सदर कपात करीत असताना सगळ्या भागामध्ये समान वाटप कसे करता येईल याचे नियोजन केले पाहिजे. प्रत्येक भागामध्ये दरवर्षी दुष्काळ पडू नये यासाठी कोणती उपाययोजना करता येईल याबाबत विचार केला पाहिजे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी कितीही पैसा लागला तरी तो देण्याचा निर्धार राज्य शासनाने केलेला आहे. तसा स्पष्ट उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्यात आला आहे. त्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो.

राज्याचा मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहे. दरडोई उत्पन्न वाढविणे, शिक्षण देणे, आरोग्याच्या सेवा उपलब्ध करून देणे इत्यादीकडे शासनाने विशेष लक्ष दिलेले आहे. यापुढे देखील आपला मानव विकास निर्देशाक वाढत जाईल अशा प्रकारची आशा व्यक्त करतो. ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

मी एक सूचना करणार आहे. 31 मार्चच्या आत बजेट मंजूर होते. आता 31 मार्च नंतर बजेटवर चर्चा होत आहे. बजेट मंजूर करण्याचा अधिकार विधानसभेला आहे हे मला मान्य आहे. किमान आम्ही चर्चा केल्यानंतर बजेट मान्य झाले एवढे बोलण्याचा अधिकार तरी आम्हाला हवा. आता आपण 1 एप्रिलला बजेटवर चर्चा करीत आहोत. 31 मार्च रोजीच आपले बजेट मंजूर झालेले आहे. त्यामुळे विधान परिषद सभागृहाची प्रतिष्ठा कुठे तरी थोडी कमी झाल्या सारखी वाटते. भविष्यात असे होऊ नये याची काळजी राज्य शासनाने घ्यावी अशी विनंती करतो आणि दोन शब्द पूर्ण करतो.

.....

...3

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून सर्वसामान्यांचा अर्थसंकल्प असे या वर्षीच्या अर्थसंकल्पाचे वर्णन करता येईल. त्यामुळे माननीय अर्थ मंत्री व राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार आणि राज्य मंत्री श्री.राजेंद्र मुळक यांचे अभिनंदन करतो.

सर्वसामान्यांचा अर्थसंकल्प याकरिता म्हणालो की, सर्वसामान्य व मध्यमवर्गीयांवर कुठल्याही कराच बोजा न लावता, कुठल्याही सर्वसामान्य व्यक्तिला त्याचा त्रास होणार नाही याचा विचार करूनच अतिशय विचारपूर्वक हा अर्थसंकल्प माननीय अर्थमंत्र्यांनी येथे सादर केला आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.. 16:40

श्री.जयवंतराव जाधव...

गरिबांचा कळवळा असलेला हा अर्थसंकल्प आहे. कारण शासनाच्या तिजोरीमध्ये निधी जमा करीत असताना गरिबांना त्याची झळ न पोहोचता त्यांना सुविधा देता आल्या पाहिजेत या दृष्टीने अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे. माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री महोदयांनी कर चुकवेगिरी करणाऱ्यांवर अतिशय करडी नजर ठेवून अशाच लोकांवर कराचा बोजा टाकलेला आहे. मग त्यामध्ये सिगारेटस् असतील, दारुचे काही प्रोडक्टस् असतील, अशा वस्तूंवर कर लावून राज्याच्या तिजोरीमध्ये भर टाकण्याचा संकल्प केलेला आहे.

सभापती महोदय, या वर्षी राज्यास दुष्काळाच्या आव्हानास सामोरे जावे लागत आहे. त्यासाठी 25 टक्के निधी विविध उपाय योजनांसाठी ठेवलेला आहे. टंचाईच्या कामासाठी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कृषी योजनांसाठी साडेतीन हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. राज्यामध्ये शिरपूर पॅटनची चर्चा होत आहे. आपल्याकडील जे पारंपारिक बंधारे असतील, के.टी.वेअर असतील त्याकडे शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, समुद्राच्या पाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी पिण्यायोग्य, वापरण्यायोग्य करावे. अशा तऱ्हेचा प्रयोग परदेशात झालेला आहे. ही बाब खर्चिक असली आणि हास्यास्पद असली तरी भविष्याच्या दृष्टीने ती गरजेची आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, सर्वसामान्य लोकांना आरोग्याचा प्रश्न भेडसावत असताना, दवाखान्याचे बिल परवडत नसताना माननीय वित्त मंत्री महोदयांनी राजीव गांधी जीवनदायी योजना संपूर्ण राज्यात लागू केली त्याबद्दल मी सर्वसामान्य जनतेच्या वतीने माननीय वित्त मंत्री महोदयांचे आणि शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, कृषी क्षेत्रासाठी विविध तरतुदी केलेल्या आहेत. राज्याला कृषी विकास योजनेंतर्गत मंजूर झालेला निधी निम्मा सुध्दा खर्च होऊ शकत नाही याची माहिती करुन घेतली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आताच नाशिक येथील कुंभमेळ्याचा विषय उपस्थित केला होता. नाशिकमध्ये कुंभमेळा होणार आहे. या कुंभमेळ्याचे नियोजन यापूर्वी व्हावयास पाहिजे होते. कुंभमेळ्याकडे अतिशय गांभीर्याने पाहिले पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव...

त्याठिकाणी एका प्राधिकरणाची नियुक्ती केली पाहिजे. त्या ठिकाणी सक्षम प्राधिकरण केल्यास नाशिकचा खुंटलेला विकास अतिशय चांगल्या प्रकारे होईल. या कुंभमेळ्यासाठी जगभरातून तसेच अनेक राज्यांतून भाविक येतात. तेव्हा आदर्श राज्याचा कारभार कसा चालतो हे आपणास त्या निमित्ताने दाखवून देता येईल.

सभापती महोदय, आमच्या किकवी प्रकल्पासाठी मान्यता देण्यात आली होती. किकवी प्रकल्पासाठी लागणारा निधी राज्य सरकार देणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

परंतु मध्यंतरीच्या काळात राज्य सरकारकडून महानगरपालिकेला पत्राद्वारे कळविण्यात आले की, किकवी प्रकल्पाकरिता देऊ केलेला निधी देण्यास असमर्थ आहोत. माननीय मंत्र्यांना मी विनंती करु इच्छितो की, आपण या विषयाकडे गांभीर्याने पहावे. नाशिक येथील पाणी मराठवाडा, नगर जिल्ह्यात जात आहे. किकवी प्रकल्पाची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर आहे. मी विनंती करतो की, किकवी प्रकल्पासाठी भरीव निधीची तरतूद करावी.

महोदय, राज्य सरकारने मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक महामंडळांच्या भाग भांडवलात वाढ करण्यासाठी तरतूद केली आहे. माझ्या काही विरोधक मित्रांना कावीळ झाल्यासारखी वाटते. त्यांना संपूर्ण जगच पिवळे झाल्यासारखे वाटत आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, वर्षभरात अनेक सण येत असतात. दसरा, दिवाळी या सणांमध्ये आपण गोडधोड करतो. परंतु विरोधकांना ओरडण्यासाठी एकमेव शिमगा हाच सण दिसतो. मी त्यांना सांगू इच्छितो की, शिमग्याव्यतिरिक्त इतरही सण साजरे करा. महोदय, माननीय अर्थ मंत्र्यांनी राज्याला कल्याणकारी दिशेने नेण्यासाठी चांगला अर्थसंकल्प मांडला आहे. या अर्थसंकल्पाचे आपण सर्व जण स्वागत करु या, एवढेच या निमित्ताने सांगतो व वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2013-14 या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारणे चर्चेमध्ये भाग घेऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण आणि स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने आदरणीय श्री.अजितदादा पवार यांनी जनसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून चांगला अर्थसंकल्प सादर केला आहे. दुष्काळाला सामोरे जात असताना शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून त्यांनी अनेक चांगल्या योजना अंमलात आणल्या आहेत. दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी 375 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. खतासाठी 53 कोटी रुपयांची, कृषी विकास योजनांसाठी 751 कोटी रुपयांची आणि महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी 777 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आदिवासी योजनांसाठी 4,177 कोटी रुपये आणि अनुसूचित जातींसाठी 4,700 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. इतकेच नव्हे तर जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी 5,200 कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. एकंदरीत शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या निरनिराळ्या योजनांसाठी भरीव तरतूद केली आहे.

महोदय, शेतकऱ्यांना विविध पॅकेज किंवा योजना देत असताना त्या मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राला लागू होतात. परंतु दुर्दैवाने उत्तर महाराष्ट्राकडे फारसे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रात या योजना राबविल्या जात नाहीत, परिणामी आमच्या भागातील शेतकऱ्यांना या योजनांपासून वंचित राहावे लागते. महोदय, सिंचनाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, या राज्याचे माजी मंत्री आणि माझे वडील आदरणीय श्री.प्रशांत हिरे यांनी त्या काळात नारपार सारखी योजना मांडली होती. जेणेकरुन आमच्या नद्यांमध्ये पाणी टाकून त्या बारमाही होऊ शकतील. परंतु तत्कालीन प्रशासन आणि अधिकाऱ्यांनी ती योजना फिजीबल नाही म्हणून बाद केली. परंतु आज हीच योजना गुजरात राज्याने स्वीकारली आणि त्या राज्यात राबविली. त्यामुळे आमच्या वाट्याला येणारे नारपारचे पाणी गुजरातमध्ये गेले. या सर्व नद्यांमध्ये 27 वळण बंधारे मिळावेत अशी मागणी आम्ही वारंवार केली आहे. दुष्काळी पॅकेजमध्ये 27 वळण बंधारे मिळाले तर शेतकऱ्यांना खूप मोठा दिलासा मिळू शकेल.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे....

महोदय, तापी नदीवर अनेक बॅरेजेस बांधलेले आहेत. परंतु त्या ठिकाणी कालव्याची कामे अपूर्ण आहेत. ती कामे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर हाती घेणे आवश्यक आहे. अशाच पध्दतीचे बॅरेजेस गोदावरी नदीवर करुन दिले तर त्याचा त्या भागातील लोकांना निश्चितपणे फायदा होऊ शकेल.

महोदय, शिक्षणाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, शिक्षण विभागासाठी शासनाने खूप चांगली मदत केली आहे. सर्व शिक्षा अभियानासारख्या योजनेसाठी 711 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अपूर्व हिरे ....

आमच्या पाड्यांवर राहणारा जो आदिवासी बांधव आहे तो अनेकदा शाळेमध्ये जेवण मिळते म्हणून आपल्या मुलांना शाळेमध्ये पाठवितो, ही परिस्थिती मी डोळ्याने पाहिलेली आहे. त्याकरिता आपण तरतूद केली याबद्दल मी आपले विशेष आभार मानतो. मुलींच्या वसतिगृहांसाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. अनेक भरीव तरतुदी या ठिकाणी केलेल्या आहेत पंरतु वेळेच्या अभावी मी सर्वांचा उल्लेख करीत नाही.

सभापती महोदय, मी एकच मागणी करतो. जो काही आयकर घेतला जातो त्यावर 3 टक्के एज्युकेशन सेस जमा होतो. हा जमा होणारा एज्युकेशन सेसचा सर्व पैसा एज्युकेशनच्या माध्यमातून आम्हाला देऊ शकलात तर आमचे जे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत ते मार्गी लागतील. आपण या ठिकाणी आम्हाला शाळाचे वेतनेतर अनुदान सुरु करुन दिले. पण मागचे खूप मोठ्या प्रमाणावर आमचे वेतनेतर अनुदान थकीत आहे. खरे तर मागच्या या थकीत वेतनेतर अनुदानाला अनुषंगून शाळांनी आज खर्च करुन टाकलेला आहे. शाळा आहे, पैसे बुडणार नाहीत या निमित्ताने का होईना पण व्यापाऱ्यांनी माल दिलेला आहे. आज हे पेमेंट शाळांनी कोठून द्यावयाचे हा एक मोठा प्रश्न आमच्या समोर आहे. जमेल तसे टप्प्याटप्प्याने द्यावेत परंतु हे पैसे आम्हाला द्यावेत अशी मागणी करतो.

सभापती महोदय, कायम विनाअनुदानित शाळांमधील 'कायम' हा शब्द आपण काढला पण त्याच्या अटी इतक्या चांगल्या बनविल्या होत्या की, यामध्ये कमीतकमी शाळा कशा पास होतील याचीच काळजी घेतलेली होती. त्यामुळे या सर्व अटी शिथिल करुन काय मार्ग काढता येईल याचाही प्रयत्न करावा. कनिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द अजून काढलेला नाही. तो शब्द काढण्याच्या अनुषंगाने काय करता येईल ते देखील करावे अशी मागणी मी करतो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाबतीत मघाशी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की आम्ही कॅबिनेटसमोर विषय आणत आहोत पण त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न खूप बिकट आहे. सहा सहा महिने त्यांचा पगार होत नाही. जशी आपण आदिवासी विकास विभागामध्ये स्केलच्या बाबतीत अंमलबजावणी केली त्याप्रमाणे

...2...

डॉ. अपूर्व हिरे ....

समाजकल्याणच्या वसतिगृहांना किंवा त्यांच्या शाळांनाही करुन द्यावी अशी मागणी करतो.

कुंभ मेळ्यासारखी महत्वाची गोष्ट नाशिकसारख्या शहरामध्ये घडणार आहे. फेब्रुवारी, 2015 पासून हा कुंभमेळा सुरु होणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाकडून आणि राज्य शासनाकडूनही निश्चितपणे मदत होणे गरजेचे आहे. ती मदत देखील आपण द्यावी अशी मागणी या निमित्ताने करतो. महाराष्ट्रामधील सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प आपण माझ्या मतदारसंघामध्ये धुळे जिल्ह्यातील साक्री येथे दिला त्याबद्दल आपल्याला मनपासून धन्यवाद देतो. अनेक मुद्दे बोलण्यासारखे आहेत परंतु वेळेअभावी हे सर्व मुद्दे मी मांडत नाही. त्याची सविस्तर टिप्पणी मी तयार केलेली आहे ती माननीय सभापती महोदयांकडे पटलावर पाठवितो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावर बोलत असताना मी मुद्यांची पुनरावृत्ती न करता थोडक्यातच बोलणार आहे. आपण मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, फुले, शाहू आणि आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणताना आमच्या अनेक सहकारी मित्रांनी पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जे स्मारक होणार आहे त्याचे कौतुक केले. सन्माननीय श्री. सुभाष चव्हाण यांनीही त्याबाबत सांगितले. परंतु कालच्या वर्तमानपत्रात इंदू मिलच्या जमिनीचे हस्तांतरण काही महिने लांबणीवर पडल्याची बातमी छापून आलेली आहे. हे हस्तांतरण लांबणीवर पडले आहे आणि हे स्मारक होण्यासाठी किती कालावधी लागेल हे सांगता येत नाही अशी बातमी एका मोठ्या वर्तमानपत्रात छापून आलेली आहे. यातील ज्या तांत्रिक बाबी आहेत त्यामध्ये मी जात नाही. शिवस्मारकारची जी स्थिती आता झाली आहे ती पाहता पूर्वी शिवस्मारकाचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये होत असे पण आता अर्थसंकल्पामध्ये सुध्दा त्याचा उल्लेख केलेला नाही. मला असे वाटते की, काही वर्षानंतर तशीच अवस्था पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची होऊ नये. त्यासाठी लागतील तेवढे पैसे देऊ असे जाहीर केले परंतु या अर्थसंकल्पात काहीही तरतूद केलेली नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी जसे शिक्षक संपावर आहेत, प्राध्यापक सुध्दा संपावर आहेत त्याच पध्दतीने निवासी डॉक्टरांनी सुध्दा शासनाला नोटीस दिलेली आहे. निवासी डॉक्टरांच्या मानधनाचा विषय आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे तो विषय जुलैमध्ये गेलेला आहे. त्यांच्या सचिवांनी 32 कोटी रुपयांचे एक प्रपोजल दिलेले आहे. दिल्ली, गुजरात या ठिकाणी या डॉक्टरांना चांगल्या प्रकारचे मानधन मिळते. महाराष्ट्रामध्ये त्यांना गेल्या जुलैपासून 32 कोटी रुपये देण्याचे मान्य केलेले आहे पण अजून त्याची तरतूद केलेली नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर.......

त्यामुळे 1 मे पासून ते संपावर जाणार आहेत. जोपर्यंत संपाचे हत्यार उगारत नाही तोपर्यंत शासन प्राध्यापकांच्या, डॉक्टरांच्या मागण्यांकडे लक्ष देत नाही. या पुरोगामी महाराष्ट्राला ते परवडणारे नाही. त्यामुळे निवासी डॉक्टरांच्या मान्य केलेल्या मागण्यांची शासनाने पूर्तता करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्री हे महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष झालेले आहेत. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु कबड्डीबरोबरच शासनाने मल्लखांब या खेळाला सुध्दा प्रोत्साहन दिले पाहिजे. मल्लखांब खेळाडूंसाठी नोकऱ्यांमध्ये काही जागा राखीव ठेवल्या पाहिजेत.

राज्यातील अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येप्रमाणे त्यांच्या योजनांसाठी तरतूद केली जाते. परंतु या निधीचे योग्य पध्दतीने नियोजन केले जात नाही. याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनीही केलेला आहे. आदिवासींसाठी तरतूद केली जाते, परंतु त्या तरतुदीमधून त्यांची उन्नती झाली आहे किंवा नाही हे पाहिले जात नाही. आदिवासींसाठी 4 हजार कोटी रुपयांची तरतूद करुनही आजही आदिवासी भागातील लहान मुले कुपोषणामुळे मरत आहेत. शासन या वर्षी वसंतराव नाईक यांची जन्म शताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. युती शासनाच्या काळात समाजकल्याण व आदिवासी कल्याण यासाठी एकच महामंडळ किंवा विभाग होता. परंतु आता सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभाग वेगवेगळे केलेले आहेत. त्याप्रमाणेच विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण विभागाची स्थापना करण्यात यावी. युतीच्या काळात श्री.अण्णा डांगे यांनी एक योजना आखली होती. परंतु युतीचे शासन गेल्यावर आघाडीचे शासन राज्यात आले. त्यामुळे ती योजना अपूर्ण राहिली आहे.

या राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना आधार कार्ड मिळण्यामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या राज्यात बांगलादेशी नागरिकांना आधार कार्ड मिळते, इतर पुरावे उपलब्ध होतात. परंतु जो भटका समाज आहे त्यांना मात्र आधार कार्ड दिले जात नाही. आधार कार्डाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे देशामध्ये आघाडीवर आहे. ही आघाडी टिकवावयाची असेल तर या लोकांना सुध्दा आधार कार्ड दिले पाहिजे. तो त्यांचा अधिकार आहे, हक्क आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ ST/ D/

श्री.भाई गिरकर........

सभापती महोदय, पोलिसांसाठी मुंबईत नागपाडा येथे एक रुग्णालय आहे. त्या रुग्णालयामध्ये आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग नाही, अनेक वर्षांपासून सर्जनची नियुक्ती केलेली नाही. पोलिसांच्या आरोग्यासाठी सर्जनच्या नियुक्तीसह ते रुग्णालयही अद्ययावत करण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेले आहे. कोकणातील पर्यटन वाढण्यासाठी या वर्षी 285 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु त्यापैकी 100 कोटी रुपये जमीन संपादन करण्यासाठीच खर्च होणार आहेत. कोकणातील 1 हजार हेक्टर जमीन संपादित करावयाची आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यापेक्षा निम्मे क्षेत्रफळ असलेले गोवा राज्य आहे. ते राज्य पर्यटनाच्या महसुलावर निर्भर आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात देवळे, सुंदर समुद्र किनारे असूनही त्यांच्या विकासासाठी फंड दिला जात नाही. त्या भागातील रस्त्यांचा विकास केला पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करुनही तेथे 4 तास लोडशेडिंग करीत असू तर ते पर्यटनाच्या दृष्टीकोनातून योग्य नाही. त्या जिल्ह्यात वीज चोरुन घेतली जात नाही. विजेच्या बिलाची 100 टक्के वसुली होत असून सुध्दा तेथे लोडशेडिंग केले जाते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर...

तेथील पर्यटनाला खीळ बसू नये म्हणून लोडशेडींग करु नये. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये चार तास लोडशेडिंग करण्यात येणार आहे असे शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आलेले आहे. आपण सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केल्यानंतर पर्यटनाला आवश्यक अशा पायाभूत सुविधा तेथे उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. मालवण येथे आपण प्रोजेक्ट करीत आहात. कोकणामध्ये आता पर्यटकांची संख्या, परदेशी पर्यटकांची संख्या वाढत आहे. पर्यटनाच्या माध्यमातून शासनाला महसूल मिळणार आहे. म्हणून तेथील रस्ते, पायाभूत सुविधा, उपलब्ध करण्याबरोबरच 17 क्रमांकाच्या मुंबई-गोवा या महामार्गावरचे अपघात कमी करण्यासाठी त्याचे चौपदरीकरण करणे आवश्यक आहे. मागील आठवड्यामध्ये या रस्त्यावर खाजगी बसचा भीषण अपघात होऊन अनेक माणसे मृत्युमुखी पडली. या महामार्गावर सातत्याने अपघात होत आहेत. या महामार्गाचे तरतूद करुन या महामार्गाचे लवकरात लवकर चौपदरीकरण करावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्री आणि राज्याचे अर्थ मंत्री यांनी सन 2013-14चा जो अर्थसंकल्प आपल्या समोर ठेवलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्या भाषणाला सुरुवात करण्याआधी मी 1960-61 सालच्या अर्थसंकल्पाकडे दृष्टीक्षेप टाकणार आहे. सन 2011-12मध्ये 86445 कोटी रुपये इतकी रक्कम जमा झाली होती. 1960-61मध्ये ही रक्कम अवघी 81 कोटी रुपये होती. माननीय मंत्री महोदयांनी आकडे तपासून घ्यावे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी पुस्तिकेप्रमाणे 2011-12 या वर्षात 1 लाख 25 हजार 313 कोटी रु. इतका सुधारित अंदाजपत्रक तयार केले होते.. सरत्या आर्थिक वर्षात 1 लाख 36 हजार 712 कोटी रु. इतका अंदाज दिला होता. जेव्हा राज्याची स्थापना झाली त्यावेळी राज्याचे अंदाजपत्रक केवळ 2 कोटी रु.चे होते. 1960-61मध्ये महाराष्ट्र राज्याने सामाजिक सेवांवर 40 लाख रु. खर्च केले होते. 50 वर्षानंतर 2010-11मध्ये आपण 52280 कोटी रु. खर्च करीत आहोत. आपण 1960-61चे चित्र आणि आताचे चित्र डोळयासमोर यावे म्हणून मी ही आकडेवारी येथे दिलेली आहे. आपण ही आकडेवारी आणि आताचा अर्थसंकल्प पाहिला तर या अर्थसंकल्पामध्ये नेमका राज्याचा संकल्प काय आहे हे समजत नाही.

माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांना खूष करण्यासाठी त्यांच्या पक्षातील काही सनमाननीय सदस्यांनी त्यांचे गोडवे गाईले. परंतु आता मंत्रिमंडळाचा विस्तार होणार नाही. त्यामुळे त्यांचे गोडवे गाऊन त्यांना खूष करुन राज्यमंत्री पद मिळवावे अशातलाही भाग नाही...(अडथळा) आपल्या नेत्याला चांगले म्हटले पाहिजे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मंदीमुळे उद्योग क्षेत्र अडचणीत आलेले आहे. त्यामुळे राज्याची आजची अवस्था काय आहे, मागील 8-10 वर्षात कोणता संकल्प केला ? आपणाला सातत्याने दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. 1972मध्ये दुष्काळ पडला, त्यानंतर 2002मध्ये दुष्काळ पडला. दर 6 वर्षानी राज्यात दुष्काळ पडत आहे. दुष्काळ राज्याला नवीन नाही. दुष्काळ निवारण्यासाठी आतापर्यंत कोणतेही नियोजन केलेले नाही. याही अर्थसंकल्पामध्ये त्यासंबंधीचे कोणतेही नियोजन नाही. नियोजनशून्य असा हा अर्थसंकल्प आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या अर्थसंकल्पामध्ये आपण नेमका कशाला अग्रक्रम दिलेला आहे ? या अर्थसंकल्पामध्ये योजनांचा सुकाळ असला तरी त्यासाठी तरतुदीचा मात्र दुष्काळ आहे. दुष्काळासाठी 25 टक्के निधी ठेवलेला असला तरी जोपर्यन्त हा निधी खर्च

..3..



श्री. रामदास कदम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होत नाही, दुष्काळ निवारण्यासाठी या निधीचे नियोजन होत नाही, तोपर्यंत या 25 टक्के निधीला काही अर्थ नाही.

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 17:05

श्री.रामदास कदम...

त्यासंदर्भातील नियोजन व्यवस्थितपणे केले जात नाही, तोपर्यंत तुमच्या 25 टक्क्याला काहीही अर्थ नाही.

महोदय, या राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना जनावरांच्या छावण्या, जनावरे दाखविण्यात, चारा, शेण यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. जो पर्यंत भ्रष्टाचार थांबत नाही, जो पर्यंत योजनांवरील खर्चाचे नियोजन व्यवस्थितपणे होत नाही. तो पर्यंत राज्याचा विकास होणे कठीण आहे. शासनाचे नियोजन व्यवस्थित नसले आणि विविध योजनांच्या कामासाठी निधी दिला तर त्या निधीचा काहीही उपयोग नाही. या अर्थसंकल्पामध्ये नियोजनाचा फार मोठा अभाव आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय वित्तमंत्र्यांना एक गोष्ट सांगू इच्छितो. राज्य शासन एका बाजूला आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय, महिला व बालविकास विभाग यांना मोठया प्रमाणात निधी देत आहे. सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देत आहे. परंतु तो निधी त्याच ठिकाणी वापरला जातो आहे काय याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. यासंदर्भातील संपूर्ण आकडेवारी मी आपणास सादर करणार आहे. काही विभागांमध्ये 200 कोटी, 300 कोटी, 500 कोटी रुपयांची खरेदी झाली, ती खरेदी जास्त दराने करुन 200-200 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे. या संदर्भातील माझ्याकडे सर्व फाईल्स उपलब्ध आहेत. सभापती महोदय, या सर्व फाईल्स मी आपणाकडे पाठवितो. आदिवासींचा विकासाकरिता कोटयावधी रुपयांची तरतूद करण्यात येते, परंतु त्यातील एकही रुपया आदिवासी बांधवांना मिळत नाही. मागासवर्गीयांना तरतूद मिळत नाही. मग ती तरतूद नेमकी कोठे जाते हा एक मोठा संशोधनाचा विषय आहे. आपल्या पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी माननीय वित्तमंत्र्यांची पाठ थोपटली. परंतु मी तुमची पाठ थोपटावी अशी माझी मानसिकताच नाही. शासनकर्त्यांकडून जो पर्यंत भ्रष्टाचार थांबत नाही, तो पर्यंत या अर्थसंकल्पाला आणि त्यातील आकडेवारीला काहीही महत्व नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे हे सभागृहात उपस्थित नाहीत. सामाजिक न्याय विभागाने पहिल्या वर्षी मागासवर्गीय बेरोजगारांच्या 350 सोसायटयांना पैसे दिले. त्यातील 250 सोसायटया पैसे मागण्यासाठी आल्याच नाहीत. याचा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

अर्थ असा होतो की, या 250 मागासर्गीय बेरोजगारांच्या बोगस सोसायटया कोणी तरी बनविल्या आणि पैसे घेतले. यामध्ये मोठया प्रमाणात पैशांचा अपहार झालेला आहे. या प्रकरणाची चौकशी कोण करणार याची माहिती माननीय वित्तमंत्र्यांनी सभागृहात द्यावी. कुंपणच शेत खावयास लागले तर मागासवर्गीयांवरील अन्याय दूर कसा होईल. मी हे लहानसे उदाहरण सभागृहासमोर समोर ठेवले आहे. महिला व बालविकास विभाग,सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग यांनी कमी किंमतीच्या वस्तू जास्त दराने खरेदी केली आहे. या विभागांनी ज्या वस्तुंची खरेदी केली, त्या वस्तूंची बाजारात किंमत काय आहे आणि विभागाने प्रत्यक्षात किती किंमतीने त्या वस्तू खरेदी केल्या, या खरेदीत किती कोटी रुपयांचा मलिदा खाल्ला याची संपूर्ण आकडेवारी माझ्याजवळ उपलब्ध आहे. जो पर्यंत भ्रष्टाचार थांबत नाही तोपर्यंत माझ्या दृष्टीने या अर्थसंकलाची किंमत शुन्य आहे.

सभापती महोदय, 1960 पासून या सभागृहात अर्थसंकल्प मांडले गेले आहेत. त्या अर्थंसकल्पावर सदस्यांची भाषणे झाली, चर्चा झाली, वित्तमंत्र्यांचे उत्तर झाले. परंतु तुमच्या अर्थसंकल्पामुळे लोकांच्या जीवनमानावर काय फरक पडला ते या सभागृहात सांगा. मुंबईमध्ये जगणारा माणूस आणि यवतमाळ येथील जंगलातून लाकडे गोळा करुन विकणारा माणूस यांच्या जीवनमानावर काय फरक पडला आहे हे आपल्या अर्थसंकल्पातून स्पष्ट झाले पाहिजे होते. शेवटच्या धनगरवाडीतील माणसाची लंगोटी अजून जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.

मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, महात्मा गांधी बॅरिस्टर होऊन आले. सर्व सामान्य शेवटच्या माणसाच्या अंगावर लाज राखण्या इतपत कपडा नाही अशी त्यांनी ग्रामीण भागातील अवस्था पाहिली आणि त्यावेळी त्यांनी शपथ घेतली की, जो पर्यंत शेवटच्या माणसांच्या अंगावर लाज राखण्याइतपत कपडा येत नाही, तो पर्यंत मी देखील धोतरच घालीन आणि व अंगावर पंचा ठेवीन. माननीय श्री.अजितदादा आपण ग्रामीण भागात जाऊन बघा. एखाद्या बौध्दवाडीत जाऊन बघा. धनगरवाडीत जाऊन बघा. शेवटच्या माणसाच्या अंगावरील लंगोटी गेली आहे काय ? या सर्व गोष्टीस तुमचा अर्थसंकल्प जबाबदार आहे. या अर्थसंकल्पातून तुम्ही कोणाचे जीवनमान उंचावित आहात हे जनतेला कळले पाहिजे. मग कशासाठी महात्मा गांधीचे पुतळे लावता, फोटो लावता, तुमच्या अशा कारभारामुळे त्यांच्या आत्म्यास शांतता लाभेल काय ?

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

या राज्यातील शेवटच्या माणसाला आपण काय न्याय देतो आहे, शेवटच्या माणसासाठी काय करतो आहोत, मागासलेल्या माणसाला पैसा जातो आहे काय, त्यांचा विकास होतो आहे काय, या गोष्टी पाहिल्या पाहिजेत. आज मराठवाडयाची काय अवस्था झाली आहे, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाहीत याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. माननीय श्री.अजितदादा पवार साहेब, तुमच्या मागे माननीय राज्यमंत्री बसले आहेत, आज सकाळी त्यांनी नातुनगरच्या धरणाच्या बाबतीत उत्तर दिले ते अतिशय भयानक आहे....

यानंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...........

त्यांनी असे लेखी उत्तर दिले की, कोकणातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती पाहिली तर ती अतिशय बिकट आहे. त्यांच्याकडे पशुधन नाही, त्यांच्याकडे साधनसामुग्री घेण्यासाठी पैसा नाही. हे शासनाने दिलेले उत्तर आहे. एका बाजूला शासनाने हे कबूल केले की, कोकणातील शेतकरी आर्थिकदृष्टया मागासलेले आहेत. एका बाजूला राज्याचा अर्थसंकल्प सादर होतो आणि दुसऱ्या बाजूला कोकणातील शेतकऱ्यांची अवस्था काय आहे हे शासन मान्य करीत आहे. हीच अवस्था आज विदर्भातील, मराठवाड्यातील शेतकऱ्यांची असेल तर गेल्या 60 वर्षाच्या काळात विकास झाला कोणाचा?

सभापती महोदय, राज्याच्या मंत्रिमंडळात पश्चिम महाराष्ट्रातील वजनदार मंत्री सामील आहेत. सर्वश्री अजित पवार, जयंत पाटील, आर.आर.पाटील, रामराजे निंबाळकर, डॉ.पतंगराव कदम हे वजनदार मंत्री राज्याच्या कॅबिनेटमध्ये असतानाही राज्यात पश्चिम महाराष्ट्रातील सातारा-सांगली जिल्हयातील काही भागांना दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे यासारखी दुर्दैवाची गोष्ट नाही. आज 309 कोटी रुपये नियोजन करण्यासाठी घेतले आहेत. त्यातील बहुतांश रक्कम पुणे जिल्हयासाठी दिली आहे. रत्नागिरी जिल्हयाला 41 कोटी रुपये दिले आहेत. ज्याच्या हातात ससा तो पारधी ही म्हण खरी करुन दाखविली आहे.

सभापती महोदय, नियोजन करुनही 60 वर्षानंतर विषमता निर्माण झाली याला जबाबदार कोण आहे? शिवशाही सरकारच्या काळात कोकणामध्ये 35 पाटबंधारे प्रकल्प मंजूर करण्यात आले होते. ते 35 पाटबंधारे प्रकल्प कधी पूर्ण होणार हे अर्थमंत्र्यांनी सभागृहाला सांगावे. कोकणासाठी विशेष निधी जाहीर करुनही तो दिला जात नाही. सगळा पैसा पश्चिम महाराष्ट्राकडे वळविला जातो. महाराष्ट्रातील एकूण पर्जन्यमानाच्या दृष्टीने 40 टक्के पाऊस कोकणामध्ये पडतो, तरी सुध्दा कोकण पाण्याविना तडफडत आहे. कारण आकाशातून पडणारे पाणी समुद्राला जाऊन मिळते. कोकणाने काय पाप केले? पाटबंधारे प्रकल्प पूर्ण केले असते तर हे पावसाचे पाणी अडवून ते इतरत्र वाहून नेता आले असते. कोकणातील 35 पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी काय नियोजन केले आहे, त्यासाठी किती निधी मंजूर केला आहे हे सभागृहाला सांगावे अशी मी विनंती करतो. कोकणात पडणारे 37 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..........

सभापती महोदय, मी माननीय अर्थमंत्र्यांकडे मागणी केल्यानंतर त्यांनी 1000 कोटी रुपये देतो असे सांगितले. त्यांनी बैठक घेतली होती. अधिकाऱ्यांना माझ्यासोबत बैठक घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. कोयनेचे पाणी उचलून नेण्यासाठी निधी देणार का? त्यासाठी काही नियोजन केले असेल तर ते सभागृहाला कळवावे.

सभापती महोदय, 1999 पासून कोकणामध्ये एक तरी पाझर तलावाचे काम पूर्ण झाले आहे का? शिवशाही सरकारच्या काळानंतरही एकही पाझर तलावाचे काम पूर्ण झालेले नाही. ही अवस्था आमच्या भागाची असेल तर आम्ही जायचे कुठे, नेमके काय केले पाहिजे? या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून कोकणाच्या पदरात काय पडणार आहे हे स्पष्ट केले तर मी अत्यंत आभारी राहीन.

सभापती महोदय, कोकणातील गरीब शेतकऱ्यांचे जीवनमान ऊंचावण्यासाठी आपण काय करणार आहात हे जाहीर करावे. द्राक्षापासून वाईन तयार करण्यासाठी सरकारने सहकार्याचा हात पुढे केला. परंतु कोकणातील जांभूळ फळ सडून जात आहे. मी या संदर्भात 10 वेळा प्रश्न उपस्थित केला आहे. जांभूळ फळाला काही किंमत नाही. काजू बोंडाला काही किंमत नाही.

नंतर 4ई.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ........

आमच्या काजूच्या बोडांला,आंब्याला एवढेंच नाही तर कोकणालाही तुम्ही किंमत देत नाही. कोकणाला आपण फलोद्यान जिल्हा म्हणून घोषित करुन फळ झाडे लावली, यासंदर्भात माननीय शरद पवार साहेबांनी योजना आणल्यामुळे कोकणात मोठया प्रमाणात फळ झाडे लागली गेली परंतु कोकणातील फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग काहीच दिले नाही.

पर्यटनासाठी राज्य शासनाने 50 कोटी रुपये दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु पर्यटनासाठी मागे जे 16 कोटी रुपये दिले होते ते 3 वर्षात का खर्च झाले नाही ? हे पैसे खर्च होणारच नाही याची आपल्याला चांगली कल्पना असल्यामुळेच आपण पर्यटनासाठी या वर्षी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पर्यटनासाठी केंद्रशासनाच्या ज्या परवानग्या आवश्यक असतात त्या परवानग्या आपण आणीत नाहीत. आपण आम्हाला फक्त कागदावरच पैसे देता. आपण 50 कोटी रुपये दिल्यामुळे आमच्या कोकणातील लोक खूष झाले परंतु मागील 16 कोटी का खर्च झाले नाही याची माहिती कोण देणार ?

सभापती महोदय, विदर्भामध्ये 20 हजार मालगुजारी तलाव आहेत. या मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीसाठी 200 कोटी रुपये दिले असते तर 6 लक्ष लोकांना रोजगार मिळाला असता व आत्महत्याही थांबल्या असत्या. राज्य शासनाने मालगुजारी तलावांसाठी एकदाच 20 कोटी रुपये दिले आहेत. विदर्भ, कोकणाने तुमचे काय घोडे मारले आहेत ? एका बाजूला आपण सिंचनावर 70 हजार कोटी रुपये खर्च दाखवता आणि 20 हजार मालगुजारी तलाव दुरुस्त करण्यासाठी 200 कोटी रुपये सुध्दा देत नाही ? त्यामुळे आपले काय नियोजन आहे ते दिसून येते. भविष्यात मराठवाडयात पाऊस पडला नाही तर त्यासाठी आपण काय नियोजन केले आहे ? दुष्काळासाठी बजेटच्या 25 टक्के निधी आपण दिलेला आहे परंतु हा निधी खाण्यासाठी तुमचे लोक टपून बसले आहेत. सहयाद्रीमध्ये पडलेले पाणी मराठवाडयाला देणार आहात काय ? नद्या जोड कार्यक्रम तुम्ही घेणार आहात काय ? यासंदर्भातील नियोजन अर्थसंकल्पात काहीच दिसून येत नाही. या अर्थसंकल्पात केवळ आकडेवारी बघावयास मिळते परंतु नियोजन बघायला मिळत नाही हेच आमचे दुर्दैव आहे.

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ........

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी पैसे कमी पडू दिले जाणार नाही असे राज्य शासन सांगते परंतु प्रत्यक्षात या शासनाजवळ पैसेच नाहीत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही असे सांगितले जाते परंतु आता आपल्यावर करवंटा घेऊन बसण्याचीच वेळ आली आहे. हे सरकार या सभागृहात केवळ खोटी आश्वासने देण्याचेच काम करीत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभे करणार या घोषणा आम्ही गेल्या 10 वर्षापासून ऐकत आहोत. शेंडया लावण्याचे काम आता पुरे करा. पैसा कमी पडू दिला जाणार नाही अशा घोषणा या सभागृहात केल्या जातात. या राज्यावर 2 लाख 53 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. पुढील वर्षी हेच कर्ज 2 लाख 70 हजार कोटी रुपयांवर जाणार आहे. केंद्र सरकारने आपल्याला 10 हजार कोटी रुपये दिले नाहीत. पुन्हा 9 हजार कोटी रुपयांची मागणी करण्यात आली परंतु त्यालाही केंद्र सरकारने परवानगी दिली नाही, पुन्हा 7 हजार कोटी रुपयांची मागणी करण्यात आली परंतु त्यालाही केंद्र शासनाने परवानगी दिली नाही. खरे म्हणजे या शासनाकडे पैसेच नाहीत. त्यामुळे 2 लाख 53 हजार कोटी रुपये कोठे गेले ? कशावर खर्च केले ? यासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्यात यावी याबाबत मागणी करुनही श्वेतपत्रिका काढली जात नाही. आम्हाला सिंचनाच्या श्वेतपत्रिकेमध्ये फसवले गेले आहे. त्यामुळे 2 लाख 53 हजार कोटी रुपये नेमके कोठे गेले याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. विदर्भ, मराठवाडा आणि कोकणाचा अनुशेष शिल्लक आहे तो भरुन काढण्याची आवश्यकता आहे. कोकण वैधानिक विकास मंडळाचे काय झाले ? आम्हाला अजून पर्यंत कोकण वैधानिक विकास महामंडळ मिळाले नाही. आम्ही मागणी केली की त्यावर समिती बसवली जाते व समिती बसवली की, त्यामध्ये 4-5 वर्षे निघून जातात. दांडेकर समितीने जो अहवाल दिलेला आहे त्या अहवालाचे काय झाले ? हे शासन केवळ समित्यावर समित्या नेमून वेळ मारुन नेण्याचे काम करीत आहे. त्यामुळे कोणताही अर्थ नसलेला, कोणतेही नियोजन नसलेला हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात कोकणावर अन्याय झालेला आहे. पर्यटनाचे पैसे दाखवून कोकणाची दिशाभूल करण्यात आल्यामुळे मी या अर्थसंकल्पाचा निषेध करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------- यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ ST/ D/ पूर्वी श्री.भारवि... 17:25

श्री.मुजफ्फर हुसेन..

सभापती महोदय, राज्य शासनाने रस्त्यांच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना हाती घेतलेल्या आहेत. मग त्या केंद्र शासनाच्या माध्यमातून असतील किंवा अन्य माध्यमातून असतील. शासनाने दहिसर ते विरार कॉरीडॉर बांधण्यासाठी मंजुरी दिलेली आहे. एमसीआरझेडनी सुध्दा मान्यता दिलेली आहे. परंतु या कामासाठी कोणत्याही प्रकारच्या निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. तेव्हा या कामासाठी निधीची तरतूद करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, मिहान प्रकल्प हा फक्त नागपूर शहरालाच नाही तर संपूर्ण राज्याला भूषणावह प्रकल्प आहे. देशाच्या ईस्ट आणि वेस्टच्या सेंटरमध्ये हा प्रकल्प उभा राहत आहे. या प्रकल्पामुळे लाखोंच्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे. तेव्हा त्या ठिकाणी भविष्यात कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधांची कमतरता जाणवणार नाही आणि तो प्रकल्प भविष्यात मागे पडणार नाही यासाठी तेथील परिसराचा एक विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यात आठ महानगरपालिका आणि सात नगरपरिषदा असून देखील जेएनएनयुआरएम अंतर्गत एकही पैसा या महानगरपालिका किंवा नगरपरिषदांना मिळालेला नाही. महानगरपालिका आणि नगरपरिषदांनी हजारो कोटी रुपयांचे प्रस्ताव तयार केलेले आहेत त्यास जेएनएनयुआरएम अंतर्गत मान्यता मिळण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती आहे.

सभापती महोदय, गृह निर्माण, झोपडपट्टी विकास, राजीव आवास योजना या अंतर्गत गरीब लोकांसाठी घरकूल योजना राबविली जाते. मुंबई शहरात एस.आर.ए.योजना लागू आहे. परंतु ठाणे, पुणे किंवा उर्वरित महाराष्ट्रात एस.आर.ए. योजना लागू नाही. माझी मागणी आहे की, संपूर्ण महाराष्ट्रात तसेच विशेषत: ठाणे जिल्ह्यात एस.आर.ए.ची योजना लागू करावी.

सभापती महोदय, हजरत सय्यद मोहम्मद ताजउद्दीन बाबा अवलिया दर्गा परिसरातील विकासासाठी 20 कोटी रुपये प्रस्तावित केलेले आहेत. हजरत सय्यद मोहम्मद ताजउद्दीन बाबा यांना जन्म 27 जानेवारी 1961 मध्ये झाला. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणारे आंदोलक हजरत सय्यद मोहम्मद ताजउद्दीन बाबा यांच्याकडे जाऊन त्यांचे आशीर्वाद घ्यायचे. अशा महान व्यक्तींचा जन्म आपल्या राज्यात झाला आहे. तेव्हा हजरत सय्यद मोहम्मद ताजउद्दीन बाबा दर्ग्याच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुजफ्फर हुसेन..

परिसराचा विकास करण्यासाठी 20 कोटी रुपयांऐवजी 100 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी माझ ी मागणी आहे. त्यासाठी एक समिती नेमून त्यामध्ये स्थानिक सदस्यांचा समावेश करुन एक वेगळा प्लान तयार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. ही सुफी संताची भूमी आहे. औरंगाबाद येथील भद्र मारुती मंदिर प्रसिध्द आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी आणि श्रावणातील शनिवारी त्या ठिकाणी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. माझी या निमित्ताने मागणी आहे की, राज्यातील सर्व धार्मिक स्थळांसाठी एक विकास परिषद तयार करावी. विशेषत: खुल्दाबादचा दर्गा, हजरत झरझरीचा बाबा दर्गा आणि भद्र मारुती मंदिराच्या परिसराचा विकास करण्यासाठी एक विकास योजना तयार करावी.

सभापती महोदय, वर्धा येथील सेवाग्रामास 75 वर्षे पूर्ण होत असून त्यासाठी जी विकास योजना तयार करीत आहात त्याचा एक नकाशा तयार करावा.

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजासाठी फक्त 280 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे ती 500 कोटी रुपये करावी अशी विनंती आहे. अल्पसंख्याक समाजाची लोकसंख्या दीड कोटी आहे. एस.सी.साठी साडेचार हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तेव्हा अल्पसंख्याक समाजासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यांनतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, शाहू-फुले-आंबेडकरांचे प्रतिबिंब असलेला, छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेला, त्यांच्या विचारांचे खऱ्याखुऱ्या अर्थाने प्रतिबिंब असलेला अर्थसंकल्प आदरणीय श्री.अजितदादा पवार यांनी मांडला आहे. माझ्यासारखा सर्वसामान्य कार्यकर्ता, दलित समाजातील कार्यकर्ता म्हणूनच म्हणतो की, "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले."

महोदय, राज्याचे आमचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय गृह मंत्री श्री.आर.आर. पाटील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची जागा शोधण्यासाठी बोटीतून समुद्रात गेले. या राज्याचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, किंबहुना महाराष्ट्रातील तमाम जनतेला अभिप्रेत असलेले स्मारक अरबी समुद्रात उभारण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे. त्यांचे स्मारक उभारण्यासाठी किंबहुना जागेचा शोध घेण्यासाठी राज्याचे माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री भर समुद्रात स्मारकाची जागा शोधण्यासाठी गेले. म्हणूनच म्हणतो की, "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले." महोदय, माननीय अजितदादांच्या नेतृत्वात काम करीत असताना मी आमदार झालो काय आणि नाही झालो काय, परंतु शेवटी कार्यकर्ता तर राहीनच ना ? त्यामुळे कृपया आपण आपली काळजी घ्या. असो.

महोदय, मी 40 वर्षापूर्वी कोल्हापूरला प्रथम गेलो होतो. त्यावेळी मी मंदिरात गेलो नाही. सर्वात अगोदर मी शाहू महाराजांचा जन्म कोणत्या वाड्यात झाला त्याचा शोध घेतला आणि त्या ठिकाणी जाऊन शाहू महाराजांच्या अस्मितेचे दर्शन घेतले. पददलित माणसाला, महाराष्ट्रातील माणसाला छत्रपती शाहू महाराजांचा अभिमान आहे. राज्य सरकारने छत्रपती शाहू महाराजांचे कोल्हापूर नगरीत भव्य स्मारक बांधण्याचा संकल्प केला आहे. त्याबद्दल मी माननीय अजित दादांचे आणि सरकारचे अभिनंदन करतो.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

महोदय, महार माणसाला शाहू महाराजांनी सांगितले की, तू हॉटेल बांधून हॉटेलचा व्यवसाय सुरु कर. परंतु तो पददलित म्हणाला की, महाराज हॉटेल बांधल्यानंतर माझ्या हॉटेलमध्ये कोण येईल ? महोदय, आपल्याला आश्चर्य वाटेल त्या माणसाने हॉटेल बांधल्यानंतर



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

छत्रपती शाहू महाराज हॉटेलच्या गल्ल्यावर जाऊन बसले आणि त्यांनी हॉटेल सुरु केली. आपण शाहू महाराजांचा इतिहास वाचा.

महोदय, छत्रपती शाहू महाराजांनी पददलितांना देशात पहिले आरक्षण दिले. त्यांनी दलितांच्या मुलांना शाळेत जाण्यास सांगितले आणि त्यांची 1 रुपया फी सुध्दा भरली. महोदय, दूरदृष्टी असलेल्या राजाचे भव्य स्मारक कोल्हापूर नगरीत होत आहे. याबद्दल मी राज्यातील तमाम जनतेच्या आणि पददलितांच्या वतीने माननीय अजितदादा आणि राज्य सरकारचे अभिनंदन करतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे .....

इंदू मिलच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितले. इंदू मिलच्या बाबतीत इतक्या लवकर त्या ठिकाणी स्मारकाची संकल्पना उभी राहील याची आम्हालाही खात्री नव्हती. आमचे लोक श्री. आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली त्या ठिकाणी आत गेले. माननीय गृहमंत्री आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, तुम्ही बाहेर निघा, आम्ही तुमचा प्रश्न सोडवू. फार अवधी न जाता वर्षभरामध्ये इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकासाठी देण्याचे सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आले. जे दिव्य स्वप्न आमच्या मनामध्ये आणि विशेषत: बौध्दांच्या मनामध्ये, पददलितांच्या मनामध्ये होते, ते साकार करण्याचे काम राज्य सरकारने आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी हातामध्ये घेतले आहे. म्हणूनच "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले."

सभापती महोदय, मागच्या नागपूर अधिवेशनामध्ये दलितांच्या आणि आदिवासींच्या घरामध्ये शौचालय असलेच पाहिजे आणि तसे प्रमाणपत्र दिले तरच त्याला निवडणूक लढविता येईल अशा पध्दतीचा कायदा झाला. मी त्याला विरोध केला होता. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, किमान 5 हजार रुपये आम्हाला अनुदान द्यावे. आदिवासी आणि पददलितांना 10 हजार रुपये खर्च करुन घरामध्ये शौचालय बांधणे शक्य नाही. त्यावेळी दादांनी सांगितले होते की, 5 हजार रुपये देण्याबाबत आम्ही विचार करु. पण या अर्थसंकल्पामध्ये किमान 11 हजार रुपये शौचालयासाठी पददलितांना, आदिवासींना देण्याचा जो निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मी दादांचे अभिनंदन करतो. आम्ही 5 हजार रुपये मागितले होते, आपण 11 हजार रुपये दिले. आपण एक पाऊल पुढे टाकले आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे त्यामध्ये आणखी 4 हजार रुपये टाकलेले आहेत. असे एकूण 15 हजार रुपये दिलेले आहेत. म्हणजे दलितांबद्दल किती सहानुभूती असलेला हा अर्थसंकल्प आहे हे यावरुन दिसून येते.

सभापती महोदय, जे कधी घडलेच नाही, जे आमच्याही कल्पनेत नव्हते ते म्हणजे आमचे जे महामंडळ आहे त्याला 200 कोटी रुपये दिले जात होते त्या ऐवजी सरळ 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याचा आम्ही विचारही केलेला नव्हता. 500 कोटी रुपये देण्याचा जो निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मी दादांचे अभिनंदन करतो. सर्व महामंडळांचा आपण जो सहानुभूतीने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे .....

विचार केला. पददलित समाजातील, वंचित समाजातील शेवटच्या माणसाला त्याच्या पायावर उभे राहता आले पाहिजे, त्याला उद्योगधंदा करता आला पाहिजे, तो उद्योजक झाला पाहिजे या दृष्टीने शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचा जो निर्णय आपण घेतलेला आहे त्याबद्दल मी आपले मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, औद्योगिक संस्थांच्या बाबतीत किमान 3 लाख 11 हजार कोटी रुपये पर्यंत खर्च करण्याची राज्य शासनाने घोषणा केलेली आहे. शासनाने औद्योगिक धोरण जाहीर केलेले आहे. तरुणांना उद्योगधंदा मिळाला पाहिजे, नोकरी मिळाली पाहिजे या दृष्टीने हा एक चांगला निर्णय घेतलेला आहे. परंतु मागासवर्गीयांच्या औद्योगिक संस्थेला पतपुरवठा करण्याचे काम थांबलेले आहे त्या बाबतीत दादांनी पुढाकार घेऊन तो पतपुरवठा परत सुरु करण्याच्या बाबतीत निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो. त्यामुळे पददलित समाजातील, दलित, वंचित समाजातील मुले उद्योगधंद्याला लागतील. त्यांना किमान 1 कोटी रुपयांपासून 15 कोटी रुपयांपर्यंतचा पतपुरवठा औद्योगिक संस्थेमार्फत होत होता तो सध्या थांबलेला आहे. जे भ्रष्टाचारी आहेत, ज्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे, ज्यांनी गुन्हे केलेले आहेत त्यांना गजाआड टाकावे, त्यांची चौकशी करावी. त्यांची सीबीआय चौकशी करावी परंतु संपूर्ण समाजाला वेठीस धरु नये अशी मी दादांना विनंती करतो. पुन्हा 1 कोटी रुपयांपासून 15 कोटी रुपयांपर्यंत मागासवर्गीय औद्योगिक संस्थेचा परतपुरवठा सुरु करावा अशी विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

सभापती महोदय, पण मुंबईत एमएमआरडीएच्या सहाय्याने मोनो रेल व मेट्रो रेल येणार आहे. त्यामुळे मुंबईतील वाहतुकीचा विशाल प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे देखील त्या रेल्वेला हिरवा कंदिल दाखविण्याच्या कार्यक्रमात सहभागी होतील. त्याचबरोबर मुंबई ते बोरीवली अशी जल वाहतूक सेवा सुरु करावी अशी मी विनंती करतो.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात घरकुलांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात तक्रारी झालेल्या आहेत. दलित समाजातील लाखो लोकांनी अर्ज केले आहेत. परंतु घरकुलांची कामे सुरु होत नव्हती. मी माननीय अर्थ मंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी गेल्या 2 वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर घरकुल योजना सुरु केलेली आहे. त्यामुळे अनेक खेड्यापाड्यांमध्ये घरकुले उभी राहिल्याचे पहावयास मिळते. मंत्री महोदयांनी घरकुल योजनेसाठी भरीव निधी दिल्याबद्दल मी त्यांचे पुनश्च अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती आहे. मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळी स्थिती असल्यामुळे तेथील कुटुंबे पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकत असताना या शासनाने एकाही जनावराला मरु दिलेले नाही किंवा एकही माणूस भुकेमुळे तडफडत असल्याचे राज्यात पहावयास मिळालेले नाही. अशा प्रकारे शासन चांगले काम करीत आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने शासनाला एक छोटीशी विनंती करीत आहे. या राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या दोन जयंत्या साजऱ्या केल्या जातात. 30 मार्च रोजी साजरी करण्यात आलेली शिवजयंती पाहिली असता हृदय पिळवटून गेले. छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचा सन्मान आहे. त्याला शोभेल अशी शिवजयंती साजरी केली जात होती. पण आता एका कोपऱ्यामध्ये कोठे तरी शिवजयंती साजरी केली जाते. हे टाळण्यासाठी शिवसेना पक्ष असेल किंवा भारतीय जनता पार्टी असेल यांनी सत्ताधारी पक्षाबरोबर एकत्र बसून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती एकच दिवस साजरी करण्याबाबत निर्णय घेतला पाहिजे. ज्या प्रमाणे राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची एकच दिवस जयंती साजरी केली जाते त्या प्रमाणे शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जावी अशी मी विनंती करतो.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.......

सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित दादा पवार यांनी व माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी मांडलेला अर्थसंकल्प जनतेला केवळ दिलासा देणारा आहे असे नाही तर गोरगरीब, पददलित लोकांचे प्रश्न सोडविणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिबिंब असणारा हा अर्थसंकल्प आहे. त्यामुळे मी म्हणतो की, जे का रंजले गांजले, त्याची वंदावी पाऊले. या अर्थसंकल्पाला पाठिंबा देतो आणि येथेच थांबतो.

-------

3....

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना आज खूप पाऊले दिसत होती. त्यांनी सन्माननीय अर्थ मंत्र्यांकडे दलितांच्या शौचालयांसाठी 5 हजार रुपये मागितले होते, परंतु माननीय अर्थ मंत्र्यांनी 11 हजार रुपये दिले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यानंतर त्यांनी आणखी 4 हजार रुपये दिले. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सभागृहात जे सांगितले होते त्याची या निमित्ताने त्यांना आठवण करुन देतो. सिंचनाचे पाणी कोठे गेले असा उल्लेख झाल्यावर त्यांनी असे म्हटले होते की, या महाराष्ट्रामध्ये हगणदारी गावे झाल्यामुळे पाणी कमी पडते. इतक्या मोठ्या संख्येने शौचालये बांधून झाल्यावर उरले सुरलेले सन्माननीय सदस्य श्री.पंडागळे यांना मिळालेले आहे. त्यासाठी ते शासनाची पाऊले वंदत असतील तर मला काही म्हणावयाचे नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2013-14च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री आणि राज्याचे अर्थमंत्री यांनी राज्याचा शिलकी अर्थसंकल्प मांडला आणि महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाला दीर्घ आयाम देण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. केन्द्र सरकारकडून निगम करा व्यतिरिक्त इतर उत्पादनावरील कर, सीमा कर, सेवा कर, सहायक अनुदाने इत्यादी मिळून सुमारे 38 हजार कोटी रु. निधी अपेक्षित असतो. चालू वर्षीचा एकूण महसूल साधारणपणे 1 लाख 56 हजार कोटी रु. असून त्या तुलनेत केन्द्र शासनाचा निधी देखील मोठा आणि दखलपात्र स्वरुपाचा आहे. हा निधी योजनेत्तर आणि योजनांतर्गत स्वरुपात येत असतो. हा निधी कोणत्या योजनांसाठी आहे, तो किती कालावधीसाठी आहे, त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा किती व तो कसा खर्च करावयाचा आहे यासंबंधीचे तपशील दिलेले असतात. केन्द्र शासनाचा मिळणारा निधी व त्याचा विनियोजन कसा करावयाचा याचा तपशील अर्थसंकल्पामध्ये पारदर्शकपणे देणे आवश्यक असताना आपण त्याकडे दुर्लक्ष करीत आहोत असे दिसून येत आहे. मी शासनाला विनंती करतो की, राज्याला केन्द्राकडून जो निधी मिळतो त्याची आपल्या अर्थसंकल्पामध्ये सुस्पष्ट मांडणी होणे नितांत आवश्यक आहे. याची दखल पुढील अर्थसंकल्पाच्या वेळी घेतली तर एक चांगले पाऊल राज्य शासनाकडून उचलले जाईल असे मी मानतो.

सभापती महोदय, चालू वर्षी शासकीय कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज दर 8.6 टक्के इतका केलेला आहे. परंतु राज्यातील शिक्षण विभागातील कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीचा व्याज दर 8.6 टक्के प्रमाणे दिला गेला नाही. यासंबंधी शासन निर्णय करुन त्यासंबंधीची तरतूद करणे अभिप्रेत होते. परंतु या अर्थसंकल्पामध्ये त्याचा कुठेही उल्लेख नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या माध्यमातून मराठी माध्यमाच्या शाळा चालविल्या जातात. त्यापैकी आता जवळ जवळ 50 टक्के शाळा बंद पडलेल्या आहेत. ज्या 50 टक्के शाळा बंद पडलेल्या आहेत त्या शाळांवरील शासनाचा पैसा वाचत आहे. ज्या शाळा अस्तित्वात आहेत त्या शाळांना कंपाऊड वॉल करणे, पायाभूत सुविधा निर्माण करणे अशा प्रकारच्या गोष्टी करुन त्या शाळांचे सबलीकरण करण्याचे धोरण आखले असते





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ 17:45

श्री. भगवान साळुंखे....

तर शिक्षणाच्या दृष्टीने अधिक चांगली गोष्ट झाली असती. परंतु दुर्दैवाने तसा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये दिसून आला नाही. राज्यातील जेवढया इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत त्या शाळांना पूर्वप्राथमिकचे युनिट जोडलेले आहे. परंतु जिल्हा परिषदा, नगरपालिकांच्या शाळांना पूर्व प्राथमिकचे युनिट जोडलेले नाही. आपल्या 50 टक्के शाळा बंद पडलेल्या असतील आणि तेवढा निधी शिल्लक रहात असेल तर तो निधी प्राथमिक शाळांना पूर्वप्राथमिक युनिट जोडण्यासाठी वळता केला तर त्या शाळांचे एका अर्थाने सक्षमीकरण होईल आणि वाडया-वस्तीतील मुलांना पूर्वप्राथमिक शिक्षण देण्यासाठी राज्य सरकारने एक भरीव पाऊल उचलले आहे असे दिसून येईल.

राज्यामध्ये सुमारे 2 हजार प्राथमिक आणि अडीच हजार माध्यमिक कायम विनाअनुदानित शाळा आहेत. या शाळांचा कायम शब्द काढला. त्या शाळांचे मूल्यांकनही केली. परंतु मूल्यांकनाच्या जाचक निकषामुळे फक्त 56 माध्यमिक शाळा आणि 214 प्राथमिक शाळा निकषपात्र ठरल्या. हे निकष शिथिल करण्याची प्रक्रिया गेले सहा-सात महिने रखडलेली आहे. ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची गरज आहे. 2009च्या शासन निर्णयामध्ये असा शब्द दिलेला होता की या शाळांना मार्च 2012मध्ये अनुदान देण्यात येईल. आता मार्च 2013 संपलेला असून हे अनुदान अजून दृष्टीक्षेपात नाही. आज आझाद मैदानावर लोक उपोषणाला बसलेले असून त्यांचा उपोषणाचा 43वा दिवस आहे. त्यांच्याकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे. माननीय उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की त्यांनी या गोष्टीकडे अत्यंत जाणीवतेने लक्ष देण्याची गरज आहे. त्याच बरोबर राज्यामध्ये उच्च माध्यमिकचे वर्ग मोठया प्रमाणात दिलेले आहेत. सुमारे 10 हजार वर्ग कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांसाठी दिलेले आहेत. एमएससी बी.एड झालेला शिक्षक एम.ए.बी.एडवर्गाचे काम करीत आहे. त्यांच्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ D/ प्रथम श्री.शिगम 17:50

श्री.भगवानराव साळुंखे ...

सभापती महोदय, राज्यातील कृषि विद्यापीठाशी संलग्न असलेली 1998 कनिष्ठ महाविद्यालये आहेत. त्यांचा देखील "कायम" शब्द काढण्यात येईल अशा प्रकारचे माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी या सभागृहात वचन दिले होते. परंतु वचनाच्या परिपूर्ती संदर्भात या अर्थसंकल्पात पाऊल टाकल्याचे कोठेही दिसून येत नाही. तशा प्रकारचे पाऊल टाकण्याची गरज आहे.

सभापती महोदय, राज्यात चांगल्या तऱ्हेचा शिक्षकवर्ग पुढे यावा, शैक्षणिक गुणवत्ता वाढली पाहिजे या बाबतीत सभागृहात अनेक वेळा चर्चा होते. परंतु शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी चांगल्या प्रकारचा शिक्षक वर्ग पुढे आला पाहिजे. आज राज्यात कायम विना व अनुदानित तत्वावर डी.एड.आणि बी.एड.महाविद्यालये काढली आहेत. सांपत्तीक स्थिती चांगले असणारे विद्यार्थी त्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेत आहेत. ते शिक्षकाची नोकरी मिळावी म्हणून पैसे घेऊन नोकरी मिळवून घेत आहेत. परंतु चांगल्या गुणवत्तेचा विद्यार्थी मात्र शिक्षक होऊ शकत नाही ही कठोर वस्तुस्थिती आहे. आपण पूर्ण शिक्षणाचा ध्यास धरतो आहोत. त्या ध्यासामध्ये शासनाकडून आम्हाला अभिप्रेत आहे की, चांगले गुणवत्ताधारक शिक्षक शैक्षणिक क्षेत्रात आले पाहिजेत. तरुण विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात पुढे आला पाहिजे. त्यासाठी डी.एड.आणि बी.एड.महाविद्यालये ही 100 टक्के अनुदानित असली पाहिजे. त्या अर्थाने पाऊल टाकलेले या अर्थसंकल्पात दिसून येत नाही.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात लघु उद्योगासाठी तरतूद केली तर ती दिसून येते. परंतु त्यासाठी जे विद्यार्थी प्रशिक्षित होणार आहेत. त्यात कृषि सहायक असेल, आरोग्य सहायक असेल अशा व्यवसाय शिक्षणाचे लहान मोठे कोर्सेस आहेत. ते सुध्दा कायम विना अनुदानित तत्वावर ठेवल्यामुळे अशा ठिकाणी विद्यार्थी प्रशिक्षण घेण्यासाठी जाऊ शकत नाहीत. ज्याला आपण डिप्लोमा कोर्स, सर्टिफिकेट कोर्स, व्होकेशनल कोर्सेस म्हणतो ते कोर्सेस देखील अनुदानित करण्याची आवश्यकता आहे. शेवटी तुमच्या आमच्या महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगाराला रोजगार मिळवून द्यावयाचा असेल, त्याला चांगल्या प्रकारे उभा करावयाचा असेल तर अशा प्रकारचे शिक्षण देण्यासाठी मोठया प्रमाणात तरतूद करावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

----------

श्री.विनायक राऊत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील महागाईने त्रस्त झालेल्या, संपूर्ण अराजकांच्या मगरमिठीत अडकलेल्या आणि दुष्काळाने होरपळून निघालेल्या या महाराष्ट्रातील जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून झालेले आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावर विचार मांडताना अनेक सन्माननीय सदस्यांनी सरकारच्या नावाने चांगली सुभाषिते सांगितली. पण चळवळीच्या माध्यमातून काम करणाऱ्या गोरगरीब जनतेला असे सांगितले गेले आहे की, "उष:काल होता होता, काळ रात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली." त्यातूनच जालना येथील एका गरीब शेतकऱ्याने या दुष्काळी परिस्थितीला कंटाळून आत्महत्या केली आहे. मराठवाडयातील पहिला दुष्काळाचा बळी पडला आहे त्याचे नाव श्री.विलास राऊत असे आहे. त्याने आत्महत्या करण्यापूर्वी पत्र लिहिले आहे.दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे मी माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करु शकत नाही. माझे लग्न झालेले आहे. परंतु कुटुंबाचा उदरनिर्वाह करु शकत नसल्यामुळे व सरकारने योग्य ती मदत न केल्यामुळे मी आत्महत्या करीत आहे.

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ KTG/ 17:55

श्री.विनायक राऊत.........

हे शेतकऱ्याने जाता जाता लिहून ठेवलेले पत्र आहे. वेळेअभावी मी महाराष्ट्रातील इतर भागातील परिस्थिती मांडू इच्छित नाही. परंतु कोकणाबाबत मात्र सरकारने अर्थसंकल्पाच्या माध्यमातून निव्वळ धूळफेक करण्याचे काम केले आहे.

सभापती महोदय, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्हयामध्ये मागील दोन वर्षापासून मोरॅटोरियमचा आदेश लागू केल्यामुळे कोकणातील विकासाला कुलूप लावले गेले आहे. तेथे कोणतीही योजना अंमलात येऊ शकत नाही. पाटबंधारे, रस्ते किंवा विकासाची सर्व कामे बंद पडली आहेत. शासनाने कोकणातील पर्यटनासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. किंबहुना 500 कोटी रुपयांची तरतूद केली तरी तो निधी खर्ची पडणार आहे का?

सभापती महोदय, वायंगणी व तोंडवळी परिसरात शासनाने सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याचे जाहीर केले आहे. त्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परंतु मोरॅटोरियमचा आदेश लागू असल्यामुळे कोकणाचा संपूर्ण विकास खुंटला जाणार असेल तर हे 100 कोटी रुपये कसे खर्ची पडणार आहेत? खडी बंद, सिमेंट बंद, चिरे बंद, खोदायचे नाही, फावडा वापरायचा नाही, कुदळ वापरायचे नाही अशा पध्दतीची भूमिका घेतली जाणार असेल तर त्यातून कोकणवासीयांची फसवणूक करण्यासाठीच ही योजना जाहीर केली गेली आहे असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. तोंडवळी येथे उभारला जाणारा सी वर्ल्ड प्रकल्प हा सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनाच्या दृष्टीने अभिमान वाटावा असा प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी 250 हेक्टर जमीन अधिग्रहित करण्याचे ठरले होते. त्यानंतर या प्रकल्पाची व्याप्ती 1400 एकरपर्यंत का वाढली? 1400 एकर जमीन या प्रकल्पासाठी संपादित केली जाणार असेल तर तोंडवळीबरोबर संपूर्ण वायंगणी गाव उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. 1400 एकर जमीन घेऊन हा प्रकल्प होणार असेल तर तेथील ग्रामस्थांचा विरोध राहणार आहे. प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा मोफत द्यायला ते तयार आहेत. परंतु प्रकल्पाच्या नावावर इतर घडामोडी करण्यासाठी जमिनी घेतल्या जाणार असतील तर ते कोकणवासीय कधीही सहन करणार नाहीत.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याकांच्या विकासासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळाला 250 कोटी रुपयांवरुन 500 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. परंतु मराठी भाषेच्या संवर्धनासाठी फक्त 15 कोटी रुपयांची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत.........

तुटपुंजी तरतूद करुन मराठी माणसांच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचविण्याचे काम राज्य शासनाने अर्थसंकल्पाच्या माध्यमातून केले आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेची अवहेलना होत आहे. किंबहुना स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ विधेयकाच्या माध्यमातून राज्यात ज्या खाजगी शाळा सुरु होणार आहेत त्यात एकही मराठी माध्यमाची शाळा नसून सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. मराठी भाषा हद्दपार करायची आणि विदेशी भाषेचे चोचले पुरवायचे काम केले जात आहे. देव सोडून देवचाराला पोसायची राज्य शासनाची भूमिका महाराष्ट्राला भूषणावह नाही हे मी या निमित्ताने निदर्शनास आणू इच्छितो.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या माध्यमातून काही कोटी रुपयांची तरतूद पाटबंधारे योजनांसाठी केली आहे. परंतु मी जलसंपदा मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, कुडाळ तालुक्यातील माणगाव खोऱ्यात टाळंबा प्रकल्प 1980 साली मंजूर करण्यात आला त्यावेळी या प्रकल्पाची किंमत 70 कोटी रुपये होती. आज 2013 साली या धरणाच्या कामासाठी जवळजवळ 2000 कोटी रुपयांची तरतूद झालेली असताना प्रत्यक्ष 17 टक्केच काम पूर्ण झाले आहे. 17 टक्के काम पूर्ण झालेले असताना 2000 कोटी रुपयांची तरतूद केली जाते. परंतु मोरॅटोरियमचा आदेश लागू झाल्यामुळे संपूर्ण सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयाच्या विकासाला खीळ बसली आहे. या मोरॅटोरियम आदेशातून राज्याला सूट मिळावी म्हणून आम्ही सुप्रीम कोर्टात जाणार आहोत, चांगले निष्णात वकील नेमणार आहोत, काही अटी शिथिल करुन घेणार आहोत असे माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. 31 मार्चचा वादा केला होता. दुर्दैवाने अद्यापही सुप्रीम कोर्टात महाराष्ट्र सरकारने दावा दाखल केला आहे असे दिसून येत नाही. असेल तर मंत्री महोदयांनी त्याबाबत खुलासा करावा.

नंतर 4एन.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत ......

50 कोटी रुपये रस्त्यांसाठी असो अथवा पाटबंधाऱ्यासाठी असोत ही तरतूद करुन कोकणातील लोकांना

फसवण्याचे काम काम या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे त्याबद्दल खेद व्यक्त करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

---------------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या ) :सभापती महोदय,सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पावर विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. जागतीक मंदी आणि देशाचा घसरलेला विकासदर या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने अंदाजपत्रक तयार करणे हे अत्यंत कसोटीचे काम होते. राज्य सरकारने सर्व आवाहनांना सामोरे जात सर्व समावेशक अंदाजपत्रक सादर केल्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करते.

सभापती महोदय,महाराष्ट्र शासनाने गेल्या वर्षी मार्च अधिवेशनात क्रीडा धोरण जाहीर केले होते व तेव्हा पासून राज्याच्या क्रीडा धोरणाबाबत उत्साहाचे वातावरण होते. परंतु दुर्देवाने वर्षभर क्रीडा धोरण लाल फितीच्या कारभारात अडकून पडले आहे. क्रीडा धोरणाच्या संदर्भात सर्वसाधारण जीआर काढले गेले. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, क्रीडा धोरणासंदर्भातील सर्व जीआर तातडीने काढून नवीन वर्षात राज्याचे क्रीडा धोरण आले तर खेळाडूंना न्याय मिळू शकेल.

सभापती महोदय, काही दिवसापूर्वी खेळाडूंना लाखो, करोडो रुपयांचे बक्षिसे राज्य शासनाकडून दिली गेली त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करते. खेळाडूंना अशा प्रकारची बक्षिसे दिली गेलीच पाहिजे. परंतु जे खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे नाव घेऊन खेळतात त्यांना दोन वेळचे जेवण आणि नाष्ट्यासाठी दिवसाला फक्त 40 रुपये देतो. प्रगतीशील महाराष्ट्रातील खेळाडूंसाठी ही शोकांतिका आहे. या खेळाडूंना किमान स्पोर्टस ॲथोरीटी ऑफ इंडिया ज्या पध्दतीने भत्ता देते त्या पध्दतीने भत्ता दिला तर महाराष्ट्रातील खाशाबा जाधव यांच्या सारखे आलिम्पीक वीर निर्माण होतील.

सभापती महोदय, क्रीडा क्षेत्राचे जे प्रातिनिधिक चित्र मी मांडले आहे त्यासाठी तातडीने क्रीडा धोरण मंजूर होण्याची आवश्यकता आहे. गेल्या 3 वर्षापासून राज्यातील खेळाडू,क्रीडा संघटक, क्रीडा मार्गदर्शक यांना शिवछत्रपती पुरस्कार दिले जातात ते गेल्या 3 वर्षापासून दिले गेले नाहीत. पुरस्कार देण्यामध्ये जी दिरंगाई झाली आहे ती दूर करण्यासाठी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पुणे येथे 1 मे रोजी कार्यक्रम घेतला तर पुण्याचे सर्वपक्षीय सदस्य या कार्यक्रमाचे संयोजन करु शकू.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने राज्यातील खेळाडूंना नोकरीमध्ये 5 टक्के प्राधान्य देण्याचे ठरवले आहे. हा निर्णय चांगला असला तरी त्याचा गैरफायदा अनेक लोक घेत आहेत.

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी.....

आलिम्पीक खेळ व महाराष्ट्रातील पारंपारीक खेळ वगळता इतर कोणत्याही खेळांना या नियमांचा फायदा दिला जाऊ नये. ज्या प्रमाणे पोलीस खात्यामध्ये किंवा इतर खात्यांमध्ये खेळाडूंची मैदानावर चाचणी केली जाते त्याच प्रमाणे राज्यातील इतर खात्यांमध्ये या खेळाडूंची प्रथम चाचणी घेण्यात यावी व नंतर त्यांना जॉईंट करुन घेण्यात यावे. वृध्द आणि आलिम्पीक खेळाडूंना पेन्शन योजना समितीची गेल्या 3 वर्षापासून बैठक झाली नसल्यामुळे खेळाडू वंचित आहेत. महाराष्ट्र क्रीडा खाते मोठमोठया कुस्तींना झुकते माप देते त्याबद्दल अभिनंदन. माती घाटातील हिंद केसरी मल्लाला मानधन मिळते परंतु आलिम्पीक, आशियाई आणि राष्ट्रकुल विजेत्यांना हे मानधन मिळत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कुस्तीगीर बंडा पाटील वीराला शेतात मजूर म्हणून काम करावे लागते. त्यामुळे आलिम्पीक वीरांचा गौरव म्हणून देत असलेले मानधन यावर्षी तरी मिळावे अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, शिवछत्रपती क्रीडा नगरीत ॲथेलेटीक स्टेडियममध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने आधुनिक स्टेडियम बांधण्यात आले. त्या ठिकाणचे ॲथेलेटीकचे स्टेडियम एका रात्रीत गायब होऊन त्या ठिकाणी फुटबॉलचे मैदान करण्यात आले. फुटबॉलचे मैदान कोणी केले, हा करार कोणी केला, कोणाला हे मैदान दिले गेले व ॲथेलेटिकचे मैदान गायब होऊन फुटबॉलचे मैदान झाले यासंदर्भात माहिती देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री हे पुण्याचे पालक मंत्री असून मी त्यांच्याकडे वेळोवेळी मागणी केलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी....

सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले स्मारक यांना जोडणाऱ्या रस्त्याच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. या साठी 17 कोटी रूपये लागणार आहेत. सदर निधीचा प्रश्न आपण सोडवावा अशी माझी विनंती आहे.

मॉरिशस येथील महाराष्ट्र भवनासाठी दोन कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यासाठी आपण बजेटमध्ये तरतूद करावी. मेट्रोचा सुधारित प्रस्ताव तातडीने दिल्लीला पाठवून त्यासाठी निधीची तरतूद करून लवकरात लवकर या कामाला सुरूवात करावी एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

.......

**उप सभापती** : माझ्या समोर आता सन्माननीय सदस्य सर्वश्री नरेंद्र पाटील, प्रकाश बिनसाळे व प्रकाश शेंडगे यांची नावे आहेत. त्यांनाच मी बोलण्यास अनुमती देणार आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या अर्थसंकल्पावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

सरकारने कुठल्याही योजनेवर 100 रूपये खर्च करावयाचे म्हटले तर त्यातील फक्त 15 रूपये लाभार्थींपर्यंत पोहोचतात असे माजी पंतप्रधान श्री.राजीव गांधी यांनी आपल्या भाषणात म्हटले होते. सन 2008 ची कृषि कर्ज माफी योजना देखील अशीच होती. त्याबद्दल देखील कॅगने ताशेरे ओढले आहेत. सामाजिकदृष्ट्या मागासलेले, आर्थिकदृष्ट्या मागासलेले, दुर्बल घटक आहेत, त्यांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. आज आदिवासी व सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची सुमार अंमलबजावणी होत असून तो एक चिंतेचा विषय आहे, असे स्वयंसेवी अहवालातून देखील स्पष्ट झाले आहे.

सध्या महाराष्ट्रात होरपळणारा असा दुष्काळ पडला आहे. राज्यकर्त्यांच्या योजना चांगल्या असतात. पण त्याची नीट अंमलबजावणी होत नाही. प्रशासनामार्फत या योजनेचा फायदा लाभार्थींना पोहोचला पाहिजे, पीडितांना पोहोचला पाहिजे, दुर्बलांना पोहोचला पाहिजे तो पोहोचत नाही. दुष्काळात होरपळत असलेल्या लोकांना त्यांचा मोबदला त्यांच्या पर्यंत पोहोचेल की नाही याबाबत आत्मनिरीक्षण करण्याची वेळ आलेली आहे.

आपल्या आर्थिक पाहणी म्हटले आहे की, संयुक्त राष्ट्र संघाने या शतकासाठी काही उद्दिष्ट ठरवून दिलेली आहेत. सन 2015 पर्यंत ती उद्दिष्टे आपल्याला साध्य करावयाची आहेत. प्रचंड दारिद्र्य, भूक, निरक्षरता, रोगराई इत्यादींचे निर्मूलन आपल्याला करावयाचे आहे. त्यासोबत महिलांचे सक्षमीकरण करावयाचे आहे. पर्यावरणाचा समतोल राखावयाचा आहे. या सगळ्या विकासामध्ये आपल्याला जागतिक भागीदारी घ्यावयाची आहे हे सुद्धा त्यांनी आपल्याला ठरवून दिलेले आहे.

सभापती महोदय, हे अतिशय चांगले बजेट आहे. सामाजिकदृष्टया, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी हे खूप चांगले बजेट आहे. हे सर्व करीत असताना त्या वर्गापर्यंत या योजना पोहोचणार की नाही याचा विचार करावा लागेल. ही उद्दिष्टे साध्य करावयाची असतील तर शेती व कृषी यामध्ये सार्वजनिक भागीदारी घ्यावी लागेल. त्यासंबंधी देखील विचार करावा लागेल. सिंचनासाठी महत्तम भागीदारी कुठून उपलब्ध होत असेल तर ती सुद्धा आपल्याला बघावी लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

पिण्याच्या पाण्याचे जल व्यवस्थापन देखील आपण बघितले पाहिजे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्याच्या उत्पन्नातील नफा मधली संस्था घेऊन जाते हे सर्वांना माहीत आहे. जागतिक बाजारात एखाद्या कृषि उत्पन्नाचा भाव जास्त असेल तर त्याचा फायदा शेतकऱ्यां पर्यंत पोहोचवला पाहिजे. भाव जर कमी असेल तर शेतकऱ्यांला संरक्षण देण्याचे काम सुद्धा आपले आहे. मी देखील कास्तकाराचा मुलगा आहे. कास्तकाराच्या घरी जेव्हा कापूस असतो तेव्हा कापसाला 3900 रूपये भाव असतो. मार्च महिन्यापर्यंत तो भाव पाच हजार रूपयांपर्यंत पोहोचतो. सोयाबीनचा भाव 2700 ते 2800 रूपये असतो. आज तो भाव 3700 रूपये आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे 30 ते 40 क्विंटलच्या वर उत्पादन होत नाही. एका क्विंटलमागे हजार रूपये मधल्या व्यवस्थेकडे जात असतील तर ते चुकीचे आहे. त्यामुळेच आज कृषी उत्पन्न बाजार समितीचे विपणन कसे आहे, काम कसे चालते याची समिक्षा करण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

सभापती महोदय, शेती खर्चावर आधारित भाव ठरविण्यासाठी मूल्यमापन समिती नेमलेली आहे. तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे नेहमी या समितीच्या कामाबद्दल उल्लेख करायचे. शेतमाल समितीने केंद्रामध्ये सोयाबीनचा प्रस्तावित केलेला भाव 2900 रुपये होता. ज्या दिवशी सोयाबीन बाजारामध्ये आले तेव्हा त्याची खरेदी 2300 ते 2400 रुपयांनी करण्यात आली. तेव्हा नंतर पॅकेज देण्यापेक्षा जो फरकाचा भाव आहे तो आधीच जाहीर केला तर आपण यातून कदाचित बाहेर पडू शकतो.

सभापती महोदय, आपल्या राज्याने एकेकाळी ठिबक सिंचन पध्दतीसाठी 90 टक्के अनुदान दिलेले आहे. आता आपण 50 टक्के अनुदान देतो. मी या संदर्भात गेल्या वर्षी प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी 50 टक्के अनुदान देण्यात येते असे सांगितले होते. पण आमच्या अमरावती विभागामध्ये 40 टक्के अनुदानाऐवजी 50 टक्के अनुदान झाल्याचा जी.आर.अजून पोहोचावयाचा होता. मी नेहमी सांगतो की, प्रशासनाच्या दफ्तर दिरंगाईमुळे शासनाच्या चांगल्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत.

सभापती महोदय,. आमच्या अमरावती विभागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मागील दोन वर्षापासून मिळाली नव्हती असा आज सकाळी विषय होता. आपण चार-पाच हजार कोटी रुपयांची तरतूद केली असेल तर मग मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दोन-दोन वर्षे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी वाट हा पहावी लागते असा माझ्यासमोर प्रश्न उभा राहतो.

सभापती महोदय, अमरावती विभाग हा खारपाणपट्टा आहे. अमरावतीचा पूर्वेचा भाग, अकोल्याचा उत्तरेकडील भाग आणि बुलढाण्याचा उत्तरेकडील भाग या भागातील साधारणत: 16 ते 20 तालुके हे खारपाणपट्ट्यात येतात.

सभापती महोदय, स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या 60 वर्षाच्या काळात दुथडी भरुन वाहणाऱ्या पूर्णा नदीवर बॅरेंजेस बांधण्याचा प्रथम विचार दादांनी केला हे मला मान्य करावे लागेल. पूर्णा नदीवर पाच बॅरेजेस बांधण्याचे काम दादांनी केले. त्याठिकाणी भूसंपादनाचा विषय नाही. पूर्णा नदीवर पाच

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

बॅरेजेस आहेत. पूर्णा बॅरेज, पूर्णा नं.2 बॅरेज, गुमशी, ऊमा बॅरेज या बॅरेजेसना मागील दीड वर्षापासून एकही पैसा मिळालेला नाही. निधी न मिळण्याचे कारण कोणतेही असो, मग ते कारण रिव्हाईज एस्टीमेटचे असो, सुधारित प्रशासकीय मान्यतेचे असो वा संकल्प चित्रांचा दोष असण्याचे असो, कारण कोणतेही असो ते आम्हाला माहीत नाही, परंतु सन 2012 पर्यत या बॅरेजेसची कामे पूर्ण करावयास पाहिजे होती. कारण या बॅरेजेसची कामे 60 ते 70 टक्के पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामांसाठी दीड-दोन वर्षे पैसे देणार नसाल तर त्याचे कॉस्ट एक्स्क्लेशन होणार आहे. तेव्हा याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन आत्महत्या ग्रस्त भागाला कुठेतरी न्याय द्यावा असे मला वाटते.

सभापती महोदय, मी गेली 23 वर्षे वैद्यकीय व्यवसाय करीत आहे. मी मेडिकल ऑफीसर म्हणून काम केलेले आहे. मी आरोग्य विभागाच्या स्थित्यंतराचा एक साक्षीदार आहे. एनआरएचएमसारखी चांगली महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेवर आपण दरवर्षी 500 ते 600 कोटी रुपये खर्च करतो. इतका पैसा खर्च करुनही आपण आरोग्यामधील एकही माईलस्टोन काबीज करु शकत नसाल तर आपण स्वत:चे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. एनआरएचएमचे पैसे जिल्हापरिषदेचे सीईओ खर्च करणार असतील तर आपली अंमलबजावणी कुठेतरी चुकते आहे किंवा कसे याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी शिक्षणाबद्दल बरेच काही बोलले गेले. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी दोन आगाऊ वेतनवाढीची आवश्यकता असते. गेल्या पाच वर्षापासून शिक्षक या पुरस्काराच्या प्रतिक्षेत आहेत. आपण पाचव्या वेतन आयोगात सुध्दा दोन आगाऊ वेतनवाढी दिलेल्या आहेत. सहावा वेतन आयोग लागू झाल्यावर सुध्दा सुरुवातीची दोन वर्षे आगाऊ वेतनवाढी दिलेल्या आहेत. पण त्यानंतर अकस्मात काय घडले ते माहीत नाही. प्रत्येक खात्यात चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा आपण गौरव करतो. तेव्हा त्यांना दोन आगाऊ वेतनवाढी देण्यास काहीही हरकत नाही. मागील अधिवेशनात देखील हा मुद्दा मांडला होता. शाळांची पाणीपट्टी, नगरपालिकेचा कर, विद्यार्थ्यांना मध्यान्हभोजनासाठी शिजविण्यासाठी लागणारे सिलेंडर आपण कमर्शिअल दराने देणार असाल तर त्याबाबत समाजामध्ये चांगला संदेश जाणार नाही. आपण यातून खूप महसूल वाचविणार नाही. तेव्हा या संदर्भात देखील विचार झाला पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

आपल्या आजूबाजूच्या राज्यांमध्ये शाळांना विद्युत देयके निवासी दराने आकारली जातात किंबहुना काही ठिकाणी आकारली सुध्दा जात नाहीत. परंतु आपल्याकडे शाळांना वाणिज्यिक दराने देयके आकारली जातात. आपण डॉक्टरांच्या क्लिनीक्सना निवासी दराने देयके आकारतो. मग शाळांना वाणिज्यिक दराने का आकारता ? माझी मागणी आहे की, शाळांची विद्युत देयके निवासी दराने आकारावीत.

महोदय, चांगल्या योजना चांगल्या प्रकारे राबवावयाच्या असतील तर त्याची सुमार अंमलबजावणी करता कामा नये. काही विभागामध्ये चांगले प्रशासन चालते. खालपर्यंत ब्युरोक्रसी त्यांच्या धाकात असते आणि म्हणूनच तेथे चांगले काम होते. सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागात असेच काम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ D/ पूर्वी श्री.अजित.... 18:15

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, आपण मला माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानतो. राज्याच्या माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्प सादर करीत असताना महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना आवश्यक त्या सवलती तसेच जनावरांना चारा, पाणी या सुविधा उपलब्ध करुन देऊन हा अर्थसंकल्प सादर केला आहे. सामान्य माणसाच्या खिशाला टाच पोहचू न देता किंबहुना त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कर न वाढविता या वर्षीचा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी काही सूचना करणार आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आणि अर्थसंकल्पामध्ये नमूद करण्यात आले आहे की, राज्यात मोठ्या प्रमाणावर उद्योग व्यवसाय वाढविण्यात येणार आहेत. त्या माध्यमातून राज्यात 20 लाख रोजगार उपलब्ध होणार असून, 5 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात येणार आहे. परंतु अजूनही मला ही गोष्ट पटत नाही. कारण ही गुंतवणूक कोणत्या क्षेत्रात येणार आहे, ती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून येणार आहे काय, राज्यात कोणते उद्योग येणार आहेत या बाबत कसलेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मध्यंतरी काही माननीय मंत्र्यांच्या मुखाद्वारे सांगण्यात आले की, राज्याची औद्योगिक परिस्थिती नाजूक आहे. मोटार वाहन उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे हे उद्योग स्लॅक्स होत आहेत. महोदय, राज्यात निर्माण होणारा रोजगार आणि येणारी गुंतवणूक यांचा विचार केला तर, राज्यात कामगार कायदा राबविण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. आज कामगार विभागाकडे अपुरे कर्मचारी आहेत. उद्या रोजगार निर्माण झ ाल्यानंतर रोजगाराला संरक्षण देणे, त्यांना कामगार कायदा लागू करणे या बाबींसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग आवश्यक आहे.

आज कामगार विभागामध्ये अ-वर्गातील 26 पदे रिक्त आहेत. अपुरे कर्मचारी असल्यामुळे राज्यात रोजगार आणि गुंतवणूक आली तरी कामगार कायद्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे होणार नाही. राज्य सरकारने बिल्डर्स अँड कन्स्ट्रक्शन वर्कर्स ॲक्ट, महिलांसाठी घरेलू कामगार हे दोन नवीन कायदे केले. या कायद्याची अंमलबजावणी करण्यास सरकारने सुरुवात केली. या कायद्यांची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

अंमलबजावणी करीत असताना कामगार विभागाच्या क्षमतेवर बोजा टाकून हे कायदे लागू करणार आहोत. या निमित्ताने मी मागणी करतो की, आवश्यक त्या गोष्टी करण्यासाठी कामगार विभागाला वाढीव निधी उपलब्ध करुन द्यावा. जेणेकरुन त्या माध्यमातून स्टाफची भरती होईल आणि राज्यातील कामगारांना काही प्रमाणात तरी न्याय मिळेल.

महोदय, राज्यामध्ये अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाच्या माध्यमातून नवीन नवीन कायदे येत आहेत. एफडीआय, एफडीएल हे कायदे आलेले आहेत. तसेच ओएसडीएल, एसडीएल, फूड डिलर्स लायसेन्स, पल्सेस डीलर लायसेन्स इ. कायदे आलेले आहेत. या कायद्यांची अंमलबजावणी करावी लागत असल्यामुळे अपुरा कर्मचारी वर्ग असताना सुध्दा दररोज धाडी टाकल्या जात आहेत. परिणामी व्यापारी आपला व्यापार करु शकत नाही. अधिकाऱ्यांकडे अपुरा स्टाफ असल्यामुळे व कागदपत्रे वेळेवर न दिल्यामुळे कायद्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे या विभागात अतिरिक्त स्टाफ वाढवून द्यावा आणि त्यासाठी भरीव निधीची तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील ....

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये काही धरणे आहेत. ती धरणे जर वेळेवर पूर्ण झाली असती तर दुष्काळी भागामध्ये काही प्रमाणामध्ये पाणी गेले असते. मी उदाहरण सांगू शकतो. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाटण तालुका विभागामध्ये मराठवाडी धरण आहे. या धरणाचे पाणी उजनी परिसरामध्ये जाण्यासाठी त्या धरणाची स्थापना केली परंतु अजूनही ते धरण अपूर्ण राहिलेले आहे. त्या ठिकाणी धरणग्रस्तांचा प्रश्न आहे. संबंधित खात्यांनी पैसे दिले नाहीत म्हणून त्यांचे पुनर्वसन झ ाालेले नाही. पुनर्वसन न झाल्यामुळे त्या ठिकाणी धरण बांधू शकत नाही. ज्यावेळी त्या धरणाच्या कामाला सुरुवात केली त्यावेळी त्या धरणाची असलेली किंमत मधल्या पूर्ण बॅकलॉगमुळे आता दुप्पटीवर आणि तिप्पटीवर गेलेली असावी असे मला वाटते. अर्थखात्याने त्या धरणग्रस्तांसाठी काही तरतूद करावी जेणेकरुन त्या धरणाची जबाबदारी लवकरात लवकर पूर्ण होईल.

सभापती महोदय, गृह खात्यालाही 500 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत असे माझ्या वाचनात आले आहे. माझे असे म्हणणे आहे की, गृह खात्याला आणखी जास्त वाढीव प्रमाणात तरतूद करण्यात यावी. त्याचे कारण असे की, काही जिल्ह्यांमध्ये आणि तालुक्यांमध्ये पोलीस स्टेशनमध्ये स्टाफच नाही. मुंबईमध्ये सुध्दा स्टाफ नाही. मी ढेबरेवाडीचे छोटेसे उदाहरण देतो. पाटण तालुक्यातील परिसरात माननीय मुख्यमंत्र्यांचेही गाव आहे. कुंभारगावच्या ढेबरेवाडी पोलीस स्टेशनमध्ये 2009 साली 34 कर्मचारी होते. आज त्या पोलीस स्टेशनमधील किमान 12 कर्मचारी बदली होऊन बाहेर गेलेले आहेत. त्या ठिकाणी 10 ते 15 कर्मचारी राहिलेले आहेत. त्या 10-15 कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून तेथील नाईकबा देवस्थानाची पाहणी करणे तसेच पवनचक्क्या असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे अशा सर्व मोठ्या जबाबदाऱ्या असल्यामुळे त्या ठिकाणी वाढीव निधी देण्यात यावा जेणेकरुन वेगवेगळ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये कर्मचारीवर्ग वाढविता येईल. कर्मचारी वाढविले तर त्या ठिकाणच्या लोकांना न्याय मिळेल.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी विविध महामंडळांना जो वाढीव निधी दिलेला आहे त्याबद्दल मनापासून त्यांचे अभिनंदन करीत असताना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला 50 कोटीवरुन 200 कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करुन दिला त्याबद्दल मी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील ....

आपला मनापासून आपला ऋणी आहे. माझी माननीय अर्थमंत्र्यांना एवढीच विनंती राहील की, महाराष्ट्रात कामगार चळवळीमध्ये जर प्रामाणिकपणे काम करावयाचे असेल तर कामगार खात्याला निधी देणे फार गरजेचे आहे. त्यासाठी आपण तरतूद करावी. जर त्यांच्याकडे अधिकारी आणि कर्मचारी असतील तरच कामगार कायदा ते चांगल्या पध्दतीने राबवतील. जर कामगार कायदा सुरक्षित राहिला तरच त्याला कामगार म्हटले जाईल नाही तर त्याची गुलामासारखी परिस्थिती होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर बोलत असताना मी एकच मुद्दा मांडणार आहे. आपण ज्यावेळी राज्याचे उत्पन्न धरतो त्यामध्ये मुंबईत केबल ऑपरेटर्सकडून जे करमणूक शुल्क घेतले जाते ते शुल्क सुरुवातीला 20 रुपये होते. ते शुल्क 20 रुपयांवरुन 30 रुपये आणि त्यानंतर 30 रुपयांवरुन 45 रुपये झाले. ज्यावेळी करमणूक शुल्क 45 रुपये झाले त्यावेळी असे उत्तर दिले गेले की, मुंबईमध्ये केबल चालकांची किंवा केबलधारकांची संख्या फक्त 30 टक्के दाखविली जाते आणि त्यामुळे आम्हाला कर वाढविण्याशिवाय पर्याय नाही. संपूर्ण देशामध्ये फक्त आपल्या मुंबईमध्येच 45 रुपये कर आहे. आंध्र प्रदेशमध्ये हा कर 5 रुपये आहे. दिल्लीमध्ये 20 रुपये, गुजरातमध्ये 6 रुपये, कर्नाटकमध्ये 6 रुपये कर आहे. इतर कोणत्याही राज्यामध्ये करमणूक शुल्क नाही. 45 रुपये दिल्यामुळे केबलचा दर जास्त वाढीव दाखविला जातो. आता डिजिटल सेट टॉप बॉक्सेस लागलेले आहेत. त्यामुळे 100 टक्के पारदर्शकता आलेली आहे. एकूण किती रेव्हेन्यू येणार याचे आकडे शासनाकडे उपलब्ध झालेले आहेत.

ज्यावेळी केबलधारकांची संख्या 30 टक्के दाखविली जात होती त्यावेळी शासनाला 2 कोटी 88 लाख रुपये इतका रेव्हेन्यू मिळत होता. त्यावेळी ग्राहकांची संख्या 6 लाख दाखविली जात होती. आता ती संख्या 33 लाख दाखविली जाते. त्यामुळे जरी करमणूक शुल्क 20 रुपये केले तरी आता महिन्याला 6 कोटी रुपये रेव्हेन्यू मिळू शकतो. म्हणजे आता जरी 45 रुपयांवरुन 20 रुपये शुल्क केले तरी रेव्हेन्यूमध्ये चार पटीने वाढ होत आहे. माझी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती आहे की, आपण या दरामध्ये सवलत दिली तर आज मुंबईतील केबदलचे जे दर वाढत आहेत त्यामध्ये ग्राहकांना डायरेक्ट फायदा मिळेल. आपण जर बारकाईने पाहिले तर हा फार मोठा पैशाचा विषय नाही परंतु लोकांच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. 45 रुपयांवरुन 20 रुपये करमणूक शुक्ल केले तरी लोकांना त्याचा मोठा फायदा मिळेल. लोकांना यामध्ये कर सवलत देऊन मुंबईतील लोकांच्या केबलचे दर स्वस्त होण्यासाठी मदत करावी असे मी या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या माध्यमातून माननीय अर्थ मंत्र्यांना सुचवू इच्छितो.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, नुकतेच स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्ष संपलेले आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या "सह्याद्रीचे वारे" या पुस्तकातील काही वाक्ये मी सुरुवातीला वाचून दाखवितो. "लोककल्याणकारी राज्य निर्माण करणे व समाजातील सर्व थरातील सर्व प्रकारची विषमता नष्ट करणे, हे जे आमचे अंतिम ध्येय आहे, त्याच्याकडे जाण्याचा निश्चित असा मार्ग अर्थरचनेमुळे तयार होतो. या मार्गावरील आमच्या वाटचालीमध्ये होत असलेली प्रगती हीच आमच्या योजनेची खरी कसोटी आहे." मी सुरुवातीलाच माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे अभिनंदन करतो. त्यांनी अत्यंत समतोल असा अर्थसंकल्प जो स्व.यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत आहे अशा प्रकारचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केलेला आहे. संपूर्ण जग मंदीकडे झुकलेले आहे. अनेक अडचणी आहेत. ज्यांच्या हातांना रोजगार नाही. महाराष्ट्र भीषण अशा दुष्काळाला सामोरे जात आहे. अशा वेळेला एक समतोल अर्थसंकल्प सादर करणे हे एक मोठे आव्हान होते. ते समर्थपणे पेलल्याबद्दल मी माननीय अर्थ मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मी केवळ दोनच मुद्दे मांडणार आहे. मुंबई शहर, कोकण, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग या ठिकाणच्या पर्यटनावर शासनाने लक्ष केंद्रीत केलेले आहे. नागपूर शहरातील हजरतबाबा ताजुद्दीन ताज दर्ग्यासाठी 20 कोटी रुपये दिले आहेत, वर्धा येथील सेवाग्रामसाठी 30 कोटी रुपये दिले गेले, ब वर्गाच्या नगरपालिकेच्या हद्दीतील तीर्थक्षेत्रांसाठी 1 कोटींची तरतूद 2 कोटी केली आहे व त्यासाठी 25 कोटींची तरतूद केली आहे. पर्यटन विकास क्षेत्राच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी 285 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केला आहे. या शासनाने पर्यटनासाठी एक चांगले पाऊल उचलले आहे.

कोकणातील सी-वर्ल्ड प्रकल्पासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही तरतूद केली असली तरी हा प्रकल्प वेळेवर पूर्ण होण्यासाठी जमीन संपादन करणे ही प्रमुख गोष्ट आहे. पुढील काळात जमीन संपादनाची प्रक्रिया वेळेवर पूर्ण झाली आणि 100 कोटी रुपयांपेक्षा जास्त

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.......

निधी लागला तर पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून वाढीव निधीची तरतूद केली जाईल असा मला विश्वास वाटतो. कारण संपूर्ण महाराष्ट्रातील जनता या प्रकल्पाकडे डोळे लावून बसली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विकास होईल. आज गोव्याचा पर्यटनासाठी उल्लेख केला जातो त्याऐवजी गोव्याचे पर्यटक सिंधुदुर्ग जिल्ह्यात येतील असा मला विश्वास आहे.

सरकारकडून पर्यटनासाठी खर्च केला जातो. मग तीर्थक्षेत्र पर्यटन असेल, मुंबई शहरातील पर्यटन असेल, मुंबईत विदेशी नागरिक पर्यटनासाठी येत असतात. त्याचे थोडेसे ॲसेसमेण्ट करणे गरजेचे आहे. पर्यटनातून राज्याला महसूल किती मिळाला आहे याची आकडेवारी मला कोठेही दिसलेली नाही. व्यापारी तत्वाचा विचार करुन पर्यटनासाठी सरकार खर्च करीत असेल तर त्यातून राज्यालाही महसूल मिळाला पाहिजे. कदाचित विक्रीकराच्या माध्यमातून उत्पन्न मिळत असेल, पण त्याचे ॲसेसमेण्ट करुन माहिती घेतली तर शासनाने कोणत्या क्षेत्रात जास्त खर्च केला पाहिजे व त्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न कसे वाढेल याकडे लक्ष केंद्रित केले तर त्याचा निश्चितपणे फायदा होईल.

मी शेवटचा मुद्दा मांडणार आहे. एकात्मिक बाल विकास कार्यक्रमांतर्गत गरोदर स्त्रियांच्या पोषण आहारासाठी कार्यक्रम राबविला जात आहे. त्यासाठी 1264 कोटी 76 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. या महाराष्ट्रात अशी मुले जन्माला येतात की, ज्यांना कमी ऐकू येते. अशा मुलांवर कॉकलर इम्प्लाण्ट केले तर त्यांना नीट ऐकू येऊ शकते. हे यंत्र साधारणपणे 3 वर्षाच्या मुलांना बसविणे शक्य असते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 18:30

श्री.प्रकाश बिनसाळे...

त्यासाठी आपण योजना तयार केली तर ही मुले सर्वसामान्य मुलांप्रमाणे बोलू शकतील, वागू शकतील. ही मुले फार कमी प्रमाणात जन्माला येतात. त्यांना कॉकलर इम्प्लाण्टेशन करण्यासाठी काही इन्शुन्सर सारख्या योजनांच्या माध्यमातून आर्थिक मदत करता आली तर त्यांना ही योजना फार फायद्याची होईल. कारण अशा इम्लाण्टेशनसाठी 5-5 लाख रुपये खर्च येतो. अनेक लोकांना एवढा खर्च परवडत नाही. म्हणून राज्य सरकारने योजना केली तर या मुलांना निश्चितपणे फायदा होईल आणि एक चांगली पिढी निर्माण करण्याचे काम आपण करु शकू असा विश्वास या निमित्ताने व्यक्त करतो. या ठिकाणी अत्यंत चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे, त्याला पाठिंबा व्यक्त करुन आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

---

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांच्या भाषणानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला माननीय उप मुख्यमंत्री उत्तर देतील व त्यानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपेल. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2013-14च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2013-14चा 184 कोटी 38 लाख रुपयाचा जो शिलकी अर्थसंकल्प या राज्याचे उप मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी सादर केला त्या अर्थसंकल्पाचे मी मनापासून स्वागत करतो आणि त्यांचे अभिनंदन करतो. सर्वसमावेशकता, समता व मानवता हे महाराष्ट्राच्या पुरोगामी पंरपरेचे स्थायी भाव आहेत आणि त्याचा विचार करुन, आदर करुन, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये या राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या जन्म शताब्दी निमित्त 100 कोटीचे नियोजन गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये केले होते. तसेच छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा आदर करुन राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतरावजी नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षासाठी यावर्षी 100 कोटी रु.ची तरतूद करण्यात आली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक असेल, छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक असेल किंवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असेल या सर्व स्मारकांचा विचार करुन, राज्यातील फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार मानणा-या जनतेच्या भावनांचा आदर करुन, स्मारकाच्या बाबतीत सकारात्मक विचार करुन चांगल्या प्रकारची पावले शासनाने उचलली आहेत त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या राज्यातील दुष्काळाने होरपळणा-या जनतेला समोर ठेवून अर्थसंकल्प तयार करण्यात आला आणि 1164 कोटी रु.चे नियोजन करीत असताना 25 टक्के निधी दुष्काळी भागातील जनतेसाठी राखून ठेवण्यात आला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सिंचनाचे अनेक प्रकल्प आपल्या राज्यात सुरु आहेत. मी या ठिकाणी मुद्दाम नमूद करु इच्छितो की, म्हैसाळ योजना असेल, ताकारी योजना असेल, टेंभू योजना असेल किंवा हरफळ योजना असेल, या योजना पूर्णत्वास नेण्यासाठी पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. त्यांनी ताकारी, म्हैसाळ योजनेसाठी भरीव निधी दिल्यामुळे या योजनांचे पाणी कवठेमहाकांळ आणि जत पर्यंत पोहोचले. टेंभू योजनेचे पाणी सांगोल्या पर्यन्त जाण्याच्या तयारीत आहे. ही योजना पूर्ण होणे आवश्यक आहे. ही योजना पूर्ण झाली तर कायम दुष्काळी असणा-या तालुक्यांना पाणी उपलब्ध होईल. आज देखील आमच्या सांगली जिल्हयामध्ये 120 गावे आणि 1174 वाडयांना 191 टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागत आहे. एकूण 3,80,445 लोकांना

..2..



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 18:30

श्री. रमेश शेंडगे....

पिण्याचा पाण्याचा पुरवठा होत आहे. कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये 12 गावे आणि 103 वाडयांतील 38793 लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे. प्रत्येक तालुक्याची आकडेवारी माझ्याकडे असून त्याच्या खोलात मी जाणार नाही.

सभापती महोदय, आमच्या जिल्ह्यामध्ये 87 चारा छावण्या मंजूर झाल्या असून त्यापैकी फक्त 60 चारा छावण्या सुरु झालेल्या आहेत. 54 हजार जनावरे या चारा छावण्यामध्ये आहेत.अजून मोठया प्रमाणात छावण्या सुरु करुन जनावरांना चारा देणे आवश्यक असून त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. फुले,शाहू, आंबेडकरांच्या या महाराष्ट्रामध्ये कोणत्याही प्रकारची संकटे आली तरी राज्याच्या सन 2013-14 च्या वार्षिक योजनेचे आकारमान लक्षात घेता आकारमानाच्या 10.2 टक्के प्रमाणे 4887 कोटी 68 लाख रुपये अनुसूचित जाती उपयोजनांसाठी व 4177 कोटी 48 लाख रु. आदिवासी उपयोजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 18:35

श्री.रमेश शेंडगे...

. या राज्यावर कितीही मोठे संकट आले तरी आमच्या सामाजिक भावनांचा विचार करुन आमच्या निधीसंदर्भात कोणत्याही प्रकारची कात्री या सरकारकडून लावण्यात आली नाही, त्यामुळे या सरकारचे मी अभिनंदन करतो

सभापती महोदय, राज्यात घरकूल योजनांचे नियोजन अतिशय चांगल्या पध्दतीने केले जाते. शहरी गरिबांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी 5838 कोटी रुपये किंमतीची 1 लाख 40 हजार 736 घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. त्यात 54 हजार घरकुलांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. अशा योजनांसाठी सुध्दा केंद्र व राज्याचा हिस्सा म्हणून 730 कोटी रुपये व 220 कोटी रुपयांचे नियोजन सरकारने केलेले आहे.

सभापती महोदय, दिनांक 27 डिसेंबर, 2011 रोजी एक शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी यशवंतराव मुक्त वसाहत योजना सरकारने जाहीर केली. या योजनेच्या माध्यमातून भटक्या व विमुक्त जमातींच्या लोकांना घरकुले मिळणार होती. परंतु या बाबतीत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, आपण भटक्या व विमुक्त जमातीच्या लोकांच्या घरकुल योजनेकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या बांधवांसाठी आपण 10.2 टक्के व 9.8 टक्के निधी राखून ठेवण्याची प्रोव्हीजन केलेली आहे. या राज्यात विमुक्त व भटक्या जमातीची लोकसंख्या 17 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. म्हणून माझी विनंती आहे की, विमुक्त व भटक्या जमातींच्या लोकांसाठी, तसेच जे ओ.बी.सी.आहेत, जे तांत्रिक अडचणीमुळे अनुसूचित जाती, जमाती या प्रवर्गात जाऊ शकत नाहीत. यांच्यासाठी अर्थसंकल्पातील 5 टक्के निधी राखून ठेवण्यात यावा व तसे सरकारने नियोजन करावे.

सभापती महोदय, शेतमजुराला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन, शेळी पालन, गायी, म्हशी, यांची पैदास यासाठी 68 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, त्यामुळे मी माननीय वित्तमंत्री यांचे अभिनंदन करतो. कुक्कुटपालनामध्ये फारच अस्थिरता आहे. गायी, म्हशी पाळून दुधाचा व्यवसाय करण्याकडे लोकांचा कल कमी व्हावयास लागला आहे. मला या ठिकाणी प्रामुख्याने सांगावयाचे आहे की, शेळी-मेंढी व्यवसायाला शेती पूरक उद्योगाचा दर्जा दिला आणि त्याकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले तर निश्चितपणे फायदा होऊ शकतो. सेमी स्टॉल फिडींग हे यशस्वी होऊ

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे..

शकते या निकषापर्यंत आपण आलेलो आहोत. त्यासाठी मात्र चांगल्या प्रकारे नियोजन केले तर शेतकरी महिला वर्गासाठी चांगल्या प्रकारचा जोडधंदा निर्माण होऊन महिला शेतकऱ्यांचे जीवनमान चांगल्या प्रकारे सुधारु शकते.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात पर्यटन विकासासाठी 285 कोटी रुपयांची तरतूद आणि ऐतिहासिक किल्ल्यांचे जनत करण्यासाठी 37 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जन्मगाव चोंढी असे आहे. दोन वर्षापूर्वी चौंढी विकास प्रकल्पाचा 38 कोटी रुपयांचा आराखडा शासनास सादर करण्यात आलेला आहे. चौंढी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मारकासाठीचा 38 कोटी रुपयांचा विकास आराखडा सादर करण्यात आलेला आहे, तो आराखडा मान्य करुन त्या अनुषंगाने भरीव निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, महामंडळाची 1100 कोटी रुपयांची लाभार्थ्यांकडे असलेली थकबाकी माफ केली त्याबद्दल मी सरकारचे आभार मानतो. या सरकारने बाराबलुतेदारांचा 7/12 कोरा करुन दिला. सर्व जाती, सर्व धर्माचा विचार करुन वसंतराव नाईक विमुक्त व भटक्या जमाती विकास महामंडळाचे भाग भांडवल पूर्वी 100 कोटी रुपये एवढे होते, ते भाग भांडवल या वर्षी 200 कोटी रुपये करण्यात आले. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचे भाग भांडवल 200 कोटी रुपये होते, ते भाग भांडवल या वर्षी 500 कोटी रुपये केले आहे. ओ.बी.सी.महामंडळाचे भाग भांडवल 50 कोटी रुपये होते, ते भाग भांडवल या वर्षी 250 कोटी रुपये एवढे केलेले आहे. मौलाना आझाद महामंडळाचे भाग भांडवल 250 कोटी रुपये होते, ते भाग भांडवल 500 कोटी रुपयांपर्यंत वाढविले. स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे भाग भांडवल 50 कोटी रुपये होते, ते भाग भांडवल या वर्षी 250 कोटी रुपये एवढे केले आहे. या सरकारचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच आहे. वसंतराव नाईक विमुक्त व भटक्या जमाती विकास महामंडळ, खादी ग्रामोद्योग महामंडळ, असे अनेक महामंडळे आहेत. या महामंडळाचे अनेक जाती,धर्माचे लोक त्यामध्ये लाभार्थी म्हणून आहेत. परंतु महामंडळाकडून निधीचे वाटप करताना ज्या जातीची लोकसंख्या आहे, त्या लोकसंख्येच्या मानाने निधीचे वाटप झाले पाहिजे. तो निधी समाजातील सर्व जाती, धर्माच्या लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 18:35

श्री.रमेश शेंडगे...

सभापती महोदय, प्रादेशिक समतोल, सामाजिक समतोल साधणारा विकासाभिमुख अर्थसंकल्प सादर केल्यामुळे मी माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे अभिनंदन करुन अर्थसंकल्पाचे स्वागत करतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेची सुरुवात दिनांक 25 मार्च, 2013 रोजी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केली. दिनांक 26 मार्च, 2013 रोजी माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांच्यासह श्री.हेमंतराव टकले, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री सुभाषराव चव्हाण, जयंत प्र.पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामनाथ मोते, डॉ.नीलमताई गोऱ्हे, प्रा.सुरेश नवले या दहा सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी भाषणाला सुरुवात केली, परंतु त्यांचे उर्वरित भाषण दिनांक 1 एप्रिलच्या दिवशी म्हणजे आज सुरु केले. आजच्या दिवशी माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, दिवाकर रावते, विक्रम काळे, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री माणिकराव ठाकरे, जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे, सर्वश्री भाई गिरकर, रामदासजी कदम, मुझफ्फरजी हुसैन, राम पंडागळे, भगवानराव साळुंखे, विनायकजी राऊत, दिप्तीताई चवधरी, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री नरेंद्रजी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री प्रकाश बिनसाळे आणि रमेश शेंडगे या दोन्ही बाजूच्या 30 सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पातील सर्वसाधारण चर्चेत सहभाग घेऊन आपले विचार मांडले त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, प्रत्येक माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पातील वित्तीय बाबींवर आपली मते मांडताना मौलिक सूचना देखील केल्या आहेत. प्रत्येकाच्या सूचनेबाबत मला माझे मत मांडता येणार नाही. परंतु शक्य तेवढ्या विषयांना स्पर्श करण्याचा प्रयत्न माझ्याकडून केला जाईल एवढी ग्वाही सुरुवातीलाच मी देऊ इच्छितो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आता सभागृहात उपस्थित नाहीत. सत्ताधारी पक्षाच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पाचे कौतुक केले, विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी काही मुद्यांबाबत कौतुक केले. परंतु काही मुद्यांबाबत टीकाटिप्पणी देखील केली आहे. शेवटी ते त्यांचे कामच आहे. आज विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित असते तर मला आनंद वाटला असता. पहिल्या दिवशी त्यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभागी होताना जोरात भाषणाला सुरुवात केली होती. शेवटी आपल्याला सांगावे लागले की, माझ्याकडे बघून बोला. कारण ते सतत गॅलरीकडे बघून बोलत होते. साहजिकच त्यांच्या धर्मपत्नी गॅलरीमध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.............

उपस्थित होत्या. त्यांना दाखविण्याकरिता त्यांना तसे करावे लागले असावे. त्यांच्या दुसऱ्या दिवशीच्या भाषणामध्ये त्यांना बराच वेळ मिळाला. कारण मध्यंतरीच्या काळात सभागृहाला सुट्टी होती. माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व अनेकांनी माझ्या अर्थसंकल्पीय भाषणातील कवितेचा उल्लेख करुन विडंबन करण्याचा प्रयत्न केला, आणखी काही करण्याचा प्रयत्न केला. तो ज्याचा त्याचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये या गोष्टी घडतातच. त्याबद्दल टीकाटिप्पणी करण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणाबद्दल कवियत्री शांता शेळके यांच्या दोन ओळी उद्‌धृत कराव्याशा वाटतात.

कसं नं तेव्हा कळलं काही
की तो होता आवच सारा,
अनुभूतीच्या आधारावीण
पोकळ नुसता शब्द पसारा

अशा पध्दतीने त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी सांगितले की, लोकशाही आघाडीचे सरकार चालविताना शक्य असेल तेवढेच बोलायचे आणि जे बोलले जाते ते करुन दाखवायचे अशा प्रकारचा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री, मी आणि मंत्रिमंडळातील माझे सहकारी यांच्याकडून केला जातो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्या दिवशी सांगितले की, 1 एप्रिलला अजित पवार उत्तराचे भाषण करणार आहेत. त्यांनी एप्रिल फूल करु नये.

सभापती महोदय, राज्यातील जनतेच्या दृष्टीकोनातून एप्रिल फूल करण्याचा प्रयत्न आम्ही कधीच करणार नाही. आम्ही शाहू, फुले, आंबेडकर, यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांचे नाव घेतो. आमच्या वडिलधाऱ्यांनी देखील समाजात, राजकारणामध्ये काम करीत असताना सामाजिक बांधिलकीचे व्रत घेऊन लोकांचे प्रश्न सोडविले पाहिजेत अशा प्रकारचे मार्गदर्शन सातत्याने केले आहे आणि आम्ही त्याच मार्गाने पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतो.

नंतर 4डब्ल्यू.1...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ........

त्यामुळे एप्रिल फूल करण्याचा प्रश्नच येत नाही. मला एका गोष्टीचे समाधान आहे की, अर्थसंकल्पाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले होते की, एका नववीमधील विद्यार्थ्याने अर्थसंकल्प पाहून लगेच प्रतिक्रिया दिली. नववीतला विद्यार्थी अर्थसंकल्प पाहून लगेच प्रतिक्रिया देत असेल याचा अर्थ आमचा अर्थसंकल्प जनता तर बघतेच बघते परंतु पुढची पिढी आमचा अर्थसंकल्प बघते आहे. आम्ही राज्य कसे चालवित आहोत हे भावी पिढी सुध्दा बघत आहे त्यामुळे मला त्याचा आंनद आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी महिलांसाठी आर्थिक तरतूद वाढवली पाहिजे, आदिवासी भागासाठी विशेष लक्ष दिले पाहिजे अशी मागणी केली होती.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यानी जोशात भाषण केले होते. त्यांनी कृषी संबंधीची सर्व खाती एकत्रित करावी तसेच खार भूमी आणि बंदरे ही खाती सुध्दा एक करावीत अशी सूचना केली आहे. यासंदर्भात मला सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, शासन स्तरावर यासंदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल. एकंदरीत कृषी क्षेत्रामध्ये काम करीत असतांना बळीराजाला जेवढी काही मदत करता येईल तेवढी मदत करण्याची भूमिका आघाडी सरकारची निश्चितपणे राहणार आहे. खाती एकत्र करण्याच्या कामामध्ये सन्माननीय मंत्री महोदय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील तसेच इतर सहकार्यांशी निश्चितपणे चर्चा करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते ऊसाच्या कराच्या संदर्भात बोलले होते. मला ते ऐकून थोडे आश्चर्य वाटले. मी पुणे जिल्हयातील असल्यामुळे तावडेसाहेबांनी रसामध्ये रस दाखवण्याचे कारण म्हणजे बहुतेक नाथ म्हसोबा बहुतेक प्रसन्न झाला असावा. त्यांच्या कारखान्याचे नाव नाथ म्हसोबा साखर कारखाना आहे. आमची तिसरी-चौथी पिढी ऊसाच्या क्षेत्रात काम करीत आहे. माझ्या आजोबांनी, वडिलांनी शेती केली, मी सुध्दा शेती करीत आहे आणि पुढची पिढी सुध्दा शेती करेल.

आम्ही शेतकरी असलो तरी अर्थसंकल्प सादर करीत असतांना यंदाच्या वर्षीच्या दुष्काळाचे सावट विचारात घेतले आहे. नेहमीच दुष्काळ पडतो अशी आमच्यावर टीका झाली.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ........

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम म्हणाले "दुष्काळाचे तुम्ही नवीन काय सांगता?" माननीय रामदास कदम विधानसभेत विरोधी पक्ष नेते असल्यापासून त्यांचे भाषण ऐकण्याची मला सवयच आहे. उलट बऱ्याच दिवसांनी मला मागचे दिवस डोळयासमोर आले.

सभापती महोदय, काही झाले तरी सर्वसामान्य माणसावर कर लावायचा नाही असे आम्ही ठरवले होते. ज्यांची ऐपत आहे त्यांच्यावरच कर लावला आहे. मधील काळात केंद्रीय अर्थ मंत्री श्री. पी.चिदम्बरम यांनी अर्थसंकल्प सादर करीत असतांना ज्यांची ऐपत आहे त्यांच्यावर कर लादला. विशेषत: जे मध्यमवर्गीय आहेत, गरीब आहेत त्यांना मात्र अर्थसंकल्पातून सूट देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सभापती महोदय, 1 एप्रिल पासून नवीन आर्थिक वर्ष सुरु झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे म्हणाले की, आज नवीन वर्ष सुरु झाले असतांना अर्थसंकल्पाची चर्चा 31 मार्चच्या अगोदर केली असती तर बरे झाले असते. परंतु सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सदस्यांनी 3 दिवसाची चर्चा करण्याचा निर्णय घेतल्यामुळे आपण अर्थसंकल्पावर 3 दिवसांची चर्चा केली. प्रत्येक सन्माननीय सदस्याकडे काही महत्वाचे विषय असतात. प्रत्येक सदस्याला अर्थसंकल्पातील चर्चेमध्ये मुद्दे मांडता आले पाहिजे. त्यामुळेच आपण आज तिसऱ्या दिवशीही चर्चा घेतलेली आहे.

सभापती महोदय, खालच्या सभागृहात उत्तर दिले असले तरी या सभागृहाने जे मुद्दे उपस्थित केले ते मुद्दे खालच्या सभागृहापेक्षा निश्चितच वेगळे आहेत. अर्थमंत्री म्हणून उत्तर देत असतांना महत्वाच्या प्रश्नाला न्याय देण्याची भूमिका आघाडी सरकारची राहील अशी खात्री मी या चर्चेच्या निमित्ताने देऊ इच्छितो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी हे बजेट रेव्हेन्यू सरप्लस असले तरी लिडरशीप डेफीशिएट बजेट असल्याचे सांगितले आहे. या सर्वांनी महसूल जादा आहे हे मान्य केले आहे. यावरून महसूल जास्त आहे हे कबूल झालेले आहे.

आता उरला प्रश्न फक्त राजकीय नेतृत्वाचा. येथे पक्षीय बोलण्याचे काहीच कारण नाही. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे साहेब यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाचा प्रदेशाध्यक्ष नेमला गेलेला नाही. आणखी काही मुद्दे आहेत. खरे तर आपण सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना विश्वासात घेतले तर आपले प्रश्न लगेच सुटतील. श्री.पांडुरंग फुंडकर सारख्या चांगल्या माणसाला बाजूला ठेवले आहे. तेथे ज्यांना आणलेले आहे ते काय बोलतात ते आम्हालाच कळत नाही. आयपीएलच्या मैदानासाठी पाणी वापरू नका असा त्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. तो विषय देखील महत्त्वाचा आहे. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. मघाशी जेव्हा प्रश्न विचारला होता तेव्हा यासंबंधी राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेईल हे मी सांगितले आहे. आमच्या राष्ट्रवादी पक्षामध्ये, काँग्रेस पक्षामध्ये एकापेक्षा एक सरस असे नेतृत्त्व आहे. आमच्याकडे नेतृत्वाची वानवा नाही. त्यावर जास्त चर्चा करून मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांच्या मुद्यांचाच आज देखील येथे काही माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. काही माननीय सदस्यांनी सांगितले की, यात नवीन मुद्दे व धोरणे नाहीत. 1999 साली आघाडी सरकार सत्तेवर आले. तेव्हा पासून धोरण आणि दिशा स्पष्ट आहे. राज्याचा सर्वसमावेशक विकास व्हावा हेच ध्येय आम्ही लोकांनी अनुसरले आहे. त्या दृष्टीनेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, महिला यांच्यासाठी सातत्याने विशेष योजना आम्ही केल्या आहेत.

शेती आणि उद्योगाला चालना मिळावी म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत. या काळात आम्ही औद्योगिक व वस्त्रोद्योग धोरण आणले. क्रीडा धोरण आणले. 8 मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांसाठी नवीन धोरण आणले. आदरणीय श्री.शरद पवार साहेब

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्याचे मुख्यमंत्री असताना देशात पहिल्यांदा महिलांचे धोरण आणले. दुसऱ्यांदा महिलांचे धोरण श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना आणले होते आणि आता श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब मुख्यमंत्री असताना तिसऱ्यांदा महिलांचे धोरण आणले आहे. यासंबंधी आम्ही चर्चा केलेली आहे. महिलांचे धोरण वेबसाईटवर आहे. याबाबत कोणाच्या आणखी काही सूचना असतील तर त्या आम्ही स्वीकारणार आहोत. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड, माननीय राज्यमंत्री प्रा.फौजियाताई खान आम्ही सर्व एकत्र बसून मंत्रिमंडळामध्ये चर्चा करू. आताची परिस्थिती लक्षात घेता तसे धोरण आणण्याचा आमचा निश्चित प्रयत्न राहील.

आम्ही तर महत्त्वाचे निर्णय देखील घेतले आहेत. महिलांसाठी 33 टक्के आरक्षण असताना आम्ही 50 टक्के आरक्षण महिलांसाठी लागू करून निवडणुका देखील घेतल्या. आज सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के महिला नेतृत्त्व करीत आहेत. त्याचा रास्त अभिमान शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राला आहे. त्याचा आम्हाला निश्चितपणे आनंद आहे.

आरोग्य आणि शिक्षणावर देखील आमचा विशेष असा भर आहे. पायाभूत सुविधा देखील आम्ही निर्माण केल्या आहेत. हे सर्व करीत असताना वित्तीय शिस्त यावी म्हणून प्रयत्न करीत आहोत. अडचणी या येतच असतात. कधी दुष्काळ येतो, कधी पाऊस जास्त पडतो. अशा प्रकारच्या अनेक नैसर्गिक आपत्तींना आपल्याला सामोरे जावे लागते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

तरी देखील काही वित्तीय शिस्त असावी, ठराविक वित्तीय चाकोरीतूनच वित्त विभागाचे काम व्हावे आणि त्यातून महसूल देखील वाढावा, महसुली अधिक्य टिकावे असा आमचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, मी मागील दहा वर्षाची काही ठळक आकडेवारी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. सन 2000-2001 मध्ये राज्याचे उत्पन्न 2 लाख 43 हजार कोटी रुपये होते. ते सन 2011-2012 मध्ये 10 लाख 82 हजार कोटी रुपयांवर गेले आहे. म्हणजे 345 टक्क्यांची वाढ झालेली आहे. सन 2000-2001 मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न 28 हजार 540 कोटी रुपये होते. ते सन 2011-2012 मध्ये 95हजार 339 कोटी रुपये झालेले आहे. ही वाढ 234 टक्क्यांची आहे. साक्षरतेचे प्रमाण 76.09 टक्क्यावरुन 82.9 टक्क्यापर्यंत झाले आहे. अर्भक मृत्यूचे प्रमाण 45 टक्क्यावरुन कमी होऊन ते 25 टक्क्यांवर आलेले आहे. वीज निर्मिती 61 हजार दक्षलक्ष युनिट वरुन 90 हजार दक्षलक्ष युनिट झालेली आहे म्हणजे् यामध्ये जवळपास 50 टक्के वाढ झालेली आहे. विजेचा वापर 47 हजार दक्षलक्ष युनिट वरुन 97 हजार दक्षलक्ष युनिट झालेला आहे. म्हणजे यामध्ये 104 टक्के वाढ झालेली आहे. ऊसाचे उत्पादन 405 लाख टनावरुन 595 लाख टनापर्यंत गेले आहे, म्हणजे 80 टक्के वाढ झालेली आहे. कापूस उत्पादनात देखील 278 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. मागील दहा वर्षात रस्त्यांची लांबी देखील 25 टक्क्यांनी वाढविली आहे. ग्रामीण भागात शौचालये बांधण्याच्या कामात 14 टक्यावरुन 51 टक्क्यांपर्यंत पोहोचलो आहोत. नळपाणी पुरवठा योजनेत देखील आपण 50 टक्क्यावरुन 62 ते 63 टक्क्यापर्यंत पोहोचलो आहोत.

सभापती महोदय, या सर्व गोष्टी मागील पंधरा वर्षात आघाडी सरकारने केलेल्या आहेत. प्रत्येक वेळी समोरच्या बाकावरुन टीका केली जाते. त्यांनी कितीही टीका केली असली तरी कोण सत्य बोलते आणि कोण असत्य बोलते याचा निर्णय सर्वसामान्य जनता घेत असते. काहीजण तर रेटून पण काहीही बोलतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आदिवासी विभागामध्ये आणि अन्य काही विभागामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे सांगितले. माझी विनंती आहे की, त्यांनी त्या संदर्भातील पुरावे माझ्याकडे द्यावेत. बिनबुडाचे आरोप करुन उपयोगाचे नाही. अलीकडच्या काळामध्ये

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

माहितीच्या अधिकाराखाली कोणतीही माहिती मिळू शकते. कुणालाही पीएलआय दाखल करता येते.

सभापती महोदय,  आज येथे काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आम्ही विदर्भावर, मराठवाड्यावर, कोकणाकडे दुर्लक्ष करतो. संपूर्ण महाराष्ट्राला पुढे नेण्याचा दृष्टीकोन समोर ठेवून आघाडी सरकार काम करण्याचा प्रयत्न करीत आहे. या सरकारने विदर्भावर अन्याय केला, माननीय राज्यपालांच्या निर्देशांचे पालन केले नाही असे काही तरी सातत्याने बोलणे योग्य नाही. कारण माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार आम्ही काम करण्याचा प्रयत्न करीत असतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष चव्हाण येथे बसले आहेत. माझ्याकडे सर्व पक्षाचे सदस्य आले आणि त्यांनी मला सांगितले की, कोकणाला काहीतरी निधी दिला पाहिजे. आम्ही विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करतो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करतो. वेगवेगळ्या सूत गिरण्या आणि कारखाने काढण्यासाठी मदत करतो. परंतु त्या प्रमाणात कोकणाला मदत केली जात नाही. मंत्रिमंडळामध्ये कोकणाचा कोणताही विषय चर्चेसाठी आल्यास कोकणासाठी काही तरी दिले पाहिजे अशी माझ्यासारख्याची देखील भूमिका असते. कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब म्हणाले की, या सरकारने कोकणाला काय दिले ? रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन योजना याच राज्याच्या काँग्रेस पक्षाने कोकणाला दिली. युतीच्या काळात कोकणातील श्री.मनोहर जोशी यांना आपण मुख्यमंत्री केले. पण ती योजना आम्ही आपणास दिलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,...

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भाषणात मी व्यत्यय आणला नव्हता. माझे उत्तराचे भाषण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांना जे काही बोलायचे असेल ते त्यांनी बोलावे. कृपया माझे उत्तर पूर्ण करु द्यावे.

महोदय, कोकण रेल्वे कोणी आणली ? त्या काळात कोकण रेल्वेच्या बाबतीत खूप चर्चा झाली. त्या वेळी कॉंग्रेस पक्षाचे माननीय श्री.शरद पवार साहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी सांगितले की, कोकण रेल्वे यावी म्हणून आम्ही प्रथम निधी देतो. परंतु कोकण रेल्वे आली पाहिजे. त्यानंतर कोकण रेल्वेला चालना देण्याचे काम झाले.

महोदय, आज समोर बसलेल्या लोकांनी एन्रॉन प्रकल्पाला अरबी समुद्रात बुडविले पाहिजे अशी वक्तव्ये केली होती. 1995 मध्ये आमच्यात बंडखोरी जास्त झाल्यामुळे समोरच्या बाबांची लॉटरी लागली आणि ते सत्तेवर आले. त्यावेळी आमचे 40 बंडखोर आमदार निवडून आले होते. नाही तर हे कधीच शक्य नव्हते. युती सरकार सत्तेवर आल्यानंतर साडे चार वर्षांत त्यांना एन्रॉन प्रकल्प चांगला वाटू लागला. मुळात दाभोळचा प्रकल्प झाला पाहिजे असे आम्हाला वाटत होते. आम्ही सत्तेत असताना विरोधी पक्षाला एन्रॉन प्रकल्प हा कोकणाचे वाटोळे करणारा प्रकल्प वाटत होता. परंतु त्यांची सत्ता आल्यानंतर तुकोबाची गाथा जशी वर निघाली तसा एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रातून वर आला.

महोदय, जैतापूर प्रकल्पात केंद्र सरकारची 1 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. माननीय श्री.फुंडकर साहेब आपण त्या प्रकल्पाला पाठिंबा दिल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. परंतु तुमचे शेजारी मात्र त्या प्रकल्पाला विरोध करीत आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, या प्रकल्पाची आपल्याला काय अडचण आहे, तारापूरला अणु ऊर्जा प्रकल्प नाही काय ? कोकणातील लोकांची दिशाभूल करुन त्यांना सांगायचे की, हे सरकार तुमचे वाटोळे करायला निघाले आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, ज्या ज्या भागात जे प्रकल्प चांगले काम करण्यासाठी आणता येतील ते आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पातून 10 हजार मेगावॅट वीज निर्माण होणार आहे. काही सन्माननीय सदस्यांनी विजेचे अजून किती प्रकल्प राज्यात सुरु करणार अशी विचारणा केली. मी या बाबत सविस्तर माहिती नंतर देणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

महोदय, कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप व किरण पावसकर माझ्याकडे आले होते. त्यांनी सांगितले की, कोकणातील 4 जिल्ह्यांमध्ये आम्ही पर्यटनाचे अशा प्रकारे नियोजन केले आहे. मी त्यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी बसलो. मी माझ्या विभागाला सांगितले की, हे काम या वर्षीच्या अंदाजपत्रकात बसवावे. हे खरे आहे की, शेवटी निधी दिल्याशिवाय त्या भागाचा कायापालट होऊ शकत नाही. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे पैसे खर्चच होणार नाहीत. मला वाटते एवढे कोत्यासारखे वागता कामा नये. मला वाटते त्यांनी असे सांगावयास हवे की, सत्ताधारी आणि विरोधी पक्ष एकत्र येऊन 50 कोटी रुपये खर्च करण्याचा प्रयत्न करु. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, त्यांनी डिसेंबर पर्यंत 50 कोटी रुपये खर्च करुन दाखवावेत, मी डिसेंबरच्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून अजून निधी देण्यास तयार आहे. हे पैसे खर्च झाल्यास नागपूरच्या अधिवेशनात या कामासाठी पुन्हा पैसे देईन.

महोदय, एवढ्यावरच आम्ही थांबलो नाही. या ठिकाणी डीपीडीसीमध्ये पैसे कसे देता असे विचारण्यात आले. जिल्हा वार्षिक याजनेमध्ये निधीचे वाटप करीत असताना त्या जिल्ह्याची सर्वसाधारण लोकसंख्या पाहून 30 टक्के निधी, जिल्ह्याची ग्रामीण लोकसंख्या पाहून 20 टक्के निधी, जिल्ह्याचे क्षेत्रफळ पाहून 30 टक्के निधी आणि मानव विकास निर्देशांक पाहून 20 टक्के निधी देतो. महोदय, या ठिकाणी माननीय अर्थ राज्यमंत्री बसलेले आहेत. या पध्दतीने पुण्याला 309 कोटी रुपये जातात यामध्ये माझा काय दोष आहे ? या सूत्रापेक्षा जास्त निधी सिंधुदुर्ग जिल्ह्याला दिलेला आहे. परंतु त्यासाठी द्यायची सुध्दा दानत असावी लागते. ती दानत आम्ही दाखविली आहे. युती सरकारच्या काळात ही मंडळी 10-12 कोटी रुपये इतकाच निधी देत होते. या वर्षी सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी 95 कोटी रुपये, रायगड जिल्ह्याला 127 कोटी रुपये आणि रत्नागिरी जिल्ह्याला 140 कोटी रुपये दिले आहेत. ही रक्कम अजून वाढविली पाहिजे. परंतु आम्ही निधी देताना त्यामध्ये भेदभाव केला नाही. माननीय मुख्यमंत्री सातारा जिल्ह्याचे आहेत, अर्थ मंत्री पुणे जिल्ह्यातील आहेत म्हणून त्या जिल्ह्यांना जास्त निधी दिलेला नाही. कोणताही जिल्हा असला तरी निधीचे वाटप करताना सूत्राच्या बाहेर गेलो नाही. नागपूर ही राज्याची उपराजधानी आहे. त्या ठिकाणी सुध्दा सूत्रानुसारच निधी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. नागपूरला जवळपास

..3..



SJB/ D/ KTG/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित..... 19:00

श्री.अजित पवार....

175 कोटी रुपये दिलेले आहेत. माझा प्रयत्न आहे की, या ठिकाणी चांगल्या प्रकारे पर्यटन वाढावे. किंबहुना त्या भागात मोठ्या प्रमाणावर विकास व्हावा.

महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की पर्यटनाचा विचार करताना गड आणि किल्ल्यांसाठी काहीच तरतूद करण्यात आली नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

2013-2014 मध्ये सी-वर्ल्ड प्रकल्पाकरिता 100 कोटी रुपये प्रस्तावित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी सांगितले की, हे पैसे कशाकरिता ? आज त्या ठिकाणी पैसे देत असताना त्यांनी सांगावयाचे की, ही जागाच घेण्याची गरज नाही. पण तशी परिस्थिती नाही. जो प्रोजेक्ट आम्ही तयार करु पाहात आहोत त्यामध्ये आमचा असा अंदाज आहे की, गोव्याचे पर्यटक आपल्या सिंधुदुर्गमध्ये येतील एवढा तो चांगला प्रकल्प आहे. मला ज्यावेळी प्रझेंटेशन दाखविण्यात आले त्याचवेळी मी माझ्या अधिकाऱ्यांना सांगितले की, या प्रकल्पाला 100 कोटी रुपये द्यायचे म्हणजे द्यायचेच. जर त्यांचे 100 कोटी रुपये वेळेत खर्च झाले तर त्या ठिकाणी निश्चितपणे आणखी मदत करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे. राज्यातील गड, किल्ले यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाची तरतूद आम्ही देतो. केंद्र शासनाकडून देखील याबाबत निधी उपलब्ध झालेला आहे. किल्ले मालिका कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. शिवनेरी, तोरणा, सिंहगड, लोहगड, राजमाची या किल्ल्यांसाठी 10 कोटी रुपये तसेच रायगड किल्ल्यासाठी 4 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वायंगणी आणि तोंडवली येथे 1400 एकर जागा संपादित करावयाची आहे. त्यातून हे सर्व काम करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, हे सर्व प्रयत्न करीत असताना काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे राज्य दिवाळखोरीत चालले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, मी अतिशय जबाबदारीने सांगतो. आपण म्हणालात की, केंद्र सरकारकडे हे कर्ज मागत आहेत परंतु यांना कर्ज उभे करण्यास केंद्र शासन परवानगी देत नाही. आजच्या चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, 2013-2014 करिता केंद्र सरकारने राज्य सरकारची एकंदरीत परिस्थिती लक्षात घेऊन 48 हजार 603 कोटी रुपये इतकी कर्जमर्यादा निश्चित केली आहे. मात्र 2013-2014 करिता आम्ही 24 हजार 103 कोटी रुपये एवढेच कर्ज उभारण्याचे प्रस्तावित केलेले आहे. आमच्याकडे 48 हजार कोटी रुपयांची आमची पत असताना आम्ही फक्त 24 हजार कोटी रुपयांचेच कर्ज उभे करीत आहोत. याचा अर्थ कर्ज मिळते म्हणून आम्ही कर्ज काढण्यासाठी निघालेलो नाही.

सभापती महोदय, स्वत:चे उत्पन्न वाढविण्याचा देखील आमचा प्रयत्न सुरु आहे. मी एक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. अजित पवार ....

गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. इतर राज्यांची सुध्दा वेगवेगळ्या प्रकारची तुलना केली जाते परंतु आज देखील आपल्या राज्याच्या एकंदरीत उत्पन्नाचा विचार केला तर निश्चितपणे सेल्स टॅक्स असेल किंवा इतर वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्सेस असतील, त्याचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढविण्यामध्ये आम्ही यशस्वी झालेलो आहोत. ही गोष्ट सुध्दा मला या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला सांगावयाची आहे.

सभापती महोदय, आम्ही नुसते त्यावरच थांबलेलो नाही. 2011-2012 मध्ये विक्रीकराचे उत्पन्न साधारणपणे 50 हजार कोटी रुपये होते ते आता 59 हजार कोटी रुपयांपर्यंत नेलेले आहे आणि 2013-2014 मध्ये 65 हजार कोटी रुपये एवढे उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. राज्य उत्पादन शुल्क देखील साडेआठ हजार कोटी रुपयांवरुन साडेदहा हजार कोटी रुपयांवर आम्ही नेत आहोत. मुद्रांक शुल्क देखील साडेचौदा हजार कोटी रुपयांवरुन साडेसतरा हजार कोटी रुपयांपर्यंत नेत आहोत तसेच वाहन कर देखील 3 हजार कोटी रुपयांवरुन पावणेपाच हजार कोटी रुपयांवर नेत आहोत. ज्या ज्या ठिकाणी चांगल्या पध्दतीने कराचे उत्पन्न घेता येईल ते घेण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

सभापती महोदय, एवढेच नव्हे तर उद्योगधंदे वाढण्याकरिता, त्यामध्ये रोजगार निर्माण होण्याकरिता 2013-2014 करिता जवळपास 2500 कोटी रुपये अनुदान देत आहोत. विजेकरिता साधारणत: 4 हजार कोटी रुपयांची सबसिडी शेतीपंपाला आणि यंत्रमागाला देत आहोत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकरिता 1210 कोटी रुपयांची सबसिडी देत आहोत. सरकार चालवित असताना, दुष्काळाचे सावट असताना दुष्काळासाठी सुध्दा निधी दिला पाहिजे परंतु हा निधी देत असताना हा जो घटक आहे त्याला देखील सवलती मिळाल्या पाहिजेत अशा पध्दतीची भूमिका घेतली. असे असताना विरोधक असा आरोप करतात की, हे राज्य दिवाळखोरीमध्ये आहे. राज्याच्या वित्तीय व्यवस्थापनाची मानके ठरलेली असतात. काही राज्यांमध्ये त्यांच्या पक्षाची सुध्दा सरकारे आहेत. मध्यप्रदेशमध्ये, कर्नाटकमध्ये, गुजरातमध्ये त्यांच्या पक्षाचे सरकार आहे. त्या बाबतीत आमची कधीही चर्चा करण्याची तयारी आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

आज वित्तीय व्यवस्थापनाची मानके ठरलेली आहेत. राज्याचे कर्ज स्थूल उत्पन्नाच्या 25.5 टक्के असावयास पाहिजे. परंतु आपल्या राज्याची ही टक्केवारी 17.68 टक्के आहे. राज्यास सन 2013-14 च्या स्थूल उत्पन्नाच्या 3 टक्के कर्ज काढण्याची मुभा आहे. तथापि, शासनाने 1.7 टक्क्यापर्यंत कर्ज सीमित ठेवलेले आहे. व्याजाचे महसुली उत्पन्नाचे प्रमाण 20 टक्क्यापर्यंत असू शकते, परंतु आपल्या राज्यात हे प्रमाण 13.5 टक्के एवढे ठेवलेले आहे. याचा अर्थ हे राज्य शासनाने दिवाळखोरीमध्ये नेले आहे का ? हे चुकीचे गैरसमज पसरविण्याचे धंदे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी बंद करावेत. एखादी खोटी गोष्ट दहा वेळा सांगितली तर खोटी गोष्टही खरी वाटू लागते. तशा पध्दतीने विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, राज्याच्या योजनेच्या आकारमानासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. योजनेचे आकारमान ठरविताना उपलब्ध साधनांचा विचार करुन योजना प्रस्तावित केली जाते. यंदाचे दुष्काळाचे वर्ष आहे. त्यासाठी शासनाने निधी दिलेला आहे. यदा कदाचित त्यासाठी अधिक निधी लागण्याची शक्यता आहे असा शासनाचा अंदाज आहे. जागतिक स्तरावर व देश पातळीवरील घडामोडींचा विचार करता मी योजनेच्या आकारमानात फारशी वाढ केलेली नाही. गेल्या वर्षी योजनेचे आकारमान 45 हजार कोटी रुपये एवढे होते, या वर्षी 46 हजार कोटी रुपये एवढे योजनेचे आकारमान आहे असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी म्हटले होते. परंतु योजनेच्या आकारमानात जास्त पसारा घालणे योग्य नाही. राज्याचा आवाका पाहून व दुष्काळाचे सावट असल्यामुळे यंदाचे योजनेचे आकारमान ठरविलेले आहे. राज्याचे तीन महिन्यानंतर, सहा महिन्यानंतर किंवा नऊ महिन्यानंतर उत्पन्न वाढले तर त्याचा अंदाज येऊ शकेल. त्यानुसार पुरवणी मागण्या सादर करता येतील. राज्याची महत्वाची गरज भागविण्यासाठी पुरवणी मागण्या सादर करण्याचा निर्णय घेतला जातो आणि त्यासाठी पुरवणी मागण्या सभागृहाला सादर केल्या जातात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

श्री.अजित पवार........

अनेक सन्माननीय सदस्य इतर राज्यांच्या योजनेची तुलना आपल्या राज्याच्या योजनेच्या आकारमानाबरोबर करतात. मला त्यांना सांगावयाचे आहे की, शासनाकडून केवळ राज्याच्या उत्पन्नाचाच विचार केला जातो. त्यामुळे योजनेचे आकारमान 46 हजार कोटीपर्यंत गेलेले आहे. यामध्ये एमएमआरडीए, म्हाडा, सिडको, रस्ते विकास महामंडळ, महापारेषण, महावितरण व महानिर्मिती यांच्यामार्फत होणारी गुंतवणूक जवळजवळ 26 हजार कोटी रुपयांची आहे. ही गुंतवणूक योजनेच्या आकारमानामध्ये एकत्रित केली तर ही योजना 70 हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल. त्यामुळे राज्यातील लोकसंख्या व अर्थ व्यवस्थेच्या मानाने राज्याची योजना इतर राज्यांपेक्षा अधिकच आहे हे निश्चितपणे मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, राज्याचा योजनेतर खर्च अधिक आहे असे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विचार मांडलेले आहेत. राज्याचे योजनांतर्गत खर्चाचे प्रमाण सन 1999-2000 मध्ये 16 टक्के होते. सन 1011-12 मध्ये 26 टक्के होते. योजनांतर्गत खर्चाचे प्रमाण गेल्या 6 वर्षामध्ये 16.55 टक्के गतीने वाढलेले आहे. योजनेतर खर्चाचे प्रमाण 10 टक्क्याने वाढलेले आहे. योजनेतर खर्च विकासासाठी नसतो असा समज चुकीचा आहे. खरे तर शिक्षण व आरोग्य यासाठी अधिक खर्च केला जातो.

महसुली तुटीचा देखील येथे उल्लेख करण्यात आला आहे. त्याबाबत मी स्पष्ट करु इच्छितो की, ज्यावेळी नवीन वेतन आयोग लागू झाला त्यावेळी योजनेतर खर्चामध्ये एकदम 30 टक्क्यांनी वाढ झाली होती. ही वाढ केंद्र सरकारमध्ये व इतर राज्यांमध्येही झालेली आहे. त्यावेळी उत्पन्नामध्ये वाढ होणे शक्य नव्हते. त्यामुळे महसुली असंतुलन निर्माण होते. परंतु महसुली संतुलन ठेवण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. एका बाजूला महसूल वाढीवर बारकाईने लक्ष दिले व मुद्रांक शुल्क, विक्रीकर, उत्पादन शुल्क, मोटार वाहन शुल्क या विभागांच्या माध्यमातून उत्पन्न वाढविले आहे. दुसऱ्या बाजूला खर्चामध्ये काटकसर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही वेळा कठोर निर्णय शासनाने घेतलेले आहेत. हे निर्णय घेत असताना शेतकऱ्यांसाठी व दुष्काळ निवारणासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याचा प्रयत्न या सरकारने केलेला आहे.

3........



NTK/ ST/ D/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी ठोक तरतुदीचा उल्लेख केला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते किंवा विरोधी पक्षातील नेते असतील त्यांनी ठोक तरतूद निवडणुकीसाठी वापरली जाईल, आमदारांना फोडण्यासाठी तरतूद वापरली जाईल असा काही तरी गैरसमज करुन घेतलेला दिसतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 19:15

श्री. अजित पवार....

हा निधी विनावाटप नाही. विभागाना वाटप केलेला सर्व नियतव्यय, कामांचे आराखडे, प्रशासकीय मंजुरी, लेखाशीर्ष उपलब्ध नसणे इत्यादी कारणामुळे पूर्ण अर्थसंकल्पीत होऊ शकत नाही. असा अर्थसंकल्पीत होऊ न शकलेला एकत्रित निधी नियतव्यय ठोक तरतुदीचे लेखा शीर्ष तयार करुन नियोजन विभागामार्फत ते पुस्तिकेत दाखविले जाते. त्या दिवशी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ठोकून सांगितले की, 4950 कोटी रु.ची ठोक तरतूद आहे. ही तरतूद 3690 कोटी रु. आहे. प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्यावर या ठोक तरतुदी संबंधित विभागाला पुरवणी मागणीद्वारे केल्या जातात. एक देखील रुपया ठेवून तसाच खर्च करता येत नाही, तो पुन्हा पुरवणी अर्थसंकल्प होऊ शकत नाही. त्यामुळे हे सरकार असे करणार आहे, तसेच करणारे आहे असे जे काही सांगितले गेले याला बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात म्हणावे लागेल. आपण विनाकारण दिशाभूल करु नका. ठोक तरतुदीबाबत एकच उदाहरण सांगतो.

सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. छगन भुजबळ साहेब तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले,जयवंतराव जाधव, माणिकराव ठाकरे व अनेक सन्माननीय सदस्यांनी कुंभमेळयाच्या तरतुदीचा उल्लेख केला. 550 कोटी रु.ची तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे. जिल्हास्तरावर आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. त्र्यंबकेश्वर नगरपालिकेसाठी 40 कोटी रु. पारुंदे आणि इतर कामासाठी 10 कोटी रु., नाशिक महानगरपालिकेच्या परिसरातील कामासाठी 300 कोटी रु. तरतूद केलेली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी कुंभमेळयासाठी तरतूद केलेली नाही असा उल्लेख या ठिकाणी केला. म्हणून मी हे सांगत आहे. आम्ही केन्द्राकडे देखील जाणार आहोत. ज्या प्रमाणे आम्ही गुरु-ता-गद्दीसाठी काही प्रमाणात केन्द्राकडून निधी आणलेला होता त्याप्रमाणे कुंभमेळयासाठी निधी आणण्याचा प्रयत्न करणार आहोत. केन्द्रामध्ये देखील आमच्याच विचारांचे युपीए सरकार आहे. केन्द्रीय मंत्री मंडाळातील श्री. सुशील कुमार शिंदे साहेब, आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांची मदत घेऊन केन्द्रीय अर्थमंत्री श्री. पी.चिदम्बरम यांच्याकडून पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. 2015मध्ये हा कुंभमेळा होणार आहे. त्यासाठी 200 कोटी रु.चा राखीव नियतव्यवय दाखविलेला आहे. जर यासंबंधीचे आराखडे पावसाळी अधिवेशनामध्ये आले तर त्या अधिवेशनामध्ये ही रक्कम दाखविली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

जाईल. कामाला सुरुवात करण्यासाठी 550 कोटी रु. पुरेसे आहेत. पुढे आणखी पैसे लागले तर ते देण्याची शासनाची तयारी आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी कोरडवाहू शेतीसंबंधीचे मुद्दे मांडले. पावसामुळे शेतीवर परिणाम होतो. कृषी विकासदराचा दीर्घकालीन विचार करणे आवश्यक असते. 2012-13 या आर्थिक वर्षात 11 हजारापेक्षा जास्त गावे दुष्काळग्रस्त आहेत. त्यामुळे कृषी विकासाचा दर उणे 1.4 टक्के असला तरी तेलबिया आणि कपासीचे उत्पादन मागील वर्षापेक्षा जास्त आहे. सन 2010-11मध्ये 31 लाख टन डाळीचे उत्पादन करुन राज्याने देशात प्रथम क्रमांक पटकावलेला आहे. तसेच कृषीकर्मण पुरस्कार देखील राज्याला मिळालेला आहे. 2001मध्ये कापसाचे उत्पादन 18लाख गाठी होते. 2011-12मध्ये 75 लाख गाठी पर्यन्त कापसाचे उत्पादन केलेले आहे. मी मघाशी सांगितले की, ऊसाचे उत्पादन 500 लाख टनावरुन 850 लाख टनावर गेलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य असा आरोप करतात की, खर्च कुठे केला. साडेतीनशे लाख मे.टनाने ऊसाचे उत्पादन वाढले. याचा अर्थ पाणी निर्माण झालेले आहे. पाण्यामुळेच ऊसाची लागवड होते. बिनपाण्याने ऊस होत नाही. कोकणामध्ये ऊस नाही. त्यामुळे त्या पिकाबाबत माहिती नसेल....(अडथळा) कोकणामध्ये पाणी आहे. पण काहींच्यात पाणी नाही त्याला आम्ही काय करणार ? गुहागरचा निकाल आपण पाहिला नाही काय ? (अडथळा)...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, त्याच बरोबर फलोत्पादनामध्ये देखील द्राक्षे, चिक्कू, डाळिंब (अडथळा) हे राज्य युतीच्या हातात साडेचार वर्ष होते.

श्री.रामदास कदम : आम्ही युतीच्या काळात कोकणात 35 पाटबंधाऱ्यांची कामे केली आहेत.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, साडेचार वर्षे यांच्या हातात सरकार होते. महाराष्ट्रासाठी युती सरकारने काही केले असते तर युतीला पुन्हा जनतेने निवडून दिले असते. आपल्याला 1999 ला बसविले, 2004 तसेच 2009 मध्ये आपल्याला बसविले. माननीय श्री.भास्कररावांनी सांगितले की, युती सरकारने साडेचार वर्षात संपूर्णपणे वाट लावली. त्यामुळे ते आमच्याकडे आले आहेत. श्री. भास्कर जाधव निवडून आले, ते गुरुंना पाडून आले आहेत.

श्री. रामदास कदम : मला विधानसभेच्या निवडणुकीत श्री.नातू यांनी हरविले.

श्री.अजित पवार : ठीक आहे. आपल्याला कोणी तरी हरविले. सभापती महोदय, ज्यावेळी पाऊस चांगला पडतो, त्यावेळी कृषि विकासाचा दर 10 टक्क्यांपर्यंत असतो. हाच दर टंचाईमध्ये उणे पर्यंत खाली आलेला आहे. हा दर वाढवला पाहिजे हे आम्हाला देखील कळते. कारण जवळपास 83 टक्के कोरडवाहू शेती आहे. तेथे त्या प्रमाणात पैसे खर्च होत नाही आणि 17 टक्के बागायती शेतीला मात्र पैसा मोठ्या प्रमाणावर खर्च होतो ही आमची देखील खंत आहे. आता कोरडवाहू शेती नरेगाच्या माध्यमातून शेततळे, आरकेव्हीवायच्या माध्यमातून सुक्ष्म सिंचन, सिमेंट नालाबांध या कार्यक्रमांतर्गत कोरडवाहू शेतीसाठी निधी उपलब्ध होतो आहे. या योजनांना पूरक म्हणून मी अधिकचा निधी गत वर्षी आणि या वर्षी अर्थसंकल्पामध्ये दिलेला आहे. तथापि कोरडवाहू शेतीसाठी अधिक मदत करावयाची आहे याची जाणीव सर्वांनाच आहे. यासाठी अधिकचा निधी देण्याचा प्रयत्न सरकारकडून राहील.

सभापती महोदय, विभाग निहाय प्राथम्य नाही. सेक्टरल प्रायारिटी नाही अशा पध्दतीने टीका या ठिकाणी झाली. कोरडवाहू शेतीच्या संदर्भात मी आत्ताच माहिती दिली आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला आहे की, मुंबई शहरासाठी काय दिले ? जेएनयूआरएम त्यात यूआयडीएसएमटी, आयएचएसडीपी त्याचबरोबर बीएसयूपी या सारख्या योजनांच्या माध्यमातून शहरी भागामध्ये मोठया प्रमाणात शासन

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

गुंतवणूक करीत आहे. नगरोत्थान ही योजना राज्य शासनाची आहे. या योजनेसाठी 650 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या व्यतिरिक्त जकात ऐवजी स्थानिक विकास कर लागू केला. जगात आपल्याकडेच जकात आहे. त्यावेळी सांगितले गेले की, जकात कर काढा आणि दुसरा कर लावला तरी चालेल. आता एलबीटी लावला आहे. एलबीटी का लावला म्हणून एलबीटीच्या नावाने बंद सुरु झालेला आहे. एकीकडे म्हणावयाचे की, जकात कर काढा आणि दुसरीकडे मात्र विरोध करावयाचा हे बरोबर नाही. शेवटी जकातीचे उत्पन्न कमी झाल्यावर दुसरे काही तरी उत्पन्न या महानगरपालिकांना द्यावयास नको काय ? व्हॅटच्या संदर्भात देखील चाललेले आहे. त्याच वेळी आम्ही कबूल केले होते की, आम्ही एलबीटी लावणार आहोत आणि तो आम्ही लावलेला आहे. या बाबतीत कोणी उपोषण वगैरे करु नये. सध्या आम्ही एलबीटी लावणारच आहोत. यात एलबीटीचे उत्पन्न बघून त्याच्या नंतरच्या काळात आणखी काही करामध्ये बदल करण्याचे काम केंद्र स्तरावर चालू आहे. साधारणत: एकच कर कशा पध्दतीने लावावयाचा यासंबंधी विचार चालला आहे. अलिकडे ज्या महानगरपालिका झाल्या आहेत, त्यांना अधिकचे अनुदान देऊन महत्वाच्या सुधारणांचे मार्ग प्रशस्त करीत आहोत.

सभापती महोदय, वस्त्रोद्योग धोरणाच्या माध्यमातून राज्यात वस्त्रोद्योग आणून रोजगार निर्मितीचा प्रयत्न सरकारचा चाललेला आहे. नवीन औद्योगिक धोरणाचा देखील मी उल्लेख मघाशीच केला आहे. नवीन औद्योगिक धोरणाच्या बाबतीत परवा नागपूर येथे एक कॉन्फरन्स झाली. मिहान प्रकल्पासाठी 200 कोटी रुपये अधिकची तरतूद दिली आहे. नागपूर येथील मेट्रो, पुणे-पिंपरी-चिंचवडची मेट्रो आणि मुंबई शहरातील मेट्रो यांच्या कामासाठी तरतूद करण्याचे कबूल केलेले आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक यासाठी जो काही निधी लागेल तो निधी देण्याचे सरकारने कबूल केले आहे. या बाबतचे प्लॅन एस्टीमेट माझ्या समोर आल्याशिवाय निधीची तरतूद कशात करावयाची असा माझ्या समोर प्रश्न आहे. परंतु यासाठी निधीची तरतूद करण्यासाठी राज्य सरकार अतिशय पॉझिटिव्ह भूमिका घेईल. त्यामुळे या बाबतीत कोणी काळजी करण्याचे कारण नाही.

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

सभापती महोदय, शिक्षण आणि आरोग्यावर देखील मोठया प्रमाणात निधी खर्च केला जात आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार आणि दर्जा ऊंचावण्याचा प्रयत्न होत आहे. अनेक शिष्यवृत्ती योजनांसाठी निधी दिला जात आहे. आधार कार्ड गृहित धरुन शिष्यवृत्तीची रक्कम दिली जात आहे. योजनेमध्ये कॉम्प्युटरायझेशन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ई-गव्हर्नन्स प्रणाली उभी करण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे. त्या संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे. जरुर संबंधित अधिकाऱ्यांना काही अडचणी येत असतील तर वित्त विभागामार्फत त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, आरोग्य विभागांतर्गत एनआरएचएमच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्य सुविधांमध्ये मोठया प्रमाणात सुधारणा झालेल्या आहेत. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना आठ जिल्हयांपुरती मर्यादित होती. आता ही योजना संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आलेली आहे. बालविकास कार्यक्रमांतर्गत महिला व मुलांसाठी देखील भरीव तरतूद केलेली आहे. तरुण आणि तरुणींना उच्च शिक्षणाची संधी देण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. राज्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीकोनातून अनेक योजना असून माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी सांगितल्याप्रमाणे या अर्थसंकल्पात त्याचे प्रतिबिंब दिसत आहे.

सभापती महोदय, प्रादेशिक असमतोलाबाबत काही माननीय सदस्यांनी भाष्य केले आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेश, 2011 या आदेशाच्या नियम 7 नुसार एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या खर्चाचा विचार करुन विकास मंडळ क्षेत्रावरील विकास खर्चासाठी निधीची समन्यायी वाटप व्हावे असे माननीय राज्यपाल दरवर्षी निदेश देतात. त्यांनी दिलेल्या आदेश आणि सूत्रानुसार त्या तीनही प्रदेशांच्या विकास क्षेत्रासाठी नियतव्ययाचे वाटप करण्यात येते. प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात आर्थिक अनुशेष पूर्ण झाला असून भौतिक अनुशेष काही ठिकाणी शिल्लक आहे हे नक्की मी मान्य करतो. राज्यातील काही जिल्हे मागे आहेत, त्याप्रमाणे केंद्र शासनाच्या बीआरजीएफ कार्यक्रमानुसार कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्हयांसाठी मानव विकास निर्देशांकानुसार काम हाती घेतले आहे. त्या दृष्टीने समतोल मार्ग काढण्यासाठी आजच डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली असून समितीच्या अहवालानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/पूर्वी श्री.गिते 19:25

श्री.अजित पवार........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हिरानंदानी बिल्डर, वर्ल्ड ट्रेड सेंटर इमारतीचे भाडे, बोगस रेशन कार्ड, ऊस मळीचे उत्पादन आणि निर्यात याबाबतचे मुद्दे उपस्थित केले आहेत. हे मुद्दे संबंधित विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवरील चर्चेच्या वेळी उपस्थित करण्यात आले तर त्याबाबत अधिक समर्पक उत्तरे मिळू शकतील. तरी देखील मी उप मुख्यमंत्री या नात्याने या संदर्भात लक्ष देईन.

सभापती महोदय, वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याच्या संदर्भात केवळ घोषणा झालेली नसून घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडून प्रस्तावात ज्या काही सुधारणा करावयाच्या असतात किंवा त्रुटींची पूर्तता करावयाची असते ती पूर्ततेची कार्यवाही या सर्व वैद्यकीय महाविद्यालयांबाबत सुरु आहे. लवकरच ही कार्यवाही कशी पूर्ण होईल या दृष्टीने निश्चितपणे राज्य सरकारकडून प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी 6000 कोटी रुपये व्यवसाय कराच्या रुपाने शासनाच्या तिजोरीत जमा होतात असे भाष्य केले आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, साधारणपणे 1870 कोटी रुपये व्यवसाय कराच्या माध्यमातून गोळा होतात. प्रतिवर्षी आवश्यकतेनुसार रोजगार हमी योजनेसाठी जो काही निधी लागतो तो या कराच्या माध्यमातून दिला जातो. सन 2012-2013 मध्ये 1150 कोटी रुपये या योजनेसाठी दिले गेले आणि सन 2013-2014 मध्ये देखील आवश्यक तेवढा निधी दिला जाईल. नरेगा योजनेंतर्गत राज्यात कामे सुरु आहेत. या योजनेमधून पूर्वी विहिरीसाठी 1 लाख रुपये अनुदान दिले जात होते, त्यामध्ये वाढ करुन ती रक्कम 2 लाख रुपये आणि नंतर 3 लाख रुपये करण्यात आली. ही रक्कम वाढविण्याचा प्रयत्न आहे.

नंतर 5एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .........

अशा पध्दतीने आपण बदल करीत आहोत. धर्माधिकारी स्मारकाच्या संदर्भात मी माहिती दिलेली आहे. परंतु डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांचे चिरंजीव श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी पत्र दिले असून त्यासंदर्भात चर्चा करुन निर्णय घेतला जाईल. सन 2013-14 च्या वार्षिक योजनेत यासंदर्भात 4 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शेवटी यामध्ये आपल्या सर्वांचे मत जाणून घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय,स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी करिता 100 कोटी रुपयांची तरतूद कृषी क्षेत्रासाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी खर्च करावी अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी केली आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी असून त्यासंदर्भात सर्व मान्यवरांशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल. शेवटी हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून नाईक साहेबांची ओळख आहे. नाईक साहेबांच्या जन्मशताब्दीला 100 वर्षे होत असतांना त्या काळात त्यांनी केलेले काम लोकांच्या स्मरणात राहील अशा पध्दतीचा निर्णय घेतला जाईल एवढे मी या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तुम्ही विजेच्या संदर्भात नक्की किती प्रोजेक्ट करणार आहात ? विजेचे नवीन नवीन प्रकल्प आलेच पाहिजे. दाभोळचा 1960 मे.वॅटचा प्रकल्प गॅसमुळे पूर्णपणे बंद आहे. आपली विजेची मागणी 15 हजार असेल आणि 15 हजार मे.वॅट विजेचे प्रकल्प पूर्ण झाले म्हणून पुढचे प्रकल्प करावयाचे नाहीत असे करुन चालणार नाही. परळी औष्णिक वीज केंद्रातून 500 मे.वॅट पेक्षा अधिक वीज निर्माण होत असते परंतु पाणी नसल्यामुळे हा प्रोजेक्ट पूर्णपणे बंद पडला आहे. वींड मिलच्या माध्यमातून वारा असेल तरच आपल्याला वीज मिळते. ज्यावेळेस साखर कारखाने सुरु असतात त्याच वेळेला आपल्याला साखर कारखान्यांच्या माध्यमातून वीज मिळत असते. राज्यातील जनतेला 12 महिने, 24 तास वीज उपलब्ध करुन द्यावी लागत असते. केवळ न्युक्लीअर किंवा गॅसवर वीज तयार करुन चालत नाही. त्यामुळे काही प्रकल्प हैड्रो, काही प्रकल्प थर्मल तर काही प्रकल्प कोजेन प्रकल्प उभे करावे लागतात. सोलरच्या प्रकल्पाचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. धुळे येथे सौर ऊर्जेच्या माध्यमातून 100

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .........

मे.वॅट वीज निर्मिती सुरु झालेली आहे. अशा प्रकारे सौर ऊर्जेचे प्रकल्प हातामध्ये घेतले जात आहेत. या राज्याला भारनियमनाला तोंड द्यावे लागणार नाही असे शासनाचे धोरण असून जे ग्राहक वीज बिल वेळेवर भरतात त्यांना वीज बरोबर दिली जाईल असा आमचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सोने, चांदी यांना कर कशाला लावला असा प्रश्न उपस्थित केला आहे. सोने, चांदी, हिरे आणि मौल्यवान धातूपासून बनविल्या जाणाऱ्या दागिन्यांवर 1 टक्क्याऐवजी 1.10 टक्के कर लावला आहे. 1.10 टक्के करामुळे 175 कोटी रुपये कर मिळणार आहे. हा कर फक्त एक वर्षासाठीच लावण्यात आलेला आहे. हा जो कर लावलेला आहे त्यासंदर्भात कोणी-कितीही सांगितले तरी मागे घ्यावयाचा नाही असे मी ठरवले होते. ऊसाचा कर 3 टक्के ऐवजी 5 टक्के लावण्यात आल्यामुळे त्याच्याही माध्यमातून शासनाला काही कोटी रुपये मिळणार आहेत. सिगारेटवरील कर 20 टक्क्यावरुन 25 टक्के केला आहे. ज्यांना व्यसने आहेत त्यांच्याकडून कर घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. जे गरीब आहेत त्यांना मात्र सवलती देण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पाच्या माध्यमातून झालेला आहे.

सभापती महोदय, महिलांसाठी निधीची चांगल्या प्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे. शैक्षणिक संस्थांना वेतनेतर अनुदान देण्याचाही निर्णय घेण्यात आलेला आहे. पूर्वीचे पैसे दिले जावे अशी कोणी तरी मागणी केली असून पूर्वीचे पैसे दिले जाणार नाही. 1 एप्रिल पासून हे पैसे दिले जातील. मागचे काहीच पैसे मिळणार नाही. त्यामुळे या पैशांसाठी कोणी उपोषण करु नका, संप करु नका, काहीही करु नका, त्याचा काही एक उपयोग होणार नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

शैक्षणिक संस्थाना, मान्यताप्राप्त शाळांना अनुदान देण्यासंबंधी प्रश्न विचारण्यात आले आहेत. तसेच काही महामंडळासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे साहेबांनी प्रश्न विचारला आहे.

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आता शिक्षकांना आवाहन केले होते तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे आपण सभागृहा बाहेर होता.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे साहेबांनी सांगितले की, काही महामंडळांना निधी वाढवून देण्यात आलेला आहे. चौंढीबद्दल जी काही रक्कम लागेल ती रक्कम देण्याची राज्य शासनाची निश्चितपणे तयारी आहे. शेळी-मेंढी महामंडळाबाबतच परवा मला श्री.रामराव वडकुते साहेब भेटले होते. तसेच सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे देखील भेटले आहेत. शेळी-मेंढी महामंडळाला निधी वाढवून देण्यासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी देखील मागणी केली आहे. ज्याप्रमाणे इतर महामंडळांना निधी वाढवून देण्यात आला आहे त्याप्रमाणे या महामंडळाला देखील काही प्रमाणात निधी वाढवून दिला जाईल ही खात्री या चर्चेच्या निमित्ताने मी देऊ इच्छितो. अनेक मुद्दे आहेत त्या सर्व मुद्यांचा परामर्श मी घेत नाही.

क्रीडा धोरणासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती दीप्ती चवधरी यांनी काही मुद्दे मांडले आहेत. युवा धोरणासंबंधी देखील काही सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत. क्रीडा व युवा धोरणासंबंधी पुढच्या पुरवणी मागण्यामध्ये सहानुभूतीने विचार केला जाईल. त्यांना अधिकच तरतूद करून तरूणांना राज्य सरकारकडून जे काही सहकार्य अपेक्षित आहे त्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकारकडून घेतला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब आपण म्हणाला कोकणासाठी काहीच देत नाही. काजूच्या बोंडासाठी, जांभुळासाठी, आंब्यासाठी काहीच देत नाही, असे देखील आपण सांगितले आहे. मी आज आपल्याला सांगतो की, कोकणासंबंधातील जो काही प्रोजेक्ट करायचा आहे तो आमच्यापुढे सादर करावा. त्याला राज्य सरकारकडून 1:9 भागभांडवल ताबडतोब दिले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

जाईल. मात्र, तो प्रस्ताव व्यवस्थित असला पाहिजे. तो प्रोजेक्ट तेथे चालला पाहिजे. नुसता उभा करून चालणार नाही. कोणीही प्राजेक्ट आणावा. कुठल्याही पक्षाच्या सदस्यांनी आणावा. हा अमक्या पक्षाचा आहे, तो तमक्या पक्षाचा आहे असा भेदभाव केला जाणार नाही. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे येथे कुठलाही प्रकल्प आणावा. आपण जांभळावर प्रकिया करणारा उद्योग आणला तरी चालेल. जांभळापासून वाईन बनविण्याचा प्रकल्प आणला तरी चालेल. पण जो काही प्रकल्प कराल त्याचे उत्पादन बाजारात विकले गेले पाहिजे. असा प्रोजेक्ट तेथे असला पाहिजे. एवढीच माझी विनंती आहे.

येथे सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे मांडलेले आहेत. अर्थसंकल्पाच्या उत्तराच्या माध्यमातून मला राज्यातील जनतेला हेच सांगायचे आहे की, महाराष्ट्राची विविध क्षेत्रातील आघाडी कायम राखण्यासाठी आघाडी शासन प्रयत्नशील आहे. सध्या राज्या समोर दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. या संकटावर मात करून जनतेला दिलासा देण्याची ताकद आघाडी शासनामध्ये आहे. कुठल्याही टीकेची पर्वा न करता बळीराजाला हात देण्याचा प्रयत्न आम्ही करत राहणार आहोत. या टंचाईवर मात करून बळीराजाला सुगीचे दिवस यावेत यासाठी शासन करीत असलेल्या प्रयत्नांना निश्चितपणे यश मिळेल, याची मला खात्री आहे.

मधल्या काळामध्ये आम्ही दुष्काळासंबंधी, चाऱ्या छावण्यासंबंधी चर्चा केली. अजून काही दिवस अधिवेशन चालणार आहे. याबाबत अजूनही काही नवीन निर्णय घ्यावे लागतील. आता त्या भागातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन राज्य सरकार त्यासंबंधातील महत्त्वाचे निर्णय घेईल अशा प्रकारची खात्री या चर्चेच्या निमित्ताने मी राज्याला देऊ इच्छितो. अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या निमित्ताने गेले तीन दिवस वेगवेगळे मुद्दे मांडण्यात आले आहेत. त्यातील बहुतांशी विषयाला मी स्पर्श करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे केलेल्या सूचनांबद्दल मला आदरच आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना आम्ही निश्चितपणे विचारात घेणार आहोत. माझी सभागृहाला विनंती आहे की, मी मांडलेला अर्थसंकल्प सभागृहाने मंजूर करावा.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शिवशाहीच्या काळात कोकणामध्ये 35 पाटबंधारे मंजूर करण्यात आले होते. त्याबाबत निधीची तरतूद करण्यात येणार आहे काय ? सन 1999 पासून आतापर्यंत म्हणजे चौदा वर्षाच्या काळात कोकणात एकही पाझर तलाव झालेला नाही. तेव्हा कोकणामध्ये पाझर तलाव होण्याच्या दृष्टीने कोणता निर्णय घेणार आहात ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, माननीय राज्यपाल महोदयांनी ज्या काही गाईड लाईन्स आखून दिलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालन करुन कोकणाला जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न राहील.

**उप सभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आता संपली आहे.

सभागहाची बैठक आता स्थगित होत आहे.

मंगळवार, दिनांक 2 एप्रिल, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीत सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत म.वि.प. नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाचा प्रलंबित प्रस्ताव घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ सायंकाळी 7 वाजू□41 मि□िटां□, मंगळवार,दि□ां□ 2 एप्रिल, 2013 रोजीच्या स□ाळी 10.00 वाजेपर्य□ स्थ□ि झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही